म. ग्रं. सं. ठाणे.
विषय जैन-प्रकाश
सं. क्र. ७३८७

REFBK-0027418

पर्यटनावरील संग्राहयग्रंथ

# प्रवासी मित्र

—खंड ४ था —

(गोवा—दीव—दमण)

लेखक

नारायण ऊर्फ प्रमोद चितारी
(जी. डी. आर्ट., ए. एम्.)

**मुखपृष्ठ**
श्री. परशुराम नाबर
(जी. डी. आर्ट., ए. एम्)

**छायाचित्रे व मलपृष्ठ**
श्री. नारायण ऊर्फ प्रमोद चितारी

**प्रथमावृत्ती**
२८ जानेवारी, १९९४
मूल्य १५०/– रुपये

**मुद्रक**
वैभव प्रिंटर्स ॲण्ड असोसिएटस्
अल्मेडा कंपाऊंड, प्रतिक्षा नगर,
सायन, मुंबई ४०० ०२२.

**प्रकाशक**
चितारी ट्रॅव्हल्स ॲन्ड टुर्स
भाईंदर पूर्व. जि. ठाणे.

किंवा

**चितारी ट्रॅव्हल्स ॲन्ड टुर्स, कबुतरखान्यासमोर**
जैनमंदिराजवळ, मुंबई, ४०० ०२८.
फोन – ४३० ७७४४/ ४२२ ५८६५
८१९ ४७३४/ ८७४३९७८

– सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन –

# अर्पण पत्रिका



श्रीमती उमाबाई स. चितारी

ज्यांनी शिकस्तीचे प्रयत्न करून माझ्या शिक्षणाची जबाबदारी सांभाळली आणि जीवनाला आकार दिला त्या चुलत आजीच्या पवित्र चरणी विनम्रपणे हे चौथेपुष्प अर्पण.

# परिचय

माझे मित्र आणि चितारी ट्रॅव्हल्स या पर्यटन क्षेत्रातील नामवंत कंपनीचे चालक श्री. प्रमोद चितारी यांच्या 'प्रवासी मित्र' या ग्रंथ मालिकेतील चौथा खंड गोवा–दीव–दमण या प्रदेशावर प्रसिद्ध होत आहे. या मालिकेतला पहिला खंड काश्मिर आणि उत्तर भारत या प्रदेशावर प्रसिद्ध झाला. (१९८५). दुसरा खंड संपूर्ण दक्षिण भारतावर आहे. (१९९१) तिसऱ्या खंडात ओरिसा, प. बंगाल आणिनेपाळ हे प्रदेश समाविष्ट झाले आहेत. (१९९३) आता चौथा खंड गोवा–दीव–दमण या भूभागाचा परिचय करून देत आहे. हा खंड वाचकांच्या हाती देताना मला अतिशय आनंद होत आहे. याचे कारण असे की, या देशातील मला खूप आवडणारा भूप्रदेश कोणता असेल तर तो गोवा आणि गोव्याला लागून असलेला दक्षिण कोकणचा भाग! मालवणी मुलुख म्हणून ओळखला जाणारा दक्षिण कोकणचा भाग हा गोमंतकाचाच एक तुकडा आहे. भाषेतले बारकावे थोडे सोडले तर या दोन भूभागात भौगोलिक किंवा सांस्कृतिक दृष्ट्या फारसा फरक नाही.माझ्या आईचे माहेर गोव्यात असल्यामुळे माझा जन्म गोव्यात झाला. थोडेसे बालपण गोव्यात गेले. उरलेले बालपण आणि थोडे शिक्षण जवळच्याच आरवली–शिरोडे या गावी झाले. पण आरवली आणि गोवा या दरम्यान आमचे सतत दळणवळण चालू असे. आरवली हे माझे गाव असले तरी गोव्याबद्दलही तेवढीच आत्मियता वाढीस लागली. वर्षातून एक–दोनदा मी आरवलीला माझ्या घरी जातो आणि त्याच वेळी तेथून गोव्यातही फिरून येतो.

अशा माझ्या आवडत्या गोव्यावर श्री. प्रमोद चितारी यांचा हा ग्रंथ निघत आहे, हे पाहून आनंद वाटला. गोवा हा विलक्षण सुंदरतेने नटलेला भूप्रदेश आहे. काश्मिर हा आपल्या देशाचा अतिसुंदर भाग समजला जातो. पं. जवाहरलाल नेहरू यांनी केरळ प्रदेशाचे वर्णन 'दक्षिणेतील काश्मिर' असे केले होते. तसेच वर्णन गोमंतकाचे होऊ शकेल. गोमंतकीय जीवनाला एक संथ, शान्त, सुंदरलय आहे. गोमंतकातली माणसे कष्ट खूप करतात. पण त्या कष्टमय जीवनातच 'सुशेगात' या शब्द प्रयोगाने

ध्वनित होणारी एक रम्य अवस्था असते. सुशेगात म्हणजे शांतपणे, घाई–गडबड न करता घेतलेला जीवनोपभोग. सुशेगात जेवा, सुशेगात झोपा, अशा एकमेकांना दिलेल्या आज्ञा ऐकू येतील. तेथील सबंध जीवनाला लपेटून राहिलेले हे एक 'सुशेगात' वळण मला मोठे विलोभनीय वाटते. म्हणूनच आजही गोव्यात शहरी आणि ग्रामीण जीवनाचा सुंदर मिलाफ झालेला दिसतो. अशा या जीवनाचे दर्शन श्री. प्रमोद चितारी यांनी फार सुरेख घडवले आहे. एखाद्या भूप्रदेशाचे भौगोलिक वर्णन म्हणजे त्या प्रदेशाचे दर्शन नव्हे. म्हणूनच गोवा–दीव–दमण या प्रदेशाचे दर्शन घडवताना चितारी यांनी भौगोलिक वर्णनाबरोबर सांस्कृतिक ओळखही करून दिली आहे ती फार महत्त्वाची आहे.

गोव्यात प्राचीन काळापासून हिंदू धर्म अस्तित्त्वात आहे. गोव्यातील लोकही विविध देवदेवतांना मानणारे, श्रद्धाळू आहेत. शान्तादुर्गा, मंगेशी अशी त्यांची अनेक दैवते. त्यांचा दिवस परमेश्वर भक्तीनेच सुरू होतो. गोव्यात प्रत्येक गावात देवांची मंदिरे आहेत. या विविध मंदिरांच्या वर्षातून एकदा मोठ्या जत्रा भरतात. पूजा, आरती, कौल लावणे, पालखी, प्रसाद वाटप इ. प्रकार भक्तीभावाने सुरू असतात. दशावतारी कार्यक्रम साजरे केले जातात. महाएकादशी, शिवरात्री, वटसावित्री, हरितालिका, ऋषीपंचमी ही व्रतवैकल्ये लोक आवडीने करतात.

श्री. चितारी यांनी केलेले हे वर्णन अगदी अनुरूप असे आहे. बाजारातील आणि विशेषतः मासळी बाजारातली गर्दी सोडली तर गोमंतातले दुसरे गर्दीचे ठिकाण म्हणजे देऊळ! गोमंतकात जागोजागी देवळे आहेत आणि ती सतत भाविक लोकांमुळे गजबजलेली असतात.

गोव्यातील लोकांचे जेवण ही सुद्धा एक मोठी ऐट असते. खिश्चन असोत, वा हिंदू असोत, साऱ्या बायका सकाळपासून दुपारपर्यंत जेवण करायच्या तयारीत मग्न दिसतील. पुरूष मंडळी सकाळी अकराच्या सुमारास तीन–चार प्रकारचे 'नुस्ते' (म्हणजे मासळी) आणतील पण त्यांचे तीन–चार खाद्य प्रकार! भाताबरोबर खाऊन ते तासभर 'सुशेगात' गाढ झोपतील हे जीवन मोठे विलोभनीय आणि धावपळीतून थोडा वेळ मुक्ती देणारे वाटते.

श्री. चितारी यांच्या 'प्रवासी मित्रा'मुळे पर्यटकांना गोमंतकीय जीवनाचे अंतरंग समजू शकेल. अलिकडल्या काळात पर्यटकांची संख्या फार वाढली आहे. तरूण माणसेच नव्हेत, तर निवृत्त झालेली माणसेही वर्षातून एक–दोनदा ट्रॅव्हल्स कंपनीतर्फे सहल करून येतात. त्यामुळे नेहमीच्या चाकोरीच्या जीवनापेक्षा एकवेगळे जीवन उपभोगण्याची संधी मिळते. अधिकाधिक लोक अशी संधी घेत आहेत. यामुळे एकमेकांचा परिचय होऊन प्रादेशिक एकात्मता वाढीला लागते हा एक मोठाच फायदा आहे.

अशा पर्यटकांसाठी श्री. चितारी यांचा 'प्रवासी मित्र' फार उपयुक्त आहे. पर्यटनाला निघण्याआधी 'गोवा–दीव–दमण' या प्रदेशाची पर्यटकांनी ओळख करून घेतली तर त्यांच्या आनंदात खचितच माहितीपूर्ण भर पडेल.

श्री. चितारी यांच्या या 'प्रवासी मित्रा' बरोबर असंख्य पर्यटकांच्या सहली यशस्वी आणि आनंददायी होवोत अशी सदिच्छा मी या प्रसंगी व्यक्त करतो.

**जयवंत दळवी**

जयवंत दळवी
सी–१११, राज–श्री,
एकसर रोड,
बोरिवली (प.),
मुंबई ४०००९१



# शब्दांच्या पलिकडे

संपूर्ण भारत वर्षाच्या पर्यटनावर पाच खंड प्रसिद्ध करण्यास मी वचनबद्ध होतो पण पर्यटकांनी दिलेला प्रतिसाद, प्रसिद्धी माध्यमांनी केलेले कौतुक आणि दूरचित्रवाणींने अनेक वेळा मुलाखतींची दिलेली संधी या प्रोत्साहनामुळे लेखनाचा उत्साह द्विगुणीत झाला आणि पाच खंडांचे रुपांतर आता १० खंडांच्या लेखनात करण्याचा विचार केलेला आहे. सातत्याने घडत असलेला प्रवास,वाचन आणि ठिकठिकाणी संशोधनात्मक अभ्यासाची मिळालेली संधी यामुळेच लेखनात दीर्घता आणि सखोलता लाभते, आत्मविश्वास दुणावतो व वाङ्मय निर्मितीद्वारे भारत मातेची सेवा करण्याचे एक वेगळेच भाग्य वाट्याला येते. पुस्तके किती खपली याचा विचार करण्यापेक्षा भारदस्त, उपयुक्त, मार्गदर्शक, संदर्भयुक्त, संशोधनात्मक व नाविन्यपूर्ण माहिती वाचकांना पुरविणे ह्यात मी इति कर्तव्यता मानतो. वाचकांच्या हव्यासाने पुस्तकाच्या पुनः पुन्हा आवृत्त्या काढाव्या लागणे हा झाला अर्थ विचार पण समाज व देशाला उपयुक्त असे विचार वाचकांपर्यंत पोहचविणे हा माझा मूळ उद्देश आहे. थोडक्यात 'सार्थसदूविचार'.

ह्या पूर्वी मी काश्मिर, उत्तर भारत, संपूर्ण दक्षिण भारत, नेपाळ, प.बंगाल आणि ओरिसा यावर लेखन केले. ते वाचकांना आवडल्याची पावती त्यांच्या हजोरोंनी आलेल्या पत्राद्वारे लाभली. ह्या प्रेरणेतूनच माझी वाटचाल सुरू आहे.

यावर्षी मी गोमंतक लिहून पूर्ण करण्याचा संकल्प केलेला होताच. त्यातच दीव व दमण हा भाग पण जोडला. डिसेंबर ९३ मध्येच लेखन पूर्ण होत असतानाच ह्या वर्षीचे अखिल भारतीय साहित्य संमेलन गोव्यातच होत असल्याची तारीख जाहीर झाली. त्यालाच दुग्धशर्करा योग म्हणायचा.

निळ्याशार समुद्राचा किनारा लाभलेल्या गोमंतकाच्या हिरव्यागार पाचूच्या सौंदर्यमयी नंदनवनात जेष्ठ व श्रेष्ठ साहित्यिक श्री. राम शेवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली मराठी साहित्य संमेलन साजरे होत असताना थोर साहित्यिकाच्या

शुभहस्ते या 'गोवा–दीव–दमण' वरील प्रवासी मित्र या पर्यटनावरील पुस्तकाचे प्रकाशन करण्याचा योग लाभला आहे.

गोव्याच्या पाठीशी परकीय सत्तेचा व स्वातंत्र्य संग्रामाचा दुहेरी इतिहास असा आहे. अति प्राचीन भौगोलिक रचना आणि ठिकठिकाणी मुक्त हस्ताने उधळलेले अनुपमेय सौंदर्य असलेल्या ह्या पवित्र देव भूमीत हा गवसलेला क्षण खरोखरच समयोचित अत्यानंदाचा आहे.

हे पुस्तक मी माझी चुलत आजी 'श्रीमती उमाकाकू' यांना विनम्रभावे अर्पण करीत आहे. प्रत्येक कृतीच्या पाठीशी काही तरी कार्यकारण भाव असतो.

आजी असली तरी मी तिला काकूच म्हणायचो. या आजीने मला उच्चशिक्षणासाठी पुण्याची दिशा दाखविली. स्वतः उच्च शिक्षित नसतानाही नातवाने मात्र पदवीधर व्हावे या जिद्दीतून आणि आपुलकीने माझे शिक्षण पूर्ण करण्याचा तिने चंगच बांधला. घराघरात अशा छुप्या पण सुधारणावादी वृत्तीच्या सावित्रीबाई असतात आणि त्यामुळेच समाजवृक्ष बहरत असतो. माझा शिक्षणाचा प्रवास तिनेच घडविल्याने ही फूल ना फुलाची पाकळी तिच्या पुनीतचरणी अर्पण करूनही मी ऋणमुक्त होईन असे नाही. तरीही ही एक कृतज्ञताच.

या साहित्यिक क्षेत्रात पदार्पण करताना मला या वाटेवर धीर देणारे, मदत करणारे जे अनेक हितचिंतक भेटले त्यात माझे लहान बंधू श्री. उदय चितारी, परम मित्र रामभाऊ देशमुख, आणि सदोदित साह्यभूत ठरलेली कु. रेवती हिंगे यांचे शाब्दिक आभार मानणे कृत्रीमपणाचे ठरेल.

या ग्रंथाचे प्रूफरिडींग नेहमीप्रमाणे माझे जिवलग मित्र श्री. सूर्यकांत देशपांडे यांनी आनंदाने पार पाडले.

या पुस्तकाच्या लेखनापासून प्रसिद्धीपर्यंत मनोभावे साह्य लाभले ते सुप्रसिद्ध अभ्यासक प्रिन्सिपॉल श्री. रमेश जोशी यांचे. त्यांच्या अमोल सहकार्याचे ऋण फेडण्यास शब्द अपूर्ण ठरतील.

सर्वांच्या कार्याबद्दल मी ऋणी आहे.

**लेखक**


**श्री. नारायण ऊर्फ प्रमोद चितारी.**

# अनुक्रमणिका


| | पान क्रमांक |
|---|---|
| **पर्यटन :–** | |
| १) पर्यटनाचे नियोजन | ३१ |
| २) प्रवासाला निघण्यापूर्वी | ३५ |
| **गोवा** | |
| १) गोव्यातील लोकजीवन | ६१ |
| २) गोव्यातील उद्योगधंदे | ७० |
| ३) गोव्यातील पर्यटन | ७३ |
| ४) पणजी | ९८ |
| ५) फोंडा | १३५ |
| ६) गोव्यातील मंदिरे | १६३ |
| ७) गोव्याची भाषा | २०३ |
| **दीव** | |
| १) दीव बेटावरील पर्यटन स्थळे | २१९ |
| २) दीव येथील प्रेक्षणीय स्थळे | २२३ |
| ३) दीव येथील निवासस्थान | २२४ |
| **दमण** | |
| १) दमणचा इतिहास | २३२ |
| २) लोक | २३९ |
| ३) दमणमधील उत्कृष्ट हॉटेल | २४७ |

| नकाशे | पान क्रमांक |
|---|---|
| १) पर्यटन | १९ |
| २) गोवा | ४१ |
| ३) गोमंतक | ४२ |
| ४) पणजी | ९७ |
| ५) मडगाव | ११९ |
| ६) वास्को–द–गामा | १२८ |
| ७) म्हापसा | १३१ |
| ८) दीव | २०७ |
| ९) दीव नकाशा | २०८ |
| १०) दमण | २२७ |
| ११) दमण नकाशा | २२८ |

| रंगीत फोटो | पान क्रमांक |
|---|---|
| १) सी कॅथेड्रल चर्च (जुना गोवा) | १०१ |
| २) दोना पाऊला (गोवा) | १०१ |
| ३) कोलवा बीच (गोवा) | १२५ |
| ४) माजोर्डा बीच (गोवा) | १२५ |
| ५) मयेलेक | १५१ |
| ६) शांतादुर्गा मंदिर | १५१ |
| ७) दमणचे प्रवेशद्वार | १७५ |
| ८) प्राचीन प्रवेशद्वार (दीव) | १७५ |


पर्यटन

# पर्यटन

**महत्त्वाची माहिती**

खालील माहिती इंग्रजीतून लिहिणे अत्यावश्यक आहे. (परकीय ठिकाणी कोणाला मराठी वाचता आले नाही तरी कोणी ना कोणी इंग्लीश वाचून आपणाला साह्य करू शकतो.)

1) Full Name :-

| _______ | _______ | _______ |
|---|---|---|
| Surname | Name | Father's or Husband's Name |

2) Full Address :- ____________________

____________________

____________________

3) Res. phone :- ____________________

With STD. No. __________ Place __________

4) Blood group :- ____________________

5) Any Health problem:- ____________________

____________________

6) Immergency First Aid ____________________

required :- ____________________

7) Name of Family Doctor :- ____________________

and his phone No. ________________

8) Name of spl. Dr. ________________

and his phone:- ________________

9) Office Address and ________________

phone no. ________________

10) Name of your Wife, Husband :- ________________

Brother, Sister or Father.

11) Address of your Nearest :- ________________

relative.

12) Car No. ________________

13) Your Weight:- ________________

14) Your hight :- ________________

15) Age / Date of Birth :- ________________

मुं-प्रवास
दा. क्र. ८६६८
२८७९८
२३.३.०६
ग्रंथ शाखा (स्थळ

**पर्यटन**

पर्यटन म्हणजे सफर, सहल, प्रवास, प्रेक्षणीय स्थळांबरोबर शारीरिक व मानसिक विश्रांती, एका स्थळाहून दुसऱ्या स्थळी जाणे, हिंडणे, फिरणे, खाणे, पिणे, वस्तू विकत घेणे, जलविहार, निसर्गसृष्टीत रममाण होणे, अशा एक ना अनेक कल्पना 'पर्यटन' या संकल्पनेशी निगडित आहेत. या दहा – वीस वर्षांत पर्यटनाची कल्पना आधिकाधिक लोकप्रिय होत असतानाच या पर्यटनाला अडथळे निर्माण करणारे काही घटक प्रभावी होऊ लागले आहेत.

**स्त्रिया–व–पर्यटन :**

खरेतर हल्ली पुरूषांपेक्षा स्त्रियांना पर्यटनाची कल्पना अधिक आवडीची वाटते. मग ती संसार सांभाळणारी स्त्री असो वा नोकरी करणारी, मध्यम वर्गीय असो वा श्रीमंत असो, 'चूल–मूल' या वर्तुळातून बाहेर पडण्यासाठी तिचे मन आसुसलेले असते. पर्यटन स्थळ स्त्रियांना आपल्या माहेराइतके मनोहारी वाटते. डबा करणे, गाडी पकडणे, येताना भाजी आणणे, वॉशिंग मशिन लावणे आणि कितीही श्रम केले तरी घरच्यांची धूसफूस व ऑफिसमध्ये बॉसच्या कपाळावर आठ्या. या वातावरणाला साहाजिकच स्त्रिया कंटाळलेल्या असतात. मग त्यांना पती व मुलांबरोबर दोन दिवस कोठेतरी जावेसे वाटणे साहजिकच आणि तेही पर्यटनालाच.

स्त्रियांसाठी स्वतंत्र पर्यटनाच्या सोयी नाहीत. परंतु स्वतंत्र रिझर्व्हेशन सीटस्, स्वतंत्र निवासस्थानांची सोय, स्वतंत्र वाहन व्यवस्था आणि व्यवस्थापनही जर स्त्रियांचेच असेल तर त्यांची पर्यटनाची हौस पूर्ण होऊ शकते. पूर्वी रिझर्व्हेशनसाठी किंवा तिकिटांसाठी स्त्रियांची स्वतंत्र रांग असायची. आता तसे नाही. "स्त्रियांसाठी पर्यटन" ही कल्पना नवी असली तरी त्यात अनेक फायदे आहेत.

1) स्त्रिया स्वतंत्रपणे एकट्या किंवा ग्रूपने ट्रीपला जाऊ शकतात. निर्धास्तपणे राहू शकतात.

2) स्त्रिया जर पर्यटन व्यवसायात आल्या तर व्यवस्थापन अधिक शास्त्रोक्त व व्यवस्थितपणे होऊ शकेल.

3) स्त्रियांकडे पर्यटनाची सूत्रे आली तर पुरषी आरेरावीला आपोआपच छेद जाईल.

4) स्त्रियांचा उदर निर्वाहाचा प्रश्न सुटू शकेल.

5) संसार सांभाळून पर्यटनाचे व्यवस्थापन करणे त्यांना सहज शक्य होईल.

6) पर्यटनाला निघणाऱ्या लोकांना घरगुती जेवण व घरगुती वातावरण हवे असते. या व्यवसायात जर स्त्रियांनी अधिकार क्षेत्र हातात घेतले तर तशी व्यवस्था त्या करू शकतात.

7) अशिक्षित स्त्रियांना तात्पुरते लिहा–वाचायला शिकवून वा फिरतीचा अनुभव देऊन सेवा उपलब्ध करून देता येईल. विशेषतः विधवा स्त्रिया, निराधार स्त्रिया, तसेच इतरानांही रोजगार मिळेल.

पर्यटनात आज गृहसौंदर्य, स्वयंपाक शास्त्र, लोकसंपर्क नियोजन आणि आयोजन या सर्व गोष्टींना अधिक महत्त्व प्राप्त होत आहे आणि आज तरी या क्षेत्रात स्त्रियांनीच आपले कर्तृत्व सिद्ध केलेले आहे.

**पर्यटन आणि आनंद :–**

'आनंद' ही जीवनातील सर्वाधिक सुख देणारी कल्पना आहे. आनंद निर्मितीसाठी तर प्रत्येक व्यक्ती आयुष्यात धडपडत असते. जे रात्रंदिन श्रम करतात, धावपळ करतात ते आनंदाच्या शोधात असतात. कळत–नकळत कसलातरी आनंद प्रत्येकाला हवा असतो.

या आनंद प्राप्तीची विविध साधने आहेत. कुणाला कशातून आनंद लाभेल हे सांगता येत नाही. 'आनंद' ही कल्पना संदिग्ध असली तरी आनंदापासून वंचित

राहणे कुणालाही शक्य नाही. आनंद कशातून मिळेल ? या प्रश्नाचे उत्तर देणे कठीण असले तरी सामान्यांना आनंद देणारी घटना म्हणजे 'पर्यटन'. पर्यटनातून प्राप्त होणारा आनंद हा काही वेगळाच आहे.

जीवनात खऱ्या अर्थाने निसर्गाशी एकरूप व्हायला मिळाले की सात्त्विक आनंदाची प्राप्ती होते. पर्यटनात आपण निसर्गरमणीय स्थानांना भेट देतो. पर्वत राई, हिरवळ, आकाशाशी स्पर्धा करणारी गर्द झाडी, झुळझुळ वाहणारे निर्झर, दुथडी भरून वाहणाऱ्या नद्या, भव्यतेचा साज ल्यालेले समुद्र किनारे, पृथ्वीवरील फुलांवर परमेश्वराने उधळलेले विविध रंग पाहिले की मन हरपते. अशा वातावरणात कोणते दुःख आपणाला सतावणार आहे ? मनुष्य कितीही दुःखी असला तरी दऱ्याखोऱ्यातील हिरव्यागार झाडातून येणारी हवेची झुळूक क्षीण मनाला नवा तजेला प्राप्त करून देते. झुळझुळ वाहणाऱ्या निर्झराचे शितल थेंब सारे दुःख विसरून रोमांच उभे करतात.

आनंद हा मानण्यावर आहे. सभोवतालच्या नैमित्यिक परिस्थितीपेक्षा पर्यटनाच्या वेळी वेगळी परिस्थिती असल्याने आनंद लाभत असतो. पर्यटन जर कंटाळवाणे, काळजीयुक्त असेल तर घराच्या बाहेरच कोणी पडणार नाही. ज्या अर्थी लोक सहकुटुंब मिळेल त्या वाहनाने दूरवर जाण्यासाठी बाहेर पडतात ते आनंदाची अपेक्षा घेऊनच आणि तो विविध मार्गांनी प्राप्त होतही असतो. पर्यटन आणि आनंद यांचे अजोड नाते आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरणार नाही.

**पर्यटन आणि संस्कृती :–**

संस्कृती या शब्दाची व्याख्या फार मोठी आहे. लोकांचे जीवनमान, आचार–विचार, खाणे–पिणे, वाङ्मय, कला–संगीत, राहणीमान, भाषा या सर्व गोष्टींचा समावेश संस्कृतीत होतो. पर्यटन हा देखील संस्कृतीचाच एक भाग आहे. पर्यटनामुळेच खऱ्या संस्कृतीची ओळख होते. भारता इतके संस्कृतीचे वैविध्य कोठेही आढळणार नाही. गोव्याला गेल्याशिवाय गोव्याच्या मिश्र संस्कृतीचे आकलन होणार नाही. कोठे धर्माचे मोठेपण तर कोठे सामाजिक जीवनाचे महत्त्व, कोठे

राजकारणाचे वर्चस्व तर कोठे अर्वाचीन परिस्थितींची आराधना हेच सांस्कृतिक प्रामाण्य आहे. काश्मिर असो वा सौराष्ट्र, आसाम असो वा कर्नाटक तेथील लोकजीवनाचे आकलन आसेतू हिमाचल प्रवास केला तरच होऊ शकते.

पर्यटनामुळे भाषेचा संपर्क येतोच पण त्याच बरोबर खाणे–पिणे, राहणीमान, आचार–विचार यांचीही ओळख होते. एका राष्ट्रात जर इतकी विविधता तर वेगवेगळ्या राष्ट्रात पर्यटन केल्यास किती वेगळेपणा जाणवेल! संस्कृतीचे महात्म्य मोठे आहे. एक संस्कृती निर्माण होण्यासाठी मानवाला हजारो वर्षे खर्ची घालावी लागली. संस्कृतीचे संक्रमणही सुरू असते.

त्यामुळेच वीस–पंचवीस वर्षांनंतर जर आपण पुन्हा कोठे पर्यटनाला गेलो तर तेथे बरेच बदल घडून आलेले दिसतात. पर्यटनाद्वारे संस्कृतीचे आकलन चटकन होते. महाराष्ट्रातून उत्तर प्रदेशात आलो तर जाणीवात्मक बदल दिसून येत नाहीत. पण तेच अंदमान, आसाम, नेपाळ याठिकाणी गेलोतर सांस्कृतिक बदल मोठ्या प्रमाणात जाणवतात. पर्यटन आणि संस्कृती यांचे जवळचे नाते आहे. संस्कृतीच्या अभ्यासासाठी, पर्यटन आवश्यक आहे. पर्यटनाद्वारे संस्कृती डोळ्यांनी बघता येते, विचारांनी अनुभवता येते व आचरणाने आत्मसात करता येते.

**पर्यटन आणि ऐतिहासिक व भौगोलिक परिस्थिती :–**

पर्यटनाचा संबंध हा इतिहासाशी वा ऐतिहासिक परिस्थितीशी आहे. आपण जेव्हा पर्यटन स्थळी जातो तेंव्हा तेथील राजवाडा, मनोरे, किल्ला, म्युझियम, मंदिरे, एक ना अनेक वास्तुना भेट देतो. या वास्तूंना ऐतिहासिक महत्त्व असते. तेथील पडक्या भिंतीतूनही इतिहास बोलतो. प्रत्येक देशाचा वा प्रदेशाचा इतिहास हा त्या–त्या भागातील अभिमानाचा बिंदू आहे. गतकाळातील वैभवाचे वर्तमानातील दर्शनही सुखदायी असते. लालकिल्ला, ताजमहाल सारखी ऐतिहासिक स्थळे फक्त इतिहासच कथन करीत नाही, तर इतिहासाला सौंदर्यही प्राप्त करून देतात आणि हे सौंदर्य आपणास पर्यटनाद्वारे पाहता येते.

पर्यटनाचा भौगोलिक परिस्थितीशी जवळचा संबंध आहे. प्रत्येक नैसर्गिक घटनेमागे भौगोलिकता आहे. निसर्गाचाही भूगोलाशी संबंध आहेच. नद्या, नाले, निर्झर, डोंगर, पर्वत, दऱ्या, खोरे, समुद्र हे सारे विषय भौगोलिक असून त्यांचा पर्यटनाशी निगडीत संबंध आहे. पर्यटन हे निसर्ग सौंदर्य न्याहाळण्यासाठी असते आणि भौगोलिक परिस्थितीतच निसर्ग सौंदर्याची निर्मिती असते. तसे पाहिले तर पर्यटन, इतिहास व भूगोल हे वेगवेगळे विषय आहेत, पण त्यांचे एकमेकांशी एवढे अजोड नाते आहे की या तीनपैकी एक जरी नसेल तरी ते ठिकाण किंवा तो भाग पर्यटनाच्या दृष्टीने लोकांचे आकर्षण ठरणार नाही. पर्यटन–इतिहास–भूगोल हा त्रिकोणच मानवी मनाला तृप्त समाधान देतो.

**पर्यटन आणि राष्ट्रीय एकात्मता :–**

भारतासारख्या वैविध्यपूर्ण राष्ट्राला 'राष्ट्रीय एकात्मते' सारखी भावना अधिक जपावी लागते. या देशात जातियतेला बंदी असली तरी येथे अनेक जाती अस्तित्वात आहेत. भारत हे घटनात्मक दृष्ट्या निधर्मी राष्ट्र मानले गेले तरी भारताइतके धर्म एखाद्या राष्ट्रात क्वचितच एकत्र नांदत असतील. प्रत्येक देशाची एक भाषा असते, पण या देशात तर दर बारा कोसांवर भाषा बदलते. जेवढे लोक तेवढ्या भाषा आणि भाषावर प्रांत रचनेमुळे तर प्रत्येक भाषेने आपली चूल स्वतंत्र मांडली आहे. येथे प्रत्येक राज्यातील राहणीमान वेगळे आहे. आसेतू हिमाचल राष्ट्रात एकसूत्रता साधली जाईल असा एखादातरी घटक असणे आवश्यक आहे आणि तो घटक म्हणजे पर्यटन आहे.

पर्यटनासाठी आपण भाषा, धर्म, जात–पात, खाणे–पिणे इ. सारे अडथळे ओलांडून सौंदर्य व आनंदाच्या शोधात निघालेलो असतो. आपण प्राप्त परिस्थितीशी जुळवून घेतो. प्रत्येकाला समजून घेतो. त्यांच्या आनंदात आपण आपला आनंद द्विगुणीत करतो. त्यांचा सांस्कृतिक आनंद दुखावणार नाही असे वागतो. हाच गुण आपल्याला राष्ट्रीय एकात्मतेच्या मार्गावर नेतो. भारतासारख्या राष्ट्रात तरी 'पर्यटन' हे राष्ट्रीय एकात्मतेचा आत्मा आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरणार नाही.

**पर्यटन आणि ज्ञान व मनोरंजन :-**

पर्यटन हे ज्ञान व मनोरंजनाचे साधन आहे का ? या प्रश्नाचे उत्तर निश्चितच 'होय' असे द्यावे लागेल. प्रवास हा माणसाचा उत्तम शिक्षक आहे असे म्हणतात, याचे कारण असे की प्रवासात आपणाला विविध व्यक्ती भेटतात, विविध प्रसंगांना तोंड द्यावे लागते, सुख – दुःखात संमिश्र समाधान मानावे लागते व यातूनच आपणाला ज्ञान प्राप्त होते.

पर्यटन हे इतिहास–भूगोल व संस्कृतीचे आकलन करून देणारे उघडे पुस्तकच आहे. यात आपण निसर्गाचे कलात्मक ज्ञान अनुभवतो. ज्ञानाच्या अनेक शाखांचा पर्यटनाशी संबंध येतो. त्यात तंत्रज्ञान येते, शिल्पकला येते, वास्तूकला येते, चित्रकला येते, विज्ञानाचाही त्यात समावेश होतो. पर्यटन खऱ्या अर्थाने ज्ञानाची कवाडे आपल्यासाठी उघडे करते.

पर्यटनात ज्ञानाबरोबरच मनोरंजनही होते. केवळ ज्ञान प्राप्तीसाठी लेखन, वाचन, पाठांतर, भाषण यांचाच संबंध असता तर पर्यटनाला लोक कंटाळले असते. ज्ञान नकळत प्राप्त होते पण मनोरंजन मिळवायचे असते. पर्यटनातून मनाचे मनोरंजन होते. पहाणे, अनुभवणे, नाविन्य कळणे यातूनच मनोरंजन होत असते. कोणाचे पाहण्यातून मनोरंजन होते तर कोणाचे माहिती ऐकून, पण शेवटी समाधान देणे हा गुण पर्यटनात निश्चित आहे.

**वृद्धांसाठी पर्यटन :-**

वृद्धांसाठी आणि पर्यटन ? हे कसे शक्य आहे ? वृद्ध म्हटले की कमीत कमी साठी आठवते आणि हे वय का हिंडा फिरायचे आहे ? असाही प्रश्न विचारला जातो. परंतु शारीरिक विशेषतः मानसिक उत्साह हा वयावर अवलंबून नसतो. थकल्या – भागल्या शरीरात ओढून–ताणून उत्साह–जोम आणता येत नाही. क्रयशक्तीपण कमी झालेली असते. 'बाहेर हिंडून काय करणार ? हातपाय मोडण्यापेक्षा घरी गप्प बसा!' अशी समाज प्रबोधनाची वाक्ये ऐकली तर निराश व्हायला होते.

खरेतर कमी खर्चात, कमी वेळात, कमी अंतराचे, प्रकृतीला मानवेल असे पर्यटनाचे नियोजन केले तर कितीतरी वृद्धांचा फायदा होईल आणि त्यानाही सुकलेल्या जीवनाला ताजेपणा आणण्याचा प्रयत्न करता येईल. वृद्ध चालू शकतात, फिरू शकतात, बसू शकतात, चढू शकतात मग तरीही त्यांना पर्यटनापासून लांब का ठेवायचे ? लहान गिर्यारोहण, उंचावरील मंदिर दर्शन, वनविहार, किल्ल्याला प्रदक्षिणा अशा अनेक पर्यटनात वृद्धांना सहभागी होताना आपण बघतो व ते यशस्वीपणे पर्यटन पूर्ण करतात.

पर्यटनात वृद्धांची काळजी घ्यावी लागते. त्यांचे खाणे–पिणे व्यवस्थित सांभाळावे लागते. शारीरिक व्याधींपासून त्यांना लांब ठेवता येईल असे व्यवस्थापन मात्र हवे. वृद्धांनाही पर्यटन आवडते, पण त्याची यशस्विता ही प्रतिसादावर अवलंबून आहे.

**पर्यटन आणि तरूण :–**

'तरूण' या शब्दाची व्याख्या करताना सुरूवातीचे वय सांगता येते पण शेवटचे वय सांगणे कठीण आहे. जे मनाने तरूण असतात ते निश्चितच तरूण असतात. एक मात्र खरे की स्वतःला तरूण मानले तरी तारूण्याची झळाळी जोम, सौंदर्य, उमेद, उन्माद इ. विशिष्ट वयानंतर परत आणता येत नाही आणि आणता येत असले तरी ते उसने अवसान!

जीवनातील बहार किंवा वसंत ऋतू म्हणजे तारूण्य, सौंदर्याने काठोकाठ भरलेला पेला आकंठपान करायचा असेल तर सौंदर्य, एकांत, स्वातंत्र्य, संगत, संपत्ती, आरोग्य आणि जोडीला पर्यटन हवे. शृंगार मग तो चार भिंतीच्या आतला असो की निर्धास्तपणे रमणीय निसर्गाच्या चांदणी सहवासात असो. जमीन अस्मानाचा त्यात फरक आहे. निसर्ग स्वतःच उन्मादक आहे. तो मानवाच्या विविध वृत्ती चेतवतो. तारूण्याला निसर्गाची पार्श्वभूमी चांगलीच भावते. तारूण्याला संयमाचे बंध असले तर ते स्तिमीत होते. वडीलधाऱ्यांची भीती, सामाजिक बंधने,

चालीरिती, प्रेस्टीज या सर्व गोष्टी तारूण्याच्या पायात बंधनाच्या बेड्या अडकवतात. तेव्हा तरूण शरीर तर सोडाच पण मन जखडून जाते. पाखराच्या पंखाइतके हलके मन जेव्हा तारूण्याच्या नंदनवनात विहार करू लागते त्यावेळी पर्यटनच त्या प्रेमी युगुलांचे सर्वार्थाने समाधान करू शकते. तरूण वयात पर्यटन न करणे म्हणजे जीवनातील मुक्त आनंदाला मुकण्यासारखेच आहे.

**पर्यटन आणि बालजीवन :–**

बालजीवन तर परावलंबी असते आणि पर्यटन तर स्वतःवर अवलंबून आहे, पण मोठी माणसे लहानांसाठी पर्यटनाचे आयोजन करू शकतात. लहान मुले पर्यटनाला एकटी जाऊ शकत नाहीत, पण त्यांचे पर्यटन सोपे करणे शक्य आहे. लहान मुलांना तासन् तास बसणे रात्रंदिवस प्रवास, न खाता–पिता उपाशी राहणे, अति थंडी किंवा अति उष्मा या गोष्टी असह्य होतात. मग आजारी पडणे हे ओघाने आलेच. लहानांच्या व थोरांच्या सहनशक्तीत फरक आहे. हीच मुले निसर्गाच्या सहवासात आनंदीही होतात. हिरवळ, बाग, फुले, नद्या, पर्वत, निर्झर, धबधबे आणि विविध प्राणी त्यांना फार आवडतात. 'गाईड' जेव्हा ऐतिहासिक प्रवचन करतो तेव्हा ही मुले सर्वाधिक बोअर होतात पण डिस्ने लँड, एसेल वर्ल्ड, फँटेसी लँडसारख्या गोष्टी मुलांना खूप खूप आवडतात.

आपल्या पर्यटनात अशा गोष्टींचा समावेश करावा की जेणे करून मुले कंटाळणार नाहीत. त्यांच्या आवडी–निवडीतून, मनोरंजनातून त्यांना ज्ञान आकलन होत असते. पर्यटन ही प्रौढ कल्पना असली तरी बालकांना बालमानसशास्त्रानुसार पर्यटनाचा अनुभव द्यावा, पण त्याच बरोबर त्यांना शारीरिक शीण येणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे.

**पर्यटन आणि शासन :–**

आजकाल पर्यटनाला चांगलाच प्रतिसाद मिळत आहे. सरकारला त्यामुळे उत्पन्नाचे उत्कृष्ट साधन हाती गवसले आहे. त्यात केवळ पैसाच मिळतो. असे नाहीतर

परकीय चलनाचा पण चांगला फायदा होतो. प्रथम पहाणी करून सरकार 'अ' रिझार्ट प्लेस' म्हणून काही स्थानांना प्राधान्य देते आणि नंतर तेथे साधनांची उपलब्धता सुरू होते. विकासासाठी आवश्यक खर्च सरकारला त्याठिकाणी करावा लागतो. रिझॉर्ट, लाईट, पाणी, खाण्या–पिण्याच्या सोयी उपलब्ध करणे आवश्यक असते.

शासनाला पर्यटनाचा आढावा काढून नंतर अंदाज पत्रकात विशिष्ट सोयी· उपलब्ध कराव्या लागतात. पर्यटन व्यवस्थापन तसेच पर्यटन नियोजन करणाऱ्या पर्यटक कंपन्यांना रिझर्व्हेशन कन्सेशन सारख्या सोयी तसेच विशेष सोयी उपलब्ध करून द्यायला हव्यात. शासन आणि पर्यटन हे दोन अविभाज्य भाग आहेत. शासनाच्या मदतीशिवाय पर्यटन व्यवसायाची भरभराट होऊच शकणार नाही. भारतात प्रत्येक राज्यात "टुरिझम डेव्हलपमेंट कार्पोरेशन"ची स्थापना करण्यात आली आहे. त्यांच्याद्वारे प्रादेशिक पर्यटनाचा विकास साधण्यात आला आहे.

**पर्यटनाचे नियोजन कसे करावे :–**

1) पर्यटनाला निघण्यापूर्वी निश्चित कोठे जायचे हे ठरवावे.

2) पर्यटनाची जागा निवडावी.

3) पर्यटनास जाऊन परत येईपर्यंतच्या खर्चाचा अंदाज घेऊन तसे पैसे जमवावे.

4) रिझर्व्हेशनचा फॉर्म भरावा व योग्य तो गाडी नंबर, तारीख, नाव, वय इत्यादी लिहून कॉम्प्युटर रिझर्व्हेशन काउंटरवर रिझर्व्हेशन करावे. (दोन महिने आधी रिझर्व्हेशन करता येते.) रिटर्न रिझर्व्हेशन करायचे असल्यास त्या गाडीचा नंबर, तारीख वगैरे माहिती लिहून तो रिझर्व्हेशन फॉर्म क्लार्ककडे द्यावा.

5) पर्यटनाच्या तारखा निश्चित झाल्यावर त्या पर्यटनस्थळावरील पुस्तके छोटी पॅम्प्लेटस् मिळवावीत. हॉटेल्सचे पत्ते मिळवून परवडेल त्या दराच्या हॉटेलमध्ये रूम रिझर्व्ह करण्यासाठी D. D. ने किंवा मनीऑर्डरने पैसे पाठवून रूम रिझर्व्हेशन

कन्फर्म करावे.

6) पर्यटन स्थळाच्या ठिकाणी थंडीचे, पावसाचे, बर्फाचे दिवस असतील तर त्यानुसार कपड्यांची जमवाजमव करावी.

7) प्रवासात लागणाऱ्या सामानाची यादी करावी.

8) प्रवासास निघाल्यापासून परत येईपर्यंतच्या खर्चाचा अंदाज घेऊन त्यापेक्षा थोडी जास्त रक्कम जवळ बाळगावी. प्रवासात जास्त खर्च वाढेल अशी खरेदी वा इतर मौज–मजेवर जास्त खर्च करू नये.

9) प्रवासाला निघण्यापूर्वी ज्या पर्यटन स्थळांना आपण भेट देणार आहोत त्या ठिकाणी कोणकोणत्या स्थानांना भेट द्यायची ? तसेच त्याठिकाणी जाण्याची साधने कोणती ? इत्यादी विषयी माहिती मिळवावी.

विशेषतः पर्यटन विकास मंडळाची शासकीय कार्यालये असतात किंवा ट्रॅव्हल एजंटस् असतात. त्यांच्याकडे पर्यटन स्थळांना भेट देण्याच्या व्यवस्थापनासाठी रिझर्व्हेशन करावे.

बस, टुरिस्ट टॅक्सी, एअर कंडिशन गाड्या इत्यादी वाहनांची व्यवस्थापण या संस्था करू शकतात. मात्र आधी पैसे पाठवून रिझर्व्हेशन करावे.

10) रिझर्व्हेशन केल्यानंतर त्या वेळेला आपण तेथे पोहोचणे ही जबाबदारी अर्थातच आपल्यावर असते.

11) उगाचच जास्त रिस्क घेऊन अनोळखी ठिकाणी एकट्याने फिरण्याचा प्रयत्न करू नये.

12) कोणी भेटलं व त्यांनी सांगितलं म्हणून जाऊ नये. पूर्ण तपास केल्याशिवाय कोठेही कुटुंबाला घेऊन जाऊ नये.

13) रमणीय स्थळे पाहताना कुटुंबाने एकत्र पहावी. कोणत्याही कारणासाठी पुढे–मागे जावू नये. सर्वांनी एकमेकांच्या बरोबर असावे. चूकुकोणीच नये. चूक झालीच तर सर्वांनी कोणत्या स्थळी उतरायचे याचा पत्ता प्रत्येकाकडे असावा.

14) वाहनांचा दर सुरूवातीलाच नीट ठरवून घ्यावा, नाहीतर कोणत्याही सबबीवर जास्त पैसे वसूल केले जातात. तेव्हा त्यादृष्टीने खबरदारी घेणे आवश्यक आहे.

**पर्यटनाच्या जागांची निवड कशी कराल?**

पर्यटनाच्या जागेची निवड करताना आपण आपल्याच आवडी–निवडीचा विचार करावा. कोणी अमूक ठिकाणी जावून आले म्हणून आपणही तेथेच जाण्याचा प्रयत्न करू नये.

प्रत्येकाच्या आवडी–निवडी भिन्न असतात. कोणाला धार्मिक स्थळांना भेट देणे आवडते तर कोणाला ऐतिहासिक स्थळांना, काहींना निसर्ग रमणीय स्थळांचे जबरदस्त आकर्षण असते. तर काहींना हिरव्यागार झाडांनी व्यापलेले समुद्रकिनारे वा अरण्यमय प्रदेश आवडतो. काहींना दऱ्याखोऱ्यातून चालणे आवडते तर काहींना बर्फाच्छादित पर्वतारोहण आवडते. जेवढ्या व्यक्ती तेवढ्या प्रकृती. कोणाला काय आवडेल हे सांगता येत नाही. म्हणून पर्यटनाला निघण्यापूर्वी वैयक्तिक, फॅमिली किंवा ग्रुपने आपापल्या आवडी–निवडीचा कॉमन फॅक्टर निवडावा म्हणजे पर्यटन कंटाळवाणे वाटणार नाही.

निसर्ग रमणीय स्थळे साधारणतः सर्वांनाच आवडतात, पण "समुद्र किनारेच ते! ते काय पहायचे!" असे म्हणणारेही महाभाग असतात. आपण ज्या पर्यटन स्थळी जाणार त्याची माहिती आपणास वाचन, चौकशी, किंवा पर्यटन कंपनीच्या कार्यालयातून मिळविता येते. अशा तऱ्हेने विचारपूर्वक पर्यटन स्थळाची

निवड करावी.

**खालील वस्तू आपण प्रवासापूर्वी बरोबर घ्याव्यात :–**

1) रिझर्व्हेशन तिकीटस्
2) ज्या कामासाठी जायचे ती कागदपत्रे किंवा हॉटेल बुकिंगची कागदपत्रे.
3) आवश्यक कपडे
4) ब्रिसलेरी वॉटर बोटल
5) कपडे – टॉवेल – दाढीचे सामान – हातरूमाल – चष्मा इ.
6) पेस्ट –ब्रश – साबण – नॅपकिन
7) शॉल, स्वेटर, मफलर
8) पेन – डायरी – कॅमेरा – दुर्बिण – गॉगल
9) आवश्यक औषधे – व्हिक्स, बाम इत्यादी.
10) सुपारी, लवंग, वेलदोडा किंवा बडिशेप
11) कपडे वाळत घालण्यासाठी दोरी
12) लहान चाकू, चमचा, डीश, नेलकटर
13) बॅटरी, टेप किंवा वॉकीटॉकी
14) फोन नंबर असलेली किंवा पत्ते असलेली डायरी.
15) सुट्टे पैसे किंवा वेगवेगळ्या किंमतीच्या नोटस् किंवा ट्रॅव्हलर चेक्स्, चेकबुक, क्रेडिट कार्ड
16) फर्स्ट–एड–बॉक्स, बँडिज इ.
17) साखळी – कुलूप
18) पत्त्यासारखे फारशी जागा न व्यापणारे बैठ्या खेळाचे साधन.
19) रिकामी प्लॅस्टीक बॅग किंवा फोल्डींग बॅग

20) फोल्डींग सीट स्टँड

**प्रवासाला निघण्यापूर्वी :–**

1) नळ नीट बंद केले आहेत की नाही ते पहावे. वरच्या टाकीचा नळ बंद करावा. ओव्हर फ्लो होणार नाही याची काळजी घ्यावी.

2) मेन स्वीचसह सर्व लाईट बंद करावेत.

3) फ्रीज स्वीचसह बंद करून कोरड्या फडक्याने पुसावा. तसेच फ्रीजमध्ये चुकूनही काही ठेवू नये. तो पूर्ण रिकामा करावा.

4) खराब होतील असे अन्नपदार्थ वा इतर पदार्थ घरात ठेवू नये.

5) जोखमीच्या वस्तू उदा. पैसे/दागदागिने इ. सुरक्षित ठिकाणी वा बँकेच्या सेफ व्हॉल्टमध्ये ठेवाव्यात.

6) सर्व कपाटे नीट लॉक केली आहेत की नाही ते पहावे.

7) आपण बाहेर जाण्याविषयीच्या शेजाऱ्यांना सूचना द्याव्यात.

8) गॅस सिलिंडर व गॅसची बटणे नीट बंद करा.

9) आणि निघण्यापूर्वी किचन – बाथरूम – बेडरूममध्ये एक फेरी मारा व बरोबर घ्यावयाच्या सामानापैकी काही राहिले नाही ना ? ते पहा. निघा आता.

**सर्वसाधारण आजारावरील उपाय –**

1) रांजणवाडी.......... डोळ्याला पुळी येवून पाणी येते. पाण्यात मिरी वाटून ती पुळीवर लावावी.

2) पोटदुखी – 1) दोन चमचे लिंबाच्या रसात आल्याचा रस चिमूटभर साखर टाकून घ्यावा. 2) चार ग्रॅम ओवा 1/2 ग्रॅम सैंधव वाटून गरम पाण्याबरोबर घ्यावे.

3) अजीर्ण – लिंबू अर्धे कापून त्यावर सूंटचूर्ण व थोडे सैंधव मीठ घालून ते गरम करून चोखावे.

4) अंगाला खाज आल्यास – खोबरेल तेलात लिंबू पिळून ते अंगाला लावावे व गरम पाण्याने अंग धुवावे.

5) आम्ल पित्त – घशाशी जळजळ, आंबटउलटी.

सुंठ व आवळकंठी समप्रमाणात घेऊन चूर्ण करावे व त्यात खडीसाखर घालून घ्यावे.

6) खोकला – पडसे – बेहड्याच्या टरफलाचा तुकडा चघळावा.

7) पोटात गॅस झाल्यास – बाळंत शोप चावून खावी.

8) उलट्या होत असल्यास – बडीशेप पाण्यात उकळून त्यात थोडी साखर घालून पाणी प्या.

9) लघवीला त्रास होत असल्यास – पुदिनाची पाने स्वच्छ धुवून ती उकळत्या पाण्यात टाकून झाकून ठेवा नंतर पाणी गाळून प्या.

10) उचकी – पिंपळी चूर्ण मधातून घ्यावे.

11) खोकला – धणे + सुंठ समभाग घेवून काढा करा व मधाबरोबर घ्या.

12) पाठदुखी – तुळशीचा रस चमचाभर मधाबरोबर घ्या.

13) आव – अर्धा चमचा जिरेपूड + एक चमचा साखर असे मिश्रण घ्यावे.

14) पोट फुगणे – ताकात थोडी जिरेपूड टाकून प्यावे.

15) जुँलाब – दह्यात 1/2 चमचे जिरेपूड घालून खावे किंवा काळ्या कॉफीत लिंबू पिळून घ्यावे.

16) डोके दुखत असल्यास – वेखंड आणि सुंठ सहन होईल इतकी उगाळावी व तो लेप गरम करून कपाळाला लावावा.

17) किडा चावल्यास – कांद्याचा रस चावलेल्या जागेवर लावावा.

18) नाकातून रक्त आल्यास – कांदा फोडून हुंगवावा. डोक्यावर थंड पाणी घालावे.

19) आकडी आल्यास – कांदा हुंगण्यास द्यावा.

20) दाढ–दात दुखल्यास – ओवा बारीक करून चूर्ण दातात धरा.

किंवा ........ हिरडीस लावा. सीमोल पाण्यात घालून चूळ भरावी.

(दाढ सुजल्यास – 1 लवंगाच्या तेलाचा कापसाचा बोळा दाढेत ठेवावा.

21) ढेकर येत असल्यास – ओवा खावा किंवा आल्याच्या रसात काळे मीठ टाकून घ्यावे.

22) चक्कर येणे – आल्याच्या रसात खडीसाखर टाकून घ्यावे.

23) घसा खवखवणे – आलेपाक किंवा आले टाकून चहा घ्यावा.

24) शरीरात वेदना होत असल्यास – आल्याच्या रसात हिंग घालून त्या जागी चोळावे.

25) सांधे दुखी (पोटऱ्या वळणे) – आले रसात थोडे मीठ घालून त्या जागी चोळावे.

26) खरचटल्यास – त्या जागी मध लावल्यास वेदना कमी होतात.

27) कापणे – जखम स्वच्छ पुसून त्यावर टिंक्चर आयोडीन लावावे. बोट कापले असल्यास त्यावर हळद दाबावी.

28) मळमळत असल्यास – प्रवासापूर्वी ''ओवामीन'' ची गोळी घ्यावी.

छातीत कफ झाल्यास – गरम दुधात हळद टाकून प्यावे.

ताप आल्यास – क्रोसीन / मेटॅसीन या गोळ्या तज्ञांना विचारून घ्या.

अंग दुखणे – 'नॉव्हलजीन गोळी तज्ञांना विचारून घ्यावी.

तळव्यांची आग होत असल्यास – चांगले तूप लावून काशाच्या वाटीने चोळा.

डोळे क्षीण झाल्यास – बकरीच्या दुधात कापूस बुडवून डोळ्यावर ठेवा.

आसने –

(शास्त्रोक्तपणे आसने कशी करायची ते माहीत हवे.)

**आसने व त्यांचा उपयोग खाली दिला आहे.**

1) पद्मासन – चित्त शांत होते, पचन सुधारते, गुडघ्याचे सांधे सुधारतात.

2) वज्रासन – संधिवात व पाठीच्या कण्याच्या दुखण्यावर उपयुक्त.

3) सुप्रवज्रासन – पचन, मलावरोध, गॅसेस इत्यादिवर उपयुक्त.

4) योगमुद्रा – लैंगिक जीवन आरोग्य संपन्न होण्यास उपयुक्त.

5) पवन मुद्रासन – गॅसेस पासून होणारा त्रास टळतो.

6) चक्रासन – श्वासाचा त्रास असल्यास हे आसन उपयुक्त ठरते.

7) शीर्षासन – नाक, कान, डोळे, यास अतिशय उपयुक्त.

8) प्राणायाम – श्वसन क्रिया कार्यक्षम बनते.

9) शवासन – मनाला, शरीराला विश्रांती मिळते. ताजेतवाने वाटते. मानसिक ताण नाहिसा होतो.

**काय कराल? –**

1) हाता–तोंडाला उग्र वास येत असल्यास – लिंबाची फोड चोळावी.

2) थकवा वाटल्यास – लिंबाची फोड चोखावी.

3) माशा असल्यास – जवळ पाण्यात पुदिन्याची पाने ठेवा.


4) ब्रेड कापण्यापूर्वी – सुरी थोडी गरम करून घ्या.


5) ताजे अंडे कसे ओळखावे ? – पाण्यात घातल्यास तळाशी जावून आडवे होते. शिळे अंडे तळाशी उभे राहील. तर खराब अंडे वर तरंगेल.

6) मुंग्या होत असतील तर – बाजूला बोरॅक्स पावडर टाका.

7) कपडे धुताना थोडा लिंबाचा रस पिळल्यास तकाकी येते.

8) शाईचा, आमटीचा/ डाग पडल्यास – लिंबू रसाने घासा.


गोवा



गोमंतक
दळणवळण
मुंबई कडे
तेरेखोल नदी
पेडणे
दोडामार्ग
चोपडे
शिवोली
म्हापसे
हळदोणे
डिचोली
सांखळी
केळघाट
वाळपई
बेती
आग्वाद
पणजी
जुने गोवे
मांडवी नदी
उसगांव
आगशी
मुरगांव
संभाजी
दाबोळी
फोंडे
बोरीपूल
मोले
कुळे
सावर्डे
मडगांव
कुडचडे
सांगे
केपे
रामाचे भूशिर
काणकोण
तळपण
कारवार कडे
गाव
विमानतळ
बंदर
पूल
घाट
लोहमार्ग
राष्ट्रीय हमरस्ता
इतर रस्ते
जलमार्ग

भारतात नितांत सुंदर निसर्गरमणीय असे केरळ, काश्मीर, कारवारसारखे प्रदेश आहेत. त्याच पंक्तीत गोमांतकाचा समावेश होतो. वनराईंनी व्यापलेला उंच–सखल प्रदेश, दुथडी भरून वाहणाऱ्या नद्या आणि चंदेरी वाळूचे प्रशस्त किनारे लाभलेले निळेशार सागर, शितल वाऱ्याबरोबर डोलणारी नारळाची उंच उंच झाडे यामुळे येथील निसर्ग विविधरंगी असूनही धीरगंभीर पण धुंद शांततेचे दर्शन घडवितो. मांडवी आणि जुआरी नदीच्या नितळ संगमाप्रमाणे हिंदू आणि ख्रिश्चन धर्माचे दुहेरी प्रवाह कोठे एकरूप होतात ते कळत नाही. सांस्कृतिक ऐक्याच्या संगमावर गोवा ताठ मानेने उभा आहे. गोव्याच्या नैसर्गिक सौंदर्याइतकेच सांस्कृतिक सौंदर्यपण मोहक आहे.

या भूमीचे मादक सौंदर्य एखाद्या नववधूप्रमाणे सदोदित हिरवेगार असते. समुद्रकिनारी असलेल्या टेकड्या पाहून वाटते, खोडसाळ वाऱ्याने हा निळाशार पदर खांद्यावरून उडवल्यामुळे या लाल भूमीचा सलज्ज चेहरा लाजून चूर झालेला आहे. परमेश्वराने दिलखुषपणे जेवढा सुंदर निसर्ग मुक्तहस्ताने गोव्यात उधळला तेवढ्याच सढळपणे गोवेकरांनी समृद्ध मनाने आपली भक्ती परमेश्वराजवळ अर्पण केली आहे.

**गोव्याचा प्राचीन इतिहास :**

महाकाय भारताच्यापाठी उभा असलेला इतिहास हा हिमालयासारखा उंच आणि हिंदीमहासागरासारखा सखोल आहे. गोवा हे भारताचे अविभाज्य अंग असलेतरी प्रत्येक प्रदेशाचा इतिहास व भौगोलिक वातावरण यात विविधता आहे.

'गोवा' हा शब्द अर्वाचीन आहे. मराठीत यास 'गोवे' (Goven), कोंकणीत 'गोयेम्' (Goem), असेही संबोधतात. पण खरा प्राचीन प्रादेशिक शब्द 'गोमना' असा आहे. इ.स. पू. तिसऱ्या शतकाच्या सुमारास 'गोमांतक' हा शब्द वापरात असल्याचा उल्लेख आहे. 'गोमंत' हा शब्द महाभारताच्या भिष्मपर्वात (अध्याय ९) आढळतो. 'गोमांत' या शब्दाची व्युत्पत्ती श्री. वर्देवालावलीकर यांनी खालीलप्रमाणे सुचवलेली आहे. गो म्हणजे गाय + मन्त = गोमान्त + क हा प्रत्यय

= गोमान्तक

या प्रदेशात प्राचीन काळात 'गोधन' भरपूर प्रमाणात उपलब्ध होते. यावरूनच 'गोमन्त'–गोमन्तक–गोवा अशी अपभ्रंशात्मक शब्दरचना अस्तीत्वात आली असावी. हरिवंश पुराणात 'गोमांचल' असा शब्द वापरला आहे. मगधाचा राजा 'जरासंध' आणि श्रीकृष्णाचे द्वंद्व युद्ध येथे झाले होते. या गोमांचलालाच शिलाहार राजाच्या काळात 'गोमांतदुर्ग' असे संबोधले जात असे. 'गोवा' हा शब्द फार प्राचीन आहे. इ.स. पू. ४थ्या शतकाच्या सुमारास इजिप्तचा राजा 'टॉलेमी' याच्या काळात 'टॉलेमायुष' या ग्रंथात गोव्यासाठी गौबा (Gauba) या शब्दाचा वापर केलेला आहे. इ.स. ११२९ च्या सुमारास कोरलेल्या कानडी शिलालेखात 'गोवा' या प्रादेशिक नावाचा उल्लेख सापडतो. विजयनगरच्या ताम्रपटातही कोकणप्रदेशाच्या उल्लेखात 'गोवा' या शब्दाला राजधानीचा सन्मान देण्यात आलेला आहे. गोवा हा भारताचाच अविभाज्य घटक असल्याने भारताइतकाच त्याच्या प्राचीनतेचा इतिहास सखोल व दीर्घ आहे.

एकेकाळी समुद्रकिनारी असलेला गोवा भारताचे पश्चिम किनाऱ्यावरील सांस्कृतिक प्रवेशाचे द्वार होते. अनेक परकीय व्यापारी, बुध्दिवंत, धर्मप्रसारक, ऐतिहासिक खंदेपुरूष, सैनिक याच मार्गाने भारतात प्रवेशकर्ते झाले. प्राचीन संस्कृतीच्या खुणा गोव्यात फार मोठ्या प्रमाणात उपलब्ध नाहीत. मानवाची प्रथम वसाहत गोमांतकाच्या परिसरात केव्हा निर्माण झाली असावी हा अजुनही संशोधनाचा विषय आहे. समुद्रकिनारपट्टी व मांडवी–जुआरी नदीच्या खोऱ्यात काही ऐतिहासिक खुणा विखुरलेल्या आहेत. हा कालखंड नव्या अश्मयुगाचा आहे, की ज्यावेळी मानव शिकारी अवस्थेत होता. दाबोलीम जवळ बाणांसारख्या हत्यारांचे अवशेष सापडले आहेत. 'वेल्हागोवा', मोपा, कुडने इ. भागात मध्यअश्मयुगीन कालखंडातील दगडी हत्यारे मिळाली आहेत. 'वेल्हागोवा' भागात उत्तर अश्मयुगीन अवशेषही मिळाले आहेत. त्यात टेराकोटा पध्दतीची मातीची भांडी आहेत. त्यावर रंग व नक्षीकाम आहे.

या भूमीच्या उत्पत्तीविषयी अनेक पौराणिक कथा गुंतल्या गेल्या आहेत. विष्णूचा सातवा अवतार परशुराम याने बाण मारून कोकणभूमी समुद्रातून वर आणवली. या भागालाच पूर्वी गोवाराष्ट्र संबोधित असत.

शिव-पार्वतीचे एकदा भांडण झाले. शंकर रागावून पार्वतीला सोडून गोमांतकात आले. 'गोमांतकेश' नाव धारण करून त्यांनी या भूमीतच प्रस्थान मांडले. नंतर पार्वतीपण शिवाचा शोध घेण्यास या प्रदेशात आल्याचे धार्मिक कथातून वर्णन वाचायला मिळते. ऐतिहासिक काळात शिवपंथीय वनवासी लोकांची वस्ती येथे होती. त्यांनी 'मल्लीकार्जुन' मंदिराची उभारणी या भागात केली. हब्बू लोकांच्या टोळ्या वारंवार या भूभागावर हल्ला करीत, तेव्हा गावकर-देसाई वनवासी लोकांच्या मदतीला धावून जात असत.

याच भागात सप्तर्षींनी सातदशलक्ष वर्ष शिवाला प्रसन्न करण्यासाठी तपश्चर्या केली. शिव त्यांची भक्ती पाहून प्रसन्न झाला व भक्तांच्या दर्शनार्थ आणि त्यांना आशीर्वाद देण्यासाठी 'सातकोटेश्वर' नावाने येथे अवतीर्ण झाला. इ.स. पूर्व २७३ या कालखंडात मथुरेचे यादव वंशातील 'भोज' गोमांतकात आले. त्यांनी चंद्रपूर (चांदर) वसवले. या यादवांच्या काळात येथे गाईंची मोठ्या प्रमाणात संख्या होती. यावेळी चंद्रपूरचा परिसर अधिक विकसित झाला. संरक्षणासाठी गावाभोवती मातीची भिंत उभारण्यात आली. एका बाजूला खाडी व दुसऱ्या बाजूला परोडानदी असल्याने या दोन दिशांकडून शत्रूची फारशी भीती नसे.

महाराष्ट्रात गोदावरीच्याकाठी पैठणजवळ सातवाहनांचे राज्य होते. त्यावंशातील पराक्रमी राजा गौतमीपुत्राने कोकणासह महाराष्ट्राचा बराचसा प्रदेश जिंकून घेतला होता. गोव्यातील भोज राजाला सातवाहनांपुढे शरणागती पत्करावी लागली. भोज राजाने चंद्रपूर जवळच्या उंच डोंगरावर 'चंद्रनाग' शिवाचे मंदिर उभारले. व्यापारीदृष्ट्या चंद्रपूर भरभराटीस आलेले छोटेसे राज्य असावे. पराक्रमी सातवाहनांचे मांडलीकत्व शेकडो वर्षे चंद्रपूरला मान्य करावे लागले होते.

गोमांतकात बौद्धधर्म प्रसाराचा प्रयत्न झाला पण तो यशस्वी ठरला नाही. मौर्य

घराण्यातील पराक्रमी सम्राट अशोक याने कोकणपर्यंत मजल मारली होती. येथूनच त्याने 'धर्मरक्षिता' या बौद्ध भिक्षूला गोव्याच्या परिसरात पाठवले होते. येथील उत्खननात ध्यानमुद्रा असलेली बुध्दाची मूर्ती सापडलेली आहे. गोव्याचा प्राचीन इतिहास मौर्यकाळापासून ख्रिश्चनधर्माच्या स्थापनेपर्यंत मानला जातो. इ. स. २ ऱ्या शतकापासून चौथ्या शतकापर्यंतच्या कालखंडातील ऐतिहासिक पुरावे उपलब्ध नसल्याने गोव्याचा हा इतिहास अनाकलनीय आहे.

चौथ्या शतकातील 'शिरोडा' येथे मिळालेले दोन ताम्रपट संस्कृत व ब्राह्मी भाषेत आहेत. येथूनच गोमंतकाच्या लिखित इतिहासाची सुरूवात होते. चंद्रपूर येथे राजा देवराज याचे राज्य होते. त्याने गोविंदस्वामी आणि इंद्रस्वामी यांना भूमी दान दिल्याचा उल्लेख या ताम्रपटात आहे.

इ. स. ४ थ्या शतकात गोव्यात कदम्बांची सत्ता स्थापन झाली. दक्षिण भारतात कदम्ब घराण्याचे राज्य होते. या राजघराण्याच्या राजवाड्यासमोर एक कदम्ब वृक्ष होता. त्यावरून या घराण्यातील राजांना 'कदम्ब' असे संबोधित. इ. स. ४ थ्या शतकापासून इ. स. १० व्या शतकापर्यंत गोव्यात 'कदम्ब' घराण्याचेच राज्य नव्हेतर विविध वेळी चालुक्य, राष्ट्रकुट, शिलाहार यांनीपण आपले राज्य स्थापन केले.

**गोव्यातील ऐतिहासिक मध्ययुगीन कालखंड :**

इ. स. १३०० ते सुमारे इ.स. १५१० पर्यंतचा दोनशे वर्षांचा कालखंड हा गोव्याच्या इतिहासातील मध्ययुगीन कालखंड मानला जातो. काही इतिहासकारांच्यामते इ. स. १४७२ पर्यंत गोवा विजयनगर साम्राज्याच्या अधिपत्याखाली होता. तर काहींच्यामते या काळात 'नाईक' म्हणून कोणीतरी प्रमुख गोव्यावर राज्यसत्ता गाजवीत होता.

इ. स. १५०९ मध्ये पोर्तुगीज गोव्यात पोहोचले. 'अल्बूकर्क ' याने १५१० मध्ये बंकापूर येथे आपली वकीलात उघडली होती.

**गोव्यातील पोर्तुगीज सत्ता :**

८ जुलै १९४७ मध्ये पोर्तुगालहून १७० खलाशांसह 'वास्को दि गामा' नवीन भूखंडाच्या (अमेरिका) शोधार्थ जहाजे घेऊन निघाला. तो केप ऑफ गुडहोपला वळसा घालून १७ मे १४९८ रोजी मलबारमधील कालीकत बंदराजवळ कापूकाण्ड येथे हिंदुस्थानच्या भूमीवर प्रथम उतरला. याच काळात पोर्तुगीज राजांनी हिंदुस्थानी लोकांना खिश्चन करण्याचा प्रयत्न सुरू केला. नंतर त्यानी मसाल्याच्या पदार्थांच्या व्यापारात शिरकाव सुरू केला. पर्शियन समुद्रातील 'ओर्मूझ' आणि लालसमुद्राजवळील 'एडन' व 'जेड्डा' या प्रमुख केंद्रातून मसाल्याचे पदार्थ गोव्यातून दमास्कस द्वारे युरोपमध्ये जात.

वास्को-द-गामा हा भारतात प्रवेश करणारा पहिला पोर्तुगीज खलाशी. कालीकत येथे त्याचे स्वागत झाले. पण अरब व्यापाऱ्यांना गामाचे आगमन सुसह्य वाटले नाही. येथील 'मलबारी' व्यापाऱ्यांनीपण त्याच्याशी जवळीक व व्यापारी संबंध ठेवले नाहीत, येथून वास्को उत्तरेला 'अंजेदिवा' बेटापर्यंत गेला. कुंडमूर आणि अंजेदिवा येथील व्यापाऱ्यांशी संपर्क साधून त्याने स्वतःबरोबर आणलेल्या वस्तूविनिमयाद्वारे हिंदुस्थानी वस्तू मोबदल्यात घेतल्या. भारतीय पश्चिम किनारा आणि व्यापारासाठी येथे उपलब्ध वस्तू यांची माहिती घेऊनच तो मायदेशी परतला.

इ. स. १५०९ ते १५१५ या काळात अलमिडानंतर 'अल्बुकर्क' हा पोर्तुगीज गव्हर्नर भारतात आला. येताना त्याने सोबत १२८० जहाजे आणली होती. त्याने विजापूरच्या सुलतानाकडून गोवा प्रांत काबीज केला. गोव्यातील विलासी सुभेदार पळून गेल्यावर अल्बुकर्कने त्याचा वाडा आणि किल्ला हस्तगत केला व आदिलशहाच्या चार हजार सैनिकांना अटक केली. अल्बुकर्कने गोव्यातच पोर्तुगीज सत्ता स्थापन करायचे ठरवून इ.स. १५१० मध्ये पुन्हा गोव्यावर हल्ला चढवला. आणि गोव्यातील विजापूरची आदिलशाहीची सत्ता नेस्तनाबूत केली. प्रथम मांडवी नदीतून पणजी किल्ला त्याने हस्तगत के ला. गोव्यात आपले धार्मिक बस्तान बसविण्यासाठी चर्च उभारण्यास सुरुवात केली. लढाईत मेलेल्या हिंदू–सैनिकांच्या स्त्रियांच्या बरोबर

पोर्तुगीजांनी विवाह करण्यास सुरुवात केली. आणि व्यापार, सामाजिकसंबंध आणि राजसत्ता या दृष्टीने पोर्तुगीज गोव्यात स्थिर झाले.

इ. स. १५८४ पासून गोव्यातील लोकांना ख्रिश्चन बनविण्यास जोरात सुरवात झाली. इ. स. १५७० मध्ये विजापूरच्या शहाने गोव्याला वेढा घालून युद्ध पुकारले पण गोव्यात पक्के पाय रोवलेल्या पोर्तुगीजांचा त्याना पराभव करता आला नाही. या काळात पोर्तुगीजांच्या नावाने नवीन चलन गोव्यात प्रथमच सुरू झाले.

इ. स. १५१५ मध्ये अल्बुकर्क मरण पावला. यानंतर 'लोपो सोरसच्या' हाती सत्ता आली. त्याने मुक्त व्यापारास प्रोत्साहन दिले. डचांनी आपले पहिले व्यापारी जहाज इ. स. १५९७ मध्ये मलबारकडे पाठवले. डच व्यापारी सुरत व मलबार येथे वारंवार येवू लागले. त्यानी मसाल्याचे पदार्थ खरेदीस व निर्यातीस सुरुवात केली. पोर्तुगीजांनी डचांना पकडून गोव्यात आणले व पायबंदी केले. याचवेळी म्हणजे इ. स. १६०० मध्ये इंग्रजांच्या 'ईस्ट इंडिया' कंपनीची आणि इ. स. १६३० मध्ये डच ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली.

डचांचा त्रास वाचवण्यासाठी पोर्तुगीजांना इंग्रजांशी तह करावा लागला. पोर्तुगालच्या राजाने इंग्लंडचा राजा दुसरा चार्लस याला आपली कन्या दिली. आणि सोबत 'मुंबई' बेट आंदण दिले. पोर्तुगीजांच्या हातून मुंबईसारखे महत्त्वाचे बंदर या प्रसंगाने इंग्रजांकडे गेले.

**पोर्तुगीज सत्ता आणि मराठेशाही :**

गोव्याच्या सभोवताली पोर्तुगीज, डच, इंग्रज, संघर्ष चालू असतानाच गोव्याच्या सीमेला लागून असलेल्या महाराष्ट्रात मराठ्यांची सत्ता उदयाला येत होती. राजे शहाजी आदिलशहाच्या पदरी सरदार असलेतरी स्वतंत्र वृत्तीचे पराक्रमी महापुरुष होते. जीजाबाई पुण्याच्या परगण्यात स्थायी होत्या. त्यांना मुलगा झाला. तेच राजे शिवछत्रपती. बालपणापासूनच स्वातंत्र्य निर्मितीचा हव्यास व स्वराज्य स्थापनेची आवड. त्यांनी तोरणा घेऊन महाराष्ट्राच्या महाद्वाराला स्वातंत्र्याचे तोरणच

उभारले होते. शिवाजी महाराजांनी 'चौल' आपल्या ताब्यात घेतले तेव्हाच पोर्तुगीजांना मराठ्यांच्या पराक्रमाची कल्पना आली. तरीसुद्धा शिवाजी महाराजांनी जंजीरा (मुरूड) वर स्वारी केली, तेव्हा पोर्तुगीजांनी सिद्धीला मदत केली. नंतर महाराजांनी बारदेस व डिचोली येथे हल्ले करून पोर्तुगीजांना अटक केली. शेवटी इ. स. १६६७ मध्ये पोर्तुगीजांना शिवाजीशी तह करावा लागला.

इ. स. १६६८ मध्ये महाराजांनी गोवा मुक्तीसाठी गनिमी काव्याने प्रयत्न केला. पण तो प्रयत्न यशस्वी झाला नाही. महाराज डिचौली येथे काही दिवस राहिले. त्यानी 'नार्वे' गावाजवळील गुहेतील शंकर मंदिराचे दर्शन घेतले. हेच गोव्यातील 'कदंब' घराण्याचे प्रसिद्ध कुलदैवत 'सप्तकोटेश्वर' होय.

महाराजांना इ. स. १६७४ मध्ये राज्याभिषेक झाला. त्यावेळी इंग्रज व डच वकील व इतर व्यापारी कार्यक्रमात सहभागी होते. पण पोर्तुगीजांचा प्रतिनिधी नव्हता. महाराजांनी इ. स. १६७५ मध्ये गोवा मोहिमेस सुरूवात केली. आणि फोंड्याच्या किल्ल्यावर हल्ला चढविला व किल्ला जिंकला. याच मोहिमेत चांदर, बार्से, चंद्रवाडी, केपे, सांगे व काणकोण हे प्रदेशही आपल्या ताब्यात घेतले.

इ. स. १६७९ मध्ये पोर्तुगीज सीमेच्या बाजूला असलेल्या 'बेतूल' येथे किल्ला उभारण्याचे छत्रपतींनी ठरविले. पोर्तुगीजांचा त्यास विरोध होता. पण ते काही करू शकले नाहीत. महाराजांच्या मनात गोवामुक्तीचा प्रश्न सलत होताच. पण त्यावेळी प्रकृती अस्वास्थ्याने मोहिमांवर संयम ठेवावा लागत होता. इ. स. १६८० मध्ये परकीय शत्रूवर जबरदस्त दबदबा निर्माण करणारा हा कुलवंत मराठी राजा निवर्तला. गोवा मुक्तीचे स्वप्न अधुरे राहिले. गोवेकरांच्या सभोवतालच्या पारतंत्र्याच्या शृंखला दीर्घकाळासाठी आवळल्या गेल्या. गोव्याची मूळ हिंदू संस्कृती परकीयांच्या सत्तेखाली खिचपत पडली.

शिवाजीमहाराजांच्या नंतर मराठेशाहीची धुरा त्यांचे थोरले पुत्र 'संभाजीराजे' यांचेकडे सोपविण्यात आली. संभाजीने 'येसाजी गंभीर' सारखा मात्तबर वकील पोर्तुगीजांशी बोलणी करण्यास पाठवला. पण पोर्तुगीजांनी तहाची टाळाटाळ सुरू

केली. संभाजीने 'काणकोणच्या' जवळ फौज आणून ठेवली. त्याला प्रतिशह म्हणून व्हिसीरेयने 'आंजेदिप' बेटावर किल्ला उभारला. संभाजीने 'चौलवर' चाल केली. त्यावेळी व्हिसीरेयने फोंड्यावर हल्ला चढवला पण त्यात पराभव पत्करावा लागला. संभाजीराजांनी 'गोवा' जिंकण्यासाठी 'जुवे' बेटावर हल्ला चढवला. तेथून 'गोवा' शहरावर चालून येत असताना व्हिसीरेयने सर्व बांध फोडून प्रदेश जलमय केला व स्वतः सेंटझेवीयर चर्चमध्ये येऊन लपला. नेमके याचवेळी औरंगजेबाचे सैन्य औरंगाबाद दिशेने वेगाने येत असल्याची बातमी मिळाल्याने 'गोवा' मोहीम सोडून संभाजी राजांना परतावे लागले.

इ. स. १६८५ मध्ये मराठी सैन्याने 'बारदेसवर' हल्ला चढवला. पोर्तुगीजांनी वाडीकर, सावंत, सरदेसाई या प्रमुख मंडळींची मते संभाजीच्या विरूद्ध तयार केली. यामुळे मोहिमेत यश येणे संभाजीराजांना कठीण होत गेले. इ. स. १६८९ मध्ये संभाजीराजांचा मृत्यू झाला व कारभार राजारामाच्या हाती आला. इ. स. १६९२ मध्ये मोंगलांनी पोर्तुगीजांचा काही कोकणातील प्रदेश जिंकला. संताजी–धनाजी यांनीसुद्धा पोर्तुगीजांवर हल्ले केले. पण यश आले नाही. राजारामांच्या मृत्यूनंतर ताराबाईंच्या कारकीर्दीत सिंधुदुर्गच्या निमित्ताने मराठे–पोर्तुगीज संघर्ष झाला.

त्यानंतर शाहूने पोर्तुगीजांना कोकणचा जहागीर म्हणून मिळालेला प्रदेश परत मागितला. कान्होजीने पोर्तुगीजांना जेरीला आणले होते. त्याचा बंदोबस्त करण्यासाठी पोर्तुगीजांना इंग्रजांची मदत घ्यावी लागली.

इ. स. १७२१ च्या हल्ल्यात मराठ्यांनी पोर्तुगीजांची जहाजे बुडवली. थोरले बाजीराव पेशवे आंग्र्यांच्या मदतीला आल्याने पोर्तुगीजांची गाळण उडाली. इंग्रज आणि पोर्तुगीज सैन्य तेथून पळाले.

इ. स. १७३९ मध्ये बाजीरावाचा भाऊ चिमाजी आप्पाने पराक्रमाची शर्थ करून पोर्तुगीजांचा पराभव केला. मराठे 'मडगांव' पर्यंत आले. याचवेळी मराठे व पोर्तुगीज यांच्यात तह झाला. खंडणी वसूल करून मराठ्यांनी 'मडगांव' सोडले. इ.

(स्थळ

स. १७४० मध्ये बाजीराव मृत्यू पावले.

त्यानंतर नानासाहेब पेशवे झाले. साष्टीच्या महसुलातील काही भाग मराठी राज्याला पोर्तुगीज देत असत. याच काळात कोकणातील बरीच ठिकाणे पोर्तुगीजांनी मराठ्यांना दिली. सदाशिवराव भाऊपण गोव्यावर स्वारी करणार होते पण ते शक्य झाले नाही. पोर्तुगीजांनी 'मर्दनगडावर' स्वारी केली. त्यात पराभव तर झालाच पण पोर्तुगीजांचा प्रमुख व्हिसीरेयच लढाईत मरण पावला. हा गोव्याच्या सत्तेला फार मोठा हादरा होता.

इ. स. १७६१ मध्ये पानीपतच्या युद्धात मराठ्यांचे अतोनात नुकसान झाले. त्याचवेळी मर्दनगडच्या अपमानाचा वचपा पोर्तुगीजांनी काढला. छत्रपती संभाजीराजांनी बांधलेला मर्दनगड पोर्तुगीजांनी जमीनदोस्त केला. 'कॉदि–द–ॲग' या पोर्तुगीज व्हिसीरेयने गोव्याची खालावलेली परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला. उद्योगाचे पुनरूज्जीवन करण्याचा प्रयत्न केला. नवीन कारागीर पणजीला आणले. यावेळेपासूनच या भागाला 'नवागोवा' असे नामाभिधान प्राप्त होऊन राजधानीचा मान पणजीला मिळाला.

माधवराव पेशव्यांच्या काळात पोर्तुगीजांशी फार संघर्ष उडाला नाही. 'सोंदे'चा राजा पोर्तुगीजांच्या आश्रयास गोव्यातच होता. हैदरनंतर म्हैसूरचे राज्य टिपू सुलतानाच्या हाती आले. मराठ्यांनी पोर्तुगीजांना टिपूच्या विरूद्ध लढण्यासाठी मदतीचे आवाहन केले. पोर्तुगीजांनी मदत न केल्याने 'सदाशिव गड' मराठ्यांच्या हातून गेला. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात 'पेडणे' ते 'सांगे' काणकोण इ. प्रदेश पोर्तुगीजांच्या ताब्यात होते. 'राघोबा' पराक्रमी असून पोर्तुगीज सत्तेपुढे त्याचे काही चालले नाही.

गोवा आणि कोकणात सावंतांचे प्रस्थ होते. कोल्हापूरचे मराठी राजे आणि सावंत यांच्या संघर्षात पोर्तुगीजांनी सावंतांना मदत केली. 'कारवार'मधील 'शिर्सी'जवळ पूर्वी एक 'सोंदे' संस्थान होते. इ. स. १७३९ च्या सुमारास पेशव्यांनी गोव्याकडे मोर्चा वळवून 'सोंदे'च्या ताब्यात असलेला फोंड्याचा किल्ला जिंकला.

त्यानंतर हैदरने 'सोंदेचा' पराभव केला. पोर्तुगीजांनी या परिस्थितीचा फायदा घेऊन सोंदेचे राज्य आपल्या ताब्यात घेतले. नंतर गोव्यातील 'बांदोडे' येथे 'सोंदे' स्थायिक झाले. 'सोंदे' घराणे हे दक्षिणेतील विजयनगरच्या साम्राज्याचे वंशज मानले जातात. 'सोंदे'चे राजे लिंगायत होते. गोव्यात आजही सोंदे घराण्यास राज घराण्याचा मान देतात.

इ. स. १७९९ मध्ये इंग्रजांनी आपले सैन्य पोर्तुगीजांच्याकडे पाठवले. ते इ. स. १८१५ पर्यंत गोव्यात होते. इ. स. १८७४ मध्ये गव्हर्नर जनरल 'जुआंव'च्या काळात गोव्यात इंग्रजांच्या मदतीने मुरगाव ते ब्रिटिश राज्य सीमेपर्यंत रेल्वे सुरू करण्याचे ठरविण्यात आले. इ. स. १८८२ मध्ये रेल्वेचे काम सुरू झाले व इ. स. १८८७ मध्ये प्रथम रेल्वे गोव्यात धावू लागली.

इ. स. १९१० मध्ये पोर्तुगालमधील राजेशाही नष्ट झाली. त्यामुळे गोव्यातील राजवटीच्या ध्येय धोरणात बदल झाले. इ. स. १९१४ मध्ये 'गोवा' वसाहतीच्या बाबतीत कायदा पास करण्यात आला. व या प्रदेशाला स्वतंत्र हक्क बहाल करण्यात आले. त्यानंतर गोव्यात निवडलेल्या व नियुक्त अशा सभासदांचे एक मंडळ गव्हर्नरने स्थापन केले. इ. स. १९१० पर्यंत गोव्यात ख्रिस्ती धर्माशिवाय इतरांना सहिष्णुतेने वागवले गेले नव्हते. त्या धोरणातही बदल होऊन व्यापक धोरण स्वीकारले गेले. इ. स. १९२६ मध्ये पोर्तुगालमध्ये क्रांती झाली. त्यावेळी तेथील अर्थशास्त्राचा प्राध्यापक डॉ. सालाझारने राजकारणात प्रवेश करून गोव्यातील सत्तेची सूत्रे आपल्या हाती घेतली. त्याने गोवा शासनातील गव्हर्नरचे अधिकार वाढवले. गव्हर्नरला सल्लागार नेमला. सत्ता एकवटण्याचाच प्रयोग होता तो. पण या काळात 'देवदासी' पद्धतीला प्रतिबंध होत होता. युरोपियन, भारतीय ख्रिश्चन व इतर यांच्यातील अंतर वाढत होते. लोकशाही ऐवजी सालाझारच्या कालखंडात हुकुमशाहीचाच उदय झाला. वृत्तपत्र स्वातंत्र्यावर गदा आली. पोर्तुगीज भाषेची सार्वजनिक ठिकाणी सक्ती झाली.

इ. स. १९२० नंतर भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात म. गांधींच्या नेतृत्त्वाखाली

स्वातंत्र्य चळवळीस जोर चढत होता. त्याचवेळी गोवेकरांच्या मनात 'सालाझारची' जुलमीसत्ता झुगारून देण्याचा संतप्त ज्वालामुखी खळबळत होता. पण गोवा–दीव–दमणवर पोर्तुगीजांनी आपली पकड मजबूत बसवली होती.

इ. स. १९३० मध्ये गोवा काँग्रेस कमिटीची स्थापना होऊन इंडियन नॅशनल काँग्रेसप्रमाणे गोवेकरांनी स्वातंत्र्याचा विचार सुरू केला. १९४२ मध्ये भारतात छोडो भारत आंदोलन छेडले गेले. त्याचे प्रतिसाद गोव्यात पण उमटले. गोव्यातील लोकांच्या विनंतीवरून डॉ. राममनोहर लोहिया यांनी १८ जून १९४५ मध्ये मडगांवला म्युनिसिपल ग्राऊंडवर दणदणीत सभा घेतली. त्यांनी पोर्तुगीज सत्तेला आवाहन दिले होते.

११ ऑगस्ट १९४६ मध्ये अखिल भारतीय काँग्रेसने वर्धा येथे गोवा स्वातंत्र्याचा ठराव पास केला. पोर्तुगालच्या पार्लमेंटमध्ये गोव्याचा प्रतिनिधी पाठवला जाई पण तो प्रकार नामधारीच होता. गोव्यात हिंदू व ख्रिश्चनांना दुय्यम दर्जाचे नागरिकत्त्व होते. पोर्तुगीज गोवा काँग्रेस हालचालींवर लक्ष ठेवून होते. तरीसुद्धा पुरूषोत्तम काकोडकर यांच्यासारख्या व्यक्ती हिरीरिने काँग्रेसचे कार्य करीत होत्या. गोव्यातही हरताळ, मिरवणुका, घोषणा सुरू झाल्या. डॉ. लोहियांना अटक केल्यावर तर गोव्यात एकच खळबळ माजली होती. हिंदूंना ख्रिश्चनांची पण साथ लाभली. डॉ. कुंदापण या चळवळीत मध्यभागी होते. गोवा काँग्रेस, गोवन युथ लीग, गोमांतक काँग्रेस अशा विविध संस्था चळवळीत होत्या. स्वातंत्र्य चळवळीतील काही कार्यकर्त्यांना पकडून पोर्तुगालच्या तुरूंगात पाठवण्यात आले. त्यात डॉ. कुंदापण होते. भारतीय काँग्रेसने इंग्रजाना विरोध करण्यासाठी जसे जिवाचे रान केले तसे पोर्तुगीजांना घालवण्यासाठी प्रयत्न झाले नाहीत.

इ. स. १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य लाभले पण भारताचाच प्रदेश असलेल्या गोव्यास मात्र पारतंत्र्यातच रहावे लागले. इ. स. १९४७ ते इ. स. १९५३ या काळात गोवा मुक्तीच्या कार्याला शैथिल्यच आले होते. आझाद गोमंतक दलाने सशस्त्र उठावाचाही प्रयत्न सुरू केला होता. सरकारी ट्रेझरीवरही हल्ला चढवला गेला.

१९ डिसेंबर १९६१ रोजी गोव्यातील पोर्तुगीज सत्ता संपुष्टात आली आणि 'गोवा' स्वतंत्र भारतात कायमचा विलीन झाला. ८ जून १९६२ मध्ये गोआ-दीव-दमण येथे लष्करी गव्हर्नरची नेमणूक केली गेली. १९६२ च्या कायद्याप्रमाणे गोवा भारताचा अविभाज्य घटक म्हणून जाहीर करण्यात आला. व लगेच गोव्यातील पंचायतींच्या निवडणुका घेण्यात आल्या. डिसेंबरमध्ये विधानसभेच्या तीस जागा आणि लोकसभेच्या जागेचीपण निवडणूक घेण्यात आली. महाराष्ट्रवादी गोमांतक पक्षाचा निवडणुकीत विजय होवून २४ डिसेंबर १९६२ मध्ये पहिल्या नवीन मंत्रीमंडळाचा शपथविधी झाला. इ.स. १९६७ मध्ये गोवा महाराष्ट्रात आणि दीव-दमण गुजरातमध्ये विलीन करण्यासाठी सार्वत्रिक मतदान झाले. पण गोव्याने केंद्रशासीत राहण्याचा निर्णय घेतला.

**गोव्यातील भौगोलिक परिस्थिती :**

भारताच्या दक्षिणेला पश्चिम किनाऱ्यावर 'गोवा' हे छोटेसे राज्य ७३.४० अंश व ७४.२० अंश उत्तर अक्षांस आणि १४.५४ व १५.४८ अंश पूर्व रेखांशात पसरलेले आहे. संपूर्ण गोव्याचे क्षेत्रफळ ३७०१ चौ. कि.मि. आहे. गोव्याच्या पश्चिमेला अरबी समुद्र असून मोठी किनारपट्टी या राज्याला लाभली आहे. पूर्व आणि दक्षिण सीमेला लागून कर्नाटक व उत्तरेस महाराष्ट्र आहे.

पूर्वी गोव्याचा प्रदेश कोकण म्हणूनच ओळखला जात असे. दक्षिण कोकणाच्या मध्यभागी गोव्याचे स्थान आहे. भारतात ठिकठिकाणी नैसर्गिक प्रदेशानुसार भाषा, राहणीमान, खान-पानाच्या सवयींमुळे वेगवेगळ्या संस्कृतींनी आपला संसार थाटला आहे. अशा प्रकारच्या विविध राज्यातील संस्कृतींची बेरीज म्हणजेच भारतीय संस्कृती होय.

गोव्याचा प्रदेश सपाट-मैदानी नसून उंचसखल आहे. पूर्वेला सह्याद्री पश्चिमेला किनारपट्टी, डोंगर, नद्या-खोरे यांची विपुलता आढळते. मध्यभाग डोंगराळ आहे. उंचावरील पठारी प्रदेशात लोकवस्ती आहे. गोव्याच्या उत्तरेला

या काळात पोर्तुगीजांनीही दहशतवाद वाढवला. बँन्क लुटणे, सरकारी कार्यालयास आगी लावणे हे प्रकार इ. स. १९५४ पर्यंत सुरूच होते. मुंबई, पुणे, बेळगांव येथे गोवा काँग्रेसच्या शाखा उघडल्या गेल्या. गोवा मुक्ती चळवळीची सूत्रे मुंबईतून हलत होती. मुंबईला 'गोवा लिबरेशन कौन्सिल' नावाची संघटना कॅथलिक लोकांनी काढली होती. गोवा मुक्तीची चळवळ लोकांपर्यंत पोहोचवण्याची महत्त्वाची कामगिरी वृत्तपत्रांनी बजाविली. यात आमचा गोवा, नवजीवन, प्रजेचा आवाज, अवर गोवा, दूधसागर हे पेपर आग्रही होते. गोवाटाईम्स् हे वृत्तपत्र विशेषत्वे या बाबतीत आघाडीवर होते. यावेळी दमणहून नगर हवेली येथे पोर्तुगीज सैन्य नेण्यासही भारत सरकारने बंदी आणली होती. श्री. वामन देसाई आणि डॉ. मस्कारन्स यांनी 'युनायटेड फ्रन्ट ऑफ गोवन्स' ही संस्था मुंबईत स्थापन केली. या फ्रन्टने संघटनेचे लोक बरोबर नेऊन दादरा नगर हवेली स्वतंत्र केले. भारत–पोर्तुगीज संघर्षाची सुरूवात येथून झाली. म्हापसे येथे सुधाताई जोशी यांनी केलेला सत्याग्रह गाजला. त्याना पकडण्यात आले व बारा वर्षांची सजा ठोठावण्यात आली. एकीकडे अहिंसक सत्याग्रह सुरू असताना दुसरीकडे गोमंतक दलाच्या क्रांतीकारकांचा जहाल उठाव सुरूच होता. श्री. नाना गोरे व सेनापती बापट यांनी पण सीमा ओलांडून सत्याग्रह केला.

इ. स. १९५६ ते इ. स. १९६० हा कालखंड शांततेचा होता. इ.स. १९५५ मध्ये गोवा लिबरेशन आर्मीची स्थापना झाली. इ.स. १९६१ मध्ये भारतीय सैन्याने गोव्याला वेढले होते. यावेळी भारताचे संरक्षण मंत्री व्ही. कृष्ण मेनन होते. भारतीय सैनिक रणगाडा, तोफांसह पणजीच्या दिशेने कूच करू लागले. पोर्तुगीजांनी अनेक पूल उडवून दिले. तरीसुद्धा भारतीय सैन्य पणजीत घुसले व तिरंगा फडकवला. गोव्यातील गव्हर्नर ई सील्व्ह विमानाने पळून गेला. वास्को येथे शरणागतीची कागदपत्रे भारतीयांना देण्याची व्यवस्था गव्हर्नरने करून ठेवली. भूदल सैन्य भारतीय सैन्याबरोबर लढण्यास तयार नव्हते. पोर्तुगीजांचे गोव्याशी संबंध जुळलेले असल्याने आपला पराभव होत असताना जाता–जाता गोव्याचे नुकसान करून जावे अशी दुष्ट कल्पनासुद्धा पोर्तुगीजांच्या मनाला शिवली नाही.

१९ डिसेंबर १९६१ रोजी गोव्यातील पोर्तुगीज सत्ता संपुष्टात आली आणि 'गोवा' स्वतंत्र भारतात कायमचा विलीन झाला. ८ जून १९६२ मध्ये गोवा–दीव–दमण येथे लष्करी गव्हर्नरची नेमणूक केली गेली. १९६२ च्या कायद्याप्रमाणे गोवा भारताचा अविभाज्य घटक म्हणून जाहीर करण्यात आला. व लगेच गोव्यातील पंचायतींच्या निवडणुका घेण्यात आल्या. डिसेंबरमध्ये विधानसभेच्या तीस जागा आणि लोकसभेच्या जागेचीपण निवडणूक घेण्यात आली. महाराष्ट्रवादी गोमांतक पक्षाचा निवडणुकीत विजय होवून २४ डिसेंबर १९६२ मध्ये पहिल्या नवीन मंत्रीमंडळाचा शपथविधी झाला. इ.स. १९६७ मध्ये गोवा महाराष्ट्रात आणि दीव–दमण गुजरातमध्ये विलीन करण्यासाठी सार्वत्रिक मतदान झाले. पण गोव्याने केंद्रशासीत राहण्याचा निर्णय घेतला.

**गोव्यातील भौगोलिक परिस्थिती :**

भारताच्या दक्षिणेला पश्चिम किनाऱ्यावर 'गोवा' हे छोटेसे राज्य ७३.४० अंश व ७४.२० अंश उत्तर अक्षांस आणि १४.५४ व १५.४८ अंश पूर्व रेखांशात पसरलेले आहे. संपूर्ण गोव्याचे क्षेत्रफळ ३७०१ चौ. कि.मि. आहे. गोव्याच्या पश्चिमेला अरबी समुद्र असून मोठी किनारपट्टी या राज्याला लाभली आहे. पूर्व आणि दक्षिण सीमेला लागून कर्नाटक व उत्तरेस महाराष्ट्र आहे.

पूर्वी गोव्याचा प्रदेश कोकण म्हणूनच ओळखला जात असे. दक्षिण कोकणाच्या मध्यभागी गोव्याचे स्थान आहे. भारतात ठिकठिकाणी नैसर्गिक प्रदेशानुसार भाषा, राहणीमान, खान–पानाच्या सवयींमुळे वेगवेगळ्या संस्कृतींनी आपला संसार थाटला आहे. अशा प्रकारच्या विविध राज्यातील संस्कृतींची बेरीज म्हणजेच भारतीय संस्कृती होय.

गोव्याचा प्रदेश सपाट–मैदानी नसून उंचसखल आहे. पूर्वेला सह्याद्री पश्चिमेला किनारपट्टी, डोंगर, नद्या–खोरे यांची विपुलता आढळते. मध्यभाग डोंगराळ आहे. उंचावरील पठारी प्रदेशात लोकवस्ती आहे. गोव्याच्या उत्तरेला

महाराष्ट्रातील सावंतवाडीचा भाग येतो. पूर्व आणि दक्षिणेला कोल्हापूर जिल्हा आणि बेळगांवचा भाग गोव्याच्या सीमेला लागून आहे.

पृथ्वीचा जन्म अब्जावधी वर्षांपूर्वी झाला असे समजले तर त्यातून वेळोवेळी घडलेल्या भूगर्भातील घडामोडींचा परिणाम भारतातील भूमीवरही झाला. सलग जमिनीचे तुकडे होऊन ती खंडरूप झाली. व मधल्या खळग्यात समुद्राचे पाणी भरले गेले. दख्खनच्या पठाराचा 'बेसाल्ट' खडकापासून बनलेला गोवा हा एक सह्याद्रीचाच भाग आहे. दख्खनमध्ये जो लाव्हा वाहिला त्यापासून ही जमीन निर्माण झाली. कोकणात 'जांभा' दगड सापडतो. हाच दगड गोव्यातपण आहे. लॅटराईट हा दगड रेतीच्या कणाकणांनी बनलेला लाल–जांभळ्या रंगाचा असतो. हा दगड प्री कॅबीयन मानतात. ज्या भूप्रदेशात लोखंड व मॅगनीज सापडते त्या खडकाळ भागास प्री कॅबीयन म्हणतात. हा दगड गोव्यामध्ये सापडतो.

गोव्यात असलेल्या खडकांचे अनेक प्रकार आहेत. खनिजयुक्त खडकांचे थर खोलवर आहेत. त्यावर ग्रॅनाईट, क्वार्टझ आणि बेसाल्ट या कठीण खडकांचे थर साचलेले आहेत पृथ्वीवर वातावरणाची निर्मिती होऊन निसर्ग निर्माण झाला, तसतसे जमीनीवरचे थरही झिजू लागले.

गोव्यात ६०० कि.मी. सह्याद्रीचा भाग पसरला आहे. काही शिखरे तीन हजार फुटापेक्षाही उंच आहेत. त्यात सोनासागर, मोर्लेम, चोगोर व व्हग्यूरीम इ. चा समावेश होतो. गोव्याचा मध्यभाग पठारी प्रदेश आहे. हा गोव्यातील हरित पट्टा आहे. तसेच गोव्यातील किनारपट्टीजवळील जमीन सपाट आहे. सुपीक जमीनीचा भाग जुआरी आणि मांडवी नदीच्या किनारी आहे.

गोव्यातील बेटांची जमीन दोन प्रकारची आहे. एक पिडाडे आणि मांडवीचा भाग खडकाळ आहे तर कुमारजीवाचा भाग मातीचा बनलेला आहे. पश्चिमेकडे तर पांढरी शुभ्र चंदेरी वाळू, स्वच्छ–नितळ पाणीच आहे. साष्टी भागात कोलवा, काणकोणमध्ये गाल्जीबाग व पाळोळे, तिसवाडीत, मीरामार आणि करंजाळे, पेडणे

भागात हरमल, बारदेस भागातील वागातोर, बाग, कलंगुट, सिकेरी हे समुद्रकिनारे निसर्गरमणीय आहेत. गोव्याच्या सौंदर्याला एक धुंद नशा आहे ती किनारपट्टीमुळेच. किनाऱ्याच्या पार्श्वभूमीवर उंचउंच हिरवीगार नारळाची झाडे दिसतात. चंदेरी वाळूला गुदगुदल्या करणाऱ्या निळ्याशार लाटा नीलसमुद्रातून येऊन किनाऱ्यावर आढळतात. उत्तरेपेक्षा दक्षिणेकडील किनारपट्टी सर्वच दृष्टीने आगळी आहे.

## जलाशये (Lakes)

गोव्यातील जलाशये खोलगट भागात निर्झरांनी वाहून आणलेल्या पाण्याने निर्माण झालेली आहेत किंवा किनारपट्टीपासून अलग झालेल्या जलप्रवाहातून तलावांची निर्मिती झालेली आहे. मध्यभागात असलेले तलाव शेतीच्या दृष्टीने उपयुक्त आहेत. तर काही जलाशये निसर्गरमणीय पर्यटन केंद्र म्हणून उपयोगी आहेत. मये, चिंबेल, करमबोलीम, कलापूर, चापोरा कुरचोरेम ही जलाशये प्रसिद्ध आहेत.

## गोव्यातील नद्या (Rivers)

तेरेखोल, मांडवी, साल, जुआरी आणि तलपोना या गोव्यातील प्रसिद्ध नद्या. त्यात जुआरी व मांडवी अधिक महत्त्वाच्या नद्या मानल्या जातात.

## तेरेखोल (Tiracol)

या नदीचा उगम कर्नाटकातील सह्य पर्वतराईतून होतो. गोव्याच्या सीमेवर येऊन ती सरळ १३ कि.मी. वाहते. या नदीच्या डाव्या किनाऱ्यावर 'तिराकोल'चा किल्ला आहे. उजव्या बाजूला गोव्याचा प्रदेश पसरलेला आहे. पठारी प्रदेशाच्या बाजूने ही नदी वाहते. ही नदी म्हणजे गोव्यातील उत्तर दिशेची सीमाच आहे.

## शापोरा (Chapora)

ही नदी कर्नाटकातील बेळगांव जवळील रामघाटातून उगम पावते. गोव्यात

या नदीचा प्रवेशच रूंद पात्राने होतो. या नदीच्या प्रवाहात लहान–लहान बेटे आढळतात. गोव्याच्या प्रदेशात ही जवळ–जवळ ३१ कि.मी. वाहते.

## जुआरी (Zuari)

या नदीला जुआरी–झुवारी अशा दोन्ही नावांनी संबोधतात. ही गोव्यातील प्रसिद्ध नदी. तिची लांबी जवळ–जवळ ६५ कि.मी आहे. गोव्याच्या प्राचीन राजधान्या या नदीच्या काठी होत्या. चांदर किंवा कद्रंबांची राजधानी गोपकपट्टण ही जुआरी नदीच्या काठीच होती. या नदीचा उगम सह्याद्रीत असून तिने गोव्याची भूमी सुजलाम्–सुफलाम् केलेली आहे. सांगेच्या नैऋत्येला या नदीचा मुख्य प्रवाह आहे. या नदीस सांगेच्यापुढे कुशावती नदी मिळते. सावर्डेमार्गे ही नदी अरबी समुद्राला मिळते. पूर्वी या मार्गेच परदेशाशी व्यापार होत होता.

## मांडवी (Mandovi)

कर्नाटकातील सह्याद्रीतून मांडवी नदीचा उगम होतो. जुआरीप्रमाणे ही पण गोव्यातील प्रमुख नदी होय. कुशवती व रागोरा या दोन उपनद्या या नदीस मिळतात. गोव्याची राजधानी पणजी या नदीकाठीच वसली आहे. या नदीच्या पात्रात चोडण, दिवाडी, कुमारजुवे, आटपाडो अशी अनेक बेटे आहेत. या नदीतून प्राचीन काळात परदेशात व्यापार करणाऱ्या छोट्या बोटी सुटत असत.

**गोव्यातील हवामान :**

अरबी समुद्राच्या किनारपट्टी प्रदेशात गोवा वसलेला असल्याने येथील हवामान कोकणाप्रमाणेच आहे. मार्च ते जून महिन्यात कडक उन्हाळा असतो. डिसेंबर–जानेवारीत मात्र कडक थंडी नसते. उन्हाळ्यात ३५° डिग्री सें. ग्रे. पर्यंत उष्णतामान वाढते. हिवाळ्यात २५° डिग्री सें. ग्रे. पर्यंत उतरते. किनारपट्टीमुळेच येथील हवा दमट आहे. पण जून ते सप्टेंबर या महिन्यात पाऊस भरपूर पडतो. त्यामुळे हवेत खूपच आर्द्रता दिसून येते. येथे ३०० ते ३५० सें.मी. सरासरी पाऊस

पडतो. गोव्यातील हवामानाचा अंदाज व्यक्त करणाऱ्या दोन वेधशाळा आहेत. इ.स. १९३१ मध्ये पणजी येथे व इ.स. १९६० मध्ये मार्मागोवा येथे वेधशाळा सुरू झाली.

गोव्यातील दमटपणा सरासरी ६०% आहे. नोव्हेंबर ते मार्च आकाश स्वच्छ असते. पण मे नंतर ढगाळ बनते. पावसाळ्यात पश्चिमीवारे वाहतात. ऑक्टोबर ते एप्रिल ईशान्य वारे तसेच दुपारनंतर समुद्रावरून पश्चिमीवारे वाहतात. उन्हाळ्यापेक्षा हिवाळ्यात गोव्यातील पर्यटन सुखदायी वाटते. पण हिरवळ आणि पावसाची मौज ऑगस्ट–सप्टेंबर मध्येच उपभोगायला मिळते.

**काही महत्त्वाच्या गावी पाऊस –**

| | स्थळ | पावसाचेमान मि.मि.मध्ये– |
|---|---|---|
| १) | पणजी | २५६५ |
| २) | म्हापसा | २५७७.५ |
| ३) | फोंडा | ३०१६.३ |
| ४) | सांगे | २६६१.५ |
| ५) | काणकोण | २९५३.२ |
| ६) | केपे | १४८४.६ |
| ७) | मडगांव | २३०२.२ |
| ८) | मार्मागोवा | २२०७.५ |

**काही महत्त्वाच्या गावी उष्णतामान – (सेंटीग्रेडमध्ये)**

| स्थळ | कमाल | किमान |
|---|---|---|
| मार्मागोवा | ३२ ते ३५ | २५ ते २०.७ |
| पणजी | ३१ ते ३३ | २४ ते २३ |

## गोव्यातील जंगले (Forest)

पोर्तुगीज काळात गोव्यात घनदाट जंगले होती. नंतर गोव्याच्या विकासात जंगलांचे नुकसान झाले पण ते अपरिहार्यच होते. गोव्याच्या एकूण जमिनीपैकी

२८.४२ टक्के जमिनीवर जंगल पसरले आहे. सांगे व काणकोण भागात पावसाचे प्रमाण जादा असल्याने हा जंगलमय भाग आहे. तसेच पश्चिमेकडील घाटात जंगल अधिक आहे. गोव्याच्या जंगलमय प्रदेशात दोन प्रकारची जंगले आढळतात. एक सदाहरित, दुसरी मध्यम हरित जंगले. या जंगलात साग, जांभ, बकूळ, ओटंब, बांबू, करवंद, आंबा, फणस, बोरी, पिंपळ व चिंच इ. झाडे आढळतात.

गोवाराज्य फळा–फुलांनीपण बहरलेले आहे. गोव्यातील आंबा, फणस, काजू प्रसिद्ध आहे. गोव्याला काजूघरच म्हणतात. इ.स. १५५८ ते १५७८ मध्ये पोर्तुगीजांनी ब्राझिल देशातून बटाटा, तंबाखू, पपई व काजू या रोपट्यांची आयात करून गोव्यात लागवड केली. एप्रिल ते जून हा गोव्यातील फणस व आंबा यांचा सिझन मानला जातो.

## गोव्यातील प्राणी (Wild animals and birds)

गोव्यात जंगले असल्यामुळे माकडे, कोल्हे, रानमांजर, वाघ, साळ, गवे, हरीण, रानडुक्कर इ. प्राणी आढळतात. गोव्यात पूर्वी घनदाट जंगलात हत्ती होते. बुलबुल, चिमण्या, गिधाडे, मैना, पोपट, सुतार, घुबड, कबूतर, पानकोंबड्या, गरूड इ. पक्षी येथील अरण्यात आढळतात. तसेच विषारी नाग व साप (घोणस, मणियार, फुरसे) इ. आहेत. तर पाणसाप, मालूण, हेवाळे हे बिनविषारी साप आढळतात.

### गोव्यातील भाषा –

गोव्यात मराठी आणि कोकणी या दोन भाषा पूर्वापार एकत्र नांदत आहेत. प्राचीन काळात मराठी ही [वाङ्‌मयीन] भाषा व कोकणी ही बोली भाषा म्हणून वापरली जात असे. इ.स. १७४५ मध्ये पोर्तुगीज भाषेची सक्ती करण्यात आली. दोन वर्षात जो पोर्तुगीज शिकणार नाही त्याला लग्न करण्याची परवानगी देण्यात येणार नाही असा सज्जड दमपण भरण्यात आला होता. प्राचीन शासकीय कागदपत्रे, शालेय अभ्यास, कोर्टकचेऱ्यांचे कागद पोर्तुगीज भाषेत असत. पण ही भाषेची सक्ती तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचली नाही. उच्च वर्गीय हिंदू व ख्रिश्चन लोकांनी फक्त

पोर्तुगीज भाषा हस्तगत केली. हल्ली गोव्यात कोकणी, मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांचा वापर होतो. पोर्तुगीज भाषा मात्र जुन्या सुशिक्षित लोकांच्या बरोबरच हळूहळू लुप्त होत चालली आहे.

**गोव्यातील लोकजीवन –**

(गोव्यातील तालुकावार लोकसंख्या आणि लोकसंख्येची घनता)

**नॉर्थगोवा :**

| तालुका | चौ.कि.मी. एरिया | लोकसंख्या | लोकसंख्येची घनता |
|---|---|---|---|
| तिसवाडी | १९७.९ | १३१९४१ | ६६७ |
| बार्देज | २५५.० | १५३९१३ | ६०४ |
| पेरनेम | २४१ | ५९३५२ | २४६ |
| बिचोलीम | २३३.४ | ७४०८९ | ३१७ |
| सतारी | ४९९ | ४०८३८ | ८२ |
| पोंडा (फोंडा) | २८७.६ | १०७८८८ | ३७५ |

**साऊथ गोवा –**

| | | | |
|---|---|---|---|
| सांगे | ८७९.४ | ५५९०४ | ६४ |
| काणकोण | ३५१.१ | ३५९३५ | १०२ |
| केपे | ३१७.३ | ५५५९३ | १७५ |
| सालकेटे | २९३ | १९३७५५ | ६६१ |
| मार्मागोवा | १०५.९ | ९८५४१ | ९३० |

इ.स. १९०० पर्यंत गोव्यातील बहुतांश भाग खेड्यांनीच व्यापला होता. या ४० ते ५० वर्षात काही गावांचे शहरी रूपांतर झाले. गोव्यातच काय पण भारतात पहिला मानव कोठे उतरला किंवा कोठून आला हे सांगणे कठीण आहे, पण आदिवासी द्रवीड वस्ती दंडकारण्यात होती. भारतातील संस्कृती जंगलात आणि नदीच्या काठी जन्माला आली. डोंगर–खोऱ्यात पूर्वी 'कोल' नावाची जमात राहात

होती. पर्वतावरून ते लोक सपाट प्रदेशात आले असावेत. कोळी लोक कोल जमातीतीलच होते. या कोळी जमातीत मासे मारणारे व शेती करणारे अशा दोन जमाती होत्या. कोल लोकांना कोलिया असे संबोधीत. काही तज्ञांच्यामते कोल शब्द 'कुळ'पासून आला असावा. गोव्यात (महादेव) लिंग देवतेचे महत्त्व आहे. ही लिंग पूजा या प्रदेशात या कोळी लोकांनीच आणली असावी. या कोळी जमातींना महादेवकोळीपण म्हणतात. मंगेष, नागेश या लिंगदेवता पारंपारिकपणे या लोकांनीच निर्माण केलेल्या देवता लिंग पूजेसाठी स्थापन झाल्या असाव्यात.

गोव्यात आणखी दोन प्राचीन जमाती म्हणजे गावडा आणि कुणबी. 'गाव' या शब्दावरून 'गावडा' शब्द आला असावा. गोंड या प्राचीन शब्दापासूनपण गावडाशब्द निर्माण होऊ शकतो. 'गावडा' या शब्दातूनच 'गोवा' शब्दाची निर्मिती झाली. 'मुंडारी' जमातपण येथे होती. त्यांना पोर्तुगीज लेखकाने 'कुरुंबी' शब्द वापरला आहे. यावरूनच 'कुणबी' हा शब्द आला असावा. कोकणात हिंदू कुणबी आहेत तर गोव्यात ख्रिश्चन कुणबीपण आहेत. गोव्यातील मूळ 'कुणबी' लोकांचा व्यवसाय शेती होता. कुर्मी पासून कुम्बी आणि त्यापासून (कुणबी) हा जमात वाचक शब्द तयार झाला असावा.

प्राचीन गोव्यात द्रवीडांचापण प्रवेश झाला असावा. त्यांच्या द्रवीड भाषेचा परिणाम गोव्यातील भाषेवर जाणवतो. द्रवीडांनीच मूर्तीपूजा आणली. पूर्वीची लिंग देवता आणि द्रवीडांची 'शिव' देवता यांचे सम्मीलन होवून 'शिवलिंग' निर्माण झाले असावे. द्रवीडांच्या वेळेसच सुमेरियनपण गोव्यात आले असावेत. हे लोक व्यापारी होते. सुमेरियन पद्दा (पुजारी). हेच लोक गोव्यातील पद्ये ब्राह्मण असावेत. अनंत, वासुकी, तक्षक, कालीय या कुळातील लोक नागवंशातील असावेत. नागलोक मूळ उत्तरेकडील.

मानववश शास्त्राच्या अभ्यासानुसार भारतात मूळ लोक गौड, अनार्य किंवा द्रवीड हे होत. यांनी विशेषतः दक्षिणेकडील राज्यात आपली संस्कृती प्रस्थापित केली होती. गोव्यातही प्राचीन संस्कृतीत अनार्यांचाच मोठा सहभाग आहे. त्यानंतर इ.स.

पू. तीन हजार वर्षांपूर्वी आर्यांचे भारतात आगमन झाले. अनार्यांची आदिवासी संस्कृती हळूहळू बाजूला सारून अनार्यांच्या वैदिक संस्कृतीने भारतात आपले स्थान पक्के केले. आर्यांना शेती व धातूकामाची माहिती होती. गंगा–यमुनेच्या खोऱ्यात त्यांनी प्रथम वसाहत करून नंतर ते दक्षिणेत सरकले. सुरुवातीस आर्य–अनार्य संघर्ष सोडून जमवून घ्यावे लागले.

दक्षिणेकडे विशेषतः कोकण ते केरळ पश्चिम किनारपट्टीवर धनुष्य बाणाच्या जोरावर सत्ता प्रस्थापित करणारा वै इतिहासाला ठाऊक असलेला महापुरुष म्हणजे 'परशुराम' होय. म्हणजे गोव्यात आर्यांच्या आगमनाची मुहुर्तमेढ परशुरामानेच केली. त्यानंतर 'विंध्य' ओलांडून भृगू आणि अगस्थीऋषी दक्षिणेत आले. विश्वामित्रांनी रामाला दंडकारण्यात आणणे हा आर्य आक्रमणाचाच प्रकार होता.

विशेषतः गोव्यात व कोकणात मात्र परशुरामानेच आर्य संस्कृती रूजवली. सारस्वत लोकांची दशगोत्र वसाहत परशुरामानेच स्थापन केली. तसेच केरळ, चिपळूण, कच्छ, गोमांतक या ठिकाणी आर्य ब्राह्मणांचे वसतीस्थान निर्माण झाले. पण यापूर्वी गोव्यात अन्य जमाती होत्या. गोव्यात आर्यांचे आगमन इ.स.पू. २००० वर्षांपूर्वी झाले असावे असा इतिहासकारांचा तर्क आहे. परशुरामाच्या आठवणीची दोन ठिकाणे महाराष्ट्रात चिपळूण व गोव्यात काणकोण ही आहेत.

कोळी लोकांना ब्राह्मण संथा दिली म्हणजेच परशुरामाने अनार्यांना आर्य संस्कृतीची दिक्षा देऊन आर्यकरणाच्या प्रथेला सुरुवात केली असावी. परशुरामाने गोव्यात वसाहत केली पण ती केवळ ब्राह्मणांची केली नाहीतर इतर वर्णीय आर्यकुल येथे स्थापित केले. गोव्यात जातीय संघर्ष होण्याऐवजी जातीय सहजीवन निर्माण होऊन आर्य–अनार्यांच्या मिश्रणातून पुढील जाती–जमातींची निर्मिती झाली.

गोव्यातील सारस्वत जमातीचा मूळ पुरुष सारस्वतऋषी असावेत असाही एक तर्क आहे. हे सारस्वतमुनी मूळ सरस्वती नदीकाठी राहणारे असावेत. त्यातून सरस्वती नदी अनेक ठिकाणी आहे पण गुप्त अवस्थेत. त्यामुळे तिचे स्थान शोधणे इतिहासकारांना कठीण झाले. ब्रह्मावर्तातून सारस्वत ब्राह्मण गोव्याकडे सरकले

असावेत. सारस्वत ब्राह्मणांच्या बरोबरीने गोव्यातील साष्टी व तिसवाडी विभागात क्षत्रियांनी वसाहती केल्या. व्यापारासाठी येथे वैशांचेही आगमन झाले.

गोव्यात पूर्वी देवदासी पद्धत रूढ होती. देवाची सेवा करणारी ती देवदासी. देवाला जसा नैवेद्य तसा शयनभोगही आवश्यक समजून या सेविका मंदिरात ठेवल्या जात. यात नाव देवाचे असले तरी हा मानवी स्वार्थोपभोगाचाच प्रकार होता. या काळात सुंदर मुली श्रद्धेने देवस्थानला अर्पण केल्या जात. हता, गोपिका, भक्ता, दत्ता इत्यादींचा देवदासीत समावेश होतो. या स्त्रिया कलावंतपण असत. काही देवळातील साफसफाई करीत. यांना 'भाविण' म्हणत. या सुंदर गात असत. हा प्रकार गोव्यात जसा होता तसाच प्रकार इतर राज्यात सुद्धा होता. फक्त अशा स्त्रियाना इतरत्र 'मुरळी' म्हणत असत. पेरणी, देवळी हा सुद्धा त्यातीलच प्रकार.

या देवदासी पद्धतीला आता कायद्यानुसार बंदी आहे. पण समाजातील चालीरिती रुजायला जितका कालावधी लागतो तितकाच कालावधी त्या रितीरिवाजांना समाजातून हद्दपार करायला लागतो. आणि ही कामे केवळ कायदा करत नाही. त्यासाठी लोकशिक्षणाची जरूरी आहे. स्त्री शिक्षणाचे महत्त्व वाढवून या स्त्रियांच्या आर्थिक जीवनाची बाजू सांभाळली गेली तर त्या खचितच या समाजजीवनाच्या भोगगर्तेतून आनंदाने बाहेर पडतील. कोणत्या स्त्रीला समाजात प्रतिष्ठीत जीवन जगायला नको आहे ? पण समाजाने जगू दिले तर ना!

गोव्यात जातीयदृष्ट्या श्रेष्ठता व कनिष्ठता आढळत नाही. आर्यांनी इतर मागास समाजालाही सामावून घेतल्यामुळे जातीयतेचा कडवट वाद येथे निर्माण झाला नाही. प्रत्येक गोवेकर या मातीचा घटक आहे असे समजून सामंजस्याने सहजीवन गोवेकरांनी स्वीकारले. हा त्यांच्या मनाचा मोठेपणा. गोव्याच्या जंगलात आदिवासी आढळत नाहीत.

**गोव्यातील ख्रिश्चन :**

गोव्यातील ख्रिस्ती लोक बहुतांशी कॅथलिक आहेत. बोलीभाषेत यांना

'ख्रिस्ताव' म्हणतात. ख्रिश्चनात पंथ आहेत, जाती नाहीत. भारतावर युरोपियनांचे आक्रमण सुरू झाले. व्यापाराच्या निमित्ताने ते सर्वत्र पसरले गेले. त्यांच्या सोबतच ख्रिश्चन धर्मपण गावागावात पोहोचला. इंग्रजांचे मिशनही भारतात येऊन धर्मांतरासाठी आटोकाट प्रयत्न करायचे. तोच कित्ता पोर्तुगीजांनी गोव्यात सत्तेच्या दबावाखाली गिरवला. एक–दोन नव्हेतर सामुदायिक धर्मांतरास गोवेकरांना त्यांनी प्रवृत्त केले. गोवा साष्टी, बारदेस या भागात खेडीच्या–खेडी ख्रिस्ती होत असत. वरच्या वर्गाला ख्रिश्चन करण्यास फारसे यश त्यांना आले नाही. आर्थिक व दुर्बल परिस्थितीचा लाभ उठविण्यात आला.

ख्रिश्चन धर्मांतर म्हणजे काय? तर फक्त धर्माचे नाव बदलले. पण समाजातील मूळ चालीरिती, भाषा, व्यवहार यात बदल झाला नाही. इ.स. १५४० च्या सुमारास पोर्तुगीजांनी धर्मांधतेने हिंदूधर्मस्थाने नष्ट करून लोकांना बाटवण्याचे प्रकार सुरू केले. ख्रिश्चन धर्मात जातीभेद नसल्याने आपले हिंदूधर्मातील कनिष्ठ स्थान नष्ट करण्यासाठी काही जाती आपणहून ख्रिस्ती धर्माकडे वळल्या. चर्चमध्ये या सर्वांना 'बाप्तीस्मा'ची दिक्षा दिली जाई. चर्च, चॅपल (लहान चर्च) कॅथेड्रल (उंच चर्च) इ. धर्ममंदिरात नित्यनियमाने जाणे हे प्रत्येक ख्रिश्चन व्यक्ती आपले कर्तव्य मानतात. त्यांची येशूख्रिस्तावर श्रद्धा आहे. चर्चमध्ये पाद्री किंवा फादर सर्वांना उपदेश करतात. बायबलमधील तत्वांना धरून आपले आचरण ख्रिस्ती धर्मात केले जाते. बाप्तीस्मा हा विधी ते फार पवित्र मानतात. मुलांची नावे ख्रिस्ती संतांची ठेवण्याची पद्धत ख्रिस्ती धर्मात रूढ आहे. तसेच चर्चमध्ये कन्फेशनलाही (प्रायश्चित्त) ख्रिश्चन धर्मात निरतीशय महत्त्व आहे. मानवाकडून कळत नकळत घडते ते प्रामाणिकपणे प्रभू येशूसमोर एकांतात कबुली दिली तर परमेश्वर त्या चुका माफ करतो. ही मानवतावादी पापाच्या पश्चातापाविषयीची चांगली कल्पना पुन्हा पाप घडू नये म्हणून ख्रिश्चन धर्मात रूजवण्यात आलेली आहे.

रविवारी 'मास प्रे' म्हणजेच सामुदायिक प्रार्थनेला सर्वांनी सक्तीने जाणे आवश्यक असते.

**गोव्यातील मुस्लीम :–**

गोवा तसे पाहिले तर हिंदू आणि ख्रिश्चन यांच्यातच विभागला आहे. व्यापाराच्या निमित्ताने गोव्यात अरब लोक येत. त्यांच्याबरोबर आपोआप इस्लामी संस्कृती गोव्यात आली. विजयनगरचे साम्राज्य स्थापन होण्यापूर्वी गोव्यात मुस्लीम अंमल होता. गोव्यात बहामनी आणि आदिलशाही अशा दोन मुस्लीम सत्तांनी राज्य कारभार केला. त्यांनी त्यावेळी येथील लोकांना बाटवण्याचे प्रकार केले. त्यामुळे धर्मांतरीत मुस्लीम वस्ती गोव्यात स्थायिक झाली. दरवेशी, मणियार, शेख, लालबेगी, फकीर, कसाब, मोमीन, रंगारी या मुस्लीम जाती येथे आढळतात. अजलाब व अजराल हे लोक येथे धर्मांतरीत मानले जातात. व्यवसायानुसार श्रेष्ठता–कनिष्ठता यांच्यातही आढळते. खरेतर हा भेद इस्लामी धर्मात नाही. बाप्तीस्माप्रमाणे इस्लामांचा पहिला संस्कार 'बिस्मिल्ला' होय.

**गोव्यातील हिंदू धर्म :**

गोव्यात प्राचीन काळापासून हिंदू धर्म अस्तित्वात आहे. गोव्यातील लोकही विविध देवदेवतांना मानणारे श्रद्धाळू आहेत. शांतादूर्गा, मंगेषी अशी त्यांची अनेक दैवते. त्यांचा दिवस परमेश्वर भक्तीनेच सुरू होतो. गोव्यात प्रत्येक गावात देवांची मंदिरे आहेत. या विविध मंदिरांच्या वर्षातून एकदा मोठ्या जत्रा भरतात. पूजा, आरती, कौल लावणे, पालखी, प्रसाद वाटप इ. प्रकार भक्तीभावाने सुरू असतात. दशावतारी कार्यक्रम सादर केले जातात. महाएकादशी, शिवरात्री, वटसावित्री, हरितालिका, ऋषीपंचमी ही व्रत–वैकल्ये लोक आवडीने करतात. पुरुषांपेक्षाही गोवेकर स्त्रिया अतिशय श्रद्धाळू व धार्मिक आढळतात. श्रावणी रविवार, सोळा सोमवार, मंगळागौर, गोपद्मपूजा इ. व्रते स्त्रिया भक्तीभावाने करतात.

**गोव्यातील सणवार :**

गोव्यात हिंदू आणि ख्रिश्चन या दोन जमाती मोठ्या प्रमाणात असल्यामुळे त्यांच्या समाजजीवनातील पारंपारिक सणवार गोवेकर साजरे करतात.

१) **गुढीपाडवा :** साडेतीन मुहुर्तातील हा उत्तम मुहूर्त. नववर्षाची सुरुवात या दिवसापासून होते. काठीवर पितांबर ठेवून सर्वत्र गुढी उभारली जाते.

२) **रामनवमी :** रामजन्माचा हा सण श्रद्धेने भक्तजन साजरा करतात.

३) **हनुमानजयंती :** चैत्रपौर्णिमेला हनुमानजयंती साजरी केली जाते.

४) **नागपंचमी :** श्रावणात नागाची पूजा करून हा सण साजरा करतात.

५) **सुताची पुनव :** नारळी पौर्णिमेच्या या सणाला समुद्राची पूजा होते.

६) **गोकुळ अष्टमी :** श्रावणात श्रीकृष्णजन्म उत्सवाचा हा सण साजरा केला जातो.

७) **गणेश चतुर्थी :** गोवेकरांचा सार्वजनिक श्रद्धेचा व आवडता सण म्हणजे गणेश चतुर्थी होय. भाद्रपद चतुर्थीला गणेशोत्सव सुरु होतो. तो अनंत चतुर्दशी साजरा होतो. कोकणाप्रमाणे गोव्यातही गणेश चतुर्थीचे महत्त्व मोठ्या प्रमाणात आहे. घरोघर गणपती उत्सव असतो. श्रद्धेने गणेशपूजा आणि आरत्या केल्या जातात. मोदकांचा नैवेद्य दाखवला जातो. आपापल्या ऐपती व आवडीनुसार गणेश मखराची सजावट केली जाते. पोर्तुगीज काळात मातीच्या मूर्तीवर बंदी घातली जाई तेव्हा लोक गणपतीच्या चित्राची मांडणी करीत. घरोघरी गणपती मूर्तींच्या मिरवणुका निघतात. भजन, कीर्तन, नाटके इ. कार्यक्रम होतात. शेवटच्या दिवशी उत्तरपूजा होऊन गणपती विसर्जन केले जाते.

८) **दसरा :** दश = दहा आणि अहर = दिवस. हा सण दुर्गा पूजेच्या निमित्ताने दहा दिवसांचा असतो.

९) **दिवाळी :** हा हिंदूंचा आनंदाचा सण. लक्ष्मीपूजन, पाडवा, भाऊबीज हे तीन दिवस महत्त्वाचे मानले जातात. नवेकपडे, गोड पदार्थ, फटाके उडविणे, दिव्यांची आरास, आकाश कंदिल इ. प्रकारांनी सण साजरा केला जातो.

१०) **शिमगा :** गोव्यात होळीचा सण शिशिरोत्सव म्हणून साजरा करतात. येथे शिमग्याचे दोन प्रकारचे सण आहेत. एक धाकटो शिमगो आणि दुसरा 'वढलो शिमगो.' फाल्गुन पौर्णिमेच्या अगोदर पाच दिवस 'धाकटो शिमगो' साजरा करतात. आणि वढलो शिमगो हा सण पौर्णिमेला आपल्या प्रमाणेच साजरा करतात. पीठ+गूळ यापासून होणारे पदार्थ या दिवशी करतात.

समुदायाने लोक गाणे गातात. 'जोत' (गाणे) म्हणून लोकनृत्यपण करतात. त्याला 'तालगडी' म्हणतात. ढोलताशा यांचा मोठया प्रमाणात नृत्यात सहभाग असतो. 'आंबवली' येथील 'शिमगासण' पहाण्यासारखा असतो.

११) **वसंतपूजा :** वसंतऋतूत हा सण आनंदोत्सव म्हणून साजरा करतात.

१२) **जाईपूजा :** जाईच्या फुलांनी देवमूर्ती करून त्याची पूजा करतात.

**ख्रिश्चन सण :**

१) **रविवार मास :** चर्चमध्ये प्रत्येक रविवारी सुंदर कपडे घालून सामुदायिक प्रार्थना व प्रवचनासाठी ख्रिश्चन आबालवृद्ध एकत्र येतात. या प्रवचनाला 'सर्मन' म्हणतात.

२) **नाताळ :** २४ डिसेंबरची मध्यरात्र आणि २५ डिसेंबर रोजी नाताळ सण साजरा करतात. २४ डिसेंबरला 'बेथलहेम' येथे येशूख्रिस्ताचा जन्म झाला. घरात किंवा चर्चमध्ये हा सण साजरा करतात. घरात गोठ्याची प्रतिकृती तयार करतात. मेरी बाल येशूला मांडीवर घेऊन बसलेली असते. रंगीबेरंगी दिव्यांची सजावट करतात.

3) **इस्टर :** इस्टरचा सण येशूख्रिस्ताच्या पुनरुत्थापनाच्या निमित्ताने साजरा करतात. मार्च महिन्यात हा सण येतो. चर्चमध्ये 'मास'चा कार्यक्रम असतो. इस्टोर ही प्रकाशदेवता इस्टरच्या सणाला 'पेसाक' पण म्हणतात.

४) **गुडफ्रायडे :** हा ख्रिश्चनांच्यासाठी दुःखद दिवस. येशूख्रिस्ताचे या दिवशी निर्वाण झाले. या दिवशी सामुदायिक प्रार्थना करतात. या दिवशी काळे कपडे वापरतात.

५) **कॉर्निव्हल :** हा कॅथलिक ख्रिश्चनांचा सण. विशेषतः 'लॅटिन' संस्कृती जेथे आहे त्याठिकाणी या सणाचे महत्त्व अधिक आहे. शिमग्यातील मौजमजा या सणात असल्याने यास 'कॉर्निव्हल शिमगो' असेपण गोवेकर संबोधतात. हा सण केवळ पणजीत साजरा होतो असे नाही तर म्हापसा, मडगांव, वास्को या ठिकाणी पण सार्वत्रिक उत्साहाने या सणाला उधाण येते. उत्साह, आनंद,

मिरवणुका, मौज, रंगीबेरंगी कपडे घालणे, गाणे, चित्र–विचित्र वागणे, कोणतीही भीडभाड न ठेवता भर रस्त्यात नाचणे ही कॉर्निव्हलची वैशिष्ट्ये.

हा सण मार्च महिन्यात येतो. ग्रीक देवता 'राजा मांमो' शहरात यावेळी प्रवेश करतो अशी प्रथा आहे. चित्ररथ सजवले जातात. यात पारंपारिक संस्कृती दिग्दर्शनपण असते. खाण्यापिण्याची हौस या दिवशी करतात. कारण यानंतर या लोकांचा 'लेंट' (उपवास) सुरू होतो. हा उपवास ४० दिवस करावयाचा असतो. चित्ररथांची मिरवणूक म्हणजेच कॉर्निव्हल परेड होय. तसा हा सण ख्रिश्चनांचा नाही. रोमनकॅथलीक राष्ट्रातील तो सण. या दिवशी जात–धर्म असा कोणताही भेदभाव न मानता सर्व धर्मीय लोकांचा मनमोकळेपणाने सहभाग हे या कॉर्निव्हलचे वैशिष्ट्य.

ज्यावर्षी पर्यटन खात्यातर्फे कॉर्निव्हलची जाहीरात होते त्यावर्षी न चुकवता पहावा असा हा सण आहे.

**गोव्यातील लोकसमजुती :**

इंग्लंडसारख्या प्रगतीपर राष्ट्रातही मरणोत्तर जीवनावर विश्वास आहे. मग भारततर प्राचीन संस्कृतीने व्यापलेले राष्ट्र. येथील प्रत्येक राज्यात लोकभ्रमाच्या कल्पना रुजलेल्या आहेत. गोवा हे तर प्राचीन विविध संस्कृतींशी बांधीलकी असलेले राज्य. येथील लोकांच्या भुताखेतांविषयीच्या कल्पना मनोरंजक तशा थरारक पण आहेत.

पणजीच्या मुख्यचौकात गेलोतर तेथे उंच चौथऱ्यावर जगात कोठे नसेल असा एकमेव पुतळा उभारलेला आहे. 'अबदे फारिया' हा संमोहन विद्या तज्ञ एका स्त्रीला विशिष्ट पोजमध्ये संमोहीत विद्येने झोपवीत आहे, असे या पुतळ्यात दर्शविले आहे. यावरून गोव्यातील लोकसमजुतीचे ते प्रतिक आहे असे म्हणायला हरकत नाही. गोव्यातील काही लोक पारंपारिक विचारांचे तसेच जुन्या कल्पनांनी घेरलेले आहेत. त्यांचा मृतात्मे, भूत इ. गोष्टींवर दृढ विश्वास आहे. गोव्यातील प्रत्येक खेड्यातील एखादे घर किंवा जागा भुताटकीची असते. कमीत कमी लोकांच्या भ्रामक

कल्पना त्या सभोवताली गुरफटलेल्या असतात. घराच्या मागील भागात विहिरी, नदीकाठ, तळी, जुन्या इमारती, झाडांचे शेंडे ही भीतीची ठिकाणे असतात. अमावस्येच्या दिवशी अशा कल्पनेला बहर येतो. रात्री घराकडे येणारे लोक जंगलात रस्ता चुकतात. तर त्यांचे बरोबर कोणी अनामिक चालू लागतात. हिंदू–ख्रिश्चन दोन्ही जातीत भुताखेतांवर विश्वास आहे.

**गोव्यातील उद्योगधंदे :**

जी. डी. डी. आय. डी. सी. (गोवा–दीव–दमण इंडस्ट्रीयल डेव्हलपमेन्ट कार्पोरेशन) सध्या गोव्याच्या औद्योगिक प्रगती विषयी प्रयत्नशील आहे. जेव्हा प्रथम पंचवार्षिक योजना आखण्यात आल्या त्यावेळी गोवा पारतंत्र्यात होता. त्यामुळे त्या राज्याला या योजनांचा फायदा उपलब्ध झाला नाही. गोव्यात लघुउद्योगासाठी २५% सब्सीडी व १५ वर्षे सेल्सटॅक्समध्ये सूट. मध्यम व मोठ्या उद्योगांना १२ वर्षे टॅक्समध्ये सूट आहे. वेर्णा शहर इलेक्ट्रॉनिकसाठी राखीव आहे. गोव्यात हल्ली ४९८७ लघुउद्योग व ५२ विशाल उद्योग प्रस्थापित आहेत. इकॉनॉमिक डेव्हलपमेन्ट कार्पोरेशन (E. D. C.) उद्योगांना आर्थिक मदत करते. आतापर्यंत त्यांनी १८३ कोटीपर्यंत कर्ज दिलेले आहे हल्ली १९% दराने व्याज आकारले जाते. व ९० लाखापर्यंत कर्ज दिले जाते. गोवा स्वतंत्र झाल्यावर महाराष्ट्र आणि कर्नाटकातून वीजपुरवठा करण्यात आला.

माइन्स (खाणी) हा गोव्यातील सर्वाधिक विशाल उद्योग आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून हा उद्योग गोव्यात आहे. गोव्याची फार मोठी अर्थव्यवस्था या व्यवसायावर आधारलेली आहे. लोखंड, मँगनीज, चुनखडी ही खनिजे गोव्यात सापडतात. इ.स. १९०५ पासून जर्मन व फ्रेंच कंपन्यांनी गोव्यातील खनीज उत्पादनास गती आणली. इ. स. १९१४ मध्ये पहिले महायुद्ध झाले त्यावेळी हा व्यवसाय थांबलाच होता. पण नंतर परत हा व्यवसाय सुरू झाला. मांडवी व जुआरी नद्या खनिज असलेल्या प्रदेशातून वाहतात म्हणून त्यांचा उपयोग मँगनीज सारखे खनिज वाहतुकीसाठी होतो.

सालसेटे, बर्डेज, पोंडा, केपे याठिकाणी सिरॅमीक उद्योगाची प्रगती झालेली दिसून येते.

पणजी, म्हापसा, कोर्टालीम, असोलना येथे फॉर्मासिटीकल कंपन्यांची स्थापना झालेली आहे.

जंगल उत्पादनातून फर्निचर, फोटोफ्रेम, अन्य लाकूडकाम इ. उद्योग मडगांव, बोरीम, म्हापसा, पोंडा येथे आढळतात.

स्टील फर्नीचर आणि धातूकाम हे उद्योग मडगांव, पोंडा, ककोरा, कोर्टोरूम, बिचोलीन व पणजी येथे आहेत. ठिकठिकाणी यंत्रदुरूस्ती आणि ॲटोमोबॉईल्सचे वर्कशॉपस् आहेत. नारळापासून तेल काढण्याचा उद्योगपण गोव्यात चालतो.

लघुउद्योगाचा विस्तार मडगांव, पणजी, सावर्डे, म्हापसा, कलंगुट, सक्वेलीन याठिकाणी झालेला आहे.

सध्या पणजी जवळ 'कोर्लिम' येथे मोठी इंडस्ट्रीयल इस्टेट उभारली जात आहे. गोव्याचा औद्योगिक विकास अजून व्हायचा आहे. पण गोव्यातील उद्योग उभारणीस आता मोठ–मोठे भांडवलदार पुढे येऊ लागले आहेत. ही आनंदाची गोष्ट आहे.

**गोवन डिशेश :**

गोव्यातील लोक तसे 'खवय्या'च. स्वतः खाण्यात आणि दुसऱ्याला खाऊ घालण्यात त्यांच्या उदारतेला तोड नाही. गोव्याचे मसाले तसे चटकदार. भाज्या चविष्ट लोणची लज्जतदार, मांसाहारी जेवण करण्यात गोवेकर अन्नपूर्णेचा कोणी हात धरू शकणार नाही. देवभोळ्या, धार्मिक वृत्तीच्या बायकापण शाकाहारी जेवणही उत्तम बनवतात.

भाज्या, आमट्या व मांसाहारी पदार्थ बनविण्यासाठी खालील मसाल्यांच्या पदार्थांचा वापर करतात.

काळीमिरी, लवंग, वेलदोडे, शहाजीरा, हिरवी कोथींबीर व मिरची, खोबरे, काजू, मेथी, दालचिनी, आलं, लसूण, तुलसी, पुदिना, जायफळ, लालमिरची, केशर, तीळ, हळद इ.

गोव्यात शाकाहारी जेवणात भेंडी, पालक, कडधान्य, सुरण, भोपळा, कोबी, मुगडाळ, चणाडाळ, उडीदडाळ इ. पदार्थ दिसतात.

१) **सूप** : मांसाहारी जेवणाच्या आधी सूप पिण्याची पद्धती आहे. मिटसूप, टोमॅटोसूप, डाळसूप, व्हेजीटेबलसूप इ.

२) **मासे** : कोलंबी, हलवा, बोंबील, दिनाज, संगाता, कुर्ली, उंकीर, पालू, शेलूक, बांगडा, पापलेट, कालवम्, सुरगुंटी इ. प्रकार आढळतात. प्रान्स , प्रान्स बफड, फ्राय फिश व करी हे पदार्थ विशेष आवडीने खाल्ले जातात.

चिकन आणि मटणाचे सर्व प्रकार मिळतातच. पण येथील चटणी व लोणचे यामध्ये मिस्कत, कसांउदी, मॅंगोचटणी, टेंडली पिकली हे पदार्थ नाविन्यपूर्ण लागतात.

# गोव्यातील पर्यटन (Tourist Information)

| | |
|---|---|
| गोवाराज्य (आकार) | ३७०२ कि. मी. |
| लोकसंख्या | ११,७०,००० |
| समुद्रसपाटीपासून उंची | समुद्रसपाटी ते १०२२ मी. |

| | | |
|---|---|---|
| **हवामान** | हिवाळा | कमाल २५.७° सें. ग्रे. |
| | | किमान २२.३° सें. ग्रे. |
| | उन्हाळा | कमाल ३२.२° सें. ग्रे. |
| | | किमान २१.३° सें. ग्रे. |

**महिनावार उष्णतामान –**

| महिना | कमाल | किमान |
|---|---|---|
| जानेवारी | ३१.५ | १९.४ अंश सें. ग्रे. |
| फेब्रुवारी | ३१.८ | २० ” ” |
| मार्च | ३१.८ | २३.१ ” ” |
| एप्रिल | ३२.२ | २५.२ ” ” |
| मे | ३२.२ | २६.८ ” ” |
| जून | ३५.५ | २४.५ ” ” |
| जुलै | २८.९ | २३.९ ” ” |
| ऑगस्ट | २९.१ | २४ ” ” |
| सप्टेंबर | २९.४ | २३.६ ” ” |
| ऑक्टोबर | ३१.१ | २३.४ ” ” |
| नोव्हेंबर | २५.७ | २२.३ ” ” |
| डिसेंबर | २५.७ | २२ ” ” |

**पाऊस** : जून ते सप्टेंबर ३५०० मि. मि. पर्यंत

**कपडे** : हिवाळ्यात उलन (स्वेटर)

उन्हाळ्यात सुती–बारीक तलम धाग्याचे

काळीमिरी, लवंग, वेलदोडे, शहाजीरा, हिरवी कोथींबीर व मिरची, खोबरे, काजू, मेथी, दालचिनी, आलं, लसूण, तुळसी, पुदिना, जायफळ, लालमिरची, केशर, तीळ, हळद इ.

गोव्यात शाकाहारी जेवणात भेंडी, पालक, कडधान्य, सुरण, भोपळा, कोबी, मुगडाळ, चणाडाळ, उडीदडाळ इ. पदार्थ दिसतात.

१) **सूप** : मांसाहारी जेवणाच्या आधी सूप पिण्याची पद्धती आहे. मिटसूप, टोमॅटोसूप, डाळसूप, व्हेजीटेबलसूप इ.

२) **मासे** : कोलंबी, हलवा, बोंबील, दिनाज, संगाता, कुर्ली, उंकीर, पालू, शेलूक, बांगडा, पापलेट, कालवम्, सुरगुंटी इ. प्रकार आढळतात. प्रान्स , प्रान्स बफड, फ्राय फिश व करी हे पदार्थ विशेष आवडीने खाल्ले जातात.

चिकन आणि मटणाचे सर्व प्रकार मिळतातच. पण येथील चटणी व लोणचे यामध्ये मिस्कत, कसांउदी, मॅंगोचटणी, टेंडली पिकली हे पदार्थ नाविन्यपूर्ण लागतात.

# गोव्यातील पर्यटन (Tourist Information)

| | |
|---|---|
| गोवाराज्य (आकार) | ३७०२ कि. मी. |
| लोकसंख्या | ११,७०,००० |
| समुद्रसपाटीपासून उंची | समुद्रसपाटी ते १०२२ मी. |

| | | |
|---|---|---|
| **हवामान** | हिवाळा | कमाल २५.७° सें. ग्रे. |
| | | किमान २२.३° सें. ग्रे. |
| | उन्हाळा | कमाल ३२.२° सें. ग्रे. |
| | | किमान २१.३° सें. ग्रे. |

**महिनावार उष्णतामान –**

| महिना | कमाल | किमान | | |
|---|---|---|---|---|
| जानेवारी | ३१.५ | १९.४ अंश सें. ग्रे. | | |
| फेब्रुवारी | ३१.८ | २० | " | " |
| मार्च | ३१.८ | २३.१ | " | " |
| एप्रिल | ३२.२ | २५.२ | " | " |
| मे | ३२.२ | २६.८ | " | " |
| जून | ३५.५ | २४.५ | " | " |
| जुलै | २८.९ | २३.९ | " | " |
| ऑगस्ट | २९.१ | २४ | " | " |
| सप्टेंबर | २९.४ | २३.६ | " | " |
| ऑक्टोबर | ३१.१ | २३.४ | " | " |
| नोव्हेंबर | २५.७ | २२.३ | " | " |
| डिसेंबर | २५.७ | २२ | " | " |

**पाऊस** : जून ते सप्टेंबर ३५०० मि. मि. पर्यंत

**कपडे** : हिवाळ्यात उलन (स्वेटर)
उन्हाळ्यात सुती–बारीक तलम धाग्याचे

| | | |
|---|---|---|
| | | एप्रिल–मे–उन्हासाठी व्हाईट कॅप. |
| **बोलीभाषा** | : | कोकणी, मराठी, इंग्रजी, हिंदी, पोर्तुगीज |
| **साक्षरता** | : | ५५.९ |
| **उद्योग** | : | खनिजोत्पादन, काजू उद्योग, मासे उद्योग, लिकर, जहाज दुरूस्ती |
| **एअरपोर्टचे नाव** | : | दाबोलीम |
| **राजधानी** | : | पणजी |
| **गोव्याला कसे जाल** | : | १) हवाईमार्ग २) रोडवेज ३) रेल्वे |
| **हवाईमार्ग** | : | मुंबई, बेंगलोर, कोचीन, दिल्ली, मद्रास, अहमदाबाद इ. ठिकाणी इंडियन एअर लाईनस्. प्रायव्हेट एअर लाईनस्पण उपलब्ध आहेत. |
| **रेल्वेमार्ग** | : | महाराष्ट्रातील मिरज येथून मिटरगेज लाईन आहे. दिल्ली–गोवा ट्रेन सुरू झालेली आहे. गोव्यात लोंदा, कॅसलरॉक, दूधसागर, मडगाव अशी स्टेशनस् घेत वास्कोला जाते. |
| **रोडवेज** | : | जवळच्या राज्यातून स्टेट ट्रान्सपोर्टच्या तसेच अनेक प्रकारच्या खाजगी लक्झरी बसने गोव्यात येता येते. बेळगांव, गोकर्ण, डुबली, कारवार, कोल्हापूर, मालवण, मंगलोर, मिरज, म्हैसूर, पुणे, रत्नागिरी, वेंगुर्ले आणि मुंबईहून भरपूर बसेस् गोव्यासाठी जातात. |

गोव्यातील बस वाहतुकीचे नाव आहे ''कदम्ब ट्रान्सपोर्ट कार्पोरेशन''. तसेच MSRTC, KSRTC या बस सर्व्हिसेस पणजी, मडगांव, वास्कोशी जोडलेल्या आहेत.

**महाराष्ट्रातून गोव्याला कसे जावे :**

मुंबई–गोवा ५९४ कि. मी.

एस्. टी. सर्व्हिस आहेच. शिवाय दादरहून (पश्चिम) स्टेशन बाहेरूनच

खाजगी लक्झरी बस दुपारी २ ते ४ या वेळात अंदाजे २५ ते ४० सुटतात. व पनवेल, महाड, सावंतवाडी मार्गे जातात.

| | | | |
|---|---|---|---|
| **पुणे** | : | सातारा, कोल्हापूर, अंबोली, सावंतवाडी | ४७१ कि मी. |
| **रत्नागिरी** | : | सावंतवाडी मार्गे | २६३ कि. मी. |
| **कोल्हापूर** | : | अंबोली घाटातून सावंतवाडी | २४६ कि मी. |
| **औरंगाबाद** | : | नगर, पुणे, सातारा, कोल्हापूर, सावंतवाडी | ७०६ कि मी. |

**भारतातील प्रमुख ठिकाणाहून गोव्याकडे. (पणजी राजधानी)**

| | | | |
|---|---|---|---|
| **अहमदाबाद** | : | मुंबई–महाड–सावंतवाडी | १२३४ कि मी. |
| **बंगलोर** | : | हिरायूर, हुबळी, लोंढा फोंडा | ५९८ कि. मी. |
| **बेळगांव** | : | लोंढा, अनमोड, फोंडा | १५७ कि मी. |
| **कलकत्ता** | : | संबलपूर, नागपूर, पुणे, कोल्हापूर | २४८७ कि. मी. |
| **कोचीन** | : | मंगरूळ, कारवार, मडगांव | ८३३ कि. मी. |
| **दिल्ली** | : | आग्रा, इंदूर, धुळे, नाशिक, पुणे | १८९५ कि. मी. |
| **मद्रास** | : | बेंगलोर, हिरायूर, हुबळी, लोंढा, फोंडा | ९२० कि. मी. |
| **म्हैसूर** | : | हसन, जोगफॉल्स, अस्तोली | ६९६ कि. मी. |
| **त्रिवेंद्रम** | : | कोचीन, मंगरूळ, कारवार | १०४६ कि मी. |
| **कारवार** | : | चावडी, काणकोण, मडगांव | १०३ कि. मी. |
| **हैद्राबाद** | : | यादगीर, मुडगळ, हनमुंड | ७५७ कि. मी. |

मुंबई शहरात व्ही. टी. दादर, ग्रँटरोड, खेतवाडी येथे प्रामुख्याने गोव्यात बसेस नेणाऱ्या प्रवासी एजंट संस्था आहेत. त्यांच्याकडे विशेषतः दिवाळी, नाताळ, मे मध्ये जाणे असल्यास किमान १५ ते ३० दिवस अगोदर बुकींग करावे.

रेल्वेचे बुकींग मुंबई सेंट्रल व्ही. टी, चर्चगेट, ठाणे, कल्याण, बोरीवली व कुर्ला येथून करावे.

**गोव्यातील पर्यटन कार्यालय (Tourist office)** (कोठे संपर्क साधाल)

१) मॅनेजर, गोवा टुरिझम डेव्हलपमेंट कार्पोरेशन
त्रिवोनारा आपार्टमेंट, म्युनिसीपल मार्केट जवळ
पणजी ४०३००१
Tel. – ४६५१५ / ४६७२८ / ४४१३२

२) गव्हर्नमेंट ऑफ इंडिया टुरिस्ट ऑफिस.
कम्युनिकेशन बिल्डिंग चर्च स्केअर, पणजी

3) गव्हर्नमेंट ऑफ गोवा–दीव–दमण डिपार्टमेंट ऑफ टुरिझम्
रुआ अकोन्सो अल्बूकर्क–पणजी

४) टुरिस्ट इनफरमेशन सेंटर
टुरिस्ट हॉटेल–मडगांव

५) टुरिस्ट इनूफरमेशन सेंटर, गव्हर्नमेंट ऑफ गोवा–दीव–दमण
म्युनिसीपल बिल्डिंग, मडगांव

६) टुरिस्ट इन्फरमेशन सेंटर
गव्हर्नमेंट ऑफ गोवा, दीव, दमण
जोशी बिल्डिंग – वास्को–दि–गामा.

७) टुरिस्ट इन्फरमेशन सेंटर
गव्ह.– गोवा–दीव–दमण
दाबोलीम एअरपोर्ट–दाबोलीम.

**गोव्याहून महाराष्ट्रात परत येण्याचा रस्ता (कि. मी.) सह :**

| | | |
|---|---|---|
| गोवा–मुंबई : | गोवा ते चिपळूण | ३२५ कि. मी. |
| | चिपळूण ते महाड | ९५ कि मी. |
| | महाड–पनवेल | १२६ कि. मी. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पनवेल–मुंबई | ५१ कि. मी. |
| गोवा–पुणे | : | गोवा ते लोंढा | १०६ कि. मी. |
| | | लोंढा ते बेळगांव | ५१ कि. मी. |
| | | बेळगांव–कोल्हापूर | १०३ कि. मी. |
| | | कोल्हापूर–सातारा | १२२ कि. मी. |
| | | सातारा–पुणे | १११ कि. मी. |

**गोव्यातील वाहन व्यवस्था :**

**कदम्ब बसेस :** प्रत्येक शहरात किंवा गावातून कदम्ब ट्रान्सपोर्टच्या बसेस सुटतात. सर्व गावांहून येणाऱ्या बसेस सिटी–बस स्टॉपवर थांबतात.

**टूरिस्ट बसेस :** टुरिझम डिपार्टमेन्ट तर्फे लहान सफेद बसेसमध्ये स्थानिक टूर नियोजित केल्या जातात. एक दिवस दक्षिण गोवा व दुसऱ्या दिवशी उत्तर गोवा. या भागातील सर्व पर्यटन स्थळे दाखवली जातात. माहिती देण्यासाठी त्यांचाच गाईड असतो.

**टुरिस्ट टॅक्सी :** श्रीमंत वर्गासाठी स्वतंत्र टुरिस्ट टॅक्सी उपलब्ध आहेत.

**मोटार सायकल :** एका व्यक्तीला प्रवास करणे असल्यास यलो–ब्लॅक मोटार सायकल सर्व्हिस आहे. मोटार सायकल स्वाराच्या मागे बसून पर्यटकाला जाता येते. मुंबई–पुण्यासारख्या ठिकाणची सातत्याने वाहन उपलब्धतेची अपेक्षा या शांत जीवनात करू नये. जरावेळ थांबूनच वाहन उपलब्ध होते. रात्री वाहनांची उपलब्धता क्वचितच.

**पणजी (राजधानीतून) गोव्यातील अंतर्गत बस सर्व्हिस आणि कि. मी. अंतर**

| | |
|---|---|
| पणजी ते मडगांव | ३३ कि मी. |
| पणजी ते म्हापसा | १३ कि मी. |
| पणजी ते कलंगुट | १६ कि. मी. |
| पणजी ते दाबोलीम एअरपोर्ट | २९ कि. मी. |

| | |
|---|---|
| पणजी ते ओल्डगोवा | १० कि. मी. |
| पणजी ते तेरेखोल | ४२ कि. मी. |
| पणजी ते वास्को–दि–गामा | ३० कि. मी. |

**गोव्यातील तालुके आणि त्या तालुक्यातील समाविष्ट गावे :**

**बारडेज् तालुका :**

अलडोना, अंजुना, आरपोरा, आसागोआ, असोनारा, बस्तोरा, कलंगुट, कामुरलीम, कंडोलीम, कोलवाले, गुइरिम, म्हापसा, मोईरा, नेरूल, ओक्सेल, पिरणा, पारा, पिलर्ने, पाम्बुर्पा, सलिगोआ, सिओलिम, तिवीम.

**बिचोलीम तालुका :**

अमोने, बिचीलोम, कारापूर, कुडनेम, दोडामार्ग, लताम्बराकोम, मायेम (मये), मुलगाव, पाले, पिलीगोआ, सांकचेर्लीम, सूर्ला

**काणकोण तालुका :**

अनोंदा, बुटपाल, काणकोण, आयलॅण्ड, चॉरी, कोला, कोटीगोआ, लोलीयम, नागोरकेम, पालोलेम, पालेम

**मडगांव (मार्मागोवा) तालुका :**

काम्बरिम, चिकालीम, कोर्टालीम, डाबोलीम, इसोर्सि, मडगाव, पिक्चेनो, साओ जोर्गे, आयलॅण्ड, सांकोले, साओ जसिंटा आयलंड, वास्को–डी–गामा.

**पेरनेम तालुका :**

हर्मल, कार्गो, दुर्गालिम, मांद्रेम, पालेइम, पार्सेम, पत्रादेवी, पर्नेम, चेरीम, वर्कोंडा

**पोंडा तालुका :**

बनसतारी, बंदोरा, बोरिम, खांडेपार, कांडोला, कुंडेम, गंजेम, कवळे, आरगोब, पंचवाडी, पोंडा, क्वेरीम, सिद्धनाथ हील, शिरोडा, तिस्क, उसगाव

**केपे तालुका :**
वार्ली, बार्केम, काकोरा, फातर्पे, गोकोलडेम, मॅना, केपे, कुसीकोंडा, सिरव्होल, एक्सलडेम

**सालीसीटे तालुका :**
अंबेलीम, असोइना, बाणावली, कारमाने, चंद्रनाथहील, चिंचीनीम, कोलवा, कुनकोलीम, कुर्टोरिम, गुरूदोलीम, माचोर्ड, मारगांव, मोबार, वरका, वेलिम.

**सांगे तालुका :**
बेती, कामर फोंडा, कोलेम, कोलंबा, कुर्डी, कुर्पेम, दरबानडेरा, नेत्रवर्ली, नुंदेम, सालगीनीम, संकोर्डेम, सांगे, सावर्डे, सिगाव, सुरिया, तांबडी व विलेना

**सतारी तालुका :**
असोडेम, बिरोनडेम, कारामबोर्लीम, करन्झोल, कोडल, कोटेरेम, पिसुरर्लेम, पोन्सुल, पेरियम, सुरला, व्हेगारी हील, वाळपोल, व्हेलगेम.

**तिसवाडी तालुका :**
बांबोलीम, काबो राजभवन, चोराओ, कोर्लीम, कुमारजुआ, गोआ वेल्हा, जुवे, मंदूर, मर्क्यूरीम, पनजी, सिरीदाओ

## ओल्ड गोवा (Old Goa)

गोव्याच्या जुन्या आठवणी जपून ठेवलेल्या व प्राचीन अवशेष राखून ठेवलेल्या चिरशांत प्रदेशाला (The Rome of the East) 'पूर्वेकडील रोम' असे संबोधतात.

रोमन साम्राज्यात भव्य चर्चची जी धीरगंभीर शांतता आहे ती या जुन्या गोवा भागात आढळते. कॅथॉलीक ख्रिश्चन संस्कृतीचे जे जुने पुराणे दर्शन रोममध्ये होते त्याच पद्धतीची संस्कृती गोव्याच्या या भागात आढळते. शेकडो वर्षांचा इतिहास पाहिलेल्या जुन्या अवशेषांमुळेच या भागाला 'ओल्ड' या विशेषणाने संबोधले जात

असावे.

पोर्तुगीजांनी आणलेल्या ख्रिश्चन संस्कृती अगोदर या ठिकाणी इस्लाम संस्कृतीने या पुराण्या गोवा भागाची जोपासना केलेली होती. आदिलशहाने स्वारी करून कोकण व गोव्याचा प्रदेश आपल्या अधिपत्याखाली आणला. त्यांची राजधानी विजापूर होती. पण गोव्याचे खास आकर्षण आदिलशहाला होते. त्या काळात 'वेल्हागोवा' एक भरभराटीस आलेले शहर होते. वास्को–डी–गामा पासून पोर्तुगीजांचे हे सत्ताकेंद्र बनले. आदिलशहा व पोर्तुगीजकाळात राजधानीचा मान या गावाला मिळाला होता. या जुन्या शहराभोवती भक्कम तट उभा केलेला होता. येथील मुख्य रस्त्यावर कापडाची दुकाने होती. किंमती वस्तू यात मिळत. रस्त्यावरच गुलामांची विक्री होत असे.

इटालियन वास्तू शास्त्रज्ञांनी या जुन्या गोवा भागातील चर्चेसची उभारणी केली आहे. पुराण्या गोव्याच्या तटाला पूर्वी चार दरवाजे होते. इ. स. १५३० मध्ये पोर्तुगीजांनी आपली राजधानी कोचीनहून गोव्यात आणली. यावेळी जुन्या गोव्याचा विस्तार एका मैलाच्या आतच होता. जुन्या गोव्यात आदिलशहाने भव्य राजवाडा बांधला होता, पण तो कालौघात उध्वस्त झाला. त्याचे काही अवशेष अजूनही पहायला मिळतात. इ. स. १५५४ मध्ये पोर्तुगीज काळात गव्हर्नर या राजवाड्यात रहात होता. इ. स. १५६० मध्ये या राजवाड्यातच जुलमी इक्वीझीयन कोर्टाची स्थापना झाली. त्यावेळी तुरुंगाच्या कोठड्या अत्याचारी माणसांसाठी वापरत असत.

या इक्वीझीयनमध्ये कोठड्या, चॅपल, सभागृह होते. सभागृहात क्रूसावर असलेली येशू ख्रिस्ताची मूर्ती होती. या इमारतीलाच गोवेकर 'व्हडले घर' (मोठेघर) म्हणत. पोर्तुगीजांनी याचा कैदखाना म्हणूनच उपयोग केला. गोव्यातील लोक या इमारतीत यायला घाबरत असत. लोकांनी ख्रिस्ती होण्यास विरोध केला तर त्यास 'व्हडल्या घरात नेऊन इंगा दाखवला जाईल,' असा दम पूर्वी दिला जाई.

पाब्लू कॉलेजच्या जागीपण आदिलशहाने बांधलेले धर्मस्थळ होते. येथेच

फादर सेंटझेवीयर राहत होता. तो लोकांना ख्रिश्चन धर्माचे शिक्षण देऊन 'बाप्तीस्मा' देऊन लोकांचे ख्रिश्चनीकरण करत असे. सेंटझेवीयर हे धर्मगुरू नंतर चीनमध्ये मृत्यू पावले. पण त्यांचे प्रेत परत गोव्यात आणले गेले.

याच जुन्या भागात आदिलशहाने तोफा-बंदुका तयार करण्यासाठी एक शस्त्रांचा कारखानाच काढला होता. याला लागून आदिलशहाचा किल्ला होता. तो अल्बुकर्कने जिंकला. नंतर नाणी पाडण्यासाठी टांकसाळ उभारली गेली. जुन्या गोव्यातच विजयनगर हिंदू साम्राज्य काळात 'गोवेश्वराची' उभारणी झाली होती. तेथेच माधवतीर्थ होते. पोर्तुगीज काळात हे नष्ट झाले असावे. नंतर गोवेकरांनी २० व्या शतकात त्याची पुन्हा उभारणी केली. साथीच्या रोगाच्या प्रादुर्भावाने जुन्या गोव्यातून राजधानीचा मानबिंदू पणजीकडे सरकला. पण व्हडलागोवा ओल्ड म्हणून राहिलेच. या भागाला ख्रिश्चन लोक वेल्हा सिडेड संबोधित, तर मूळ गोवेकर त्यास 'वेल्हा गोवा' म्हणत. आदिलशहाच्या पूर्वकाळापासून जुनागोवा शहराची व्याप्ती राजधानी पणजीला गेल्यानंतर वाढली. पानवेल, रायबंदर, गोवेश्वर मंदिर, आदोशी व मांडवी नदीचा परिसर इ. भाग त्यात समाविष्ट झाला.

पणजीची वसाहत पोर्तुगीजांच्या पूर्व काळात बेटावरच होती. त्याकाळात पोर्तुगीज होड्यांचा वापर करीत असत. इ. स. १६ व्या शतकाच्या पूर्वार्धापासून १९ व्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत जुन्या गोव्याच्या विभागातील वास्तू व माहितीचा धावता आढावा घ्यायचातर म्हणावे लागेल की, मांडवीच्या आजूबाजूला ख्रिश्चन संस्कृती आकार घेत होती. शहराचा विस्तार वाढत होता. उत्तरेकडील व्हॉईसरॉयचा राजवाडा नदीकाठी असल्याने त्यातच धक्का बांधून परदेशी व्यापार जोरात चालू होता. आयात-निर्यातीसाठी शेजारीच 'गोदी' होती. यास 'क्कॉईश-द-अल्फा देग' म्हणत. या गोदीला लागून असलेल्या मोकळ्या जागेत ग्रँड-बझार भरत असे. या सर्व भागात शिरण्यापूर्वी म्हणजेच राजवाड्यासमोर एक भव्य कमान होती. प्रत्येक नव्या आलेल्या व्हॉईसरायचे स्वागत या ठिकाणी प्रथम होत होते. खरेतर वास्को दि गामाच्या पणतुने ही कमान इ. स. १५९९ मध्ये पणजोबांच्या स्मरणार्थ उभारली.

नंतरच्या काळात ती कोसळली होती. परत तिचा जीर्णोद्धार करण्यात आला. येथून जवळच अवरलेडी चर्च व कॉन्व्हेंट होते. येथेच एक सेंट करेजन चर्च इ. स. १७ व्या शतकाच्या मध्य काळात उभारले गेले. चर्चच्या बाजूची इमारत ख्रिश्चन धर्माचा अभ्यास करण्यासाठी उभारण्यात आली.

'रुअ–द–लेस–लॉईश' या चौकात गुलामांचा व्यापार चालत असे. स्त्री–पुरुषांची येथे विक्री होत असे. गुलाम विकत घेण्यापूर्वी नग्न अवस्थेत त्याची पहाणी केली जात असे. आज आपण त्या स्थानावर उभे राहिलो तर भूतकाळाने असाही इतिहास येथे घडवला याचे आश्चर्य वाटते. 'रुअ दि असौगी' ही दुकानांची बाजारपेठच.

जुन्या शहराच्या सीमेला लागून टेकडीवर गोवेश्वराचे मंदिर आहे. येथे ब्राह्मणांसाठी ब्रह्मपुरीची स्थापना करण्यात आली होती. येथे देवी व गणेश मंदिर पण होते. कालांतराने ही दोन मंदिरे नष्ट झालेली आहेत.

**जुन्या गोव्यातील वास्तूकला :**

इ. स. १५ व १६ व्या शतकात पोर्तुगीजांनी गोव्यात वास्तूकला रुजवली. त्यानी राजकारण आणि धर्मकारण या दोन्ही गोष्टींबद्दल या प्रदेशात आग्रही भूमिका घेतली. 'वास्को–दि–गामाने' व्यापारी वृत्ती बरोबर मिशनरी स्पीरीटही येथे आणले होते. वसाहत हाच मूळ हेतू ठेवून युरोपियन भारतात आले असावेत.

भारतातील ख्रिश्चन धर्माचे रोपटे गोव्यातच रुजवले गेले व तेथेच ते वर्धिष्णू झाले. त्यामुळे त्यांच्या वास्तूकलेवरही धर्माचा पगडा असणे अपरिहार्य आहे. जुन्या गोव्यात ज्यांनी ख्रिश्चन चर्चेस उभारली त्यांच्यावर युरोपातून 'रेनान्सेस' चळवळीतून इटलीत पोहोचलेल्या नव्या–नव्या कलात्मक कल्पनांचा प्रभाव पडलेला होता. येथून जे जेसुइट गोव्यात आले त्यांनी त्या कल्पना आपल्या बरोबर आणल्या. त्यामुळे रोमन पद्धतीच्या प्रतिकृतींची झलक या वास्तूंवर दिसून येते.

रोममधील सेंट पीटर चर्चचेच डिझाईन गोव्यातील 'सेंट फॅजेटन' चर्चसाठी वापरण्यात आले. बॉब जिरास चर्चमध्ये ऑयनिक, डोरिक, कोरिथियन व रोमन पद्धतीचा वापर केलेला आहे. पोर्तुगालमध्ये 'मन्युलाईन' बांधकाम पद्धती होती. त्याचा परिणाम 'अवर लेडी ऑफ रोझरी' किंवा 'सेंट फ्रान्सिस ऑफ आसी' चर्चवर दिसून येतो. गॉथिक वास्तूकलेचा परिणाम चर्च बांधणीवर आढळतोच.

जुन्या गोव्यातील चर्चेस मधील स्थानिक वस्तूंचाच वापर केला गेला. युरोपियन पद्धतीने बांधणी असली तरी हवामान, उपलब्ध वस्तू, कलावंत व कुशल श्रमीक यावर बांधणीचे स्वरूप अवलंबून असते. गोव्यात पाऊस भरपूर असल्याने मोठ्या कमानी उभारता येत नाहीत. बऱ्याच ठिकाणी लाकडी फळ्यांचा उपयोग करावा लागतो. प्रवेशद्वारे पण आकारांनी लहान बनवावी लागतात. बाह्य भागातील चुना लवकर खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वास्तू शास्त्रज्ञ परदेशी असले तरी कारागीर देशी असल्याने त्याचा परिणाम भिंतीवरील सजावटीवरून दिसून येतो.

चर्चमधील पेंटींग्ज लाकडावर असून फळ्या भिंतीत बसवण्यात आलेल्या आहेत. स्थानिक कलावंतांनी युरोपियन कलेची भ्रष्ट नक्कल केलेली आढळते. कोरीव कामात लाकडावरील कोरीव काम अधिक दिसते.

## सी कॅथेड्रल चर्च (Se cathedral)

गोव्यात पोर्तुगीजांनी उभारलेली जी विविध चर्चेस आहेत त्यात सर्वाधिक मोठे चर्च सी कॅथेड्रल आहे. त्याची उंची ३५.३६ मि., लांबी ७६.२ मि. व ५५.१६ मि. आहे. या चर्चची भव्यता डोळ्यात भरणारी आहे. गोव्यातील ही सुंदर वास्तू पोर्तुगीज गॉथिक पद्धतीने उभारलेली आहे. बाह्यभाग 'टस्कन' अंतर्गतभाग 'कोरिथियन' स्वरूपाचा वाटतो.

'सेंट कॅथेड्रल' हिला हे चर्च अर्पण केल्यामुळे या चर्चला ते नाव दिले गेले. हे झाले मार्गदर्शकाचे ज्ञान, पण खरे तर सी– कॅथेड्रल या दोन्ही प्राचीन अपभ्रंशात्मक

शब्दांना अर्थ आहेत. कॅथेड्रा Cathedra हा मूळ ग्रीक शब्द. त्यावरून पोर्तुगीज भाषेत Cadeira 'कॅडीरा' शब्द आला. या शब्दाचा अर्थ आहे आसन किंवा खुर्ची. `Se सी' हा शब्द लॅटीन आहे. सिडेरे Sedera वरून आला. त्याचा अर्थ बसणे असा होतो. कॅथॉलिक धर्म संस्थेत सर्वश्रेष्ट धर्मगुरू पोप – दुसरा 'आर्च बिशप' यास बसण्याची खुर्ची किंवा बसण्याचे आसन म्हणजे 'सी कॅथेड्रल'. प्रत्येक चर्चचे अधिकार क्षेत्र कोणाकडे तरी असते. 'सी कॅथेड्रल'चे अधिकारक्षेत्र आर्चबिशप यांचेकडे आहे.

या चर्चची उभारणी इ. स. १५१० या वर्षाच्या शेवटी झाली. इ.स. १५३४ मध्ये 'बोल ऑफ पोप तिसरा' याजकडून या चर्चला कॅथेड्रलचा दर्जा प्राप्त झाला. या चर्चने पोर्तुगीजांची धार्मिक कृत्ये, पोर्तुगीजांचा उदय व ऱ्हास आपल्या डोळ्यांनी पाहिलेला आहे. 'सी कॅथेड्रलच्या' भिंती आता बोलक्या झाल्या तर!

सी कॅथेड्रलचा समोरचा भाग टस्कन व डोरिक शैलीने उभारलेला असून त्यास तीन प्रवेशद्वारे आहेत. त्यावर पुन्हा तीन द्वारे व त्यावर खिडकीवजा छोटे द्वार या पद्धतीने तीन मजल्या इतकी त्याची उंची आढळते. त्यास शुभ्र रंग देण्यात आला आहे. डाव्या बाजूच्या दरवाजाने पण प्रवेश करता येतो. चर्चचाच एक अविभाज्य भाग म्हणून मनोरा टाईप टॉवर पाच मजल्यांचा आहे. यातील सर्वात वरच्या चौथऱ्यावर खिडकीत भव्य घंटा आहे.

इ.स.१७६६ मध्ये वीज पडून या चर्चचा डावा मनोरा कोसळला. देवळात मुख्य गाभारा असतो तसे या ठिकाणी समोरच्या स्वतंत्र चौथऱ्यावर 'अल्टर' आहे. याची उंची ११।। मिटर व रूंदी १०।। मिटर आहे. मध्यभागी एकावर एक असे तीन भाग आहेत. बाजूला क्रॅासवर येशु ख्रिस्त आहे. मुख्य अल्टरचा भव्य भाग ज्या ठिकाणी संपतो तेथून रूंद आणि भव्य अशा चर्चचा अंतर्गत सभागृहाचा भाग सुरू होतो. अल्टर समोर उभे राहण्यास मोकळी जागा आहे. येशूच्या प्रतिमेकडे पहात त्या उंचच उंच वास्तूकडे नजर जाते तेव्हां आपणच उंचीनी लहान आहोत असा भास होतो.

समोरच्या भव्य अंतराळ चौथऱ्याला लागून दर्शनी भागात समोर डाव्या

बाजूला दोन अल्टर आणि उजव्या बाजूला एक अल्टर आणि एक चॅपल दिसतो. पहिला अल्टर आहे, अल्टर ऑफ अवर लेडी, दुसरा अल्टर ऑफ होप. अंतराळाचा मधला भाग सोडून अल्टर ऑफ सेंट पीटर, चौथा चॅपल ऑफ सेंट डोलोरीज. याशिवाय अल्टर ऑफ अवरलेडी ऑफ सॉरो, चॅपल ऑफ ब्लेस्ड सॅक्रेमेंट, चॅपल ऑफ अवरलेडी ऑफ व्हर्च्यूज इ. व आता बरोबर मागे फिरून चर्चच्या विरूद्ध दिशेला भिंतीकडे अल्टर ऑफ सेअने, त्यापुढे चॅपल ऑफ दी होलीघोस्ट, चॅपल ऑफ सेंट बर्नाड इ. आहेत.

मध्यभागी प्रार्थनेसाठी लाकडी बेंच ठेवण्यात आलेले आहेत. चॅपल ऑफ मिरॅकल मध्ये त्याच्या नावाप्रमाणे काही चमत्कृती आढळल्याची दंतकथा ऐकवली जाते. हा क्रॉस पूर्वी दुसऱ्या चर्चमध्ये होता. तेथे तो कणाकणाने वाढून मोठा झाला. त्याची उंची अंदाजे ६ मिटर आहे. कारण ही उंची अजून पुढे वाढण्याची शक्यता आहे.

चर्चच्या आतील भव्य वास्तूचे प्रचंड स्तंभांच्या दोन रांगांनी दोन भाग स्पष्ट दिसतात. प्रवेश द्वाराजवळ पवित्र पाण्यासाठी एक ग्रॅनाईट पात्र आहे. सेंट झेवीयर या भांड्यातील पवित्रपाणी बाप्तीस्मासाठी वापरत असे. डाव्या भिंतीवर ख्रिस्तोफर बाल येशूला खांद्यावर समुद्रातून नेत आहे असे भव्य चित्र आहे.

चर्चच्या दोन्ही बाजूला जे चॅपलस् आहेत त्यावर लाकडाचे कोरीव काम केलेले आहे. मध्यल्या अल्टरमध्ये येशूसह तीन मूर्ती आहेत. त्याच्या बाजूला कातारीनच्या जीवनातील विविध दृश्ये बघायला मिळतात.

या कॅथेड्रलच्या बाह्य बाजूला लागून एक चौरसाकृती मजले असलेला टॉवर असून त्यात पाच घंटा बसवल्या आहेत. 'इक्वीझीशन' कोर्टात निर्णय होताना यातील एक घंटा वाजवली जात असे.

सेंट कॅथरीनच्या मेजवानीचा समारंभ मोठ्या थाटात साजरा केला जातो. या कार्यक्रमात पोर्तुगीज काळात स्वतः गव्हर्नर .सामील होत असे. 'सी कॅथेड्रल'

पासून एक भव्य मिरवणूक काढली जात असे. ती परतल्यावर 'मास' चा कार्यक्रम होत असे.

अल्बुकर्कने गोवा जिंकून जेथे प्रथम प्रवेश केला तेथेच या चर्चचा दरवाजा उभारण्यात आला. आणि विजयाचे प्रतिक म्हणूनच हे चर्च उभारले गेले.

**बॅसलिका ऑफ बाम जेसूस :**

बॅसलिका हे गोव्यातील जगप्रसिद्ध चर्च आहे. इ.स. १५ व्या शतकापासून ख्रिस्ती धर्मप्रसारक सेंट झेवीयरचे प्रेत अजूनही येथे रूप्याच्या पेटीत ठेवलेले असल्यामुळे ख्रिश्चन लोक या चर्चला अतिशय पवित्र जागा मानतात. सेंट कॅथेड्रल चर्चच्या उजव्या बाजूला थोड्याच अंतरावर हे चर्च उभारण्यात आलेले आहे. या चर्चला सेंट फ्रान्सिस झेवीयरचर्च असे पण म्हणतात. ज्या जागेवर हे चर्च आहे त्या जागेचे नाव 'तेरीरो डोस गोलाज' असे होते. तेथे पूर्वी कोंबड्या झुंझवण्याचा कार्यक्रम होत असे.

'बॉम जेसीस' या शब्दाचा अर्थ आहे 'गुड जेसीस' किंवा बालयेशू. हे चर्चपण आपल्या शिल्पाकृतीसाठी प्रसिद्ध आहे.

बाहेरून या चर्चकडे पाहिले तर रंग विहीन जुन्या भिंती पाहून असे वाटते की, हे काहीतरी जुने ऐतिहासिक अवशेष भग्नावस्थेत असावेत. पण आत प्रवेश केल्यावर टापटीपपणा व यातील सुंदरता दिसते. इ.स. १४९४ मध्ये या चर्चची उभारणी झाली. त्यानंतर इ.स. १५९४ मध्ये बारावा पोप पायस याने जीर्णोद्धार केला.

या चर्चला पूर्वी 'सायबा' म्हणत. या चर्चला लागून जी इमारत आहे तिला 'काझ प्रॉफॅस्स' म्हणतात काझ = घर व प्रॉफॅस्स = परमेश्वराची श्रद्धा. तेव्हा याचा अर्थ असा होतो – परमेश्वरावर श्रद्धा करण्यास शिकवणारे घर.

या चर्चचा समोरचा भाग तीन मजली असून तळमजल्यावर मध्यभागी

गोलाकार दरवाजा आहे. बाजूला आयताकृती दोन् दरवाजे आहेत. पहिल्या मजल्यावर तीन भागात तीन खिडक्या, दुसऱ्या माळ्याच्या तिन्ही भागात वर्तुळाकृती डिझाईनस् आहेत. या चर्चसाठी ग्रॅनाईट (जांभा दगड) आणि चुन्याचा वापर करण्यात आला आहे. आयोनीक, डोरीक व कॅरिथियन शैली या चर्चमध्ये आढळते. या चर्चची उंची २३ मिटर आहे. अति उंच टोकाला Jesus Hominivm Salvador या प्रत्येक शब्दातील अद्याक्षरे वर्तुळाभोवती बेलबुट्टीच्या डिझाईनमध्ये कोरलेली आहेत. याचा अर्थ 'मानवाला तारणारा 'जिझस' असा होतो.

मुख्य चर्चच्या आत दोन चॅपलस् आहेत. एक मुख्य 'अल्टर' आणि 'सॅक्रस्टी' हा भाग प्रवेशद्वाराजवळ आहे. वरच्या गॅलरीत काही विशेष प्रसंगाला अतिमहत्त्वाच्या व्यक्ती उभ्या रहात असत. सोनेरी रंगाने नटवलेले अल्टर सोडून चर्चचा उर्वरीत भाग ५५.७७ मिटर लांब व १६.७६ मिटर रूंद असा भव्य प्रमाणात आहे.

चर्चच्या आत शिरल्यावर उजव्या बाजूला सेंट ॲथानीचे अल्टर आहे. प्रवेश द्वाराच्या बाजूला दोन घुमटाकृती भाग 'कन्फेशनची' आसने आहेत. डाव्या बाजूला एका हातात क्रूस व दुसऱ्या हातात छडी असा दाढी असलेला सेंट फ्रान्सिस झेवीयरचा पुतळा आहे. डोक्याच्या सभोवताली किरणचक्र व बाजूने लाकडी डिझाईन कोरलेली महिरप आहे. आत उजव्या भिंतीवर डॉन मस्कारेन्सचे चित्र आहे. त्याच्या समोरच्या भिंतीवर अतिशय सुंदर कोरीव काम केलेली लाकडाची डिझाईन भिंतीवर लावलेली आहेत. वर्षानुवर्षे हे कोरीव काम करण्यात खर्च झालेले असावेत.

मुख्य अल्टरचे पुन्हा दोन भाग करून एक भाग 'अवर लेडी ऑफ होप' आणि दुसरा भाग सेंट मायकेल यास अर्पण केलेला आहे. मेन अल्टरच्या गाभाऱ्यासमोर येऊन उभे राहिल्यावर प्रथम पायाजवळ लाकडी फ्रेम आहे. मग दुहेरी उंच होत गेलेला चौथरा आहे. सहा खांबांच्या महिरपीच्या आत उभा सेंट इग्नारियस लॉयचा पुतळा आहे. त्याच्यावर किरणाकृती सूर्यासारखी आकृती व त्याचे वर इन्फंट जिझसची मूर्ती आहे. उत्तरेच्या बाजूला 'सॅक्रेमेंटचे' चॅपल आहे.

दक्षिणेला सेंट झेवीयरचा मृत देह ज्या रूपेरी शवपेटीत ठेवला आहे ते चॅपल आहे. या चॅपलला दोन्ही बाजूला प्रत्येकी तीन तीन पिळदार स्तंभ आहेत. वरील महिरप अर्ध गोलाकृती असून त्याच्या खाली कोरीव जाळी व आजूबाजूला चार लहान (एंजलप्रमाणे) बालकांच्या प्रतिकृती आहेत.

प्रत्येक खांबाच्या वरच्या बाजूला तीन तीन मूर्ती असून त्याच्या वरील भागात अगदी सिलींगपर्यंत सुंदर कोरीव काम व मूर्ती आहेत. चॅपलच्या मध्यभागी चौथऱ्यावर प्रथम सेंट झेवीयरची ब्रांझची मूर्ती आहे. आणि त्यामागे चांदीची कास्केट असून त्यात जीर्ण झालेला सेंट झेवीयरचा मृतदेह रासायनिक द्रवात ठेवलेला आहे.

सेंट झेवीयर हा जगभर ख्रिश्चन धर्माचा प्रचार करणारा फार मोठा संत. इ.स. १५५५ मध्ये सेंट झेवीयर ख्रिश्चन धर्माच्या प्रसारार्थ चीनमध्ये निघाला असताना वाटेतच तो मरण पावला.

तेथेच त्याचे ख्रिश्चन विधीप्रमाणे दफन करण्यात आले. पण एक वर्षानंतर जेव्हा त्याचे प्रेत हिंदुस्थानात त्याच्या कर्मभूमीत नेण्याचे ठरले तेव्हा ते उकरून काढण्यात आले आणि आश्चर्य एक वर्षानंतर सुद्धा तो देह तसाच्यातसाच होता. नैसर्गिक प्रक्रियेनुसार त्यास थोडीही बाधा निर्माण झालेली नव्हती. १५ मार्च १५५६ मध्ये ते प्रेत गोव्यात आणण्यात आले. इ.स. १६२४ मध्ये ते चांदीच्या पेटीत ठेवण्यात आले असे म्हणतात. त्याचा एक हात रोम येथे पुरण्यात आला असे म्हणतात.

या पेटीची समोरची बाजू काचेची असल्यामुळे सेंट झेवीयर या ख्रिश्चन संताचा देह पहाता येतो. अंगावरील कातडी सुकलेली आहे. देहाची काही हाडे पूर्णपणे दिसतात. दर दहावर्षांनी समक्ष दर्शन व्हावे म्हणून सेंट झेवीयरची शवपेटिका उघडली जाते. त्यावेळी गोव्यात देशी, परदेशी लोकांची प्रचंड गर्दी होते. या शवदर्शनाची प्रथा इ.स. १७८२ पासून सुरू झाली. व नंतर १८५९, १८९०, १९००, १९१०, १९२२, १९३१, १९४२, १९५२, १९६१, १९६४, १९७४, १९८४ या वर्षी सेंट झेवीयरचे दर्शन देण्यात आले.

या ठिकाणी एक लोककथा प्रचलित आहे. मराठी राजा शूर 'संभाजी' गोव्यातील पोर्तुगीज सत्ता नेस्तनाबूत करण्यासाठी गोव्यावर चालून आला. संभाजी राजे जुव्यापर्यंत आले. तेव्हा त्यावेळच्या व्हॉईसरॉयने आपला राजदंड सेंट झेवीयरच्या पायथ्याशी ठेवला व संरक्षणार्थ करूणा भाकली. आश्चर्य असे की मोंगलांच्या स्वारीमुळे गोवा स्वारी अर्धवट सोडून संभाजी राजे निघून गेले. त्यावेळेपासून नवा गव्हर्नर जेव्हापद स्वीकारायचा तेव्हा राजदंड सेंट झेवीयरच्या कास्केटवरून घेत असे.

सेंट फ्रान्सिस झेवीयर चॅपलच्या बाजूला पुन्हा एक कॅरिडॉर आहे. तो रस्ता सॅक्रस्टींला जातो. आत प्रवेशासाठी एक लाकडी दार आहे. या कलागृहात भिंतीवर वेगवेगळ्या संतांचे पोट्रेटस् आहेत. या अल्टरमध्ये एक सोनेरी गुलाब असून तो इ.स. १९५३ मध्ये या शहराला आर्शीवाद म्हणून 'पोप पायस' XII याने दिलेला आहे.

गोव्यातील निसर्ग सौंदर्य आणि ग्रामीण संस्कृती बरोबर ख्रिश्चन धर्माचे एक पवित्रस्थान 'ओल्डगोवा' पहाणे या हेतूने परदेशी पर्यटक मोठ्या प्रमाणात येथे भेट देण्यास येतात.

**सेंट फ्रान्सिस चॅपल :**

बा जीझस, ब्राझीलिकामध्ये सेंट फ्रान्सिसचे दालन आहे. त्यास धार्मिक आणि कलेच्या दृष्टीने निरतीशय महत्त्व आहे. ऐतिहासिक कालाचा महिमापण त्यात दिसतो. या चॅपलच्या भिंतीवर सेंट झेवीयरच्या जीवनातील वेगवेगळे प्रसंग चितारलेले आहेत. हा पॅलेस मनोहर आहे.

सेंट झेवीयरचे कास्केट जेथे आहे त्या 'मॉसिलिअम' समाधी स्वरूपातील चौथऱ्याला चार पायऱ्या आहेत. पहिली पायरी सुंदर आहे. दुसऱ्या पायरीवर संतजीवनावरील चित्रण आहे. प्रत्येक प्लेटवर निळा स्फटीकी दगड देवदूताने पेलल्याचे दाखविले आहे. तसेच सेंट गॉस्पेल कथन करत आहे. शेवटच्या प्लेटवर

सेंट झेवीयर चीनमध्ये मृत्यू पावत असताना व त्याचे सोबत अँथनी व शिष्यगण आहेत. तिसऱ्या पायरीवर पांढरे ठिपके असलेला मार्बल आहे.

या मॉसिलियमचे डिझाईन राम्पोनी यानी केले. टस्कन पद्धतीच्या कलेचा उपयोग यात करण्यात आला आहे. कॉस्मास III हा इटलीत ड्यूक होता. त्याने हे भेट म्हणून दिले. ६५ पेट्या भरून इटलीतून माल आणला व १६९८ मध्ये याची उभारणी केली गेली.

या मॉसलिअमवर (चौथऱ्यावर) रूप्याची कास्केट ठेवण्यात आलेली आहे. त्याच्या आत फ्रान्सिस झेवीयरचे अवशेष ठेवलेले आहेत. ही कास्केट मात्र गोव्यातील कॅथॉलिक कलावंतानीच पण इटालियन कलेचा नमुना समोर ठेवून बनविली आहे. या कास्केटला तयार करण्यासाठी खूपच खर्च आला. पण तोही निधी जमवून भागवण्यात आला. या कास्केटवर अनेक चित्रे रेखाटलेली आहेत. त्या चित्रांचे विषय पुढील प्रमाणे आहेत. झेवीयर आजारी आहे, रोममधील हॉस्पीटलमध्ये आहे, लोकांना बाप्तीस्मा देत आहे, पाण्यात बुडून मरण पावलेल्यांना झेवीयर जिवंत करतो, गर्दी समोर प्रवचने करतो, चर्चमध्ये प्रवचन, खांद्यावर मूल घेवून गुडघे टेकवून बसलेला, बहिऱ्या जपानी माणसाला तो बरे करतो, समुद्राचे पाणीं मधुर बनवतो, अशी एक ना अनेक चित्रे या कास्केटवर कोरलेली आढळतात.

**सेंट फ्रान्सिस दि आसिसी चर्च :**

सी कॅथेड्रलच्या पश्चिमेस 'आर्च बिशपचा' राजवाडा होता. ही वास्तू चिरे आणि चुना वापरून बांधली आहे. चर्चचा एक भाग आहे कॉन्व्हेंट सेंट फ्रान्सिस–दी–असीसीचे चर्च व सेंट फ्रान्सिस–दि असीसीचे कॉन्व्हेंट. या वास्तू इ.स.१५१७ मध्ये 'फ्रान्सिस' पंथाच्या फादर्सनी बांधल्या. इ.स. १७६२ मध्ये या वास्तूची दुरूस्ती करण्यात आली. सेंट फ्रान्सिस–दी–आसीसी हा इटालियन संत होता. त्यांचा जन्म 'आसीस' नावाच्या गावात झाला. यानीच फ्रान्सिस्कन पंथ स्थापन केला. या संताच्या स्मृतीसाठी हे चर्च व कॉन्व्हेंट बांधले.

हे चर्च टस्कन शैलीत उभारण्यात आले. तर त्याचा दर्शनी भाग गॉथिक स्टाईलने उभारला आहे. या चर्चला तीन प्रवेशद्वारे आहेत. मधले द्वार भव्य व बाजूची दोन छोटी आहेत. तिन्ही दरवाज्यावर खिडक्या आहेत.

चर्चमध्ये तीन चॅपल्स आहेत. समोरचा चॅपल भव्य आहे. वरच्या वेदीवर सेंट फ्रान्सिस दी आसिसी यांची क्रॉसवर लटकवलेली मूर्ती आहे. चॅपलवर इतर संतांच्यापण मूर्ती आहेत. संतांच्या जीवनावर आधारलेली अनेक चित्रे पण येथे बघायला मिळतात. मुख्य चॅपलच्या बाजूच्या अल्टरमध्ये 'सेंट अँथनी' आणि सांताक्लाराच्या मूर्ती आहेत. या चर्च मधील मुख्य अल्टर कोरिथीयन पध्दतीचे आहे. पहिल्या भिंतीवर सेंट मायकेलचा पुतळा आहे. तर एका चॅपलमध्ये श्रीलंकेतील जाफनामधून आणलेला अवर लेडी ऑफ मिरॅकलची मूर्ती आहे. मागचा दरवाजा तसाच ठेवून हल्लीचे चर्चम्हणजे नूतनीकरण आहे.

**सेंट कॅझेटन चर्च :**

सी कॅथेड्रलच्या विरूध्द दिशेच्या रस्त्यावर हे चर्च आहे. रोमन चर्चच्या धर्तीवर हे चर्च उभारलेले आहे या चर्चच्या इमारतीच्या खालील भागात रोमन पध्दतीचे १० स्तंभ आहेत. मध्यभागी प्रवेशद्वार असून बाजूला लहान आकाराचे अर्धगोलाकृती दरवाजे आहेत. वर दुसऱ्या मजल्याच्या अंतरावर खिडक्या व त्यास बाल्कनी आहे. चर्चच्या दोन्ही बाजूला टॉवर आहेत व मध्यभागी घुमट आहे येथे जलाशये असून त्याचे पाणी पवित्र मानतात. याठिकाणी धर्मगुरूंना प्रवचनासाठी उंच चौथरा आहे. येथे धर्मगुरूनाही प्रशिक्षण देतात. या चर्चच्या वर क्रॉस नाही हे मोठे आश्चर्य मानतात. अल्टरवर इटालियन पध्दतीची कॅन्व्हसवर काढलेली सेंट कॅझेटनची चित्रे आहेत. हे चर्च इ.स. १७ व्या शतकात उभारण्यात आले.

**दी चॅपल ऑफ सेंट कॅथरियन :**

हे चर्च अल्बुकर्कने इ.स. १५१० मध्ये उभारले. जॉर्ज कॅब्रल या गव्हर्नरने इ.स. १५५० मध्ये याची बांधणी अधिक विस्तृत केली. हे चर्च सेंट कॅथरियनला

अर्पण केलेले आहे.

**रॉयल हॉस्पीटल :**

सेंट कॅनराईनच्या बाजूला रॉयल हॉस्पीटल आहे. इ.स. १५१० मध्ये गोवा जिंकल्यावर शिपायांच्या सोयीसाठी अल्बुकर्कने याची स्थापना केली. यास इ.स. १५२४ मध्ये 'होली हौस ऑफ मर्सी' असे म्हटले जाऊ लागले. या ठिकाणी शेकडो पेशंट ठेवले जात. नंतर ही संस्था इ.स. १८४२ मध्ये मिलीटरी हॉस्पीटल म्हणून पणजीला हलविण्यात आली.

**ओल्ड पिलरी :**

गोमातेश्वराच्या मंदिराकडे जाणाऱ्या पूर्वेकडील रस्त्यावर ओल्ड पिलरी आहे. या ठिकाणी सर्वांसमक्ष गुन्हेगाराला फटके मारून शिक्षा दिली जात असे. एका चौथऱ्यावर एकुलता एक स्तंभ आहे. हा स्तंभ कोणत्यातरी मंदिराचा भाग होता काय ? असाही एक काल्पनिक विचार आहे.

**अवर लेडी ऑफ रोझरी चर्च :**

बॅसलिका ऑफ बाम जिझस्पासून जवळच हे चर्च आहे. यास दोन मजले असून चुन्याने केलेले सर्व बांधकाम आहे. दोन्ही बाजूला दोन राऊंड टॉवर्स् आहेत.

विजापूरच्या आदिलशहाचा पराभव केल्यानंतर इ.स.१५२० मध्ये अल्बुकर्कने हे चर्च बांधले. टाईल्सच्या सिलींगसाठी लाकडाच्या तुळ्यांचा वापर केलेला आहे. तेथे दोन चॅपलस् तीन व अल्टर्स् आहेत. मुख्य अल्टर अवर लेडी ऑफ रोझरीसला अर्पण केलेला आहे. या चर्चच्या सिलींगजवळ ज्या खिडक्या आहेत त्यावरून गॉथिक शैलीचा वापर यात केलेला आढळतो. मुख्य अल्टरच्या उजव्या बाजूला संगमरवरी चौथरा आहे. त्यावर नक्षीकाम असून पोर्तुगीज अक्षरे कोरलेली आहेत. एक चॅपल तर केवळ आदिलशहांच्या पराभवाच्या आनंदाप्रित्यर्थ उभारला आहे. पण तो अल्बुकर्कच्या मृत्यूनंतर उभारण्यात आला.

**सेंट मोनिकामठ :**

होळी हील येथे हा आश्रम उभारण्यात आला. रोझरी चर्चच्या वाटेवर हा आश्रम आहे. चौरसाकृती वास्तूच्या आत मोठी मोकळी जागा आहे. काही सभागृहाच्या छतावर वेलबुट्टीचे सुंदर डिझाईन आहे. तसेच पवित्र बायबलमधील प्रमुख दृश्ये चितारलेली आहेत. या कॉन्व्हेंटची बांधणी इ.स. १६०६ मध्ये सुरू झाली. आणि १६२७ मध्ये संपली. यास 'रॉयल मॉनेस्ट्री' म्हणतात. कारण त्यास राजाश्रय होता.

**सेंट ऑगस्टाईन मनोरा :**

होली हीलच्या परिसरातच सेंट ऑगस्टाईन टॉवर आहे. यास चार मजले असून त्या प्रत्येकावर कमान आहे. हे चर्च आणि टॉवर इ.स. १६०२ मध्ये उभारले. इ.स. १८४२ मध्ये या इमारतीची पडझड झालेली होती. इ.स. १९३१ मध्ये अर्धा टॉवरच कोसळला. ऑगस्टाईन पंथाची दमण, वसई, ठाणे कोचीन येथे केन्द्रे आहेत. या मनोऱ्याकडे दुर्लक्ष झाल्याने त्याची दुर्दशा झाली.

**रॉयल चॅपल ऑफ अँथनी :**

सेंट अँथनी टॉवरच्या पश्चिमेला सेंट अँथनीला अर्पण केलेले रॉयल चॅपल आहे. सेंट अँथनी हा पोर्तुगालमधील सुप्रसिध्द ख्रिश्चन संत मानला जातो. इ.स. १८३५ मध्ये याची बांधणी सुरू झाली. आणि १९४४ मध्ये पूर्ण झाली. त्याचे नूतनीकरण झाल्यावर इ.स. १९६१ मध्ये पुन्हा त्याचे उद्घाटन करण्यात आले.

**कान्व्हेंट आणि मिरॅकलक्रॉस :**

जुनागोव्याच्या दक्षिणेला असलेल्या टेकडीवर हे चर्च व कॉन्व्हेंट आहे. चुन्याचे बांधकाम असलेले चर्च व एक मजली कान्व्हेंट आहे. यातील बरेचसे उपभाग कालप्रवाहात गडप झाले आहेत. क्रॉस ऑफ मिरॅकलसाठी इ.स. १६१९ मध्ये हे

चर्च उभारण्यात आले. येथील क्रूस कालांतराने सी कॅथड्रल चर्चमध्ये पाठवण्यात आला.

**सेंट पावूल कॉलेजचे गेट :**

पोंडाच्या रस्त्यावर सेंट पाऊल कॉलेजचे गेट आहे. कमानीच्या बाजूला कोरीयन शैलीचे स्तंभ आहेत. हे कॉलेज इ.स. १५४२ मध्ये उभारले. पण कॉलेजचे गेट इ.स. १५४३ मध्ये उभारण्यात आले. भिंती चुन्याच्या बांधलेल्या असून स्तंभासाठी बेसाल्ट दगडाचा वापर करण्यात आला होता. कॉलेजचे आता कोणतेही अवशेष उरलेले नाहीत. प्रवेशद्वार केवळ पहायला मिळते. या कॉलेजचा उपभोग धर्मप्रसारार्थ विद्यार्थी तयार करणे हा होता.

**होली हील (पवित्र टेकडी) :**

जुनागोवा भागात पार्तुगीजांच्या काळात ही पवित्र टेकडी मानीत. या टेकडीवर सेंट ऑगस्टीन व मोनिका कॉन्व्हेंट आहे. अल्बुकर्कची विजापूरकरांशी लढाई झाली तेव्हा तो या पवित्र टेकडीवर होता. या विजयाप्रित्यर्थ त्याने येथे चर्च बांधले. 'गॉर्सिआ डी' या प्रसिध्द वनस्पती शास्त्रज्ञाने या ठिकाणीच सुप्रसिध्द असा वनस्पती शास्त्रावरील ग्रंथ लिहिला.

**व्हॉईसरॉय आर्च :**

सेंट कॅजेटन चर्चकडून एक रस्ता मांडवीकडे जातो. त्या रस्त्यातच 'व्हॉईसरॉय आर्च' हा प्रवेश दरवाजा आहे. पूर्वी गावांना प्रवेशद्वार असायचे. तसाच हा प्रकार आहे. या दरवाज्याच्या वरच्या बाजूला वास्को–डी–गामाचा पुतळा आहे.

**आदीलशहाच्या राजवाड्याचे गेट :**

सेंट कॅजटेन चर्चकडे जाण्याच्या रस्त्यावरच आदिलशहाच्या राजवाड्याचे गेट आहे. प्रथम दगडाच्या सहा पायऱ्या आहेत. वर चौथरा असून त्यावर

प्रवेशद्वाराची फक्त चौकट उभी आहे. या अवशेषांशिवाय जवळपास कोणतेही अवशेष नाहीत. ब्राम्हणी पध्दतीने या प्रवेशद्वाराची उभारणी आहे. यापासून जवळच एक भव्य राजवाडा होता. इ.स. १६९५ मध्ये ते पोर्तुगीज गव्हर्नरचे निवासस्थान होते. नंतर ती जागा समारंभासाठी वापरत असत. इ.स. १८२० मध्ये पडकी झालेली ती इमारत संपूर्ण तोडून टाकण्यात आली. आठवणीसाठी प्रवेशद्वाराची कमान मात्र उभी आहे.

**स्टॅच्यू ऑफ कॉमोज :**

बॉम जिझस आणि सी कॅथेड्रल या दोन चर्चच्या मध्यंतरी पसरलेल्या बगीच्यात कॉमोज या कवीचा ब्रांझचा पुतळा आहे. या कवीने इ.स. १६ व्या शतकात वास्को–दी–गामाच्या प्रवासावर दीर्घकाव्य लिहिले होते. हा कवी पोर्तुगीजच होता. तीन मिटर उंचीचा हा पुतळा आहे. इ.स.१९६० मध्ये हा पुतळा उभारला गेला.

**म्युझीयम :**

सेंट फ्रान्सिस ॲसीसी कॉन्व्हेंटने सोडून दिलेल्या एका भव्य इमारतीत इ.स.१९६४ मध्ये वस्तूसंग्रहालयाची स्थापना करण्यात आली. या वस्तूसंग्रहालयात ब्राह्मण काळातील वस्तू, शिल्प, पोर्तुगीज गव्हर्नरांची पेंटींग्ज ठेवलेली आहेत. दर्शनी गॅलरीत उमा महेषाचे शिल्प आहे. या म्युझियमचे वैशिष्ट्य म्हणजे अल्बुकर्कचा ब्रांझ पुतळा व वास्को–दी–गामाचे तैलचित्र. इतरत्र विष्णूमूर्ती शिल्प, दशावतार, '१३ वे शतक' होयसाळ शैलीची चित्रे, कदम्ब काळातील कला इ. पण पहायला मिळते. राजा सिंहासनावर बसला असून इतरत्र दरबारी लोक आहेत तसेच नौकायुध्द हे उत्तम रितीने शिल्पात कोरले आहे. विजयनगर व पर्शियन शिलालेख यात ठेवले आहेत. या म्युझीयमला एक स्वतंत्र पोर्ट्रेट गॅलरी असून त्यात १६ पोर्तुगीज गव्हर्नरांची चित्रे आहेत. लाकडावरील कोरीवकामपण यात पहाव्वयास मिळते. म्युझियम सकाळी ९ ते ५ या वेळात उघडे असते.

**सेंट फ्रान्सिस झेवीयर :**


ख्रिस्ती धर्मात येशू ख्रिस्तानंतर ख्रिश्चन धर्माचे जे अनेक मिशनरी, संत

प्रचारक झाले त्यात सेंट झेवीयरचे स्थान जेष्ठ आणि श्रेष्ठ आहे. त्याचे मूळ नाव Franciaco de xavier & Jassu. नंतर त्यास लोक सेंट झेवीयर म्हणू लागले. त्याच्या वडिलांचे नाव 'डॉन जुएन डी यी एतोंडो' व आईचे नाव 'डोन्ना मारिया'. याचा जन्म स्पेनमध्ये ७ एप्रिल १५०६ कॅसल झेवीयर येथे झाला. यांना तीन बहिणी व दोन भाऊ होते. इ.स. १५१२ मध्ये राज्यातील प्रचंड घडामोडीमुळे स्पेनमधून फ्रान्सला यावे लागले. प्रथमपासूनच अभ्यासू वृत्ती असल्याने पॅरिसमधील सेंट बार्बारा कॉलेजमध्ये दाखल झाले. पुढे त्यानी शिकवण्याचा पेशा पत्करला आणि त्याचवेळी त्यांचा इनिगो–दी–लायोलाशी परिचय झाला. ख्रिश्चन धर्म कल्पनांचा प्रभाव यामुळे वाढीस लागला. आणि मुक्तीचा मार्ग शोधण्यासाठी धडपड सुरू झाली. इ.स. १५३४ मध्ये ख्रिश्चन धर्म प्रसाराची प्रतिज्ञा करून ते 'जेरूसलेम'कडे रवाना झाले. इग्नेशियस् त्याला व्हेनीसमध्ये येऊन मिळाला.

रोममधील परकीय वकील मस्कारन्स यांनी किंग जॉन III ला विनंती केली की, सहा विद्वान धर्मगुरूंची निवड करून इस्ट इंडियाला पाठवा. पण त्यानी फक्त एकालाच म्हणजे सेंट झेवीयर यांना पाठवले. त्यानी जपान व चीन देशाचा प्रवास केला. शेवटी वयाच्या ४६ व्या वर्षी इ.स. १५५२ मध्ये चीनमध्येच त्याना मृत्यू आला. मालकाला अवर लेडी ऑफ माऊंटमध्ये (चर्च) तो पुरण्यात आला. परत ते थडगे उकरून १६ मार्च १५५४ मध्ये गोव्यात आणण्यात आले. (या संबंधी सुरवातीला माहिति लिहिलेली आहेच.)

**गोमतेश्वर :**

हे हिंदूंचे महादेवाचे मंदिर असून त्यास गोमतेश्वर किंवा गोवेश्वर असेही म्हणतात. कुच्छ रस्त्यावर ब्रम्हपुरी भागात हे मंदिर आहे. बहामनी राजवटीचे गोव्यावर आक्रमण झाले त्यावेळी हे मंदिर उध्वस्त करण्यात आले. परंतु विजयनगरच्या माधव या मंत्र्याने या मंदिराचा जीर्णोध्दार केला. त्यामुळे तेथील जलाशयाला माधवतीर्थ असे म्हणतात. इ.स. १७७५ मध्ये इक्वीझीशन कोर्ट नष्ट झाल्यावर या मंदिरावरील बंदी उठवली गेली व ते दर्शनासाठी मुक्त करण्यात आले. या ठिकाणी गोरखनाथ कुंड व एक गुहापण आहे.


पणजी
कला अकादमी
मिरामार दोनापावला
म्युझियम
मार्केट
मांडवी नदी
हॉटेल सम्राट
सिने अशोक
बेती
हॉटेल नेपच्युन
आझाद मैदान
हॉटेल मांडवी
SBI
जेटी
चर्च
सचिवालय
गेस्ट हॉउस
मडगांव
वास्को
टूरिस्ट हॉस्टेल
जीपीओ
मांडवी नदी
टूरिस्ट होम
केटीसी बस टर्मिनस
मडगांव / वास्को कडे
म्हापशा कडे
मांडवी पूल

## पणजी (PANJI) :

हे शहर गोव्याची राजधानी असून पणजी या शहराचा उच्चार 'पणजीम' असा पोर्तुगीज काळात करण्यात येत असे. शांत–शीतल–स्वच्छ अशा वातावरणात निसर्ग रमणीय सौंदर्याचा साज लेवून, मांडवींचे शुभ्र वस्त्र परिधान करून ऐतिहासिक, सांस्कृतिक कुंकुम भाली रेखून, हिंदू ख्रिश्चनादी धर्मांचे व्रत घेऊन सेंट फ्रान्सिस झेवीयर किंवा मंगेशी वा शांतादुर्गाची पूजा बांधणारी, काळोख्या रात्री मदिरागृहातून रेंगाळणारे धुंद वातावरण, लॅटीन पध्दतीचे लाल चुणुक रंगाचे कौलारू शिरपेच बांधलेली घरे, ठिकठिकाणी लुसलुशीत मखमली हिरवळ अंगावर ओढून बसलेल्या बागा, सारेच काही आगळे–वेगळे. इतर शहरांपेक्षा या शहराची नाजुकता वेगळी आहे. येथील निसर्ग अजून चैतन्यशील आहे म्हणून हे शहर जीवंत वाटते.

एकदाच भेट देऊनही समाधान न होणारे, लांबवर जाताच पुन्हा आकर्षण निर्माण करणारी ही नगरी स्वर्ग वाटत नसली तरी माणुसकी असलेली मानवी नगरी वाटते. गोव्याची प्राचीन राजधानी पणजी हे शहर नव्हतेच. प्राचीन गोव्याच्या राजधान्या वेगवेगळ्या ठिकाणी होत्या.

ऑलॉनियु–द–क्रुझ यांच्या मते 'कवडीचा' ही गोवा भूमीतील अतिप्राचीन राजधानी. कवडीचा किल्ला ही देवरायांची राजधानी होती. पण हा किल्ला मौर्य किंवा चालुक्य काळातपण असावा. देवराय हे विजय नगरचे राजे होते. तसेच ते 'गोमीनाम' पण होते. गोमीनाम म्हणजे गोव्याचा राजा. इतिहासात गोव्याची राजधानी 'चंद्रपूर' होती. काहींच्या मते 'कवडी' हेच चंद्रपूर असावे. शिलाहार काळात चंद्रपूरचे नांव 'कपित्य' असे होते. पण या वेगवेगळ्या नावाच्या किंवा नावे वेगळी असली तरी स्थान एक असावे अशी ही राजधानी इ.स. पूर्व २१३ व्या शतकात अस्तित्वात असावी. पारोडा नदीच्या काठी प्रथम वसाहत झाली असावी. भोज, कोकणमौर्य, कदम्ब यांची चंद्रपूर ही भरभराटीस आलेली राजधानी होती. चंदपूरला 'सिंदापूर' पण म्हणतात. ते काळाच्या ओघात नष्ट झाले.

गोव्याची नंतरची राजधानी होती 'रेवतीद्वीप'. कानडीत याला 'इरींहीगे'

असे संबोधीत. चालुक्यांच्या काळात 'रेवतीद्वीप' प्रादेशिक राजधानी होती. त्यावेळी या राज्यात कोकण–गोवा हा प्रदेश एक असावा. त्यावेळी गोव्याला 'गोपराष्ट्र' असे पण म्हणत. इ.स. ७ व्या ८ व्या शतकापर्यंत 'गोवाशब्द' आकाराला आला नसावा.

शिलाहार काळात 'वलीपत्तन' ही गोव्याची राजधानी होती पण या राजधानीची जागा नक्की नाही. कोणी वेळली, कोणी वळावली किंवा खारेपाटण असे म्हणतात. पण हे सर्व तर्कच. तरीसुद्धा वालावली हे वलीपत्तन असावे असे मानतात. तेथे धम्मियरचे राज्य होते.

गोव्याची चौथी राजधानी 'गोवापुरी' ही कदम्ब काळात होती. 'जयकेशी' च्या काळात ती भरभराटीस आली होती. इ.स. ९६० च्या सुमारास कदम्बाने चंद्रपूर जिंकून घेतले. इ.स. १०५० मध्ये जयकेशीच्या हाती सत्ता आल्यावर त्याने चंद्रपूरहून राजधानी 'गोपक पट्टण' किंवा गोवापुरी येथे हलवली. अरबांचा व्यापार येथे भरभराटीस आला होता. ही राजधानी काहींच्या मते 'व्हडले गोवे' येथे असावी. बहमनी सुलतानाने गोवा नष्ट केले. अशा प्रकारे वरील चारही राजधान्या या गोव्यातील प्राचीन इतिहासाचे प्रतिनिधित्व करतात.

गोव्याच्या आधुनिक इतिहासातील राजधान्या दोनच आहेत. एक 'ओल्ड गोवा' आणि दुसरी सांप्रत राजधानी 'पणजी'.

इ.स. १५१० मध्ये पोर्तुगीजांनी गोवा शहर जिंकले आणि तेथेच आपली राजधानी स्थापिली. ओल्डगोवा ही राजधानी इ.स. १४९८ पासून विजापूरच्या आदिलशहाने स्थापन केली. पोर्तुगीजांनी हे शहर जिंकून त्यास 'गोवा' असेच नाव दिले. आदिलशहा कालीन राजवाड्यासह कोणत्याही इमारती आता शिल्लक नाहीत. आदिलशहाचा जो राजवाडा होता त्याचे प्रवेशद्वार फक्त शिल्लक आहे. इ.स. १५५४ पासून या राजवाड्यात व्हॉईसरॉयचे निवासस्थान निर्माण झाले. नदी किनाऱ्याच्या बाजूने जुन्या गोव्यातच व्हॉईसरॉयची कमान होती. व्हॉईसरॉय ज्या भव्य वाड्यात राहत असे त्यास 'साबायुचा' राजवाडा म्हणत. याचा अर्थ ओल्डगोवा. ही आदिलशहाची राजधानी पोर्तुगीजांना ऐतीच मिळाली. जवळ–जवळ १५० वर्षे ही

पोर्तुगीजांची राजधानी होती. इ.स. १६८० मध्ये या शहरात सार्थीचा रोग पसरून अनेक लोक मृत्यूमुखी पडले. नागरिकांनी जीव वाचवण्यासाठी स्थलांतर सुरू केले. पण त्यापेक्षा मोठा धक्का या राजधानीला बसला तो संभाजीराजांच्या स्वारीचा.

इ.स.१६८३ मध्ये संभाजीराजांनी 'गोवा' जिंकण्यासाठी गोव्यावर स्वारी केली. लोक घाबरले त्यांनी आजुबाजूच्या परिसरात म्हणजे भाटी, चोडण, नार्वे, इ. ठिकाणी पलायन केले. त्यामुळे जुनागोवा भागातील घरे ओस पडली. त्यावेळी व्हॉईसरॉय 'कॉर्दी–द–आल्व्होर' याने राजधानी मुरगावला हलविण्याचे ठरवले. त्या ठिकाणी पोर्तुगीज सरकारने इमारती बांधण्यास सुरूवात केली. पण गव्हर्नर तिकडे जाण्यास नाखुष असल्याने तो विचार येथेच संपला.

व्हॉईसरॉयने पोर्तुगाल सरकारला कळवले की राजधानी 'मुरगांव' ऐवजी 'पणजी' भागात उभारावी. आज जेथे पणजी आहे तेथे पाणी–दलदल आणि लहान–लहान डबकी होती. व त्यामध्येच नारळीची झाडे असलेल्या असंख्य लहान–मोठ्या वाड्या एकत्रितरित्या वसलेल्या होत्या. तसे वाड्या–वाड्यांमध्ये अंतर नव्हते. 'काबोटेकडी' भागात पोर्तुगीजांनी घरे बांधली.

कदम्ब घराण्यातील राजा 'त्रिभुवनमल्ल' याच्या ताम्रपटात पणजी शहराचे पूर्ण नाव गवसते. हा ताम्रपट इ.स. ११०७ च्या सुमाराचा आहे. त्यात 'पाचरवणी' गावाचा उल्लेख आहे. तसाच अजून एक 'पंजनी–खळी' हा उल्लेख सापडतो. पांज = होडी आणि खळी = ओढा म्हणजे ओढ्याच्या काठची जागा. म्हणजेच जेथे होड्या जाऊन उभ्या राहू शकतात असा भूभाग.

तरीसुद्धा या भूभागाला त्यावेळी प्रचलित शब्द 'पोणजी' असा होता. या शब्दाचा अर्थ पाण्यात न बुडालेली जमीन असा पोर्तुगीज भाषातज्ञ देतात.

आदिलशहाने येथेच दोन मजल्यांचा किल्लेवजा राजवाडा बांधला होता, ज्यास पाच बुरूज होते. 'पारशी' भाषेत त्याला पाचइमा आफसुंगारी शब्द वापरला जाई. त्या शब्दाच्या अपभ्रंशातून 'पणजी' शब्द आला असावा असाही एक तर्क आहे.



सी कॅथेड्रल चर्च (जुना गोवा)



दोना पाऊला (गोवा)

डॉ. शिरोडकरांच्या मते हा पूर्वीचा शब्द पांजणखळी होता. पाज = पाऊलवाट व खळी = नाला आहे. या भागात जी टेकडी आहे त्याच्या बाजूलाच एक नाला आहे. टेकडीवरूनच नाल्याकडे येण्याचा एक छोटा रस्ता (पाऊलवाट) आहे. त्यासच पांजणखळी म्हणतात. 'पांजण' शब्दातच फेरफार होऊन तो शब्द 'पाणज' झाला व पाणजचेच पुढे पणजी झाले.

देशी भाषेत 'पांजी' शब्दाचा अर्थ 'टोक' असा होतो. नदीच्या टोकाचा हा जमीनीचा शेवटचा भाग म्हणजे पांजी. यावरूनही 'पणजी' झाले असावे.

आज जेथे 'पणजी' शहर आहे तो सर्व नारळी–पोफळी व शेती असलेला दलदलीचाच प्रदेश होता. मासेमारी करणाऱ्या कोळी लोकांची जमात येथे रहात होती. इ.स. १७५९ मध्ये व्हॉईसरॉय कॉंदिने येथे एक राजवाडा बांधला. व एक चॅपल उभारले. इ.स. १८८७ मध्ये भव्य रस्ते करण्यात आले. यावेळी 'कार्दोझू' गव्हर्नर होता. इ.स. १८१८ मध्ये गव्हर्नर येथे राहण्यासाठी आले. पुढे याच राजवाड्याचा उपयोग विधीमंडळ बैठक, सचिवालय यासाठी होऊ लागला. मंत्री लोकांना जागा अपूर्ण पडू लागली म्हणून हीच इमारत वाढवण्यात आली.

जुन्या गोव्यातील हायकोर्ट 'नवागोवा' भागात आले. राजवाड्यात एक छापखाना आणण्यात आला व सरकारी गॅझेट छापण्यास सुरूवात झाली. शहरात चौक निर्माण झाले. 'कांपुददॉ मानुएल' हा रस्ता तयार केला. तोच सध्याचा कांपाल रोड. लष्करासाठी इमारत बांधण्यात आली. कस्टमसाठी इमारत बांधण्यात आली. इ.स. १८१८ मध्ये महालक्ष्मीचे मंदिरपण हिंदूंनी उभारले. या गावाला राजधानीचा आकार येत होता. पण राजमान्यता नव्हती. इ.स. १८४० ते ४२ मध्ये गव्हर्नर जनरल 'लॉपिश दलीम' याने राजधानी म्हणून या गावाला शासकीय दर्जा प्राप्त व्हावा म्हणून पोर्तुगालची राणी 'मारीय' हिच्याकडे अर्ज केला. व हे प्रयत्न इ.स. १८४३ मधील गव्हर्नर 'कॉंदि द आंतश' याच्या काळात फळाला आले.

२२ मार्च १८४३ पासून पणजीला नव्या राजधानीचा मान प्राप्त होऊन त्यास 'नवागोवा' असे संबोधले जाऊ लागले. सांताइनेझ ते पाटोपुला पर्यंत पणजीचा

विस्तार होता. रायबंदरचा समावेश यातच केला गेला.

आझाद मैदानात वास्को–दी–गामाचे स्मारक, तसेच एक मोठे हॉस्पीटल व पोलीसठाणे उभारण्यात आले. (इ.स. १८४७) इ.स. १८५७ मध्ये मेडीकल कॉलेज बांधण्यात आले. शहरात टेलीफोन व्यवस्था सुरु झाली. फोंडा, म्हापसे व साखळी हे टेलीफोनने जोडले गेले. पोर्तुगाल मध्ये ज्या ज्या सुखसोयी शहरांना उपलब्ध होत्या त्या–त्या सुखसोयी पणजीला उपभोगायला मिळू लागल्या.

'[illegible] पाल्य' यान इ.स. १८४३ मध्ये पणजीत पहिली मराठी शाळा सुरू केली. मुलींच्या शाळेसाठीपण स्वतंत्र इमारत बांधण्यात आली. स्त्री शिक्षणास सुरूवात झाली. यावेळची लोकसंख्या होती फक्त १४, १३१. या शहरात १० वकील, १४ डॉक्टर. एक हॉस्पीटल. १७ व्यापारी, २६० जमीनदार, ७ औषध देणारे वैद्य, ३५५ सरकारा अधिकारी, ४७० सरकारी अधिकारी वास्तव्य करीत होते. या शहरात कापड. वूल, सिल्क, भात, गहू, तेल, तंबाखू, काजू, नारळ, आंबा, मीठ व फिश मिळणारी दुकाने होती. तसेच वेधशाळा, संगीतशाळा, लष्करीशाळा, कॉलेजपण होते. उत्तर दिशेला मांडवी, पश्चिमेला जुआरीनदी, दक्षिणेला ताळगावं, पूर्वेस मिठागरे व रायबंदर पर्यंतचा भूभाग पणजी शहरात होता.

'आल्तीनो' टेकडीच्या पूर्वेला एक छोटे मारुती मंदिर आहे. मार्गशीर्ष महिन्यात पौर्णिमेला येथे जत्रा भरते. या भागात काही चॅपलस् पण आहेत. याला लागून असलेल्या भागाला 'पासार' म्हणत. पोर्तुगीज भाषेत पास म्हणजे चौक. टेकडीच्या पायथ्याला देऊळवाडा म्हणून भाग आहे. येथे एका चौकात एका मुलीला हिप्नॉटाईज करीत असल्याचा काळा पुतळा आहे. पुढे बांदोडकर मार्गावर मांडवी हाटल आहे.

जुन्या पोलिस ठाण्याच्या इमारतीजवळ १५० वर्षांपूर्वीची जुनी सेंट्रल लायब्ररी आहे. त्याच्या वरच्या मजल्यावर मिनेझिस ब्रागांस इन्स्टीट्यूट आहे. आजुबाजूला सरकारी कचेऱ्या आहेत. पोलिस ठाण्याच्या बाजूला सरकारी मुद्रणालय व समोर मैदान आहे. वैद्यरोडवर महालक्ष्मी मंदिर आहे.

पणजीचा एक उपभाग करंजळे. येथील रस्त्यावर ढेपे कॉलेज आहे. पुढचा चौक हा 'मीरामार'. येथील चौपाटी शौकीनांची फिरण्याची जागा आहे. येथेच किनाऱ्याजवळ स्व. दयानंद बांदोडकरांचे स्मारक आहे. फुटबॉल ग्राऊंडपासून 'कांपाल' भाग सुरू होतो. येथेच एक कला अकादमीचे दालन आहे. चर्चकडून किंवा वैद्य मार्गाने पुढे आल्टीनो भागात जाता येते. येथून पणजीचे सौंदर्य न्याहाळता येते. पश्चिमेला तर मांडवी किनारा, समुद्रकाठ, यामुळे निसर्गसौंदर्याची लयलूटच येथे आहे. 'आल्टीनो' टेकडी म्हणजे पणजीचा एक ब्युटी स्पॉट आहे.

**पणजीतील पर्यटन – (काय पहाल)**

**१) कला अकादमी :**

श्री. यशवंतराव चव्हाण भारताचे अर्थमंत्री असताना त्यांच्या शुभहस्ते ३१ मे १९७४ मध्ये कला अकादमीचा पायाभरणीचा समारंभ कंपाल मैदानावर झाला. इ.स. १९३५ मध्ये नाट्यकलेच्या संबंधात नाट्यअकादमी स्थापन झाली होती. तिचे रूपांतर १९७० मध्ये कलाअकादमीत झाले. प्रत्येक कलेसाठी येथे सल्लागार मंडळ आहे. त्या मंडळात त्यातील निवडक तज्ञ लोक निवडले जातात. ही कलाअकादमी कलेला प्रोत्साहन मिळावे म्हणून शिबीरे, स्पर्धा, प्रदर्शन आयोजीत करणे इ. कार्यक्रम सतत करत असते. स्व. मुख्यमंत्री श्री. दयानंद बांदोडकर यांनी कला अकादमी संकुलासाठी चांगलेच प्रयत्न केले. श्री. प्रतापसिंह राणे मुख्यमंत्री असताना या संकुलाचे उद्‌घाटन झाले. येथे एकावेळी हजार प्रेक्षक बसतील असे नाट्यगृह आहे. ग्रंथालय, ध्वनीप्रक्षेपण इ. सोयी तेथे उपलब्ध आहेत. सुप्रसिद्ध वास्तूतज्ञ श्री. 'चार्लस कुर्रेय' यानी या संकुलाची कलात्मक मांडणी केलेली आहे.

**२) चर्च ऑफ अवर लेडी :**

पणजी शहराच्या मध्यभागी "चर्च ऑफ अवर लेडी इमॉक्युलेट कन्सेप्शन"ची इमारत व घंटेचा टॉवर येथे बघायला मिळतो. इ.स. १५४१ मध्ये या चर्चची उभारणी झाली. इ.स. १६०० मध्ये त्याची उंची वाढवण्यात आली. आणि इ.स. १६०९ मध्ये त्याचे नूतनीकरण करण्यात आले. या चर्चवर बसवण्यात आलेली घंटा ही आकाराने

गोव्यात द्वितीय क्रमांकाची मानली जाते. येथे २२५० कि. ग्रॅ. वजनाचा ताम्रपट आहे.

**३) महालक्ष्मी टेंपल :**

शहराच्या मध्यभागी असलेल्या अल्टीनो हीलच्या पायथ्याशी हे मंदिर आहे. प्रथम ही महालक्ष्मीची मूर्ति बिचोलीम तालुक्यातील 'मये' येथे होती. नंतर ती पणजी येथे आणण्यात आली. काळ्या दगडाच्या गाभाऱ्यात रूपेरी देवघरात लक्ष्मीची मूर्ती बसवलेली आहे. त्या मंदिराच्या बाजूला मारुती मंदिर आहे. चैत्रपौर्णिमा आणि रथसप्तमीला येथे मोठी यात्रा असते.

**४) मारुती मंदिर :**

मळा विभागात मारुतीगड भागात हे मंदिर आहे. इ.स. १९३३ मध्ये या मंदिराची स्थापना झाली.

**५) गॉशपार दि एश :**

हा जुन्या किल्ल्याचा भाग असून ऐतिहासिकदृष्ट्या यास महत्त्व आहे. पर्यटक विशेषतः पावसाळ्यात या भागात सहल काढतात. पणजीपासून साडेतीन कि.मी. अंतरावर हा किल्ला आहे.

**६) श्रीने ऑफ फतिमा :**

डॉन बास्को स्कूलच्या कंपाऊंडमध्ये अवर लेडी ऑफ फतीमाला अर्पण केलेले ख्रिश्चन धर्मस्थळ आहे. इ.स. १९७० मध्ये हे उभारण्यात आले. हिऱ्याला पैलू पाडल्याप्रमाणे येथे अल्टर बघायला मिळतो. हा भाग संगमरवरी दगडांनी उभारला आहे. त्यावर जिझसचा क्रूस आहे.

**७) जुम्मा मशीद :**

शहराच्या मध्यभागी अवर लेडी ऑफ इमाक्युलेट कन्सेप्शन जवळ ही मशीद आहे. ही मशीद अंदाजे २०० वर्षांपूर्वीची असावी. तिचे सुलेमान यानी बांधकाम

केले. इ.स. १९३५ मध्ये त्या मशीदीचे नूतनीकरण करण्यात आले. रमझान ईद व बकरी ईद हे दोन इस्लामी सण या मशिदीत मोठ्या प्रमाणात साजरे होतात.

**८) मीरामार बीच :**

पणजीपासून ३ कि.मी. अंतरावर हा बीच आहे. पणजीच्या दक्षिणेला २ कि.मी. अंतरावर हा सुंदर किनारा पसरलेला आहे. या समुद्रकिनाऱ्याला पूर्वी 'गास्पर दियस' बीच म्हणत. गोवा भारतात विलीन झाल्यावर 'मीरामार' हा शब्द प्रचलित झाला. या ठिकाणी 'गॉशपार दि एश'चा भुइकोट किल्ला होता. तो आता पूर्ण नष्ट झाला आहे. मऊ सोनेरी वाळूचा किनारा 'सनबाथ' घेणाऱ्यांना स्वर्गीय आनंद देतो. आजूबाजूला नारळीची हिरवी झालर मनाला सुखावह वाटते. 'मिरामार' किनाऱ्यावरून सूर्यास्ताचे दृश्य अतिशय मनोहर दिसते. संध्याकाळी या चौपाटीवर फिरण्यासाठी असंख्य लोक येतात. येथून उत्तरेकडे पाहिले तर आग्वादचा किल्ला दिसतो. या बीचवर एक सिमेंटचा बांधलेला बॅडस्टॅण्ड आहे. मुलांच्यासाठी एक 'चिल्ड्रनपार्क' आहे व शेजारीच भाऊसाहेब बांदोडकरांचे स्मारक आहे.

**९) दोना पावला :**

पणजीच्या दक्षिण दिशेला ७ कि.मी. अंतरावर तिन्ही बाजू समुद्राने वेढलेले एक सुंदर स्थान म्हणजे 'दोना पावला' गोवा दर्शनाच्या बसेस येथे थांबतात. व पर्यटकांना अर्धातास एन्जॉय करण्यासाठी दिला जातो. येथून समुद्राकडे जाण्यास एकच वाट आहे. त्या वाटेवर दुतर्फा कपड्याची दुकाने आहेत. गोवनस् प्रिंट असलेले व्हाईट टी शर्ट आणि बर्मुडापॅन्ट येथे विक्रीसाठी जास्त प्रमाणात दिसतात. समुद्राला लागून एक छोटी खडकांची टेकडी आहे. यावर पायऱ्यांनी चढून वर जाता येते. वर काही बांधकाम करून ते एक छोटेसे पर्यटनस्थळच बनविले आहे. येथून तिन्ही बाजूंनी महाकाय पसरलेल्या अरबी समुद्राचे भव्य दर्शन मनाला रिझवते. येथून मार्मागोवा बंदर स्पष्ट दिसते. टेकडीच्यावर उभारलेल्या चौथऱ्यावर दुर्बिणीतून बंदर व शहर दाखविण्यासाठी काही दुर्बिणी २/- रु. तिकीट घेऊन उपलब्ध आहेत. प्रेमरसासाठी गाजलेला हिंदी चित्रपट 'एक दुजे के लिए' यात वासू व सपना यांचे भेटण्याचे ठिकाण

हेच होय.

**१०) सेक्रेटरीएट :**

या मांडवी नदीच्या काठी असलेल्या भव्य इमारतीला पॅलेस असे म्हणतात. पूर्वी येथे राजवाडा होता. तो आदिलशहाने उभारला होता. इ.स. १५१० मध्ये पोर्तुगीजांनी तो जिंकला. इ.स. १६१५ मध्ये पोर्तुगीज व्हॉईसरॉयने याची पुन्हा उभारणी केली. व इ.स. १८४३ मध्ये या राजवाड्याचे रूपांतर सेक्रेटरीएट या शासकीय इमारतीत करण्यात आले.

**११) आबे फारिया स्टॅच्यू :**

सचिवालयाच्या जवळच्या चौकातच जगप्रसिद्ध 'आबे फारिया' या मोहिनी विद्या शास्त्रज्ञाचा पुतळा आहे. इतर पुतळ्यांपेक्षा या ब्रांझच्या पुतळ्याचे आगळेपण जाणवते. हा ॲक्शन पुतळा आहे. त्यामुळे त्यात जिवंतपणा वाटतो. आबे फारिया एका स्त्रीवर मोहिनी विद्या टाकत असतानाचा प्रसंग येथे दाखवला आहे. तिच्या नजरेला आबे फारियाने नजर भिडवली आहे. व हाताने तिच्या मनावर कब्जा मिळवत आहे. त्यामुळे ती मोहित होत चालली असून आडवी होत आहे. असे हे दृश्य आहे.

गोव्यातील लोक पारंपारिक वृत्तीचे साधे–भोळे त्यामुळे त्यांचा भुताखेतांवर, मोहिनी विद्येवर दृढ विश्वास आहे. इ.स. १९४५ मध्ये याची उभारणी करण्यात आली.

**१२) श्री. भाऊसाहेब बांदोडकर :**

सचिवालयाच्या उजव्या बाजूस गोव्याचे पहिले लोकप्रिय मुख्यमंत्री श्री. भाऊसाहेब बांदोडकरांचा पुतळा आहे. त्या पुतळ्याचा चेहरा मांडवी नदीकडे आहे.

**१३) फ्रॅन्सीस्को लुईस गोमस् :**

या सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ, लेखक आणि देवभक्ताचा पुतळा कंपाल बागेत इ.स. १९२९ मध्ये उभारण्यात आला.

**१४) हुतात्मा चौक :**

गोवा शेकडो वर्षे पोर्तुगीजांच्या अधिपत्याखाली होता. गोवामुक्तीसाठी शेकडो गोवेकर देशभक्तांनी आपले प्राण पणाला लावून इ.स. १९६१ मध्ये गोवा पोर्तुगीजांच्या गुलामगिरीतून मुक्त केला. ज्यानी आपले प्राणपुष्प मातृभूमीच्या चरणी वाहिले त्यांच्या स्मरणार्थ आझाद मैदानावर 'हुतात्मा' स्मारक उभारण्यात आले आहे. स्वतंत्र गोव्याचे पहिले गव्हर्नर लेफ्टनंट जनरल श्री. के.पी. कंडेय यांच्या शुभहस्ते इ.स. १९७३ मध्ये या स्मारकाचे यथोचित उद्घाटन करण्यात आले.

**१५) काबो राजनिवास :**

जवळ–जवळ तीनहजार स्क्वे.मी.च्या भव्य परिसरात ४० मि. उंचावर 'काबोराज' हे भव्य निवासस्थान बघायला मिळते. या निवासंस्थानाची लांबी १०७५ मि. व रूंदी २७० मिटर आहे. सध्या काबोराज वाडा आहे तेथे इ.स. १५४० मध्ये स्वसंरक्षणार्थ एक किल्ला उभा करावा असा विचार पोर्तुगीजांनी केला होता. तेथे एक चॅपलही उभारण्यात आले. ते व्हर्जीन मेरीला अर्पण करण्यात आले. इ.स. १५९४ मध्ये व्हॉईसरॉय अल्बुकर्कने त्यात कॉन्व्हेंट जोडले. इ.स. १७ व्या शतकात गोव्याच्या आर्चबिशपचे निवासस्थान म्हणून या इमारतीचे वेगळेच महत्त्व वाढले. नंतर उन्हाळ्यातील थंड हवेचे ठिकाण म्हणून गव्हर्नरचा मुक्काम येथे होऊ लागला. येथे ब्रिटिश लोकांनीपण आपले वास्तव्य केले आहे. चुना, दगड, माती, कौल यांचा वापर करून बांधलेली ही वास्तू मात्र ऐतिहासिक स्मृतीसाठी महत्त्वाची आहे.

**१६) ओल्ड गोवा :**

पणजीपासून १० कि.मी. अंतरावर ओल्ड गोवा आहे. पणजीहून दक्षिण गोव्यासाठी ज्या टुरिस्ट बस सुटतात त्यातून हा भाग एक दिवसात बघता येतो. बस सकाळी ९ वा. सुटते व संध्या. ६ वा. परत येते. यात सी कॅथेड्रल, सेंट फ्रान्सिसी,

अवरलेडी ऑफ रोझरी, सेंट मोनिका ननरी, सेंट ऑगस्टीन टॉवर, व्हॉईसरॉय कमान ही चर्चेस बघता येतात.

### १७) रिव्हर क्रुसी :

गोवा पर्यटनातर्फे १/२ तासांचा नदी भ्रमणाचा कार्यक्रम एका मोठ्या बोटीतून आयोजित केला जातो. या बोटीवर खाण्यापिण्यासह सांस्कृतिक–नृत्य कार्यक्रम पण बघायला मिळतो. तिकीट दर ५०/– रु. तिकीटाचे दर बदलू शकतात.

(रिव्हर क्रुसी)

| कार्यक्रमाचे नाव | जाण्याची वेळ | तिकीट दर | स्थान |
|---|---|---|---|
| १) सूर्यास्त भ्रमण | सायं. ६ वा. | ५०/– रु. | पणजी जेठी |
| २) सूर्यास्तानंतर | सायं. ७.१५ वा. | ५०/– रु. | " |
| ३) चांदण्या रात्री | रात्रौ १२ वा. | ६०/– रु. | " |

ही नदी भ्रमणाची तिकीटे जेठवर किंवा टुरिझम कार्यालयात बुक करता येतात.

पणजीतील पर्यटक सूचना केन्द्र :–

| | | |
|---|---|---|
| १) पर्यटन कार्यालय, टुरिस्ट होम | – | पारो–पणजी |
| २) पर्यटन सूचना काऊंटर | – | बसरर्मिनल–पणजी |
| ३) गव्हर्नमेंट ऑफ इंडिया | – | टुरिस्ट ऑफीस–चर्च–केअर–पणजी. |

**पणजीतील ट्रॅव्हल्स् एजंटस् :**

| | | |
|---|---|---|
| १) | अलकान इंटरनॅशनल ट्रॅव्हल्स | – हॉटेल डेलमान, अल्बुकर्क रोड. |
| २) | झुआरी एअर ट्रॅव्हल्स् | – म्युन्सिपल गार्डन – पणजी. |
| ३) | बाबा ट्रॅव्हल्स् | – कुन्हा रिव्हेरारोड – पणजी. |
| ४) | मांडवी टुर्स् ॲन्ड ट्रॅव्हल्स् | – सेंट्रल पोस्टाजवळ – पणजी. |
| ५) | मनीषा टुर्स्–ट्रॅव्हल्स् | – मस्कारेन्स बिल्डिंग – पणजी. |
| ६) | नूतन टुर्स् ॲन्ड ट्रॅव्हल्स् | – सिने नॅशनल – पणजी |

७) शिवम टुर्स् ॲन्ड ट्रॅव्हल्स् – पारो – पणजी.
८) अल्फिना टुर्स् ॲन्ड ट्रॅव्हल्स् – अझवेहो बिल्डिंग पाटो – पणजी.
९) टुरिस्ट होमटुर्स् ॲन्ड ट्रॅव्हल्स् – टुरिस्ट होस्टेल जवळ –पणजी.
१०) गोवा टुर्स् – वैद्यरोड – पणजी.
११) एम्. जी. एम्. इंटर नॅशनल ट्रॅव्हल्स – हेड पोस्ट ऑफिससमोर – पणजी.
१२) गोवा टुरिस्ट सर्व्हिस – गोविन्द बिल्डिंग – पणजी.

**पणजीपासून इतर स्थळांचे अंतर –**

| | | | |
|---|---|---|---|
| पणजी | – | कलंगुट | १६ कि.मी. |
| पणजी | – | दाबालीम एअरपोर्ट | २९ कि.मी |
| पणजी | – | मडगांव | ३३ कि.मी |
| पणजी | – | म्हापसा | १३ कि.मी |
| पणजी | – | ओल्डगोवा | १० कि.मी |
| पणजी | – | व्हेगॅटर | २२ कि.मी |
| पणजी | – | वास्को–दी–गामा | ३० कि.मी |
| पणजी | – | बोंडला | ५५ कि.मी |
| पणजी | – | पयनेम | २७ कि.मी |
| पणजी | – | बिचोलीम | ३२ कि.मी |
| पणजी | – | अगुडा | १२ कि.मी |
| पणजी | – | मीरामार | ३ कि.मी |
| पणजी | – | दोनापावला | ७ कि.मी |
| पणजी | – | मंगेशी | २१ कि.मी |
| पणजी | – | पोंडा | २८ कि.मी |

**गोव्यातील महत्त्वाचे फोन – (पणजी)**

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | १०० |
| फायर ब्रिगेड | १०१ |

| | |
|---|---|
| ट्रॅक बुकींग | १८० |
| रेल्वे इन्क्वायरी | ५६२० |
| अँब्यूलन्स | ५९२६ |
| मॉर्निंग अलार्म | १७३ |
| इंडियन एअरलाईन | ३८२६ |
| पणजी पीन कोड | ४०३००१ |

**पोस्ट ऑफिस –** १) जनरल पोस्ट ऑफिस

२) टेलिग्राफ ऑफिस – डॉ. आत्माराम बोरकर रोड, पणजी.

**बँक्स –**

१) स्टेट बँक ऑफ इंडिया – पणजी
२) बँक ऑफ बडोदा – आझाद मैदान – पणजी
३) इंडियन बँक – वेल्हे बिल्डिंग, म्युन्सिपल गार्डन – पणजी
४) सिंडीकेट बँक – बांदोडकर मार्ग – पणजी
५) बँक ऑफ महाराष्ट्र – अल्फान्सो अल्बुकर्करोड – पणजी
६) कॅनरा बँक – मस्कारन्स बिल्डिंग, मांडवी हॉटेल – पणजी
७) बँक ऑफ इंडिया – आझाद मैदान – पणजी
८) युनियन बँक ऑफ इंडिया – रूआडी से–थोम – पणजी
९) सेंट्रल बँक – अल्फान्सो अल्बुकर्क मार्ग – पणजी
१०) विजया बँक – स्टीमर जेठी समोर – पणजी
११) युनायटेड कमर्शियल बँक – गोविंद बिल्डिंग – पणजी

**रेस्टॉरन्टस् –**

१) न्यू पंजाब बार अँन्ड रेस्टॉरन्ट – म्युन्सिपल गार्डनसमोर – पणजी.
२) नटराज बार अँन्ड रेस्टॉरन्ट – जूनरोड – पणजी.
३) पार्कचीफ – चिल्ड्रन पार्क, डी.बी. मार्ग. (गोवन्स फूडसाठी प्रसिद्ध) – पणजी.

४) रिव्हर डेक रेस्टॉरन्टस् – मांडवी नदी (गोवन्स, साऊथ, नॉर्थ, इंडियन फूड) – पणजीरेस्टॉरन्टस् –

५) शालीमार बार ॲन्ड रेस्टॉरन्ट – अल्बुकर्क रोड – पणजी

६) स्पेको – पोस्ट ऑफिस जवळ – पणजी.

७) व्हिलेज – रायबंदर – पणजी

८) तंदूर – म्युन्सिपल गार्डन समोर – पणजी

९) रिव्हर डेक रेस्टॉरन्टस् – मांडवी रिव्हर – पणजी

१०) बेम विंदो रेस्टॉरन्टस् –टुरिस्ट होम – पट्टो – पणजी

११) चा–चा–चा – रूआ डी क्यूरेम – पणजी

१२) चीर–चार रेस्टॉरन्टस् – टुरिस्ट होस्टेल

**व्हेजिटेरियन रेस्टॉरन्टस् –**

१) गुजराथ बोर्डींग – सम्राट थिएटर जवळ – पणजी

२) हॉटेल रामालय – सिने नॅशनल समोर – पणजी

३) शानबाग – म्युन्सिपल गार्डन – पणजी

४) शिवरॉक – हॉटेल नोवा – गोवा जवळ – पणजी

५) संयोग हॉटेल – नॅशनल सिनेमा समोर – पणजी

६) रामेश्वर बोर्डींग – महालक्ष्मी मंदिराजवळ – पणजी

७) कामत हॉटेल – म्युन्सिपल गार्डन जवळ – पणजी

८) हॉटेल पॅलिसिओ डी गोवा – गामा – पिंटो रोड – पणजी

९) कामत कॅन्टीन – कदम्ब बस स्टँड – पणजी

**पणजीतील बुकस्टॉल्स –**

१) वर्षा बुक स्टॉल, २) बुक फेअर ३) सिंगबाळ – चर्चजवळ .

(शिवाय प्रत्येक ‘स्टार’ असलेल्या हॉटेलमध्ये टुरिस्ट पुस्तके उपलब्ध आहेत.)

सिनेमागृह – सिने सम्राट – अशोक, सिने एल. दौराहो, सिने नॅशनल.

**गॅरेज –** १) आनंद सर्व्हीस स्टेशन, तळेगाव, पणजी

२) ॲगल ऑटो सेंटर – शिगावकर रोड

३) गॅरेज मतमो – दादा वैद्यरोड

**केमिस्ट –** १) हिंदू फार्मसी – म्युन्सिपल गार्डन – पणजी

२) मॅन्जीस ॲन्ड सिया – पोस्ट ऑफिस जवळ – पणजी

३) फार्मसिआ ऑलिव्हरिया – पोस्ट ऑफिस जवळ – पणजी

**शॉपींग –**

१) **कपडे** – कोणत्याही वस्तू घेण्याची घाई करू नये.समुद्रकिनारी सर्वत्रच गोवन्स प्रिन्टची दुकाने आहेत. तेव्हा एक दोन ठिकाणी भाव बघावेत – किंमत पडताळावी व नंतर खरेदी करावी. गावातील काही दुकाने पुढे दिलेली आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | बेंटो मिंग्युअल | – | पोस्ट ऑफिस शेजारी |
| २) | गौरी हॅन्डीक्राफ्टस् | – | एम्. जी. रोड |
| ३) | हॅन्डीक्राफ्ट एंम्पोरीयम | – | के. टी. सी. बस टर्मिनल |
| ४) | वेल्हो–फिल्होज | – | म्युन्सिपल गार्डन |
| ५) | वास्कोव्हर शॉपींग सेंटर | – | नवहिंद भवन जवळ |
| ६) | मॅगसन | – | चर्चजवळ |
| ७) | बेंझ | – | बॉम्बेबझार – जून रोड |
| ८) | लिबबाज | – | न्यू मार्केट |
| ९) | ओ सेनहॉर | – | हेड पोस्ट ऑफीस जवळ |
| १०) | पुष्पक | – | म्युन्सिपल मार्केट |
| ११) | मेट्रो गार्मेंट | – | म्युन्सिपल मार्केट |

२) **काजू** – वेगवेगळ्या किमतीत वेगवेगळ्या ग्रेडचे काजू मिळतात. पण किंमत पाहून काजू खरेदी करू नयेत. टपोरा–मोठा व नवा काजू महाग असतो. साल काढलेले व साल न काढलेले तसेच खारे काजू, मसाला काजू असे चविष्ट अनेक प्रकार मिळतात. बंदिस्त पाकीट फोडून काजूची टेस्ट घ्यावी व मग खरेदी करावी. काजू

**खरेदीसाठी काही प्रमुख पत्ते –**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | झुंटयेट कॅश्यूनटस् | – | सिने सम्राटपुढे |
| २) | रविराज | – | ओरियन बिल्डिंग मार्केट |
| ३) | हॉटेल मांडवीसमोर काजूची अनेक दुकाने आहेत. | | |

**३) फोटोग्राफी सामान –** गोव्यातील सर्व टुरिस्ट स्थळी हे साहित्य उपलब्ध असते. पण यात डुप्लीकेट रोल मिळवण्याची दाट शक्यता असते. माहितगारांनीच ही खरेदी करावी. ओरिजनल रोलसाठी पणजीतील स्टुडीओतच खरेदी करावी. ती सुद्धा नीट पाहून. किशोर कलर आर्ट – कोनिका स्क्वेअर, डॉन बास्को समोर. येथे योग्य फोटोग्राफीचे सामान मिळते.

**४) गोवनस् सॉस –** १) वाल्कोव्हर शॉपींग सेंटर – नवहिंद भवनजवळ
२) मॅगसन – चर्चजवळ

**५) लीकर –** लीकर व गोवाफेणी गोव्यातून आपल्याला आणावयाची असल्यास त्याचे स्वतंत्र लायसन मिळते. ते काढावे व नंतर याची खरेदी करावी.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | लालजी देवराज | – | सचिवालयाजवळ |
| २) | स्वागत वाईन | – | गोविंद बिल्डिंगजवळ |
| ३) | नॉव्हेल्टी हाऊस | – | ओल्ड बस स्टॅण्ड |
| ४) | सिसॉल | – | मांडवीजवळ |
| ५) | राजकमल | – | एम्. जी. रोड |
| ६) | डिलक्सवाईन | – | जानेवारी रोड |
| ७) | घाणेकर वाईनमार्ट | – | हॉटेल डेलमनसमोर |

**स्पोर्टस् –**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | स्पोर्टस् ॲथारिटी ऑफ गोवा | – | इनडोअर स्टेडियम. |
| २) | गोवा ब्रीज असोसिएटस् | – | क्लब टेनीस–डी गॅस्पर डायस. |
| ३) | पणजी जिमखाना | – | पणजी. |

**ट्रेकींग–हायकींगसाठी –**

**द दायकिंग असोसिएशन गोवा –** येथे ट्रेकींगसाठी पुढील जागा उपलब्ध आहेत – मालेम, तांबडी, दूधसागर, महावीर, वाईल्डलाईफ, अतोले, मतकोंडा हील,

**पणजीतील मंदिरे –** हनुमान मंदिर, महालक्ष्मी मंदिर.

**चर्चेस –** १) अवर लेडी इमॅक्युलेट कन्सेप्शन, डॉन बास्को, स्कूलमधील चर्च, अवर लेडी ऑफ मिरॅकल, सेंट ख्रिस्तोफर प्रोटेस्टंट चर्च.

**मशीद –** जामा मशीद.

**लायब्ररीज –** सेंट्रल लायब्ररीज, महालक्ष्मी हिंदू वाचन मंदिर, महाराष्ट्र इन्फरमेशन सेंटर, सरस्वती वाचन मंदिर.

**म्युझियम् –**

१) **ऑर्किऑलाजीकल म्युझियम ॲन्ड पोट्रेट गॅलरी –** ओल्ड गोवा. वेळ १० ते १२/दु. २ ते ५ शुक्रवार बंद.

२) **ऑर्चिरीज म्युझियम ऑफ गोवा –** आशीर्वाद बिल्डींग पणजी. वेळ ९ ते १ व २ ते ५–३०. शनिवार–रविवार सुट्टी.

३) गॅलरीज 'सी कॅथेड्रल'.

**कुरिअर सर्व्हिस –**

१) डी. एच्. एल्. डीव्हीजन ऑफ एअरक्राफ्ट लि. – नागेश अपार्टमेन्ट, रूअ कोन्द दी सारसेदीश – पणजी.

२) स्कॉयपॅक – कुन्यरिवारारोड, म्यु. गार्डन (स्के अर) – पणजी.

३) ब्ल्यू डार्ट – हॉटेल फिदाल्गो, जूनरोड – पणजी.

**गोव्यातील सांस्कृतिक नृत्यप्रकार –** १) इनपेट – तलवार युद्ध २) गोफ लोकनृत्य ३) कुणबीनृत्य ४) तालगडी – सामुदायिक ५) धनगरनृत्य ६) तोनियामेल.

**पणजी येथील निवासस्थान –**

या ठिकाणी हॉटेलचे दर देत आहोत. पण बदलत्या परिस्थितीनुसार व सिझनप्रमाणे ते बदलू शकतात. हॉटेलमधील फरक समजावा व त्यावरून अंदाज करावा.


(मध्यम वर्गियांसाठी) – सिंगलबेड – डबलबेड

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | टुरिस्ट होस्टेल | – पणजी फोन ४३३९६ / ४७१०३ | | |
| २) | अंबिका हॉटेल | – चर्चस्क्वेअर | १२०.०० | १५०.०० |
| ३) | हॉटेल–नोवा–गोवा | – डॉ. आत्माराम बोरकर | ३७५.०० | ५००.०० |
| ४) | हॉटेल सनराईज | – १८ जून | २००.०० | ३००.०० |
| ५) | हॉटेल सोना | – रूआ डी ओरेम | १३५.०० | २००.०० |
| ६) | कम्पाल बीच रिझॉर्ट | – डी. बी. बांदोडकर मार्ग | २६०.०० | ३००.०० |
| ७) | हॉटेल फ्लेमींगो | – रूआ डी ओरेम–पोटोब्रीज | – | १००.०० |
| ८) | हॉटेल मूनसिटी | – बोरभाट | – | १००.०० |
| ९) | लंडन हॉटेल | – मीरामार | १५०.०० | २५०.०० |
| १०) | हॉटेल मयूर | – मीरामार | १००.०० | १५०.०० |
| ११) | हॉटेल गोल्डन गोवा | – डॉ. आत्माराम बोरकर मार्ग | ३००.०० | ४००.०० |
| १२) | हॉटेलअहरोमा | – म्यु. गार्डन जवळ | १५०.०० | २५०.०० |
| १३) | हॉटेल राजधानी | – डॉ.आत्माराम बोरकर मार्ग | १५०.०० | ३००.०० |
| १४) | हॉटेल मनशांती | – डॉ. गामा पिंटो रोड | २००.०० | २००.०० |
| १५) | सी व्ह्यू हॉटेल | – दोना पावला | ३५०.०० | ४००.०० |
| १६) | हॉटेल समीर | – मेनेझीस ब्रॅगन्झा | १७५.०० | २५०.०० |
| १७) | मे फेअर हॉटेल | – डॉ. दादा वैद्य रोड | २००.०० | ३००.०० |
| १८) | हॉटेल अमेय | – सेंट इनेझ | १५०.०० | २००.०० |

**श्रीमंत व्यक्तींसाठी**

१) अगौडा हर्मीटज – सिन्क्वीरीम २०००.०० च्या वर

| | | |
|---|---|---|
| २) | फोर्ट अगौडा बीच रिझॉर्ट – सिन्क्वीरीम | ७०० ते १००० पर्यंत |
| ३) | माजोर्डा बीच रिझॉर्ट – माजोडीबीच सालसेहा | ८०० ते २५०० पर्यंत |
| ४) | सिडाडे डी गोवा – व्हेगनीमबीच – दोनापावला | ६०० ते २००० पर्यंत |
| ५) | हॉटेल ओबेरॉय – बोगमाओबीच | ८०० ते १००० पर्यंत |
| ६) | हॉटेल फिडॅल्गो – १८ जून रोड | ३०० ते ७०० पर्यंत |
| ७) | हॉटेल मांडवी – डी.बी. बांदोडकर मार्ग | २०० ते ८०० पर्यंत |


मडगांव
पणजी कडे
कदंबा बस स्टॅन्ड
फोंड्या कडे
17
कोळवा कडे
कोळवा-फोंडा जंक्शन
2
होली चर्च
हॉस्पिटल
गोमंत विद्यानिकेतन
पोलीस स्टेशन
म्युनिसिपल गार्डन
विशांत सिनेमा
म्युनिसिपल मार्केट
रेल्वे स्टेशन

# मडगाव (MARGAO)

पणजीपासून मडगावचे अंतर ३३ कि.मी. आहे. दक्षिणगोवा विभागातील सालेसिटी तालुक्यात असलेले राजधानी नंतर दुसऱ्या क्रमांकाचे हे एक जुने शहर. गोव्यात मध्यवर्ती असलेले हे महत्त्वाचे रेल्वे स्टेशन. येथे रेल्वेने उतरले की, बसने गोव्यात कोठेही जाता येते. गोव्यातील मोठी बाजारपेठ येथे आहे.

मडगाव शहरातील लाल कौलांची घरे लॅटीन वसाहत किंवा स्पॅनिश-मेक्सीकन वास्तूशास्त्राचा नमुना वाटतात. या गावातील भाग भव्य आहे. हे शहर गोव्यातील शासकीय कार्यालयाच्या दृष्टीने व कारभाराच्या दृष्टीने राजधानीचाच मान मिळवते. बाहेरगावी जाण्यासाठी गावाच्या मध्यभागी कदम्बबस स्टॅण्ड आहे. येथे दोन प्रमुख बाजारपेठा आहेत. जुन्या मार्केटपासून १० मिनिटांच्या अंतरावर होलीस्पीरीट चर्च आहे. येथे जत्रा भरते. शहराच्या मध्यभागी 'ग्रेसचर्च' आहे. कोलवा व बाणावली समुद्रकिनारे येथून जवळ आहेत. येथे राजेंद्रप्रसाद स्टेडियम आहे. राष्ट्रीय स्तरावरील क्रिकेट व फुटबॉलचे सामने येथे होतात. मडगावात प्रत्यक्ष पर्यटन स्थळे नाहीत. पण हे मध्यवर्ती व सोयीचे ठिकाण असल्याने येथे निवास करून गोव्यातील पर्यटन स्थळे पहाणे सोयीचे जाते.

**मडगावच्या परिसरात काय बघाल?**

१) **मोटे हील** – हे नयनरम्य फिरण्याचे स्थान आहे. येथून संपूर्ण मडगावचे दृश्य मनोहर दिसते.

२) **मंदिरे** – मडगाव ते पणजी बसने बोरीच्या पुलावर उतरावे व शिरोड्यातील कामाक्षीमंदिर व शिवनाथमंदिर पहावे. शिरोडा – पणजी रस्त्यावर नवदुर्गामंदिर आहे. येथून सिध्देश्वर डोंगराकडे एक रस्ता जातो. त्या डोंगरावर सिद्धनाथाचे मंदिर आहे. येथून १५ कि.मी. अंतरावर केपे येथे चंद्रेश्वर मंदिर आहे. ३५० मिटर उंच डोंगरावर या मंदिराची उभारणी केलेली आहे. मडगांवपासून कुंकोलीत १० कि.मी. व त्याच्याजवळ दामोदर मंदिर बघण्यासारखे आहे.

३) **बीच** – उतार्डो व माजोर्डा हे सुप्रसिद्ध बिच मडगांवहून ८ कि. मी. वर आहेत. बेतालबेतीम व कोलवा बिच ६ कि.मी. अंतरावर आहेत.

४) **चर्च ऑफ सेंट ॲलेक्स** – मडगांवपासून ९ कि.मी. अंतरावर रावलनाथ मंदिराच्या अवशेषांवर हे चर्च उभारले असावे.

५) **स्प्रिंग** – मडगांवपासून १२ कि.मी. अंतरावर केशरवाल स्प्रिंग हे निसर्गरम्य स्थान सुंदर तर आहेच, पण या पाण्यात औषधीगुणपण आहेत.

६) **दूधसागर** – मडगांवहून सकाळी ६ ला निघून रात्री ८ पर्यंत 'दूधसागर' धबधबा बघून येता येते.

**चित्रपटगृहे** – १) विशांत, २) सिने मेट्रोपोल ३) सिने लता. या शिवाय व्हिडीयो चित्रपट गृहे भरपूर आहेत.

७) **नाट्यगृह** – 'गोमंत विद्या निकेतन' हे पोलिस स्टेशन जवळ असून नाटकांच्यासाठी प्रसिद्ध आहे.

८) **टुरिस्ट इन्फरमेशन सेंटर** –

१) टुरिस्ट होस्टेल मडगांव – फोन २२५१३

२) टुरिस्ट इन्फरमेशन सेंटर, गव्ह. ऑफ गोवा–दीव–दमण म्युन्सिपल बिल्डिंग – मडगांव – २२५१४

३) टुरिस्ट इन्फरमेशन सेंटर. गव्ह. ऑफ कर्नाटक मडगांव.

**मडगांवमधील ट्रॅव्हल एजंटस्** –

१) सुविना ट्रॅव्हल्स् –गोसालिया बिल्डिंग – मडगांव फोन– ३२५२

२) अल्फीना टूर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स् – मडगांव २०१७५

३) जॉर्जिया ट्रॅव्हल्स् – मडगांव २१३३७

४) विश्रांती टूर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स् – मडगांव

५) डायनामिक टूर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स् – मडगांव २०१९७

६) गोवा ट्रॅव्हल सर्व्हिस – इसिदोरो बाप्तीसारोड – मडगांव

७) जेमिनी टूर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स् – स्टेशन रोड – मडगांव. टे. नं. २२२०८

८) शांता ॲण्ड वर्षा टूर्स – स्टेशन रोड – मडगांव

९) सनरीट टूर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स् – रेल्वेस्टेशनजवळ – मडगांव २१२२६

१०) ग्रॅसीयन ट्रॅव्हल्स् – लता सिनेमाजवळ – मडगांव

११) फोरवेज ट्रॅव्हल्स् – मडगांव

१२) इंडियन सफारी – लता सिनेमाजवळ २३२७८

१३) मीलन टूर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स् – मीलन लॉज २२७१५

१४) नूतन टूर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स् – मडगांव

१५) जॉर्ज ट्रॅव्हल्स् – मडगांव २१३३७

**गॅरेजेस् –**

१) व्हर्जीनकार ॲण्ड सन्स – टे.नं. २२७७१

२) नरसिंहा नाईक – टे. नं. २११४३

३) जॉर्ज फ्रान्सीस्को – टे. नं. २०६५९

**व्हेजीटेरियन रेस्टॉरंट –**

१) मोहिनी हॉटेल – स्टेशनरोड

२) कामन मिलन – स्टेशनरोड

३) दिलरपूश हॉटेल – स्टेशनरोड

४) देसाई बोर्डींग – स्टेशनरोड

५) मेघदूत कामत – म्युन्सिपल गार्डन

६) गुजराथ लॉज – मार्केट

**बार ॲन्ड रेस्टॉरंट –**

१) आसरा – बार ॲन्ड रेस्टॉरंट

२) कासा मेनीनो – बार ॲन्ड रेस्टॉरंट – चायनीज फूड

३) लॉगीनदास – बार ॲन्ड रेस्टॉरंट –(गोवीयन फूड)

४) पिकॉक रेस्टॉरंट – टुरिस्ट होस्टेल – (पंजाबी)

५) गोल्डस्टार डीलक्स – सी. फूड चायनीज (A.C.)

६) गायलीन बार–रेस्टॉरंट (A.C.)

७) फूड अफेअर – (A.C.) चायनीज, पोर्तुगीज, सी फूड

**मडगांवमधील निवासस्थान –**

१) हॉटेल अप्सरा – रे रामण

२) हॉटेल गोल्डस्टार – बाप्तीस्मारोड. फोन–२१८६१

३) हॉटेल मेट्रोपोल – फोन–२१५१६

४) मार्बल हॉटेल – म्यु. गार्डनसमोर. फोन–२१६५८

५) अन्नपूर्णा हॉटेल – स्टेशनजवळ. फोन– २२७६०

६) गोवा गेस्ट हाऊस – रेल्वे स्टेशनजवळ. फोन– २२२५७

७) सनरीट हॉटेल – रेल्वे स्टेशनजवळ. फोन– २१२२६

८) विश्रांती लॉज – रेल्वे स्टेशन

९) गोवा वूडलॅण्ड हॉटेल – फोन– २११२१

१०) मीलन लॉज – स्टेशन रोड. फोन– २२७१५

११) हॉटेल सिलव्हियाराजे – मोंटेहील फोन– २०४०७

१२) स्वागत लॉजींग–बोर्डींग फोन– २२२६८

१३) न्यू गुजराथ लॉज – लता सिनेमाजवळ

१४) हॉटेल नूरजहान – डॉन बॉस्कोरोड

**शॉपींग – (मडगांव)**

**लीकर** – १) दमानिया (मार्केट), २) सिंतुब्रो (रेल्वेगेटजवळ)

**कपडे** – १) बटनस्, २) कुरतरकर ब्रदर्स (मार्केट), ३) गोल्डन

**नीडल** – रेड रोड ब्युटीक (लेडीजसाठी)

**हॅण्डीक्राफ्ट** – १) अबदुल जाफरभाई


२) खादी ग्रामोद्योग

**काजू** – १) सादेकर (मार्केट)


२) लोजामुसा (मार्केट)

**औषधे** – होली स्पीरीट मेडिकल स्टोअर (ओल्डमार्केट) (२४ तास सेवा)

**मोडकी बझार** – ओल्डमार्केट जवळ अन्य मार्केटींग करू शकतात.



कोलवा बीच (गोवा)



माजोर्डा बीच (गोवा)

# वास्को–दि–गामा


हे शहर पणजीपासून ३० कि.मी. अंतरावर असून गोव्याचे शेवटचे टोकच आहे. मुरगांव बंदर येथून ४ कि.मी. अंतरावर येते. जुआरी नदीच्या पलीकडे हे शहर आहे. वास्कोहून दाबोलीम विमानतळ ४ कि.मी. अंतरावर आहे. मडगांवहून वास्कोला ट्रेनने जाता येते. मुरगांव हे बंदर असल्याने त्यास गोव्याचे प्रवेशद्वार असे म्हणतात.

इ.स. १९१७ साली पोर्तुगालहून अमेरिकेच्या शोधार्थ निघालेल्या अनेकांपैकी वास्को दि गामा हा एक असून तो आफ्रिका खंडाला वळसा घालून हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर उतरला ते कालीकत बंदर. नंतर तो गोव्यात ज्या स्थानी प्रथम आला त्या स्थानास वास्को–दि–गामाचे नाव देण्यात आले. नंतर येथे वसाहत झाली. या बंदर भागाला मुरगांव किंवा मार्मागोवा असे म्हणतात. इ.स. १५१० मध्ये पोर्तुगीजांनी गोवा घेतला. इ.स. १८१८ मध्ये पणजी राजधानी झाली पण पाश्चिमात्य देशांशी व्यापार ज्या मुरगांव बंदरातून चालत असे त्या मुरगांवचे महत्त्व कमी झाले नाही. या बंदराच्या संरक्षणासाठी मुरगांव येथे किल्ला बांधण्यात आला होता. या किल्ल्याची बांधणी इ.स. १९२४ मध्ये सुरू झाली. या किल्ल्याचा परीघ ६ मैल आहे. या ठिकाणी गोव्याची राजधानीपण काही काळापुरती होती. परत ती पणजीला नेण्यात आली. या शहराचे सेंट्रल झोन व सदर्नझोन असे दोन भाग पाडण्यात आले. समुद्र जवळ असल्यामुळे शहराचे उष्णतामान समशितोष्ण असते.पण जुआरी नदी जवळूनच वहात असल्याने वातावरणात थंडाई जाणवते.

**परिसरात काय पहाल? –**

१) मुरगांव बंदर, २) परदेशी बोटी, ३) दाबोलीम विमानतळ, ४) सेंट अँड्रुज चर्च, ५) रेल्वे स्टेशन.

**वास्कोतील गॅरेजेस् –** १) ऑटो सर्व्हिस फोन – २४२१


वास्को-द-गामा
अरबी समुद्र
ऑईल रिफायनरी
हॉटेल अन्नपूर्णा
पोस्ट ऑफिस
जुवारी नदी
हॉटेल जुवारी
स्वतंत्र पथ
रेल्वे स्टेशन
सिटी बस स्टॅन्ड
कॉमर्स सेंटर
N
ठक्कर हाउस
केटीसी बस टर्मिनस कडे दाभोळी वि. तळ मडगांव/पणजी

२) कामत गॅरेज – बइना

**बुक स्टॉल्स्** – एस्. व्ही. इ. मुथू

**केमिस्ट** – १) मॅनेझिस् अॅण्ड सिआ – टॅक्सी स्टॅण्ड जवळ

२) पार्मासिया – वसंत – टॅक्सी स्टॅण्ड जवळ

३) पार्मासिया नॅशनल – टॅक्सी स्टॅण्ड जवळ

**बँक्स्** – सेंट्रल बँक, कॅनरा, देना, इंडियन ओव्हरसीज, स्टेट बँक ऑफ इंडिया, यूनियन बँक ऑफ इंडिया, विजया बँक, चार्टर्ड बँक.

**निवास** –

१) टुरिस्ट होस्टेल

२) हॉटेल अन्नपूर्णा – डॉ. देशपांडे रोड

३) हॉटेल बिस्मार्क – सेंट अॅड्र्युज चर्च जवळ

४) इंदिरा लॉज – इसो इस्टालेशन जवळ

५) सन्मान हॉटेल – वदेम वन रोड

६) वेस्टर्न् हॉटेल – अवेनिदा फ्लोज

७) महाराजा हॉटेल – रुआलिओ–पोल्डो–इलोरस्

८) हॉटेल मार्सेल – गोम्स् रोड


९) हॉटेल एअरपोर्ट – एअरपोर्ट रोड

१०) हॉटेल पाझ गार्डनस् – स्वातंत्र्य पथ

११) हॉटेल वास्को – स्वातंत्र्य पार्क

**रेस्टॉरंटस् व बारस्** –

१) पूलसाईड – कॉफी शॉप (ब्रेक फास्टसाठी), २) बीचबार बी क्यू, ३) क्लंडेल –बार–रेस्टॉरंट, ४) कॉकपीट –बार–रेस्टॉरंट, ५) लागोस्ता–बार–रेस्टॉरंट, ६) हॉटेल लापाझ, ७) लीटल चेफ, ८) हॉटेल रिबेलो, ९) हॉटेल अन्नपूर्णा, १०) मेघदूत (व्हेज), ११) ब्रिंदावत (व्हेज), १२) सत्कार (व्हेज), १३) महाराजा हॉटेल (व्हेज), १४) उडीप्पी लॉज (व्हेज).


म्हापसा
पोलीस स्टेशन
पोस्ट ऑफिस
म्हापसा म्युनिसिपालटी
हॉटेल विलेना
म्युनिसिपल गार्डन
हॉटेल बार्देस
TAXI,STAND
स्टेट बँक ऑफ इंडिया
केटीसी बस टर्मिनस
म्हापसा चर्च/असिलो हॉस्पिटल कडे
म्हापसा म्युनिसिपल मार्केट
टुरिस्ट हॉटेल
कळंगुट बीच कडे
पणजी कडे
N

# म्हापसा

उत्तर गोव्यातील व्यापारीपेठ असलेले बार्देस तालुक्यातील म्हापसा हे महत्त्वाचे शहर. पणजीपासून १३ कि.मी. अंतरावर हे शहरआहे. दर शुक्रवारी येथे मोठा बाजार भरतो. भाज्या, लिकर, कपडे, खेळणी व अन्य वस्तू या बाजारात उपलब्ध असतात. गोव्यातील कोणत्याही भागातून येथे येण्यासाठी बससेवा उपलब्ध आहे. पणजीहून फेरी बोटीने बेगींम ते म्हापसा बसने आल्यास आपला वेळ वाचतो. महाराष्ट्रातून (मुंबई) गोव्यात जाताना पहिले गाव लागते ते म्हापसा. येथूनच गोव्याच्या निसर्ग सृष्टीचे दर्शन होऊ लागते. नॅशनल हायवेवर हे शहर असल्याने या शहराचा व्यापारी विकास झालेला आहे. शहराचा जुनाभाग टेकडीच्या मध्यभागी आहे. या व्यापारी केन्द्र असलेल्या गावाच्या नावातच व्यापारी वृत्ती दिसून येते. माप = मापणे–मोजणे. व सा = भरणे म्हणजेच म्हापसा = माप भरण्याची जागा किंवा वस्तू मोजण्याची जागा. यावरूनच 'म्हापसा' शब्द उच्चारला की बाजारपेठेची आठवण होते. येथून ९ कि.मी. अंतरावरून 'चापोरा' नदी वहाते.

**परिसरात काय पहाल** – १) गार्डन, २) मांगोरा किल्ला, ३) आग्वाद किल्ला, ४) बोडगेश्वर मंदिर, ५) अवर लेडी ऑफ मिरॅकलस् चर्च.

**१) बोडगेश्वर मंदिर** – हे मंदिर कणकेश्वर बाबांना अर्पण केलेले आहे. त्यास बोगींनी असे म्हणतात. या मूर्तीवर भक्तांची श्रद्धा आहे. जानेवारी महिन्यात येथे जत्रा भरते.

**२) अघरलेडी ऑफ मिरॅकल चर्च** – हे चर्च अवरलेडी ऑफ मिरॅकलला अर्पण करण्यात आले आहे. या चर्चची उभारणी इ.स. १५९४ मध्ये झाली. इ.स. १८३८ मध्ये या चर्चला आग लागली होती. त्यानंतर काही भागांची पुनरबांधणी करण्यात आली. ख्रिश्चन लोकांप्रमाणे हिंदूलोक पण या चर्चमध्ये जातात.

**थिएटरस्** – १) एलू कॉपितान, २) सिने अलंकार

**बार अॅन्ड रेस्टॉरंट** –

१) बारवाची बार अॅन्ड रेस्टॉरंट – बस स्टॅन्ड जवळ

२) ब्ल्यू पाम बार अॅन्ड रेस्टॉरंट – कलंगुट रोड

३) कासा बेला – टॅक्सी स्टॅन्ड जवळ

४) मूनलाईट बार अॅन्ड रेस्टॉरंट – शालिनी बिल्डिंग

५) पिंक पँथर बार अॅन्ड रेस्टॉरंट – कॉस्कर कॉर्नर

**ट्रॅव्हल एजंट –**

१) डिलाइट टुर्स् अॅन्ड ट्रॅव्हल – टुरिस्ट होस्टेलजवळ

२) नाईक टुर्स् अॅन्ड ट्रॅव्हल – डेम्पोमॅन्शन

३) दीपा ट्रॅव्हल्स् – टॅक्सी स्टॅन्डसमोर

४) बॉम्बे ट्रॅव्हल्स् – शिरसाट लॉजसमोर

५) शुभलक्ष्मी ट्रॅव्हल्स् – टॅक्सी स्टॅन्डसमोर

**निवास स्थान –**

१) शालीनी हॉटेल – तालीवाडा

२) हॉटेल त्रिशूळ – म्हापसा क्लिनीकजवळ

३) हॉटेल पौर्णिमा – अन्साभट

४) सिझर पिंटो – गुरिम

५) हॉटेल बारडेझ – कॉस्कर कॉर्नर

**व्हेज जेवण –**

१) ताजमहल – हॉटेल व्हिलेनासमोर

२) अशोक – मार्केटसमोर

**नॉनव्हेज जेवण –**

१) दी स्टमक – सिने अलंकारजवळ

२) मंदारीन – गार्डन सेंटर

३) लॉबस्टर – म्युन्सिपालटीजवळ

४) रूचीरा – हनुमान टेंपलजवळ

५) संध्या – टुरिस्ट होस्टेलजवळ

# पोंडा (PONDA) फोंडा

फोंडा हे गोव्यातील तालुक्याचे ठिकाण असून या तालुक्यालाच मंदिरांचा प्रदेश म्हणतात. टुरिस्ट लोकांना शहरात (पणजी किंवा मडगांव) राहण्यापेक्षा येथे राहणे जास्त आवडते. त्यातून हे गोव्यातील मध्यवर्ती व धार्मिक ठिकाण. डोंगर–टेकड्या–निसर्ग यांची लयलूटच येथे आढळते. पर्यटन केन्द्रांनी 'फामागुडी' येथील टेकडीवर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ अनेक कॉटिजेस् बांधल्या आहेत. येथून पणजी २९ कि.मी. तर मडगांव १६ कि.मी. अंतरावर आहे. फोंडा शहराभोवती हल्ली उद्योगधंद्यांची वाढ होऊ लागली आहे. बुधवार व शनिवारी येथे मोठा बाजार भरतो.

**परिसरात काय बघाल? –**

१) कपीलेश्वर मंदिर, २) शांतादुर्गा मंदिर, ३) श्री. रामनाथ देवस्थान, ४) महालक्ष्मी मंदिर, ५) श्री. नागेशी मंदिर, ६) बांदीवड्याची मंदिरे, ७) वेलींग–नृसिंह मंदिर. ८) खंडेपार – वॉटर वर्क्स् , ९) सफा मशीद, १०) मर्दनगड किल्ला
(वरील मंदिरांची माहिती पुढे सविस्तर दिली आहे.)

**बँका –**

१) देना बँक, २) बँक ऑफ इंडिया, ३) स्टेट बँक.

**सफा शाहौरी मज्जीद –** विजापूरच्या इब्राहिम आदिलशहाने इ.स. १५६० मध्ये सफा शाहौरी मज्जीद बांधली. या मशीदीच्या शेजारी सुंदर जलाशय आहे. बाजूला बाग असून त्यात अनेक कारंजे होते. पण पोर्तुगीजांच्या काळात कारंजाचा नाश करण्यात आला. इद उल् फितर, रमझान ईदचे सण येथे साजरे केले जातात.

**फोंड्याचा किल्ला –** या किल्ल्याला 'कोट' असे संबोधतात. विजापूरच्या आदिलशहाच्या काळातच या किल्ल्याची उभारणी करण्यात आली. इ.स. १५४९ मध्ये हा किल्ला पोर्तुगीजांनी उध्वस्त केला. शिवाजी महाराजांनी फोंडा जिंकून पुन्हा किल्ला बांधला.

येथूनच इ.स. १६८३ मध्ये संभाजी राजांनी गोव्याच्या पोर्तुगीजांच्या विरूद्ध उठाव केला. संभाजी महाराजांनी किल्ला उध्वस्त केला नाही. उलट विजयासाठी यास साकडे घातले होते असे येथील फकीर सांगतात.

**रेस्टॉरंट –**

१) कासा मेनिनो – चायनीज व सी फूड

२) हॉटेल प्रेसीडेंट (बार) गोवनीज, चायनीज व सी फूड

३) हॉटेल मुसाफिर – शाकाहारी–मांसाहारी.

**हॉटेल –**

१) हॉटेल अतीश – फार्मागुडी

२) हॉटेल किंगसम्राट – फोंडा

३) हॉटेल प्रेसीडेंट – सुपरमार्केट

४) हॉटेल कीर्ती – निरंकार रोड

५) गीताश्रम लॉजींग – बसस्टॅण्ड

६) हॉटेल लहरा – फोंडा

७) टुरिस्ट कॉटेजेस् – फार्मागुडी

८) हॉटेल पर्ल – मेनरोड

९) हॉटेल पद्मवी – बसस्टॅन्ड जवळ

**सिनेमा – अनिषा–फोंडा.**

**डिचोली** (**DICHOLI**) – यालाच बिचोलीम असे म्हणतात. पणजीहून बोटीने बेतीमला यायचे व तेथून डिचोलीला जाता येते. येथून 'मयेलेक' हा निसर्गरम्य परिसर ५ कि.मी. अंतरावर आहे.

**परिसरात काय बघाल? –**

१) काजू कारखाना, २) मातीची भांडी तयार करणे, 3) हरवले धबधबा, ४) मयेलक, ५) साखळीचे दत्त व विठोबा मंदिर.

## फातर्पे (FATORPE) –

लहानसे सुंदर टुमदार गाव. लोकसंख्याही मोजकीच. 'केपे' पासून नैऋत्येला १६ कि.मी. अंतरावर 'फातर्पे' गाव आहे. व याचेच नाव तालुक्याला दिले आहे. कदम्ब राजांच्या काळातील शीलालेखात नागरी लिपीत फातर्पेचा उल्लेख सापडतो. हा भाग सखल असल्याने सर्वत्र भातशेती आढळते. येथील शांतादुर्गा मंदिर प्रसिद्ध आहे. देवीचे मूळस्थान 'कुंकोर्लीम' हे आहे. म्हणून या शांतादुर्गेला 'कुंकालीकरीण' असे म्हणतात. मंदिराचे गर्भगृह पंचधातूचे आहे. देवीच्या हातात त्रिशूळ आहे. हे फार मोठे जागृत दैवत मानले जाते. या गर्भगृहात खंडेरायाचीही चार फूट उंचीची मूर्ती आहे. कुंकालीकरण शांतादुर्गा ही सार्वत्रिक देवता आहे. हिंदूच नाहीतर ख्रिश्चनपण या देवीचे भक्त आहेत. येथे पौष शुक्ल पंचमी ते दशमी जत्रा व देवीचा उत्सव असतो. तसेच फाल्गुन वद्य प्रतिपदा ते पंचमी येथे शिमग्याचा उत्सव होतो.

## प्रियोळ (PRIOL) –

फोंडा तालुक्यात निसर्गसुंदर प्रियोळ गाव वसले आहे. पणजीच्या आग्नेयेला २५ कि.मी. अंतरावर प्रियोळ आहे. लहानगाव असूनही शिक्षणाच्या सोयी उपलब्ध आहेत. येथील लोकांचा मूळ व्यवसाय शेती हाच आहे. 'जस्मीन' फुलांसाठी हे ठिकाण प्रसिद्ध आहे. या भागात चोहीकडे जस्मीनच जस्मीनची फुले दिसतात. तसेच काजू, फणस व केळी यांचे उत्पादनपण येथे भरपूर होते. इ.स. १०९९ मध्ये कदम्बराजा त्रिभुवनमल्ल याच्या काळातील शीलालेखात प्रियोळचा उल्लेख आहे. हा शिलालेख संस्कृत–नागरी लिपीत आहे.

**परिसरात काय बघाल? –**

१) मंगेशी मंदिर, २) म्हाळसा नारायणी मंदिर

## केपे (QUEPEM) –

केपे हे गोव्यातील तालुक्याचे गांव आहे. कदम्बांची पूर्वीची राजधानी चंद्रमणी होती. तेच हल्लीचे केपे शहर होय. पणजीपासून ४८ कि.मी. अंतरावरील हे अत्यंत खेडेगांव असून येथे येण्यासाठी ८ कि.मी. अंतरावरील रेल्वे स्टेशन म्हणजे सावर्डे. येर्थील आठवड्याचा बाजार रविवारी असतो. वाळलेले मासे येथे स्वस्त मिळतात. येर्थील दत्तमंदिर व चंद्रेश्वर मंदिर प्रसिद्ध आहे.

## केरी (QUERIM) –

फोंडा पासून केरीचे अंतर ९ कि.मी. आहे. प्रियोळ पासून येथे बसने जाता येते. विजयदुर्ग मंदिर पहाण्यासारखे आहे.

## कवळे (QUEULA) –

या गावाचे पूर्वीचे नाव कपीलग्राम. फोंडापासून २ किलो मिटरवर हे गांव आहे. येर्थील शांतादुर्गाचे मंदिर प्रसिद्ध आहे. येर्थील संस्कृत पाठशाळा प्रसिद्ध आहे.

**परिसरात काय बघाल? –**

१) शांतादुर्गा मंदिर २) श्री. कपीलेश्वर मंदिर ३) मठ

## राया (RAIA) –

पणजी–मडगांव मार्गावर पणजी पासून ४१ कि.मी. अंतरावर राया गाव आहे. हे गाव सेलेसेटे तालुक्यात येते. जुआरी नदीचे काठी वसलेले टुमदार गांव भातशेतीसाठी प्रसिद्ध आहे. या गावात ठिकठिकाणी नारळाच्या बागा आहेत. येर्थील सौंदर्यतर मनाला मोहून टाकणारे आहे.

**परिसरात काय बघाल? –**

१) राचोलचा किल्ला २) राचोलची पाठशाला ३) सेमीनरी (चर्च)

**राचोलचा किल्ला** – जुआरी नदीच्या काठी हा किल्ला आहे. या किल्ल्याची उभारणी इ.स. १५ व्या शतकात झाली असावी. विजापूर व मराठे या दोघांचेही आलटून–पालटून येथे राज्य होते. आता किल्ल्यात सर्व पडझड झालेली आढळते. किल्ल्यातील अन्य इमारती उध्वस्त झाल्या पण चर्च आणि सेमिनरी स्मृती म्हणून शिल्लक आहेत.

**सेमिनरी** – हिची स्थापना मडगांव येथे इ.स. १५७४ मध्ये झाली. पण इ.स. १५७९ मध्ये विजापूरच्या राज्यकर्त्यांनी हल्ला करून ती नष्ट केली. नंतर ती 'राचोल' येथे हलविण्यात आली. इ.स. १५७६ मध्ये तिचे रूपांतर चर्चमध्ये करण्यात आले. धर्मशास्त्राचा अभ्यास या पाठशाळेत शिकवला जात असे. सेंट पॉल कॉलेज नंतर या विद्यामंदिराचेच महत्त्व होते. येथील वाचनालयात 'ग्रंथसंपदा' समृद्ध होती. विद्यार्थ्यांसाठी येथे अनेक खोल्या बांधल्या होत्या. येथील चर्च सेंट इग्नेशियशला अर्पण करण्यात आले आहे.

## रायवन (RIVON) –

कुशावती नदीच्या काठी असलेले हे गाव सांगे तालुक्यात असून पावसाळ्यात हिरव्यागच्च भात शेतीने ते वेढलेले असते. नारळी–पोफळीच्या बागा येथे आहेत. या गावाचे पूर्वीचे नाव 'ऋषीवन' होते. त्याचा अपभ्रंश होऊन आजचे नाव आकाराला आले. राम लंकेला जाताना येथे थांबले होते अशी आख्यायिका सांगितली जाते. पांडवांनी यज्ञ केल्याची जागा पण येथे दाखवली जाते. इ.स. ८ व्या शतकातील एक बुद्धमूर्ती येथे सापडली आहे.

**परिसरात काय बघाल? –**

१) दामोदर मंदिर, २) विमलेश्वर मंदिर, ३) शांतादुर्गा (कोलंब), ४) मारूती मंदिर.

## सांगेम (SANGUEM) –

सांगेम किंवा सांगे हे तालुक्याचे स्थान आहे. या गावाचे पूर्वीचे नाव 'संगमपूर' असे होते. पणजीपासून आग्नेयेला ६० कि.मी. अंतरावर नगरपालिका

असलेले हे गाव आहे. ते सावर्डे या रेल्वे स्टेशन पासून ७ कि.मी. अंतरावर असून बेळगांवला जाण्यासाठी उत्तम रस्ता आहे. रविवार व बुधवारी आठवड्याचा बाजार येथे भरतो. या तालुक्यात पोफळी–नारळ व काजू यांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते.

**परिसरात काय बघाल? –**

१) **संगमेश्वर टेंपल** – जुआरी नदीला कुशावती नदी येथे येऊन मिळते. त्यामुळे हे धार्मिक स्थान बनले आहे. संगमावरच मंदिरात शिवलींग आहे. महाशिवरात्रीला मोठी यात्रा भरते.

२) **अवरलेडी ऑफ मिरॅकल चर्च** – हे चर्च अवर लेडीजला अर्पण केलेले आहे. या चर्चची इ.स. १८५७ मध्ये पुन्हा दुरूस्ती करण्यात आली.

३) **जुम्मामशीद** – सुंदर–स्वच्छ स्थान. इस्लाम धर्माचे हे प्रार्थना मंदिर शतकापूर्वीचे आहे. मध्ये घुमट असून चारी बाजूस मिनार आहेत. शबे कद्र–शबेबरात हे दोन समारंभ येथे साजरे होतात.

४) **लांबडी सूर्ल** – येथे महादेवाचे प्राचीन मंदिर आहे.

## सोनौली (SONAULI) –

सांगे तालुक्यात तालुक्याच्या ठिकाणापासून ३१ कि.मी. अंतरावर सोनौली गाव आहे. येथे ७००० मि.मि. पेक्षा जास्त पाऊस पडतो. या ठिकाणी दूधसागर हा धबधबा आहे.

## दूधसागर (DUDH-SAGAR) –

कर्नाटक सीमेला लागून असलेल्या डोंगराळ प्रदेशातून काळ्या कातळातून, हिरव्या मखमखलीतून दुधासारखा शुभ्र पाण्याचा हा अवखळ धबधबा ६०३ मिटर उंचीवरून खालच्या खोल दरीत स्वतःला झोकून देतो. लोंढाहून–वास्कोकडे

निघाल्यावर वाटेतच दूधसागर स्टेशन लागते. येथून पुढे बोगदा आहे. नंतर उजव्या हाताला १० मिनिटांच्या अंतरावर धबधबा दिसतो. रेल्वेचे पुढचे डबे धबधब्याच्या समोर येतात. येथे थोडावेळ गाडी थांबून नंतर पुढे सरकते. पण बघणाऱ्यांच्या नजरा मात्र दुधाळ धबधब्यातच खिळलेल्या असतात. येथे एक लहान पूल आहे. तरूण मंडळी या अल्पवेळात ब्रीजवर उंच पाईपला धरून धबधब्याची खोली बघतात व धावत येऊन परत गाडी पकडतात.

या धबधब्याचा दिमाख राजेशाही आहे. उत्तुंग पर्वतावरून घरंगळत येणारा धबधबा शीतल तुषार उडवीत अनेक धारांनी कोसळतो. काळ्याकुट्ट खडकाच्या जणू केशकलापातून कोसळणारा शुभ्र धबधबा शंकराच्या मस्तकावरून पृथ्वीवर येणाऱ्या 'गंगावतरणाची' आठवण करून देतो.

पृथ्वीची तृष्णा शांत करण्यासाठी आकाशातील शुभ्र अमृत कुंभ 'अप्सरा' ढगावर अलगद पावले टाकीत येऊन या पर्वतराईवर तर ओतीत नाहीत ना ? या धबधब्याचे सौंदर्य–नजाकत अवर्णनीय आहे.

निसर्ग बाळगोपाळांचे जीवन–भरण होण्यासाठी भूमातेचा पान्हा दऱ्याखोऱ्यांच्या मुखात परमेश्वराने सोडलेला नाही ना ? काळ्याकातळाला फुटलेला दुधाचा पाझर झाडाझुडपांना दुग्धपान करीत बाळसेदार बनवीत आहे.

दूधसागर पहावा तो पावसाळ्यात. विशेषतः श्रावणात कोसळणाऱ्या जलतुषारात सोनेरी उन्हाचे किरण मिसळताच इंद्रधनुचे सप्तरंग कातळाच्या पार्श्वभूमीवर उधळले जातात. इंद्रधनुचे मंगलतोरणच दोन डोंगरांच्या मध्यभागी बांधावे असे वाटते. उंच कातळाच्या शिखरावर परमेश्वराचे ध्यान करीत मग्न असलेल्या ऋषीमुनींनी संध्या समयी अर्घ्य द्यावेत तसे पाणी वरून खाली कोसळते. दूधसागराचे नितळ सौंदर्य मुग्ध करते.

## शिरोडा (SHIROD) –

मडगांवहून एक रस्ता फोंडा शहराकडे जातो. वाटेत राय–बोरी ही गावे

लागतात. बोटी येथे जुआरी नदीवर एक पूल आहे. येथून जवळच शिरोडे नावाचे गाव आहे. कामाक्षी व शिवनाथ ही प्रसिद्ध दोन देवालये येथे आहेत. येथून फोंडा १० कि.मी. अंतरावर आहे. सत्तर टक्के लोकांचा व्यवसाय शेती असून 'ताडी' काढण्याचे काम पण काही लोक करतात. या ठिकाणी इ.स. पाचव्या शतकातील एक ताम्रपट सापडला आहे. मौर्य घराण्यातील राजा चंद्रवर्मनच्या अधिपत्याखाली हे ठिकाण होते. प्राचीन काळात या शहराला 'शिवपूर' असे संबोधीत. येथील कामाक्षी मंदिर बघण्यासारखे आहे.

## काणकोण (CANA CON) –

काणकोण हे तालुक्याचे ठिकाण आहे. या तालुक्यातून तळपणची नदी व गाळजीबागची नदी या दोन लहान नद्या वाहतात. काणकोण पासून जवळच काब–द–राम येथे एक किल्ला आहे. व पर्तळ या एका खेडेगांवी जुनामठ भग्नावस्थेत पहाण्यास मिळतो.

## पैंगण (PAINGIN) –

या गावाचे पूर्वीचे नाव 'पंचयग्राम' असे होते. हे गाव काणकोण ते सदाशीवगड या रस्त्यावर काणकोण पासून १० कि.मी. अंतरावर आहे. येथे नारळी, पोफळी, काजू, भातशेती, केळीच्या बागा व हंगामात फणस भरपूर पहावयास मिळतात. येथील परशुराम मंदिर बघण्यासारखे आहे. हे अतिप्राचीन मंदिर असून देवळात परशुरामाची मूर्ती आहे. परशुराम हा विष्णूचा सहावा अवतार मानला जातो. वसंतपूजा–परशुरामजयंती–दसरा हे सण या मंदिरात साजरे होतात.

**गोकर्ण जीवोत्तम मठ –**

काणकोण ते सदाशिवगड रोडवरच थोडया आतील बाजूस हा मठ लागतो. पोर्तुगाल राजवटीपूर्वी या भागाला 'पर्वत कानन' म्हणत असत. या मठात रामदेवाचे मंदिर आहे. मंदिराच्या प्रवेशद्वारी दोन द्वारपाल मूर्ती सुरेख आहेत. रामनवमीचा

उत्सव येथे साजरा केला जातो.

## मार्केम (मडकइ) (MARCAIM) –

जुआरी नदीच्या काठी फोंड्याच्या पूर्वेला हे गाव वसलेले आहे. मार्केम हे तालुक्याचे गाव आहे. येथील नवदुर्गामंदिर बघण्यासारखे आहे. इ.स. १६०३ मध्ये या मंदिराचा जीर्णोद्धार केला होता. महिषाशूरमर्दिनी प्रमाणे चेहरा असलेली गाभाऱ्यातली मूर्ती चार फूट उंचीची आहे. कार्तिक वद्य चतुर्थी ते दशमी येथे जत्रा भरते.

## सावर्डे (SANVARDOM) –

मुंबई–मिरज रेल्वे मार्गाने कॅसलरॉक स्टेशन सोडल्यावर आपण गोव्यात प्रवेश करतो. त्यानंतर दूधसागर, सोनवळी व सावर्डे–कुडचडे स्टेशन लागते. येथून २ कि.मी. अंतरावर 'काकोडे' गावी महादेवाचे मंदिर बघता येते. येथून जवळच 'पारोडा' येथे चंद्रेश्वर–भूतनाथाचे मंदिर बघण्यासारखे आहे. येथून 'केपे' येथे जाणे व केपेहून 'जांबवली' येथील मंदिर पहाण्यासारखे आहे. सावर्डे येथून रेल्वेने पुढे मडगांवला जाता येते.

## कुडचडे (KURCHAROM) –

सावर्डे स्टेशनवरून जुआरी नदीचा पूल ओलांडून गेले की कुडचुडे गाव लागते. छोटेसे व टुमदार असे हे गाव आहे. येथील पर्वतात 'मँगनीज' मिळते. येथील दत्तमंदिर प्रसिद्ध आहे.

## कंडोली (CANDOLIM) –

बार्डेज तालुक्यातील हे एक लहानसे गाव. गावात दोन हिंदू मंदिरे व एक चर्च आहे. 'आग्वाद' किल्ला व कंडोलीम बीच आणि येथील निर्झर हे तर पर्यटकांचे आकर्षण आहे. येथील लोकांचा मुख्य व्यवसाय भातशेती व मासेमारी होय.

## आग्वादचा किल्ला (FORT OF AGUAD) –

या किल्ल्यालाच 'सांता क्रतारीन' असे संबोधतात. बार्देझचा आग्नेय भाग आणि गोव्यातील उत्तरेकडील समुद्रभाग याने व्यापलेला आहे.

समुद्राच्या काठाशी 'आग्वाद' हा प्रचंड काळा कातळ आहे. येथेच इ.स. १६१२ मध्ये हा किल्ला उभारण्यात आला. प्रवेशद्वाराशीच स्वातंत्र्यसैनिकाचा पुतळा आहे. आग्वादची उंची समुद्रसपाटीपासून २६० फूट आहे. त्यावरच एक शुभ्ररंगाचे 'लाईट हाऊस' असून त्याची रूंदी ३६ फूट आणि उंची ४२ फूट आहे. येथे एक मोठे घड्याळ असून मोठी घंटा टांगलेली आहे. सेंट ऑगस्टस्टाईनची सत्ता एकेकाळी येथे होती. येथील लाईट हाऊसमधील प्रकाश २५ कि.मी. अंतरावरील जहाजांना सिग्नल म्हणून उपयोग होतो. पोर्तुगीजांनी गोव्यात रेईश मांगुश आणि गास्पार हे दोन किल्ले उभारले पण एवढ्याने त्यांचे स्वसंरक्षण होणे कठीण होते. म्हणून त्यांनी पणजीच्या विरूद्ध दिशेला समुद्रकाठी नवीन किल्ला बांधण्याचे ठरविले व सांताकारीनच्या दिवशी हा किल्ला बांधून पूर्ण झाला म्हणून त्यास सांताकारीन फोर्ट म्हणू लागले.

पणजीच्या सभोवार मांडवी नदीचे प्रचंड पात्र पसरले आहे, त्यासच जुआरी नदी मिळते. पुढे मांडवी समुद्रास मिळते. या भव्य जलसंगमात राजधानीचा राखणदार म्हणून आग्वाद किल्ला उभा आहे. गालव्हाव आणि लिआशीश हे दोन या किल्ल्याचे बुरूज समुद्रमार्गे येणाऱ्या शत्रूपासून रक्षण करतात. या दोन्ही बुरजावर शत्रूला नेस्तनाबूत करण्यासाठी तोफा ठेवण्यात आल्या होत्या. सध्यामात्र या तोफा तेथे नाहीत.

सांताकारीन नाव बदलून त्यास 'आग्वाद' नाव कसे रूढ झाले या विषयी रंजक कथा आहे. या किल्ल्यात राहणाऱ्याना गोड पाणी पिण्यासाठी मिळत नसे. त्यांनी एक खोल विहीर खोदली. आश्चर्य म्हणजे समुद्रातील या विहीरीला गोड पाणी लागले. जवळपासची जहाजे गोडेपाणी भरून घेण्यासाठी या किल्ल्याकडे येत असत. किल्लेदाराने एक मोठा हौद येथे उभारला या पाण्याला 'माय द आग्वा' पासूनच 'आग्वाद' हा शब्द किल्ल्याला रूढ झाला.

या किल्ल्याला प्रचंड तळघर आहे. पोर्तुगीज काळात गुन्हेगारांना या ठिकाणी आणून ठेवत. अनेक गोवा स्वातंत्र्यवीरांचे येथे अमानुष हाल करण्यात आले. येथे प्रवेशद्वाराजवळ एक पोर्तुगीज शिलालेख आहे. या प्रवेशद्वाराजवळच स्वातंत्र्यदेवी व स्वातंत्र्य वीराचा पुतळा उभारण्यात आला आहे. पोर्तुगीज सत्तेचे निर्दालन झालेल्या क्षणाची आठवण हे दोन पुतळे पाहिल्यानंतर येते. प्रवेशद्वारातून आत गेल्यानंतर कार्बोराज प्रासाद दिसतो. बुरूजावर उभे राहिले असता सुंदर समुद्र परिसर, वनराईने व्यापलेला हिरवागार किनारा, टुमदार पणजी शहर स्पष्ट बघता येते. किल्ल्याच्या मध्यभागी चौक आहे. याच्या बाजूला दोन गनपावडरसाठी खोल्या, दोन तुरूंग, चार बॅरॅक्स व अवरलेडी ऑफ गुड व्हाईजसाठी सुंदर चर्च आहे. सेनापतीसह इतर अधिकाऱ्यांची निवासस्थाने येथे अवशेषरूपाने पहावयास मिळतात. इ.स.१८०८ मध्ये ब्रिटिशांनी हा किल्ला जिंकला. एकूण या किल्ल्यावर ७९ तोफा होत्या. गोवा मुक्ती संग्रामाच्या वेळी अनेक स्वातंत्र्य सैनिकांना कैदी म्हणून याच किल्ल्यात ठेवण्यात आले होते. आता किल्ल्याचे स्वरूपच बदललेले आहे. त्याचे रूपांतर 'सेंट्रल सिव्हील जेल' मध्ये झालेले आहे. सभोवताली बाग बगीचे आहेत.

## पिलार (PILAR) –

पणजीपासून १० कि.मी. अंतरावर आहे. ख्रिश्चन मिशनऱ्यांना येथे धर्माचे व समाजसेवेचे शिक्षण दिले जाते. उंच टेकडीवर ख्रिश्चनांच्यासाठी चर्च आहे. चर्चच्या परिसरातून मुरगांव बंदराचे दृष्य सुंदर दिसते.

## कंडोला (CANDOL) –

फोंडाच्या उत्तरेला १८ कि.मी. अंतरावर कंडोला हे गाव आहे. या गावाच्या सभोवताली नाचणी व भातशेती दिसते.

**परिसरात काय पहाल? –**

**१) गणपती मंदिर –** कंडोला येथील गणपतीमंदिर पहाण्यासारखे आहे. मंदिराचा वरचा घुमट कदंबचालुक्य शैलीचा वाटतो. गाभाऱ्यामध्ये काळ्याकुळकुळीत दगडात

गणपतीची मूर्ती कोरलेली आहे. ही मूर्ती जयपूरहून आणली होती. गाभाऱ्यासमोर भव्य सभामंडप आहे.

२) **भगवतीमंदिर** – हे मंदिर ४५० वर्षापूर्वीचे आहे. पोर्तुगीजांच्या भीतीमुळे या मंदिरातील मूर्ती बिचोलीम तालुक्यात 'मायेम' येथे हलविण्यात आली. मायेम येथे फक्त भगवती खांब आहे.

## नार्वे (NAROA) –

बिचोलीम तालुक्यात बिचोलीमच्या दक्षिणेला ५ कि.मी. अंतरावर नार्वे नावाचे लहानसे टुमदार गांव आहे. वस्ती अगदी विरळच आजूबाजूला सर्वत्र भातशेती दिसते. नार्वेजवळ दिवडीभागात मांडवी नदीच्या काठी सप्तकोटेश्वर मंदिर आहे. या मंदिराचे धार्मिक तसेच ऐतिहासिक महत्त्व आहे.

**वालपाई** – हे सत्तरी तालुक्यातील प्रमुख शहर आहे. हा भाग नैसर्गिकदृष्ट्या डोंगराळच आहे. या ठिकाणी गोव्याचे प्रमुख शैक्षणिक केंद्र आहे. सत्तरी तालुक्यातच 'सोसोगड' हे गोव्यातील उंच पर्वत शिखर पहायला मिळते. 'हपाजुणे' हे धरण या तालुक्यातच आहे.

## (पेडणे) पेर्नेम (PERNEM) –

रत्नागिरी जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्याला लागून महाराष्ट्राच्या सीमेवर उत्तरेला 'पेडणे' गाव आहे. हा भाग तेरेखोलच्या जवळ येतो. म्हापशाहून सिओलीम किंवा कोलवाहून पेडण्याला जाता येते. पेडण्याच्या सभोवताली शेती असून नाचणी, भात, उडीद, ही पिके तेथे घेतली जातात. गुरूवारी येथे आठवड्याचा बाजार भरतो.

**भगवती मंदिर** – या ठिकाणी भगवती मंदिर पहाण्यासारखे आहे. हे मंदिर ५०० वर्षांपूर्वीचे जुने आहे. प्रवेशद्वाराजवळ शिल्पाकृतीतील दोन हत्ती आहेत. एक भव्य सभामंडप आहे. नंतर अंतरभाग–गर्भगृहात देवीची ५ फूट उंच उभी मूर्ती आहे. अष्टभूजा देवीच्या दर्शनाने मन प्रसन्न होते.

## साखळी (SAKHALI) –

डिचोळी तालुक्यात 'साखळी' हे गाव येते. डिचोळीहून येथे येताना रस्त्यात 'हरवळेचा' धबधबा व त्या ठिकाणचे शंकर मंदिर बघता येते. खुद्द साखळी गावात दत्त आणि पांडुरंगाची दोन देवालये आहेत. येथे काजूचा कारखाना आहे. साखळीचा आठवड्याचा बाजार सोमवारी भरतो.

**तेरेखोल** – पेडणे तालुक्यातच केरी नावाचे लहानसे गाव आहे. तेथून तेरेखोल नदी वाहते. या नदीच्या काठी तेरेखोलचा किल्ला आहे. येथूनच हरमलचा किनारा व पत्रादेवीचे हुतात्मा स्मारक बघायला जाता येते.

**तेरेखोलचा किल्ला** – सावंतवाडीहून याठिकाणी जाण्याचा एक रस्ता आहे. व दुसरा रस्ता पणजीहून केरी पेरीनेम मार्गे तेरेखोलला येतो. पणजीहून जाताना मात्र दोनदा फेरी बोट करणे आवश्यक आहे. तेरीखोल नदीच्याकाठी पण समुद्राभिमुख किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या किनारी कातळावर सतत पाण्याच्या लाटा उसळताना दिसतात.

इ.स. १७०० च्या सुमारास मराठी राज्यकर्त्यांनी या किल्ल्याची उभारणी केली. पुढच्या पाव शतकात तो पोर्तुगीजांच्या ताब्यात गेला तरी मराठ्यांनी स्वारी करून पुन्हा तो जिंकला, पण पोर्तुगीजांनी गोव्यातील सत्ता प्रबळ करून हा किल्ला शेवटी आपल्याच अधिपत्याखाली आणला. पोर्तुगीजांनी हा किल्ला घेताना खूप मोठे हत्याकांड केले.

भारत स्वतंत्र झालातरी गोवा पारतंत्र्यात होता. सत्याग्रह, प्रतिकार या मार्गाने स्वातंत्र्यसैनिक पोर्तुगीजांच्या हातून गोवामुक्त करीत असताना १९५४ मध्ये तेरेखोलच्या किल्ल्यावर तिरंगाध्वज फडकविण्यात आला.

ऐतिहासिक महत्त्वाप्रमाणेच या किल्ल्याचे नैसर्गिक सौंदर्य आणि भव्यताही पर्यटकांच्या मनात भरणारी आहे. किनाऱ्यापासून वरपर्यंत टेकडीवर हिरवीगार

झाडी आढळतात. वरती एक चर्च आहे. पर्यटक तेरेखोल फोर्ट रेस्ट हाऊसमध्ये राहू शकतात.

## सालगांव (SALIGAO) –

बार्देझ तालुक्यात पणजीपासून वायव्येला ११ कि.मी. अंतरावर 'साळगांव' हे गाव आहे. म्हापशापासून ते अधिक जवळ म्हणजे ईशान्येला अवघे ६ कि.मी. अंतरावर आहे. येथे भाज्या, मोठ्या प्रमाणात होतात. येथील 'माथे–डी–डायस' चर्चचा परिसर रमणीय आहे. हे चर्च १८६७ मध्ये बांधण्यात आले. या चर्चची गॉथिक शैलीनेच अतिशय सुंदर उभारणी केली आहे. या चर्चच्या भिंतीवर लेडी फातिमा व मा–डी–डायस यांच्या दोन सुंदर मूर्ती आहेत.

## शिरगांव (SHIRGAO) –

(डिचोली) बिचोलीमच्या वायव्येला ६ कि.मी. अंतरावर 'शिरगांव' हे टुमदार गाव आहे. असोनारो गावाशी ते रस्त्याने जोडलेले आहे. कच्च्या लोखंडाच्या खाणी या बाजूला आहेत.

**लैराई मंदिर** – प्रशस्त व सुंदर बांधकामामुळे हे मंदिर आकर्षक वाटते. या मंदिराला सभामंडप आहे. लाकडी महीरपीत संगमरवरी दगडात कोरलेल्या गणपतीच्या मूर्तीचे दर्शन येथे घडते. गर्भगृहात कलश असून तो लैराई देवीला अर्पण केला आहे. हे जागृत दैवत मानले जाते. वैशाख शुद्ध पंचमीला येथे मोठी जत्रा भरते.

## कलंगुट (CALANGUTE) –

बार्ट्डझ तालुक्यात 'कलंगुट' हे निसर्गसुंदर गाव वसलेले आहे. पणजी व म्हापशाहून येथे जाण्यास नियमीत बसेस् सुटतात्. जगप्रसिद्ध असे जे समुद्र किनारे आहेत त्यात कलंगुटच्या समुद्र किनाऱ्याला 'क्वीन ऑफ बीचेस' हा सन्मान दिला जातो. 'असिलो' हा अपंग व वृद्धांसाठी असलेला आश्रम या ठिकाणी आहे. येथे दर शनिवारी आठवड्याचा बाजार भरतो.

## कोलवा (COLVA) –

मडगांवपासून कोलवा केवळ ७ कि.मी. अंतरावर आहे. हे एक लहानसे गाव आहे. या गावाला देखणा समुद्रकिनारा लाभला आहे. मासेमारी हा येथील लोकांचा प्रमुख व्यवसाय. लोभस समुद्रकिनारा व चर्चमधील बाल–येशूची मूर्ती यासाठी कोलवा प्रसिद्ध आहे. येथे 'अवरलेडी ऑफ मर्सीज्'चे चर्च आहे. या चर्चच्या उभारर्णीस १५८१ मध्ये सुरूवात झाली होती.

## नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ ओशनोग्राफी (N I O) –

दोनापावलाच्या निसर्गरमणीय परिसरातच 'नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ ओशनोग्राफी' ही संस्था आहे. या संस्थेच्या इमारतीवरील पांढरा गोलाकार घुमट; ही वेगळीच संस्था असावी याची जाणीव करून देतो. येथे सागर–शास्त्राचा अभ्यास केला जातो. पृथ्वीवरील खनिजे हा संपणारा खजिना आहे. आता तो खजिना नव्या–नव्या जागांवर शोधण्याची स्पर्धा जगात सुरू झाली आहे. भारत हे विकसनशील राष्ट्र असल्याने अशा स्पर्धेत सहभागी होणे आपले कर्तव्यच आहे. रशिया, अमेरिका सारख्या समृद्ध राष्ट्रांनी 'अंटार्क्टिका' मोहीम सुरू केली.

नव्या प्रदेशातील आक्रमण तेथील मालकी हक्काचाच प्रकार ठरतो. पण सदोदीत बर्फ, ६ महिन्यांची रात्र वा दिवस, वादळी व अतिशय प्रतिकूल हवामान यामुळे ही मोहीम म्हणजे जीवाशीच खेळ होतो, पण भारताने डॉ. कासीम यांच्या नेतृत्वाखाली पहिली अंटार्क्टिका मोहीम आटोपली. या मोहिमेचे नेतृत्व व व्यवस्थापन गोव्यातील 'ओशनोग्राफी' या संस्थेने केले. या मोहिमेसाठी पहिले जहाज गोव्यातूनच निघाले. अंटार्क्टिकावर पोहचून तेथे तिरंगी ध्वज उभारण्यात आला.

अखिल भारतात ही एकमेव संस्था गोव्यात आहे. येथून अंटार्क्टिका १२ हजार कि.मी अंतरावर आहे. नॉर्वेच्या मदतीने मिळालेल्या जहाजामुळे या मोहिमेस यशस्वी होण्यास हातभार लागला. आता दरवर्षी नव्या–नव्या संशोधनासाठी

नॅशनल इन्स्टिट्यूटमधून मोहिमा आखल्या जातात व नव–नवीन संशोधन केले जाते.

पूर्व परवानगी घेऊन अभ्यासू पर्यटकांनी ही संस्था जरूर बघावी.

## गोव्यातील अभयारण्ये (WILD LIFE SANCTUARY) –

गोवा राज्यात तीन अभयारण्ये आहेत. त्यांची नावे–बोंडला, कोरीगोवा आणि मोलेम म्हणजे महावीर अभयारण्य अशी आहेत. या अभायारण्यातून जंगली प्राण्यांना अधिकाधिक संरक्षण देण्यात आलेले आहे. चित्ता, रानटी डुक्कर, रानमांजर तसेच रंगीबेरंगी पक्षी या अरण्यात आहेत.

**भगवान महावीर अभयारण्य** – मोले येथे असलेले हे अभयारण्य सांगे तालुक्यात आहे. या अभयारण्याचे क्षेत्रफळ २४० चौ. कि.मी. आहे. १९६७ साली या अभयारण्याची स्थापना झाली. या अभयारण्याचे कोअर झोन व बफर झोन असे दोन भाग केले जातात. या अभयारण्यातील एका भागाला "नॅशनल पार्क" असे म्हणतात. या जंगलात मोटरने फिरण्यासाठी काही रस्ते बांधण्यात आले आहेत. हे अभयारण्य कर्नाटक सीमेला लागून आहे.

सांगे तालुक्यात भरपूर पाऊस पडतो. हवा उष्ण त्यामुळे हा प्रदेश घनदाट अरण्यांचा आहे. या जंगलात विविध प्रकारचे वृक्ष, झुडुपे व उंच गवत आहे. येथे रंगीबेरंगी पक्षी झाडावर वसाहतीस येतात. या अरण्यात सफारीतून फेरी मारताना वन्य प्राणी दृष्टीस पडतात. पक्षी निरीक्षकांचे तर हे नंदनवनच आहे. (सोबत दुर्बिण असणे उत्तम.) या अभयारण्यात डोंगर, उंचसखल प्रदेश, खोरी पहावयास मिळतात. दूधसागर धबधबा, सुरला शिवमंदिर, डेव्हील्स कॅनन, सन–सेट पाईंट येथे या अभयारण्यातील भटकंतीत बघता येतात.

पर्यटन खात्याने पर्यटकांसाठी येथे विश्रांतीगृह उभारले आहे. त्याची माहिती – रेंज फॉरेस्ट ऑफिस, मोले–गोवा–४०३४१० यांचेकडे उपलब्ध होऊ शकते. गोव्यातील मोले गावच्या ईशान्येला १५ कि.मी. च्या आत हे स्थान आहे. कोलेम स्टेशनवरून केवळ ५ कि.मी. तर फोंड्याहून २९ कि.मी. आहे.



मयेलेक



शांतादुर्गा मंदिर

## बोंडला अभयारण्य (BONDLA SANCTUARY) –

हे स्थान सत्तरी तालुक्यात येते. इ.स. १९६९ मध्ये या अभयारण्यास सरकारने मान्यता दिली. अभयारण्यापेक्षा पशु–पक्षी बघण्यासाठी लहानमुलांची एक प्रचंड 'झू' सारखी ही जागा वाटते. फक्त प्राण्यांचा संचार मात्र मुक्त. एकूण ५५ कि.मी. परिसरात हे अभयारण्य पसरलेले आहे.

या अभयारण्याचे आणखी एक आकर्षण म्हणजे 'गुलाबबाग'. ही बाग पाहिली की काश्मीरमधील शाही बागांची आठवण होते. येथील झुऑलॉजी पार्क उत्कृष्ट आहे. गुरूवारी येथे प्रवेश बंद आहे.

**बोंडला येथे कसे जाल? –**

मडगांवपासून ३९ कि.मी. अंतर

फोंडापासून २५ कि.मी. अंतर

बोंडाला येथे पर्यटकांना राहण्यासाठी विश्रांतीगृह आहेत.

## खोतीगांव अभयारण्य (COTIGAO WILD LIFE SANCTUARY)

हे अभयारण्य काणकोण तालुक्यात आहे. नॅशनल हाय वे क्र. १७ वरून मध्येच ४ कि.मी. आत या अभयारण्यासाठी जावे लागते. महावीर अभयारण्यापेक्षा हे अभयारण्य लहान आहे. या अभयारण्याचा परिसर १०५ कि.मी. मध्ये पसरला आहे. मडगांवपासून ४ कि.मी. तर पणजीपासून ६० कि.मी. अंतरावर हे अभयारण्य आहे. येथील घनदाट अरण्यात जंगलीप्राणी बघायला मिळतात. (उदा.– चित्ता, सांबर, हॉर्नबील इ.) येथे राहण्याची व जेवणाची सोय योग्य नाही. या अभयारण्यात वैदिक अभ्यास करण्यासाठी 'जीवोत्तम परतागल' नावाचा मठ आहे.

**पक्षी अभयारण्य –**

पणजीहून लाँचने मांडवी नदीत 'चोराव' नावाच्या बेटावर जाता येते. ही

पाणथर अरण्याची जागा. येथे ओरीओल, आयोरा, क्रायफॅचर, पीनरेल्स सीगल्स, फिशींग इगल्स् पायमर या बरोबरच परदेशी पाहुणे पक्षीही बघायला मिळतात.

## गोव्यातील समुद्र किनारे (BEACHES IN GOA) –

भारताला वरदान लाभलेली निसर्गरमणीय भूमी म्हणजे गोवा. निसर्गानेच गोव्याच्या पश्चिम किनारपट्टीला निळ्याशार समुद्राची झालर लावलेली आहे. अरबी समुद्राच्या लाटा किनारपट्टीचे चुंबन घेऊन किनाऱ्याला एक मादक हुरहूर लावून जड अंतः करणाने त्याच्यापासून लांब जातात. खरेतर त्यांनाही या मर्दानी खडकाळ मजबूत किनाऱ्याला आपल्या लुसलुशीत हातांच्या मिठीत घट्ट धरून ठेवावेसे वाटते. पण छे ! नशीब लागते ना ? हवी–हवीशी वाटणारी गोष्ट न मिळणे यालाच नशीब म्हणतात. पण या विरहातही लांबवर दिसणाऱ्या आशेचा तारा लुकलुकत असतो. जवळ असूनही मृगजळाची अवस्था!

गोव्याला १२० कि.मी. समुद्रकिनारा लाभला आहे. त्यात मांडवी व जुआरी या दुथडी भरून वाहणाऱ्या नदींचे किनारे या भूमीत मुक्तहस्ताने उधळलेले आहेत. चैतन्यशील जीवन चहूबाजूला आहे. गोवा खरेतर चिरतरूण वाटतो तो येथील किनाऱ्यामुळे. गोव्याच्या रात्री खरेतर मद्याच्या मादकतेत चिंब भिजून जातात हे पाहून असे वाटते की, या समुद्राच्या पाण्यात मद्य तर नाही ना ? कारण येथील किनाऱ्याची मादक झिंग काही वेगळीच आहे. ही किनारपट्टी रोज सकाळी जाऊन पाहिली की, 'व्हर्जीन लँड' वाटते. रात्री पुन्हा विस्कळीत वाळू लाटांमुळे मूळस्थितीत येते. मऊशार, मखमली वाळूवर रात्री जलपऱ्या येऊन खेळत असाव्यात किंवा वाळूवर मनसोक्त लोळण घेत असाव्यात असा भास वाळूवरील काही अंगखुणा पाहून होतो. वाळूत पाऊल टाकले की रेशमी वाळू पायाला गुदगुल्या करते. शीतल पाण्याचे थेंब अंगावर रोमांच उभे करतात, तर समुद्रावरून येणारा अवखळ वारा खट्याळपणे सौंदर्यवतींना हैराण करतो.

## कलंगुट बीच (CALANGUTE BEACH) –

'क्विन ऑफ गोवा बिचेस्' हा किताब कलंगुट बीचला पर्यटकांनी दिला आहे. सर्वच जगप्रवाशांना आर्कषण वाटणाऱ्या या किनारपट्टीला तर 'मिस युनीव्हर्स' हा सौंदर्यशाली किताब किती सुंदर वाटेल! सौंदर्यशालीनींच्या सौंदर्यस्पर्धा होतात तशा किनारपट्ट्या उभ्या केल्यातर सडपातळ अंगाची,गौरवर्णी, उभारअंगाची ही किनारपट्टी सर्वाधिक आकर्षण वाटेल यात शंका नाही.

कलंगुट हे बार्डेज तालुक्यातील मांडवी किनारी वसलेले गाव. या किनाऱ्याला लागूनच एक रस्ता गळ्यात गळे घालून उभा आहे. रूपेरी वाळूत हिरवीगार झाडे आहेत. एकेकाळी युरोपियन हिप्पींनी किनारा गजबजलेला असे. त्यावेळी हशीश सारखे पदार्थ विकले जात. 'दम मारो दम' या थाटात त्यांची समाधी लागलेली असे. आता मात्र ही परिस्थिती बदललेली आहे. कुणीही नग्न अवस्थेत तेथे दिसत नाही. युरोपियन पर्यटक खूप असतात. हे युरोपियन खातात, पितात, मजा करतात तसेच समुद्रात पोहून झाल्यावर वाळूत पडून 'सनबाथ' घेतात.

या किनाऱ्याच्या बाजूला, रेस्टॉरंट, बार, हॉटेल्स भरपूर आहेत. रोज हजारो पर्यटक या किनाऱ्याला भेट देतात. मार्च ते मे पर्यंत हा किनारा गजबजलेला असतो. स्थानिक गोवेकर संध्याकाळी ५ नंतर येथे येतात. पावसाळ्यात मात्र किनारा निर्मनुष्य होतो. कारण कोसळणारा पाऊस, रौद्रपणे उसळणाऱ्या लाटा पाहिल्या की किनाऱ्यावर उभे राहणेपण कठीण होते. सीझनमध्ये येथील हॉटेलात जागा उपलब्ध होत नाही म्हणून आधीच रिझर्व्हेशन करावे लागते.

कलंगुट किनाऱ्यावर चांदण्या रात्रीची सहल अधिकच मोहक असते. समुद्राच्या पाण्यावर चांदणे पडले की चकाकणाऱ्या रूपेरी लाटांना उधाण येते. त्या तीव्रतेने किनाऱ्याकडे येतात. जणुकाही लाटांचा लपंडावच सुरू आहे, कारण ती आकार बदलून पुन्हा किनाऱ्याकडे येते. लाटेतून उडालेले जलबिंदू चहूबाजूला पसरतात, जणू ओंजळीतून कोणी मोती उधळावेत तसे. पण हे मोतीसुद्धा क्षणभरात

नाहीसे होतात. शिल्लक असते ती फक्त आठवणींची ओल. बेतीमकडून कलंगुटकडे निसर्गसौंदर्याची लयलूट करीतच येता येते. कधीकधी मात्र या किनाऱ्यावरची गर्दी पाहून वाटते, कधीतरी येथे शांतता असावी.

| कलंगुट किनाऱ्याजवळ राहण्याच्या सोयी – | अंदाजे दर |
|---|---|
| १) हॉटेल गोवन हेरीटेज गौरवाडो (ए.सी.) | १७५ ते ४००रु. |
| २) कोंच बीच रिझॉर्ट उम्तवाडो | २५० ते ३५०रु. |
| ३) ग्रीफ फील्ड कॉटेज मारोदो | १५० ते ३००रु. |
| ४) अल्फ्रान रिझॉर्ट सौंतवाडो | २०० ते ३००रु. |
| ५) कोवला हॉटेल बाग | १२५ ते २५०रु. |
| ६) कलंगुट बीच रिझॉर्ट | १०० रु. |
| ७) हॉटेल रिव्हर साईड बाग | १२५ ते १५० रु. |
| ८) जॉर्नीज हॉटेल कोब्रावाडो | ५० ते १०० रु. |
| ९) व्हिला गोएसा कोब्रावाडो (ए.सी.) | २५० ते ४०० रु. |
| १०) अलडीया बीच कॉटेज | ८० ते १०० रु. |

सौतवाडो

| | | |
|---|---|---|
| ११) | कासा नेल्लोर<br>कोब्रावाडो | ३० ते ५० रु. |
| १२) | डॉन बॉस्को हॉस्टेल<br>नाईक वाड्डो | ८० ते १००रु. |
| १३) | फ्रान्सिस होम<br>मडोवाड्डो | १००रु. |
| १४) | ग्रीन हाऊस<br>उमतावाडो | ३० ते ४०रु. |
| १५) | किस्मत महल टुरिस्ट होम<br>गौरवाडो | ५० ते ६०रु. |
| १६) | पामपॅलेस गेस्ट हाऊस<br>बाग | ५०रु. |
| १७) | शेत्ता हॉलिडे रिझॉर्ट<br>कोब्रावाडो | ६०रु. |
| १८) | टुरिस्ट रिझॉर्ट<br>कलंगुट बीच | |
| १९) | लुडोव्हिसी टुरिस्ट होम<br>कलंगुट | |
| २०) | वर्मा बीच रिझॉर्ट<br>कलंगुट बीच | |
| २१) | मिरांडा बीच रिझॉर्ट | |

सौतवाडो

२२) बार्बोसा कॉटिजेस्
कलंगुट बीच

२३) सोनी लोबो
कलंगुट बीच

२४) ओ सीज टुरिस्ट होम
उमतावाडो

२५) पालमार कॉटिजस्
कलंगुट बीच

२६) ओ कॉमेराव बीच
उमतावाडो–कलंगुट बीच

**बार ॲण्ड रेस्टॉरंट –**

१) हॉटेल गोवा हेरिटेज
गौरावाडा, कलंगुट (चायनिज् गोअनस फूड)

२) टुरिस्ट रिझॉर्ट रेस्टॉरंट ॲण्ड बार
कलंगुट (चायनिज् कॉंटिनेंटल तंदुरी)

३) स्टार्को–कलंगुट (गोअनस्–कॉंटिनेंटल)

४) पाम बीच बार ॲण्ड रेस्टॉरंट – (सी फूड, ड्रिंक)

५) विल्सन बार ॲण्ड रेस्टॉरंट
बीच (सी फूड, गोअनस्)

# कोलवा बीच (COLVA BEACH) –

मडगांवपासून हा किनारा ६ कि.मी. अंतरावर आहे. कलंगुट किनाऱ्याशी सौंदर्यात स्पर्धा करणारा हा समुद्र किनारा आहे. अरबी समुद्राच्या लाटांनी हा किनारा धुऊन निघतो. नजर फिरवाल तिकडे वाळू आणि पाणीच पाणी असलेला गोव्यातील हा किनारा लांबच–लांब पसरलेला आहे. या ठिकाणी सूर्योदय आणि सूर्यास्त बघण्यासाठी पर्यटक येतात. सायंकाळी समुद्रात बुडणारा लालबुंद सूर्य तर मखमली लाल गालिच्यावरून चालत क्षितिजापर्यंत जातो. पाण्याच्या लाटा म्हणजे पावले टाकल्याने चुरगळत गेलेला गालिचा वाटतो. किनाऱ्यावर नारळाची झाडे विरळ आहेत. मध्येच वाळूत खालून पोकळी असलेले सिमेंटचे दोन पूल आहेत. हे पूल ओलांडून किनाऱ्यावर येता येते. पुलाच्या खालून सांडपाणी वाहते. किनाऱ्यावर बोटी विसावत असतात. या मासेमारीच्या लहान–लहान बोटी आहेत.

कोलवा किनारा विस्तृत आहे. सनबाथसाठी युरोपियन पर्यटक येथे येतात. लाटांचे क्षणात तांडव तर क्षणात पदन्यास ही जलक्रीडा मन हरवून टाकते. समुद्रस्नानाच्या तयारीनेच या किनाऱ्यावर पदार्पण केले जाते. किनाऱ्याच्या बाजूला 'पेय' दुकाने आहेत.

**कोलवा बीच – रेस्टॉरंट ॲण्ड बार –**

१) दि डॉल्फीन (ए.सी.)
हॉटेल व्हाईट सँड

२) सँड पेबल्स
सिल्व्हर सँडस् बीच रिझॉर्ट (गोअनस्–सी फूड–चायनीज्)

३) सिल्व्हर स्टार डिलक्स
(गोअनस्, चायनीज्, कॉंटिनेंटल)

**मीरामार बीच –**

या बीचलाच 'गास्पर डायस बीच' असे संबोधतात. पणजीपासून हा किनारा जवळ आहे. कम्पाल पासून कोबोरालपर्यंत हा प्रशस्त मृदुवाळूचा किनारा पसरला आहे. नारळाच्या झावळ्यांमुळे समुद्रावरून येणारा शीतल वारा चारी बाजूला उधळला जातो. पणजीपासून २ कि.मी. अंतरावर असलेल्या या किनाऱ्यावर बसने १०/१५ मिनिटांत पोहोचता येते.

या किनाऱ्यावर विशेषतः सायंकाळी लोक फिरायला येतात. 'सूर्यास्त' बघणे ही या किनाऱ्याची खासियत आहे. सुरूच्या झाडांची छाया येथे असते. येथून काबोराजा राजवाडा आणि अग्वादचा किल्ला बघायला मिळतो. किनाऱ्यावर खाण्यापिण्यासाठी रेस्टॉरंटस् आहेत. मांडवीच्या मुखाकडे दृष्टी असलेला एक पुतळा येथील सर्कल मध्ये बघायला मिळतो.

मांडवी आणि जुआरी नदी समुद्राला मिळाल्यानंतर त्रिवेणी संगमाची भव्यता दृष्टीत मावत नाही. या समुद्र किनाऱ्यावर देखील पर्यटकांची गर्दी असते.

**मिरामार—हॉटेल ॲण्ड रेस्टॉरंट**

१) सोलमार हॉटेल – मिरामार (चायनीज रेस्टॉरंट)

२) लंडन हॉटेल – मिरामार

ट्रोपकाना बार—रेस्टॉरंट (चायनीज, तंदुरी, मोगलाई)

## दोना पावला (DONA PAUL) –

पणजीपासून दक्षिणेला ७ कि.मी. अंतरावर हा समुद्र किनारा आहे. पणजीहून येण्याजाण्यासाठी नेहमी बसेस् उपलब्ध असतात. जमिनीचाच काही भाग समुद्राखाली येतो, तेथे टोकालाच एक टेकडी आहे. पायऱ्या चढून गेल्यावर टेकडीवर एक चौथरा आहे. येथून तिन्ही बाजूने दूरवर पसरलेले समुद्रदृष्य पहाता येते. येथे वाळूचा किनारा नाही पण समुद्रातून जाणारा रस्ता आहे. रस्त्याला टी–शर्ट, बर्मुडा अशा कपड्यांची

लहान–लहान दुकाने आहेत. येथील उंच टेकडीवर जुआरीनदी, मार्मागोवा बंदर व समुद्राचा परिसर न्याहाळता येतो.

निवास – १) व्हिला सोलहिल रिझॉर्ट २) हॉटेल लिबडोरन

३) मीराबेल टुरिस्ट रिझॉर्ट ४) हॉटेल सी व्ह्यू

## व्हेगाटर (VAGATOR BEACH) –

चापोरा किल्ल्याची पार्श्वभूमी लाभलेला हा सुंदर किनारा आहे. या ठिकाणी उन्हाळ्यात अधिक पर्यटक येतात. या किनाऱ्याजवळ निवासस्थानांची उत्तम व्यवस्था आहे.

| | (अंदाजे दर) |
|---|---|
| १) हॉटेल डायमंड इंटरनॅशनल (ए.सी) | २०० ते ६०० रु. |
| २) व्हॅगेटर बीच रिझॉर्ट | ३०० ते ५०० रु. |
| ३) अनिता लॉज | ५० रु. |
| ४) दि ओयासिस् | १०० ते २०० रु. |
| ५) फ्लॉरेन्स डिसुझा | ६०० महिन्याचा दर |
| ६) टेर्टा परेरा | १० ते २५ रु. |
| ७) जॉन सिरील | ५० ते ६० रु. |

## माजोर्डा बीच (MAJORDA BEACH) –

अरेबीयन समुद्राज्या प्रशस्त जलाशयाला लागून हा किनारा पसरलेला आहे. या किनाऱ्याला लागून असलेले 'माजोर्डा बीच रिझार्ट' हॉटेल प्रसिद्ध आहे. दाबोलीम विमानतळापासून तो २० मिनीटांच्या अंतरावर आहे. या किनाऱ्यावर युरोपीयन पर्यटकांची मोठ्या प्रमाणात ये–जा असते.

रेस्टॉरंट – १) लगुना – सी फूड, इंडियन, चायनीज, गोवनस् फूड.

२) काफे देल मार

३) पुलसाईड बार बे क्यू (तंदुरी, सी फूड)

**बाणावली किनारा –** हा किनारा मासेमारीच्या दृष्टीने महत्वाचा किनारा मानला जातो. येथे किनाऱ्यावर मासे वाळत घातल्याने दुर्गंधी येते. परंतु या गोष्टीकडे दुर्लक्ष केल्यास किनारा मात्र सुंदर आहे.

**हरमलचा किनारा –** पेडणे तालुक्यात हरमलचा किनारा सुंदर आहे. किनारपट्टीजवळ नारळाची हिरवीगार झाडे आहेत. सर्वबाजूंनी किनाऱ्याला फेसाळत लपेटणाऱ्या लाटा चित्त वेधून घेतात. या किनाऱ्यावर निरव शांततेचा लाभ होतो.

**हणझुण किनारा –** टुमदार गावाला वळसा घालणारा हा किनारा नारळाच्या झाडांनी यापला आहे. हा किनारा शांत व स्वच्छ असल्याने युरोपीयन पर्यटकांना त्याचे आकर्षण आटते. 'सनबाथ' साठी ते या किनाऱ्यावर येतात. सागराच्या फेसाळणाऱ्या लाटा येथील स्नान श्रृंगाराला साद घालतात.

**बागा–किनारा –** कलंगुट किनाऱ्यापुढे बागाचा किनारा लागतो. कलंगुट किनाऱ्यावर फार गर्दी असल्याने पर्यटक मन शांतीसाठी या बागा–किनाऱ्याला भेट देतात. बागाच्या दृष्टीने पोहोचेल इतका लांबच–लांब पसरला आहे. युरोपियन पर्यटकांना या किनाऱ्याचेही आकर्षण वाटते.

**बागातोर बीच –** रस्त्यावर बस उभी राहिली की खोलवर उतरता रस्ता थेट समुद्रकिनाऱ्यावर जातो. खाली उतरले की उजव्या हाताच्या डोंगरावर लांबच–लांब एक काळसर भींत दिसते ती जुन्या किल्ल्याची सीमारेषा. खाली किनाऱ्यावर अनेक लोक समुद्रस्नान करीत असतात. येथेही खूप गर्दी असते. पुढे आलो की डाव्याबाजूला किनाऱ्यावर एक टेकडी आहे. ती टेकडी चढून वर आलो की भव्य समुद्राचा परिसर डोळे दिपवून टाकतो.

**बेतूल किनारा –** केपे तालुक्यात बेतूलच्या किनाऱ्याचा समावेश होतो. हा किनारा

अतिशय शांत–निवांत आहे. या किनाऱ्यावर फारशी गर्दी नसल्याने समुद्र स्नानास योग्य असा हा किनारा आहे. या किनाऱ्याला हिरव्या झाडांची किनार लाभल्याने किनाऱ्याचे सौंदर्य वाढले आहे.

**पालोले समुद्र किंनारा** – हा दक्षिण गोव्यातील शहरापासून लांब असलेला, एकांत व निवांत वातावरण असलेला, देखणा आणि नयनरम्य समुद्र किनारा. वस्तीपासून लांब असल्यामुळे येथे फारशी गर्दी आढळत नाही पण. अशा शांत किनाऱ्याचे युरोपियन पर्यटकांना मात्र आकर्षण वाटते. रेशमी वाळूच्या बिछान्यावर निळ्या आकाशाकडे बघत तासन् तास ते या भव्यसागराच्या पायथ्याशी पहुडलेले असतात.

**लिला बीच** – हा समुद्र किनारा 'लिला' हॉटेलच्या परिसरालाच लागून आहे. खरेतर लिला हॉटेल मधूनच किनाऱ्याकडे जाण्यासाठी रस्ता आहे आणि बाजूला कंपाऊंडच्या जवळ एक लहान रस्ता बाहेरून आहे. या बीचवर फारसे बाहेरचे लोक दिसत नाहीत फक्त हॉटेलमध्ये उतरलेले पर्यटकच असतात. या पर्यटकांसाठी 'लिला' हॉटेलने ठिक–ठिकाणी गवताच्या छत्र्या उभारल्या असून त्याखाली फोमच्या गाद्या असलेले फोल्डींग बेंच आहेत. समुद्रस्नान करून आलेल्या युरोपियन तरूणी किंवा तरूण या छत्र्यांखाली पहुडलेले असतात. यातील काही मधुनच ऊठून समुद्रात जाऊन डुबकी मारून येतात. सामान्य जीवनापेक्षा हे जीवन काहीसे आगळे–वेगळे असे आहे.

समुद्र काही फक्त भारताच्या सभोवतालीच नाही तर तो इतर देशांच्या किनारपट्टीला देखील तितक्याच उत्साहाने उसळतो. मग हे हजारो मेलावरून येणारे पर्यटक येथेच का येतात ? त्यात भारताच्या तर तिन्ही बाजूला समुद्र आहे. मग गोव्याच्याच समुद्रकिनाऱ्याचे या लोकांना व अशा अनेकांना आकर्षण का ? समुद्र किनारे तर सर्वत्र सारखेच. कोकणातील गुहागरचा आणि हरिहरेश्वरचा समुद्र किनारा कमी सुंदर आहे का ? पण नशीब म्हणतात ते हेच गोव्याच्या समुद्रकिनाऱ्याला काय फेणीची धुंदी आहे कोणास ठाऊक; पण हे सागर किनारे सर्वांना साद घालतात आणि त्यांना प्रतिसादही लाभतो.

## गोव्यातील मंदिरे (TEMPLES IN GOA)

## मंगेशी मंदिर (MANGESHI TEMPLE)

**कसे जाल–**

पणजीहून फोंडाकडे जाणारा जो रस्ता आहे त्या रस्त्यावर 'प्रियोळ' नावाचे गाव आहे. पणजीपासून मंगेशीचे अंतर(अग्नेय दिशेला) २१ कि.मी. आहे व फोंडापासून ९ कि.मी. आहे.

मंगेशी हे शिवमंदिर आहे. येथे 'शिवा'चेच नाव ''मंगेशी'' असे आहे. मंदिराच्या बांधकामाचा भाग प्रशस्त असून सभोवतालचा भाग ८८८६ चौ.कि.मी. आहे. या मंदिराची उभारणी १६ व्या शतकाच्या मध्याला झाली असावी. जुआरी नदीच्या काठी 'कोर्टलेम' यास पूर्वी 'कुशस्थला' असे संबोधित. येथे पूर्वी मंगेशाची मूर्ती होती. येथून १५६५ च्या सुमारास त्या मूर्तीची जागा बदलण्यात आली. पोर्तुगीजांनी गोवा हस्तगत केल्यावर साहजिकच हिंदू देवालयांवर संकट ओढवले. त्यावेळी मूर्तीला काही होऊ नये म्हणून भक्तजन मूर्ती एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेत असत. अशाच परिस्थितीत प्रियोळला मूर्ती आणून तिची स्थापना झाली.

दक्षिणेतील मंदिरांप्रमाणे मंगेशी मंदिर भव्य वा शिल्पाकृती नाही. बाह्य भाग सिमेंटने बांधला असून त्यास कलात्मक पांढरा–पिवळा रंग दिलेला आहे. आकाराने हे मंदिर लहान आहे. पायऱ्या चढून मंदिराच्या आवारात गेल्यावर मंदिरापुढे प्रथम काय दिसते तर सफेद रंगाची कोनाडे असलेली 'दीपमाळ'. बाजूला अग्रशाळा आहे. डाव्या हाताला व्यवस्थापनाचे कार्यालय दिसते. अग्रशाळेत निवासाची सोय होते. महाद्वारातून मंदिर परिसरात प्रवेश केला की सभोवताली लादी बसविलेली मोकळी जागा दिसते. बाहेरच्या बाजूला जे जलाशय दिसते, त्यात सणावाराला दिव्यांची आरास केली जाते. दिव्यांचे प्रतिबिंब पाण्यात पडते. त्यावेळी ते दृष्य अधिक मोहक दिसते.

मंदिराला भव्य सभामंडप आहे. या मंदिराच्या सभागृहात एक गर्भगृह आहे.

या गाभाऱ्यात शिवलिंग आहे. ते मध्यभागी असून त्यावर अभिषेक पात्र आहे. मंदिरात पूजा सुरू होते तेव्हा "मंगेशीला" सोन्या–चांदीचे दागिने घातले जातात. या गर्भगृहाच्या बाहेर समोरच्या बाजूला देवशर्मा–ग्रामपुरुषाची मूर्ती आहे. मंगेशीच्या डाव्या–उजव्या बाजूला गणपती आणि भगवतीच्या मूर्ती आहेत. नगारखान्याच्या तेथे मंगेशीकडे तोंड करून काळभैरवाची मूर्ती आहे. रुद्रावर्तन, रुद्राभिषेक, लघुरूद्र, महारूद्र–महानैवेद्य इ. धार्मिक कार्यक्रम मंगेशीच्या मंदिरात होतात.

कोणत्याही देव–देवतांच्या अस्तित्वामागे काही परंपरागत चालत आलेल्या दंतकथा असतात. कथेवर विश्वास किती ठेवायचा ? हा ज्याच्या त्याच्या श्रद्धेचा प्रश्न आहे. पण कथा मनोरंजक व परिस्थितीशी जुळणाऱ्या असतात. एकदा कैलासात शंकर–पार्वती द्युत खेळत होते. पार्वती डाव ठरली व तो अपमान समजून क्रूद्ध होऊन घर सोडून निघून गेली. ती थेट गोव्यातील जंगलात 'कुशस्थली' येथे आली. (जुआरी नदीच्या डाव्या किनाऱ्यावर हे स्थळ आहे.) तेवढ्याच तिकडून एक वाघ येताना तिला दिसला. ती घाबरली. तिने 'शिवाचा' धावा सुरू केला. तिच्या तोंडून जे शब्द आले ते असे–

"त्राहि माम् गिरिश"

शंकरांना तिची दया आली. शंकर तेथे अवतरले. पण तिला दर्शन दिले नाही. आपण तेथे येवून गेल्याचे पार्वतीला कळावे म्हणून तेथे एक शिवलिंग सोडून दिले. हेच ते सुप्रसिद्ध मंगेशलिंग होय. कुशस्थलीचाच "कुट्ठली" असा उच्चार गोव्याच्या लोकांनी केला. या "कुट्ठली"लाच "कोर्टलिम" असे संबोधतात.

शिवलिंग कितीतरी वर्षे या जंगलातच होते. एका कळपातील गाय तेथे येऊन तिने आपल्या स्तनातील दूधाचा अभिषेक शिवलिंगावर केला. गुराख्याने हे दृष्य पाहिल्यावर आपल्या मालकाला म्हणजेच शिवशर्मा व देवशर्मा यांना कथन केले. मालक लगेच जंगलात गेले व त्यांनी शिवलिंगचा शोध लावला. त्यानंतर शिवलिंगाचे पूजन केले. कालांतराने कोणी एका भक्ताने त्यावर लहान मंदिर उभारले. या

शिवलिंगाला 'मंगेश' असे का संबोधले गेले याचा काही इतिहास नाही, पण तो केवळ अपभ्रंश शब्द असावा. जेव्हा पार्वतीने जंगलात वाघ पाहिला. त्यावेळी भीतीने तिने "त्राहि माम् गिरिश" असे म्हणून शंकराचा धावा सुरू केला. "त्राहि माम् गिरिश" याचा अर्थ 'हे शंकरा मला वाचव!' गिरिश हे शंकराचेच नाव आहे.

गिरी=पर्वत आणि ईश=परमेश्वर.

हिमालयात कैलास पर्वतावर शंकराचे मूळ स्थान असल्याने त्यास 'गिरिश' असे संबोधतात. 'मम् गिरिश' चा उच्चार पुढे 'म्' चे अनुनासिक होऊन 'मंगिरीश' असा शब्द आकाराला. कालांतराने शब्दाचा उच्चार लहान व सुटसुटीत करण्यासाठी 'मंगिरीश'चाच उच्चार "मंगेश" असा झाला. या नावाच्या व्युत्पत्तीविषयी आणखी एक दंतकथा अशी की, पार्वतीचे 'मम् गिरिश' हे शब्द कोणीतरी ऐकले. तो अरण्यध्वनी "मंगेश" असा भासला व त्याने त नाव रूढ केले असावे. हा आपला शाब्दिक खेळ. खरेतर एखादा शब्द आकाराला येण्यात तेथील वर्षानुवर्ष चालत आलेल्या प्रथा–आचार–विचार आणि त्याचबरोबर भाषेच्या प्रभावाचा फार मोठा वाटा असतो. स्थानिक देवदेवतां या कुलदैवत असल्याने एखादे नाव रूढ झाले की हजारो वर्षे काळाला देखील ते पुसता येत नाही. मंगेशी हे शिवाचे अतिशय वेगळे असे नाव आहे यात शंका नाही.

१ पोर्तुगिजांनी सालेसाटे ताब्यात घेतल्यावर "मंगेशी"च्या शिवलिंगाला कुशस्थलाच्या जंगलातून 'प्रियोळ' येथे आणले. प्रियोळ हे फोंडा तालुक्यातील स्थान. एकेकाळी ते 'राजा सोंडा' याच्या ताब्यात होते. अनेक गोवेकर ज्यावेळी इतस्तत पसरले त्यावेळी पुण्याला मराठी दरबारात मंगेशाचे दोन भक्त पोहोचले. त्योचे नाव 'नारे राम मंत्री'. त्यांच्या नंतर 'रामचंद्र मल्हार सुखटणकर' यांनी मराठी राज्याचा दबाव राजा सोंडावर आणून 'मंगेशी'साठी स्वतंत्र इनाम द्यावे म्हणून प्रयत्न केला व ते त्यात यशस्वी झाले. खरेतर त्यांना 'मंगेशी' एक स्वतंत्र संस्थानच हवे होते. नंतर पोर्तुगीजांच्या काळात देखील त्या सरकारकडून मराठा दरबाराचे वजन वापरून मंगेशीचे उत्पन्न व इनाम कायम ठेवण्याचे सांगण्यात आले. अशा प्रकारे मंगेशीच्या विश्वस्तांना स्वतंत्र उत्पन्नाचे साधन निर्माण झाले.

या ठिकाणी सात प्रकारचे पुजारी असून त्या प्रत्येकाचे काम वेगवेगळे आहे. 'ज्योतकार' हे मंदिराच्या दिवे लागणींचे काम बघतात, तर किर्तनकार भजन, किर्तन, गायन करतात. 'भाविण' मंदिराच्या भक्तीने प्रेरीत होवून नृत्य सादर करतात. आज मंगेशाचे भक्त सगळीकडे पसरले आहेत. काहींचे ते कुलदैवत आहे, तर काहींनी 'मंगेशीकर','मंगेशकर' हे परमेश्वराचेच नाव धारण केले आहे. परमेश्वरावरील दृढ श्रद्धेनेच रोज हजारो भाविक येथे दर्शनाला येतात. कुलदेवताचे यथासांग पूजन करतात. वेगवेगळे नवस करतात. यशानंतर नवस फेडायला येतात.

पोर्तुगीजांच्या काळात त्यांनी हिंदूंच्या चालीरितींना प्रतिबंध केल्याने विवाहपण मंगेशी मंदिरातच होत. आजही ती प्रथा चालू आहे. इतरत्र लग्न झालेतरी, नवविवाहीत कुलस्वामीच्या दर्शनार्थ मंगेशीला येतात. यथासांग पूजा करून पुन एक प्रकारचे लग्न मंदिरात लागते आणि नंतर संसार सुरू होतो. आश्विन शुध्द प्रतिपदा ते नवमी या मंदिरात नवरात्रोत्सव साजरा होतो, तर काला उत्सव, तसेच माघ वद्य चतुर्दशीला शिवरात्री आणि मंगेशीची यात्रा माघ शुध्द सप्तमीला सुरू होऊन पौर्णिमेला संपते. वरील उत्सव या मंदिरात मोठ्या थाटात साजरे होतात. त्यात हजारो भक्तजन सामील होतात.

सुरूवातीला शिवाचे मूळ स्थान (हल्लीची जुआरी नदी) आद्यनाशिनी नदीच्याकाठी असलेले कुशस्थळीच होते. या ठिकाणी देवाच्या मालकीच्या जमिनी, बागायती व कुळागरे होती. कोमूनिनाद लोक देवालयाची सेवा करीत. त्यांनीच कुशस्थळी ग्रामसंस्था काढली. ही ग्रामसंस्थाच देवालयाचा दैनंदिन खर्च भागवत असे. गोव्यात नाथसंप्रदायाचा प्रभाव वाढल्यानेच 'मंजुनाथ', 'मंगनाथ' इ. नावे रूढ झाली असावीत.

परकीयांच्या आक्रमणाने नेहमीच भारतील संस्कृती संकटात आलेली आहे. आक्रमकांची वृत्ती विध्वंसक असल्याने संस्कृतीचा सांभाव ही फार मोठी जबाबदारी तत्कालीन लोक जीवनावर होती आणि मोठ्या हिकमतीने वेळोवेळी लोकांनी ती पार पाडलेली आहे.

पोर्तुगालमधील लिस्बनच्या राणीने गोव्यातील सत्तेला इतर धर्मियांना स्थान देऊ नका म्हणून फर्मान काढले. त्यावेळी स्वत बरोबर देवदेवतांना सुरक्षीत ठिकाणी हलवण्याचे लोकांनी ठरविले. मंगेशीवरील धोका लक्षांत घेऊन कुशस्थलातील कुळव्यांनी एकत्र जमून देवाचे स्थान हलविण्याचे ठरविले. (इ.स. १५६०) मंगेशीच शिवलिंग पोटाशी बांधून गडद अंधारात होडीने पैलतीर गाठला व मूर्ती मंगेशी वाड्यावर पोहोचविली. ही कामगिरी कुळावी महाजनांनी पार पाडली. अजूनही आठवण म्हणून येथील पुजारी देवमूर्ती उपरण्याने पोटाला बांधून तलावाच्या पाण्यातून पाच फेऱ्या मारतात. पालखी वाहून नेण्याचा मानपण कुळावी महाजनांचाच आहे. कुशस्थळी असताना मंगेशी देवस्थानाचीआर्थिक परिस्थिती उत्कृष्ट होती. जमीनी, इनामे, दागदागिने, रेशमीवस्त्रे, भांडी इत्यादिंनी देवालय समृध्द होते. या मंदिराच्या सेवक लोकांत अविवाहीत नृत्यांगना, ब्राम्हण, गुरव, महार, सुतार, लोहार, रंगारी, हिलामतदार, कुंभार, भंडारी यांचा समावेश होत असे. येथे कोणताही जातीभेद नव्हता. जुन्या कागदपत्रांत कुशस्थळी कोणकोणत्या देवदेवता होत्या यांची माहिती मिळते. पूर्वी येथे असलेल्या मंजुनाथ मूर्तीलाच हल्ली मंगेशी असे म्हणतात. सांतेरी देवीला हल्ली 'श्री सांतेरी' म्हणतात तर वीर देवतेला हल्ली 'वीरभद्र' म्हणतात. या देवदेवता आजही मंगेशी मींदरात आहेत.

कुशस्थलीच्या मंदिरातून मंगेशीचे वास्तव्य हलविल्यावर ती जागा पोर्तुगीजांनी काबीज करून तेथे चर्च उभारले. देवालयाची उत्पन्नाची व मालकीची साधने चर्चच्या ताब्यात दिली. कार्तिक शुध्द दशीला मंगेशीचे स्थलांतर झाले असावे म्हणून याच काळात पालखीसह उत्सव साजरा केला जातो. प्रियोळ येथील मंगेशीच्या स्थापनेचा विचार केला तर आजतागायत या मूर्तीच्या स्थापनेला जवळ-जवळ साडे चारशे वर्षे झालीत. मूर्तीच्या स्थापनेचा कालखंड कळला तरी मंदिराची उभारणी, त्याच्या रचनेतील बदल किंवा पूर्वकाळात जीर्णोध्दार झाला कि नाही या विषयी निश्चित खुलासा मात्र सापडत नाही.

हल्ली आपण जे 'मंगेशी' मंदिर बघतो ते इ.स. १८९० मध्ये उभारण्यात आले आहे पण या जीर्णोध्दारापूर्वी उभारलेले मंदिर वेगळे असावे. १८९२ मध्ये

स्वामी विवेकानंद येथे दर्शनासाठी येऊन गेले व त्यावेळी त्यांनी भजन केले. इ.स. १९६१ मध्ये गोवा पोर्तुगीजांच्या सत्तेखालून मोकळा झाल्यावर दहावर्षांनी म्हणजे १९७०–७१ मध्ये या मंदिराची दुरूस्ती झाली. गर्भगृह आता प्रशस्त करण्यात आले असून पिवळा–पांढरा रंग दिलेले मंदिर चित्ताकर्षक आहेत. मंदिराचा अतिशय लहान घुमट लांबूनही सुवर्ण कळसामुळे डोळ्यात भरतो. घुमटाच्या बाजूला कौलारू छप्पर आहे. प्रवेशद्वाराच्या पायऱ्या चढल्यावर पुढे एक लहान घुमट असून समोर सहा दरवाजे असलेली व वर कळस असलेली दीपमाळ आहे. सभोवतालचे गाव नारळी पोफळींच्या हिरव्यागार झाडांनी वेढलेले आहे. या मंदिराला प्रदक्षिणेला जागा आहे. भांडारगृह पण तेथे आहे. या मंदिराच्या घुमटावरील सुवर्णकलश कैवल्यपूर मठाधिश 'श्रीमद् सच्चीदानंद सरस्वती स्वामी' यांच्या शुभहस्ते बसविण्यात आला होता. १९७३ मध्ये माघ पौर्णिमेला जिर्णोद्धाराचा महोत्सव आनंदात साजरा झाला.

'मंगेशी' हे भक्तजनांच्या मते अतिशय जागृत दैवत आहे, म्हणूनच अनेक लोक तेथे लीन होतात, इच्छापूर्तीची अपेक्षा करतात, कौल लावतात. मंगेशीच्या गर्भगारापासून परिसरापर्यंत सारे वातावरण पवित्र व मंगल आहे. मंदिर बघताना प्रथम गर्भगारासमोर जाऊन मंगेशीच्या पिंडीचे दर्शन घ्यावे. बाहेर संगमरवरी चौथऱ्यावर नमस्कार करणारा 'श्री ग्रामपुरुष' आहे. वत्सगोत्राच्या महाजनांचा तो मूळ पुरुष असावा. त्याच्यामागे नंदिकेश्वर आहे. मंदिराच्या उजव्या बाजूस 'श्री गणपती' व डाव्या बाजूस 'श्री भगवतीची' पाषाण मूर्ती आहे. मंदिराच्या समोर नगारखाना असून बाजूला शुभ्र उंच दीपमाळ आहे. नगारखान्याच्या खालच्या भागात काळभैरवाचे दर्शन घेता येते. मागच्या बाजूलाच जलाशय आहे. या जलाशयाच्या सुरूवातीलाच असलेल्या लहानशा देवालयात 'श्री सांतेरीदेवी' (वारूळ), निरंकारलिंग व पुढे क्षेत्रपाल आहे. ही देवी महाजनांची कुलस्वामिनी आहे. माघ शुक्ल पंचमीला या देवीची जत्रा असते.

मंगेशी मंदिराच्या मागे असलेल्या मंदिराच्या गाभाऱ्यांत 'श्री भुलकेश्वर'ची काळी पाषाण मूर्ती आहे. या मूर्तीच्या उजव्या बाजूला वीरभद्र लिंगरूपात बघायला

मिळतो. त्याच्या जवळच 'सांतेरी' देवीची पण मूर्ती आहे. मंगेशी मंदिराच्या बाहेर थोड्या अंतरावर एक 'श्री नाईकस्वामी' मंदिर आहे. हे मंदिर मंगेशीच्या भक्तांचा मठ आहे. ते स्वामी अंत्रवल्ली गावाचे राहणारे आहेत. त्यांनी मंगेशीवर स्तुती काव्य रचले आहे.

**मंदिरातील नित्यक्रम –**

१) सकाळी ५ वा. चौघडा सुरू होतो. लगेच काकड आरती

२) निर्माल्य विर्सजन – प्रभातपूजा

३) सकाळी ८ वाजता – वैदिक देवकृत्य सुरू

४) सकाळी ११ वाजता – चौघडा वाजतो. त्यानंतर दुपारी १२ वाजता महापूजा महाआरती.

५) सायंकाळी ७ वाजता नौबत वाजत आरती मुळकेश्वर मंदिरात जावून येते. या काळात नृत्यांगना देवळाच्या बाजूला भक्तीगीतावर नृत्य करतात.

६) संध्याकाळी ८ ते ९ या वेळेत नैवैद्य सर्मपण व पुराणिकांचे पुराण.

७) रात्री ९ वाजता हरिकीर्तन रात्री १०–३० वाजता आरती.

**पर्यटक किंवा भक्तानी मंदिराच्या परिसरात कसे वागावे –**

१) असंख्य जनांचे हे श्रृध्दास्थान असल्याने आपल्या कृतीने किंवा शब्दाने कोणीहीं दुखावले जाईल असे वागू वा बोलू नये.

२) देवालयाच्या आत फोटो काढू नयेत.

३) पवित्र मनाने श्रृध्देने मंदिराच्या परिसरात प्रवेश करावा. धार्मिक कार्य करावयाचे असल्यास कोणते कार्य करावयाचे, खर्च किती, वेळ केव्हाची, पुरोहित कोण ? याचा पूर्ण तपास करूनच त्यात भाग घ्यावा. देवकार्यात येथे पुढील गोष्टी केल्या जातात. अभिषेक, गणपती पूजन, पुण्याहवाचन, व्रत, श्री. कुबेर लक्ष्मीपूजन, रथोत्सव, लघुरूद्र, महारूद्र इ.

४) कोणत्याही अपवित्र वस्तू आत नेवू नयेत.

५) पायातील पादत्राणे बाहेर काढून ठेवावीत.

६) स्त्रियांनी मासिक पाळीच्यावेळी मंदिरात प्रवेश करू नये.

७) अभक्ष भक्षण करून मंदिरात जाऊ नये.

८) देवालयात गोंधळ–आवाज करू नये. कोणत्याही धार्मिक कार्याची पावती घ्यावी.

खालील काळात भक्तांना प्रसाद–कौल लावता येत नाही.

(केवळ कौल लावण्यासाठी जे भक्त जातात त्यांचेसाठी)

| महिना | दिवस |
|---|---|
| चैत्र | शुक्ल प्रतिपदा व नवमी |
| वैशाख | अक्षयतृतीया |
| आषाढ | शुक्ल एकादशी व द्वादशी |
| श्रावण | प्रत्येक सोमवार, नागपंचमी, नारळी पौर्णिमा, कालाष्टमी |
| भाद्रपद | गणेश चर्तुर्थी, ऋषीपंचमी, अनंत चर्तुर्थी, |
| अश्विन | नवरात्र, दसरा, वद्य चतुर्दशी |
| कार्तिक | शुक्ल एकादशी ते पौर्णिमा |
| मार्गशीष | दत्तजयंती |
| पौष | संक्रांत, शेवटचा सोमवार |
| माघ | महाशिवरात्र, शुक्ल एकादशी–द्वादशी वार्षिक महोत्सव |
| फाल्गुन | वद्यप्रतिपदा ते वद्यपंचमी |

मंगेश देवस्थानात होणाऱ्या देवकृत्यांची थोडक्यात माहिती –

(यासाठी दक्षिणा व वस्तूंचा खर्च द्यावा लागतो)

**१) रूद्र आवर्तन** – एकवेळ रूद्रध्याय म्हणून आवर्तन करायचे. चांदिच्या शिंगाने लिंगावर अभिषेक करायचा.

**२) एकादशनी** – रूद्रावर्तनच पण एकाने ११ वेळा ते आवर्तन करायचे. असे ११ जणांनी करावयाचे.

**३) लघुरूद्र** – ११ वेळा एकादशनी करायची, ११ ब्राम्हणांनी.

**४) महारूद्र** – यात ११ लघुरूद्र करायचे ११ ब्राम्हणांनी.

**५) रंगपूजा** – गर्भगाराचा दरवाजा ते चौकट दरवाजा इथपर्यंत ही पूजा होते. रंगपूजा केळीच्या सोपटानी बांधतात. रंगीबेरंगी फुले वापरतात. रात्री १० नंतर ही पूजा होते. आरती, मंत्रपुष्प इ. कार्यक्रम यात असतात.

**६) घुड भरणे** – यात मंगेशी मंदिराचा गाभारा घड्याघड्याने पाणी ओतून भरावयाचा. व नंतर प्रार्थना करणे.

**७) सहरअबेल** – तीन पाने असलेल्या एक हजार बेल–पत्राने शिवलिंगाची पूजा करणे.

**शिबीकोत्सव** – शिवभक्त जनांनी सोमवारी रात्री मंगेशी मंदिरात मुक्काम करणे भाग्याचे ठरते. दर सोमवारी रात्री १० वाजता चांदीच्या पालखीतून 'मंगेशी'ची मिरवणूक काढतात. यावेळी मंदिराला जी प्रदक्षिणा होते त्यास सोमसुत्री म्हणतात. या प्रदक्षिणेत तीर्थकुंड न ओलांडता पालखी जेथे १६ ठिकाणे थांबते त्यास गोव्यात 'पेणे' असे म्हणतात.

या पालखी बरोबर विव्दत् ब्राम्हण वाजंत्री, नृत्यांगना, महाजन, मंगलदीप नेणाऱ्या रऔया, मशालजी, इ. लोक असतात. राजदंड पालखी समोर असतो. ''पार्वती पते हरहर महादेव'' असा जयजयकार करीत पालखी फिरत असते. पालखी थांबली की नृत्यांगना 'झुलवा' म्हणतात. वैदिक ब्राम्हण मंगेशसुक्त म्हणतात. हा नयनरम्य भक्तीरसाने ओथंबलेला शिबिकोत्सव पहाणे खरोखरच भाग्याचे ठरते.

श्री मंगेशी मंदिरातील वार्षिकोत्सव –

| महिना | तिथी | उत्सव |
|---|---|---|
| चैत्र | शु. १ | वसंतोत्सव |
| | शु. ७ ते ९ | नाट्योत्सव |
| | शु. ९ | रामजन्मोत्सव |
| | शु. १५ | श्रीची मिरवणूक |
| | वद्य ७ | पालखी |
| वैशाख | शुद्ध ३ | अक्षयतृतीया |
| | वद्य १२ | श्री. नाईकस्वामी पुण्यतिथी |
| जेष्ठ | वद्य ५ | शिबीकोत्सव |
| आषाढ | पौर्णिमा | श्री. मिरवणूक, तलावापर्यंत |
| श्रावण | वद्य ८ | श्रीकृष्णजन्म |
| भाद्रपद | शु. ६ | रंगपूजा |
| | शु. १४ | शिबीकोत्सव |
| अश्विन | शु. ८,९ | महारूद्र |
| | शु. १० | दसरा |
| | शु. १२ | जागर |
| | शु. १४ | कोजागिरी उत्सव |
| | वद्य १४ | कुबेरलक्ष्मी पुजन उत्सव |
| कार्तिक | शु. १ | दीपाराधना |
| | शु. २ | भाऊबीज उत्सव |
| | शु. ११ | पंचमूर्ति दर्शन–रथोत्सव |
| | शु. १३ | दहीकाला |


| | | |
|---|---|---|
| | शु. १४ | 'श्री'ची मिरवणूक, मठापर्यंत |
| | वद्य ७ | कौडिण्य पुरुष उत्सव |
| | वद्य १४ | शिबीकोत्सव |
| मार्गशीष | शु. ११ | श्रीमद् भगवतगीता जयंती |
| पौष | शु. १५ | पालखी उत्सव |
| माघ | अमावस्या | 'गड' घालणे |
| फाल्गुन | शु. ५ | सांतेरीदेवी जत्रा |
| | शु. ७ | रथोत्सव |
| | शु. ९,११ | शिबोकोत्सव |
| | शु. १४ | दिपकोत्सव |
| | शु. १५ | महापर्वणी उत्सव |
| | वद्य १४ | शिवरात्री उत्सव |

**मंदिरातील निवास स्थानासाठी पत्ता** – श्री. आनंद भावे, मंगेशी संस्थान, ता. फोंडा, गोवा.


## शांतादुर्गा – गोव्याची कुलस्वामिनी.

गोव्यातील फोंडा तालुक्यातील 'कवळे' गावी सुप्रसिद्ध आराध्य देवता 'शांतादुर्गेचे' मंदिर आहे. शांतादुर्गा हे नाव कसे पडले यासाठी एक दंतकथा सांगितली जाते.

विष्णू आणि शिवाचे एकदा भलतेच भांडण जुंपले. या भांडणाचे पर्यावसान युद्धात झाले. विष्णूने आपले सुदर्शन चक्र शिवशंकरावर सोडले तर शंकरानी पाशुपतास्त्राचा मारा केला. या भयंकर युद्धाने पृथ्वीपण थरथरली पृथ्वीवर प्रलय होणार या भितीने ब्रम्हदेव काळजीत पडले. तेंव्हा त्यांनी दुर्गादेवीला बोलावून शंकर




दमणचे प्रवेशद्वार



प्राचीन प्रवेशद्वार (दीव)

व विष्णू देवाना शांत करण्याची विनंती केली. त्यानुसार श्री दुर्गादेवीने दोघाना शांत केले.

दोन संतप्त देवताना दुर्गादेवीने शांत केल्याने तिला 'शांतदुर्गा' असे संबोधले जावू लागले. शांतादुर्गा ही देवता मूळ 'केळशी' या गावात होती. इ.स. १५१० मध्ये पोर्तुगीजांनी गोवा ताब्यात घेतल्यावर इतर देवतांप्रमाणे केळशीच्या दुर्गादेवीला पण धोका निर्माण झाला. तिच्या सुरक्षिततेसाठी देवाचे स्थलांतर केळशी करानी केले,

महाजन मंडळींनी ती मूर्ती सुरक्षितपणे इ.स. १५६४ मध्ये पूर्वाश्रमीचे 'कैवल्यपूर' म्हणजे आजचे कवळे या ठिकाणी आणली. आणि ती हरिजन वाड्यात स्थापली. आजही शांतादुर्गेची ओटी भरण्याचा मान त्याना आहे. यावरून देवदेवतांच्या पूजेबाबत जातीयता मानली जात नसे, हे सिद्ध होते.

माघ शुक्ल पंचमीला या ठिकाणी महापर्वणी उत्सव सुरू होतो. या मंदिराचे मूळ संस्थापक गौड सारस्वत ब्राम्हण व महाजन हे आहेत. यांच्यात कौशिक, गौतम, भारद्वाज, वत्स या गोत्रांचा समावेश होतो.

मंगेशी आणि शांतादुर्गा ही गोव्याची आद्यदैवते आहेत. ही दोन्ही संस्थाने एकमेकांचा आदर बाळगतात. शांता दुर्गेचा ४०० वा महोत्सव इ.स. १९६६ मध्ये झाला. इ.स. १८९८ मध्ये या मंदिरावर पठाण व दरोडेखोरांनी दरोडा टाकून दागदागिन्यांची लुटालट केली होती.

१) **श्री. शांतादुर्गा मंदिर** – छत्रपती शाहू महाराजांच्या पदरी असलेले मंत्री नरोरामशेणवी हे भाविक गृहस्थ होते. त्यांना या संस्थानचे प्रमुख बनवले. त्यावेळी त्यानी या मंदिराची पुनरबांधणी केली. प्रवेशद्वारापाशी सुंदर जलाशय आहे. मंदिराची उभारणी जमिनीपासून उंच ठिकाणावर केलेली आहे. प्रवेशद्वारातून प्रवेश केला की मंदिरासमोर प्रथम दिसते ती शुभ्ररंगाची दिपमाळ. बाजूला नगारखाना आहे. मंदिरात प्रवेश करण्यापूर्वी महाद्वारावरच श्री. शांतादुर्गा असे लिहीलेले आहे. मग पायऱ्या चढून प्रवेशाच्या भागातून आतल्या मुख्य सभागृहात आपण येतो. वरील

बाजूस कौलारू जुन्या पद्धतीची शाकारणी आहे. मागच्या बाजूला अंतरगाभारा येतो. या गर्भगृहाचा भाग दुमजली असून वर सोनेरी कळस आहे. या गर्भगृहात श्री. शांतादुर्गाची प्रसन्न मूर्ती स्थापित आहे. सभोवताली उंच समया असून देवीला उच्च दर्जाचे दागिने, कपडेलत्ते व फुलांनी सजवले जाते. देवीचा एक हात आशीर्वादासाठी वर आहे. देवीच्या पुठील दोन्ही हातात शिव आणि विष्णू आहेत. गाभाऱ्यात झुंबरे टांगलेली आहेत. शांतादुर्गा मंदिरातील नवरात्रौत्सव सुप्रसिद्ध आहे. माघशुद्ध प्रतिपदा ते षष्ठी पर्यंत या देवीच्या मंदिराजवळ जत्रा भरते. येथे रथोत्सव होतो. मराठी महिन्यातील प्रत्येक पंचमीला शांतादुर्गेची पालखी निघते.

शांतादुर्गा मंदिरात साजरे होणारे उत्सव –

| महिना | उत्सव |
|---|---|
| चैत्र | रामनवमी, वसंतपूजा |
| वैशाख | अक्षयतृतीया |
| जेष्ठ | श्री लक्ष्मीनारायण उत्सव |
| श्रावण | शिबीकोत्सव |
| भाद्रपद | अनंत व्रतोत्सव |
| अश्विन | नवरात्र उत्सव |
| कार्तिक | काला उत्सव |
| मार्गशीर्ष | पालखी उत्सव |
| माघ | जत्रा |
| फाल्गुन | शिमगोत्सव |

**२) श्री शांतादुर्गा (कुंकळ्ये करीण)** – मडगावपासून १८ कि.मी. अंतरावर हे स्थान आहे. शांतादुर्गेचे मुख्यस्थान कवळे येथे असले तरी तिची विविध रूपे गोव्यातील विविध भागात विखुरलेली आहेत. हे देवालय केपे तालुक्यात फातर्पे येथे आहे. ही देवतापण मुळची सेलेसेटे तालुक्यातील पण पोर्तुगीजांच्या भीतीने तिला पण इ.स.

१५ व्या शतकात फातर्पे येथे आणण्यात आले. पौष शुद्ध नवमीला येथे मोठी जत्रा भरते.

३) श्री शांतादुर्गा मंदिर (म्हापसा) – म्हापशापासून १४ कि.मी. अंतरावर पर्नेम मधील धरगल येथे हे मंदिर आहे. डिसेंबर मध्ये जत्रा भरते.

४) श्री शांतादुर्गा (शंख वाळेश्वरी) – महाजन लोकांची ही प्रमुख देवी साष्टी तालुक्यात 'शंखवाळ' गांवात होती. या देवीला पूर्वी श्री सांतेरी असेपण संबोधीत असत. इ.स. १६ व्या शतकात पोर्तुगीजांचा त्रास वाढल्यामुळे देवीची मूर्ती आदिलशहाच्या ताब्यात असलेल्या फोंडे तालुक्यातील वेलींग गावी आणण्यात आली. तथेच तिच्या पूजेला सुरूवात झाली. त्याचे रूपांतर नंतर मंदिरात झाले. तिलाच शांतादुर्गा शंखवाळेश्वरी असे म्हणू लागले.

फोंडा म्हार्दोळ मार्गावर वेलींग गाव आहे. चांदीच्या महिरपीत पंचधातूची देवीची मूर्ती मंदिरात आहे. देवीच्यापुढे पंचधातूच्याच श्री. लक्ष्मी आणि विजयदुर्गा यांच्या मूर्ती आहेत. देवळाच्या भिंती सुंदर टाईल्स लावून सुशोभीत केलेल्या आहेत. देवालयाकडे जाताना उजव्या बाजुला जलाशय आहे. या मंदिरात खालील उत्सव साजरे केले जातात.

| महिना | उत्सव |
|---|---|
| चैत्र | वर्षप्रतिपदा |
| वैशाख | अक्षयतृतीया |
| जेष्ठ | वद्यपंचमी, शिबीकोत्सव |
| माघ | रथोत्सव. |

या देवालयातप भक्तजन कौल लावण्यासाठी येतात. संकट काळात संभ्रमावस्थेत जेव्हा काय करावे व काय करू नये अशी अवस्था होते तेंव्हा मनशांती देवून निर्णय देणारी एकच पाठराखीण असते व ती म्हणजे 'देवीमाता'. लोकश्रृद्धेने पान लावून देवीने दिलेल्या निर्णयाची वाट पाहतात व दिलेला कौल श्रद्धेने मानतात.

बाजूस कौलारू जुन्या पद्धतीची शाकारणी आहे. मागच्या बाजूला अंतरगाभारा येतो. या गर्भगृहाचा भाग दुमजली असून वर सोनेरी कळस आहे. या गर्भगृहात श्री. शांतादुर्गाची प्रसन्न मूर्ती स्थापित आहे. सभोवताली उंच समया असून देवीला उच्च दर्जाचे दागिने, कपडेलत्ते व फुलांनी सजवले जाते. देवीचा एक हात आशीर्वादासाठी वर आहे. देवीच्या पुढील दोन्ही हातात शिव आणि विष्णू आहेत. गाभाऱ्यात झुंबरे टांगलेली आहेत. शांतादुर्गा मंदिरातील नवरात्रौत्सव सुप्रसिद्ध आहे. माघशुद्ध प्रतिपदा ते षष्ठी पर्यंत या देवीच्या मंदिराजवळ जत्रा भरते. येथे रथोत्सव होतो. मराठी महिन्यातील प्रत्येक पंचमीला शांतादुर्गेची पालखी निघते.

शांतादुर्गा मंदिरात साजरे होणारे उत्सव –

| महिना | उत्सव |
|---|---|
| चैत्र | रामनवमी, वसंतपूजा |
| वैशाख | अक्षयतृतीया |
| जेष्ठ | श्री लक्ष्मीनारायण उत्सव |
| श्रावण | शिबीकोत्सव |
| भाद्रपद | अनंत व्रतोत्सव |
| अश्विन | नवरात्र उत्सव |
| कार्तिक | काला उत्सव |
| मार्गशीर्ष | पालखी उत्सव |
| माघ | जत्रा |
| फाल्गुन | शिमगोत्सव |

२) **श्री शांतादुर्गा (कुंकळ्ये करीण)** – मडगावपासून १८ कि.मी. अंतरावर हे स्थान आहे. शांतादुर्गेचे मुख्यस्थान कवळे येथे असले तरी तिची विविध रूपे गोव्यातील विविध भागात विखुरलेली आहेत. हे देवालय केपे तालुक्यात फातर्पे येथे आहे. ही देवतापण मुळची सेलेसेटे तालुक्यातील पण पोर्तुगीजांच्या भीतीने तिला पण इ.स.

१५ व्या शतकात फातर्पे येथे आणण्यात आले. पौष शुद्ध नवमीला येथे मोठी जत्रा भरते.

**३) श्री शांतादुर्गा मंदिर (म्हापसा)** – म्हापशापासून १४ कि.मी. अंतरावर पर्नेम मधील धरगल येथे हे मंदिर आहे. डिसेंबर मध्ये जत्रा भरते.

**४) श्री शांतादुर्गा (शंख वाळेश्वरी)** – महाजन लोकांची ही प्रमुख देवी साष्टी तालुक्यात 'शंखवाळ' गांवात होती. या देवीला पूर्वी श्री सांतेरी असेपण संबोधीत असत. इ.स. १६ व्या शतकात पोर्तुगीजांचा त्रास वाढल्यामुळे देवीची मूर्ती आदिलशहाच्या ताब्यात असलेल्या फोंडे तालुक्यातील वेलींग गावी आणण्यात आली. तथेच तिच्या पूजेला सुरूवात झाली. त्याचे रूपांतर नंतर मंदिरात झाले. तिलाच शांतादुर्गा शंखवाळेश्वरी असे म्हणू लागले.

फोंडा म्हार्दोळ मार्गावर वेलींग गाव आहे. चांदीच्या महिरपीत पंचधातूची देवीची मूर्ती मंदिरात आहे. देवींच्यापुढे पंचधातूच्याच श्री. लक्ष्मी आणि विजयदुर्गा यांच्या मूर्ती आहेत. देवळाच्या भिंती सुंदर टाईल्स लावून सुशोभीत केलेल्या आहेत. देवालयाकडे जाताना उजव्या बाजुला जलाशय आहे. या मंदिरात खालील उत्सव साजरे केले जातात.

| महिना | उत्सव |
|---|---|
| चैत्र | वर्षप्रतिपदा |
| वैशाख | अक्षयतृतीया |
| जेष्ठ | वद्यपंचमी, शिबीकोत्सव |
| माघ | रथोत्सव. |

या देवालयातप भक्तजन कौल लावण्यासाठी येतात. संकट काळात संभ्रमावस्थेत जेव्हा काय करावे व काय करू नये अशी अवस्था होते तेंव्हा मनशांती देवून निर्णय देणारी एकच पाठराखीण असते व ती म्हणजे 'देवीमाता'. लोकश्रृद्धेने पान लावून देवीने दिलेल्या निर्णयाची वाट पाहतात व दिलेला कौल श्रद्धेने मानतात.

यास प्रसाद–कौल म्हणतात.

खालील दिवशी प्रसाद–कौल घेता येत नाही.

१) प्रत्येक महिन्यातील दोन प्रतिपदा, पंचमी, एकादशी, अमावस्या, पौर्णिमा

२) अक्षयतृतीया

३) संक्रांत

४) श्रावणी सोमवार

५) माघ शुक्ल चर्तुर्थी व षष्टी

६) फाल्गुन शुद्ध नवमी ते वद्य पंचमी

७) ग्रहणकाळ

**श्री शांतादुर्गा, चामुंडेश्वरी, कुडतरी महामाया –**

साष्टी मध्ये असलेल्या कुडतरी गावात शांतादुर्गादेवीचे मूळ स्थान होते. हळूहळू पोर्तुगीजानी सत्ता काबीज करायला सुरूवात चंद्रवाडीच्या 'शेणपण' गावात देवी आणली. तेथून ती केपे तालुक्यातील 'अवेडे' गावात आणली. व येथेच तिची यथासांग स्थापना करण्यात आली. या देवीलाच महामाया–शांतादुर्गा–चामुंडेश्वरी म्हणतात. लोकाना बाप्तीस्मा देण्यास जोरदार सुरूवात झाल्याने देवदेवतांचे स्थलांतर करावे लागले. दृढ श्रृद्धेने प्रत्येकाने आपापले धर्म व देवता जोपासल्या.

इ.स. १५६७ मध्ये पोर्तुगीजानी जवळजवळ २८० मंदिरे नष्ट केली. यावेळी काही मशीदीपण नष्ट करळयात आल्या. देवांच्या मूर्ती भ्रष्ट होवू नयेत म्हणूनन हिंदूनी त्या पाण्यात सोडल्या. या गावांत अनेक मंदिरे होती पण ती कालौधात नष्ट झाली. श्री. शांतादुर्गा व चामुंडेश्वरी या दोन देवता मंदिरात शेजारी–शेजारी आहेत. चामुंडेश्वरीलाच चामुंडा म्हणतात. ती सप्त मातृकातील एक आहे. सप्त मातृकांची उत्पत्ती वेगवेगळ्या देवांपासून झाली आहे.

१) ब्रह्मापासून – ब्रह्मी

२) महेश्वरापासून – महेश्वरी

| | |
|---|---|
| ३) कुमार स्कंदापासून – | कौमारी |
| ४) वराहापासून – | वराही |
| ५) इंद्रापासून – | ऐंद्री |
| ६) विष्णूपासून – | वैष्णवी |
| ७) यमापासून – | चामुंडा |

**मंदिरातील विविध उत्सव –**

| महिना | उत्सव |
|---|---|
| चैत्र | स्मारकोत्सव |
| वैशाख | वसंतोत्सव |
| श्रावण | शिर्बीकोत्सव |
| अश्विन | नवरात्र–दसरा |
| कार्तिक | तुलसी विवाह–दिप प्रज्वलन |
| पौष | जत्रा |
| फाल्गुन | होलीकोत्सव |

**म्हार्दोळची महासला (म्हाड्डोल – म्हाळसा) –**

म्हार्दोळ येथे महालसा देवीचे प्राचीन मंदिर आहे. मंगेशीपासून १ कि.मी अंतरावर हे देऊळ आहे. रमणीय परिसरात वसलेल्या या देवालयाचे छप्पर तांब्याच्या पत्र्याने तयार केलेले आहे. सभोवताली अग्रशाळा आहे. समोर उंच दीपस्तंभ आहे. दरवाज्यावर नगारखाना आहे.

स्कंदपुराणात पहिल्याच अध्यायात 'महालसा' देवीचा उल्लेख आढळतो. म्हणजे पुराण काळापासून महालसाचे अस्तित्व गोमांतकात आहे. महालसा म्हणजे साक्षात मोहिनी. समुद्रमंथनाच्या समयी विष्णूने माहिनीचे रूप घेतले होते. मोहिनी हाच महालसेचा अवतार होय.

सासाष्टी (साष्टी) तालुक्यात पूर्वी 'वरण्ये' गाव होते. त्यास आज वेरणे असेही म्हणतात. श्री. महालसा देवीचे हे आदिस्थान होय. परशुरामाने एकदा वरूणाला ऋषींसाठी उत्कृष्ट स्थान निर्माण करण्यास सांगितले. 'वरूणाने सुंदर केलेले 'वरणापूर' हेच हल्लीचे वेरणे' होय

फारपूर्वी एक महादैत्य वरूणापुरास त्रास देवू लागला. त्यावेळी भक्तानी रामाची आराधना केली. परशुराम अवतरले व त्यानी जनतेला अभय देवून सांगितले की मी एका शक्तीशाली देवीची प्रतिष्ठापना केली आहे. तिची आपण आराधना करावी. भक्त जनानी देवीचे यथासांग पूजन केले व जनहितासाठी महाशक्तीरूप धारण करून ती चंदासुराचा वध करण्यासाठी निघाली. दैत्याला गाठून तिने त्याचे शिरच कापले. तो दिवस माघ शुद्ध षष्ठीचा होता. या दिवशी देवीच्या मंदिरात भक्तजन मोठ्या भावीकपणे देवीचे पूजन करतात. हि कथाही मागे पडली व जुने मंदिरही कालांतरात नष्ट झाले. व कौशीक गोत्राच्या सारस्वत ब्राम्हणाने पुनः ते मंदिर उभारले. या देवीची अनेक रूपे आहेत. उदा. दुर्गा, महालक्ष्मी, अंबा, मोहिनी, वैष्णवी, भद्रकाली, शांता, शारदा, आदिशक्ती, महामाया इ.

पोर्तुगीजाना तोफखाना उभारण्यासाठी लाकूड हवे होते. ते त्यांनी महालसा मंदिराचे घ्यायचे ठरवले. व आपला मोर्चा 'वेरणे'कडे वळवला. लाकडे तर घेवून गेलेच पण मंदिर उध्वस्त केले. पूजाऱ्यांनी महालसा मूर्ती मात्र वाचवली. रामचंद्र बाबानी मंगेश, शांतादुर्गा प्रमाणे महालासा मंदिरालहा पण पेशव्यांच्या कडून इनाम मिळवून दिला.

अंतर गाभाऱ्यात काळ्या दगडात महालसेची मूळ मुर्ति आहे. एका हातात त्रिशुळ व दुसऱ्या हातात तलवार आहे. मागील दोन हातात सुधाकलश व दैत्याचे मुंडके आहे. या देवळात शांतादुर्गा, श्री काळभैरवी, श्री गणपती, श्री भगवती, इ. देवांच्या मूर्ती आहेत.

श्री महालसा मंदिराच्या पाठीमागे 'सांतेरी' देवीचे मंदिर आहे. यातील गर्भगारात उजवीकडे लक्ष्मी–नारायण व बाहेरच्या भिंतीवर गणपती आहे. या

मंदिरात पहाटेपासूनच पूजा–अर्चा चालू होते. प्रत्येक रविवारी श्री महालसेची पालखीतून मिरवणूक निघते. यातही 'पेणी' म्हणजे वाटेत १० ठिकाणी पालखी थांबते. येथे तुळशी–मंजीरी लावून कौल मागीतला जातो. मंगळवार, शुक्रवार, रविवार कौल मागीतला जात नाही. माघ शु. षष्ठी ते माघ वद्य दशमी पर्यंत येथे मोठा उत्सव व म्हार्दोळची जत्रा भ्मरते. इ.स. १९७२ मध्ये मंदिराच्या बाजूला अग्रशाळा उभारली असून तेथे राहण्याची उत्तम सोय आहे.

या मंदिराचे वैशिष्ठ्य म्हणजे या ठिकाणी दिपस्तंभाप्रमाणे उंच व मोठी समई आहे. या समईला 'ज्ञानदिप' म्हणतात.

**देवालयातील उत्सव –**

| महिना | उत्सव |
|---|---|
| चैत्र | श्री रामपूजा |
| वैशाख | पुन प्रतिष्ठादिन |
| आषाढ | पालखी, रंगपूजा |
| अश्विन | दसरा, हरीजागर, शहाळ्याच्या पाण्याचा अभिषेक |
| कार्तिक | महाएकादशी, दशावतारी काला |
| मार्गशीर्ष | गुड्यांचा रथोत्सव |
| पौष | भोगावळ |
| माघ | नौकारोहण, श्रीची अंबारी मिरवणूक |
| फाल्गुन | ज्ञानदिप, पालखी, रात्री आरत्या. |

**सप्तकोटेश्वर (शिवछत्रपतींचे दैवत) –**

इ.स. १६५८ मध्ये शिवाजीराजांनी कोकणावर स्वारी केली. त्यावेळी त्यांचा संबंध पोर्तुगीजांशी आला. इ.स.१६६१ साली त्यांनी कुडाळवर स्वारी केली. व मराठी सैन्य गोव्याच्या सीमेवर येवून पोहोचले. गोव्याच्या व्हॉईसरॉयने त्यावेळी

मैत्रीचा हात पुढे केला. इ.स.१६६६ मध्ये विजापूरचा अंमल असलेल्या फोंड्याच्या किल्ल्यास शिवाजींनी वेढा घातला. यावेळी गोवा मुक्त करण्याचाच विडा त्यानी उचलला होता. पण तो अनेक कारणानी पूर्णत्वास गेला नाही. या स्वारीच्यावेळी महाराजांचा मुक्काम 'डिचोली' येथे होता. येथून जवळच नारळे नावाचे गाव आहे. त्या ठिकाणी जीर्ण झालेले सप्तकोटेश्वराचे शिवमंदिर होते. महाराज शिवभक्त एका सोमवारी पूजेसाठी ते येथे आले. गुहेत शिवलींग, आजुबाजूला मातीच्या भिंती व झावळ्यांचे छप्पर अशी देवालयाची दुर्दशा त्यानी पाहिली. ते महाराजाना पहावले नाही. महाराजानी मोरोपंत पिंगळ्यांना आज्ञा केली व लगेच स्वत च कोनशीला उभारून मंदिराचा जिर्णोद्धार केला.

सप्तकोटेश्वर हे कदम्ब राजघराण्याचे कुलदैवत. इ.स. १४ व्या शतकात बहामनींने कदम्बांचा पराभव केला व गोवा आपल्या ताब्यात घेतला. यावेळी बमनी राजानी सप्तकोटेश्वराचे मंदिर उध्वस्त केले. पण इतिहास वळणे घेत पुनरावृत्ती घडवतो. यावेळी कर्नाटकात विजयनगरचे साम्राज्य इ.स. १५ व्या शतकात आले. विजयनगरच्या माधव मंत्र्याने सप्तकोष्टेश्वर व अन्य मंदिरांचा जिर्णोद्धार केला. यानंतर पोर्तुगीज आले. गोवा, दीवाडी, चोडण ही बेटे पोर्तुगीजांची होताच पुन सप्तकोटेश्वरावर संकट ओढावले. मंदिरावर पोर्तुगीजांची धाड येणार असे कळताच सूर्यराव सरदेसाई या कारभाऱ्याने इ.स. १५४६ मध्ये रातोरात हे लिंग उचलून डिचोली जवळील लाढंबासे गावी आणले. नंतर हिंदळे गावात नेहून डोंगराचा कडा कोरून तेथील गर्भागारात इ.स. १५५९ च्या सुमारास त्या शिवलिंगाची प्रतिष्ठापना केली. त्यानंतर म्हणजे १३ नोव्हेंबर १६६८ मध्ये एक शतकानंतर छत्रपतींच्या हस्ते या मंदिराचा जिर्णोद्धार झाला.

जंगलासारख्या प्रदेशात आजूबाजूला उंचवटा असलेल्या व मध्येच सपाट जागी सप्तकोटेश्वराचे मंदिर आहे. या मंदिराच्या डाव्या बाजूला शुभ्र रंगाची दीपमाळ आहे. यापुढे एका काळ्या शिळेवर कोरीव अक्षरात छत्रपती शिवाजींनी या मंदिराचा जिर्णोद्धार केला या बाबत माहिती आहे. त्यानंतर मंदिराचे प्रवेशद्वार, अंतरंग व सभागृह. आतील गाभाऱ्यात शिवलिंग आहे. या लिंगालाच 'सप्तकोटेश्वर' असे

म्हणतात. या नावाच्या व्युत्पत्ती मागे धार्मिक कथेची पार्श्वभूमी आहे.

नार्वे जवळच्या नदीला त्या काळात पंचगंगा असे नाव होते. त्या नदीच्या काठी वशिष्ट ऋषींनी तपश्चर्या केली. या तपश्चर्येच्या काळात त्यांच्या मुखातून 'सप्तकोटी' मंत्रांचा उच्चार झाला. त्यावेळी शंकर प्रसन्न झाले. म्हणून या शिवलिंगास 'सप्तकोटेश्वर' असे नामाभिधान प्राप्त झाले.

**श्री नागेश मंदिर –**

बांदिवडे गावी फोंडे तालुक्यात फर्मागुडी जवळ नागेशी हे स्थान आहे. श्री. नागेश हे गोव्यातील अतिप्राचीन मंदिर आहे. मूळ नाव 'बंदवाड' यापासून बांदिवडे हा शब्द प्रचलित झाला. स्कंदपुराणात सह्याद्री खंडात नागेशी देवाचा उल्लेख सापडतो. परशुरामाचा काळ विचारात घेतलातर या मंदिराची स्थापना साडेचार हजार वर्षापूर्वीची गृहीत धरावी लागते.

इ.स. १२–१३ व्या शतकात महाराष्ट्रात नाथपंथाचा प्रभाव वाढला होता. तत्कालीन काळात गोव्यातही मंगेशनाथ, गणनाथ, सिद्धनाथ, ब्रह्मनाथ या देवांची नावे प्रचलित होती. बंदवाड ग्राम आणि नागनाथ या संदर्भातही नागेशाचा संबंध येतो की काय ? हा विचार करणे आवश्यक आहे.

नागेशीच्या मंदिरातील शिवलिंग 'स्वयंभू' असून सभोवतालच्या जलाशयातून ते बाहेर आलेले आहे असा भक्तजनांचा समज आहे. नागेशीच्या संबंधीत शीलालेखात विजयनगरच्या राज्यातील राजा देवराय याने जमिनी व हे मंदिर संस्थानला दिल्याचा उल्लेख सापडतो.

या मंदिरास लाभलेला सभोवतालचा निसर्गप्रदेश अतिशय नयनरम्य आहे. सभोवताली हिरव्यागार डोंगरांची झालर. त्यातून झूळझूळ वाहणारे निर्झर, नारळी पोफळीची झाडे. परमेश्वरानेच केवळ आपल्या अस्तित्वासाठी येथे मुक्त हस्ताने निसर्ग सौंदर्याची बरसात केलेली असावी. या मंदिराच्या तलावाकाठची बांधणी कलात्मक आहे. महालक्ष्मी मंदिराकडून या मंदिरात येताना तलावाजवळ आले की गर्भागारातील

नागेशमूर्ती व दिव्यांचे प्रतिबींब पाण्यात दिसते. या देवालयाचे प्रवेशद्वार पश्चिमाभिमूख आहे. परिसरात आल्यावर प्रथम द्वारासमोर दिसतो तो नंदी कोरलेला असतो तसा.

मंदिरात प्रवेशकेला की संगमरवरी दगडानी सुशोभित चौक लागतो. आतील लाकडी खांबावरील नाजूक नक्षीकाम देखणे आहे. येथे रामायणातील दृश्ये व इतर मूर्तीकाम बघण्यासारखे आहे. गर्भगाराच्या बाहेरच लक्ष्मीनारायण व गणपतीचे दर्शन होते. गर्भगृहात शिरल्यावर देवाचे शयनगृह व प्रदक्षिणा मार्गआहे. आंतरभागात नागेशाचे शिव–लिंग आहे. शंकराच्या अंगाखांद्यावर नेहमी नाग असायचे नागांचा ईश = देव. म्हणून त्यास नागेश असे संबोधतात. पिंडीचे मुख उत्तर दिशेला आहे. रोज प्रभातकाळी चांदीच्या अभिषेक पात्रातून शिवापिंडीला अभिषेक होतो.

नागेशाचे गर्भगृह संगमरवरी शुभ्र सुंदर आहे. आत रूपेरी मखर असून त्यात नागेशाची पूर्णाकृती मूर्ती आहे. दुपारी १२ नंतर शिवलिंगाची महापूजा सुरू होते. महानैवेद्य, महाआरती इ. कार्यक्रम होतात. सायंकाळी ७ वाजता पंचोपचार पूजेनंतर मंदिराचे दरवाजे बंद होतात. या मंदिरात दर सोमवारी शिबीकोत्सव असतो. नागेशाची त्यावेळी पालखी निघते. ती वाटेत ११ ठिकाणी थांबते.

**देवालयातील उत्सव –**

| महिना | उत्सव |
|---|---|
| चैत्र | शिबीकोत्सव, महारथोत्सव, नौकारोहण |
| आषाढ | लक्ष्मी आगमन समारंभ शुद्ध १० |
| कार्तिक | जत्रा |
| माघ | शिवरात्री उत्सव |

मंदिराच्या बाजूला अग्रशाळा आहे. तेथे राहण्याची व जेवणाची सोय होते. मंगलकार्ये या देवस्थानात भरपूर होतात. या मंदिराच्या बाहेरच दीपमाळ आहे. कार्तिक पौर्णिमेला ही दिपमाळ प्रज्वलीत करतात. यावेळचे दृश्य मोहक असते.

**कपिलेश्वर मंदिर– कवळे, ता. फोंडा.**

कवळे या गावाचे पूर्वीचे नांव कपिलेश्वरी. कपिलेश्वरीचे शिवलिंग तेच 'श्री कपिलेश्वर' होय. समोर दगडी बांधकामाचे जलाशय, उत्कृष्ठ नैसर्गिक परिसर, नारळी पोफळीची हिरवीगार वनराई. कवळे येथे केळशीहून स्थानांतरीत झालेल्या शांतादुर्गाचे मंदिर आहे. पण त्याहीपेक्षा कपिलेश्वराचे मंदिर प्राचीन आहे. बांदीवडेच्या नागेशमंदिराच्या स्थापनेच्या समान काळातच या कपिलेश्वर मंदिराची उभारणी झाली असावी. रोज मूर्तीची महापूजा त्यानंतर आरती होते. शिवलिंगास चांदीचा बनवलेला शिव चेहरा बसवला जातो. कपिलेश्वर हे कवळे गावचे ग्रामदैवत आहे.

**देवालतायील उत्सव –**

| महिना | उत्सव |
|---|---|
| चैत्र | वसंतपूजा |
| वैशाख | नवरात्र–दसरा |
| कार्तिक | तुलसीविवाह, महारूद्राभिषेक |
| माघ | पालखी |

**श्री लक्ष्मीनृसिंह मंदिर – वेलिंग–फोंडा**

म्हार्दोळपासून पंधरा मिनीटांच्या अंतरावर श्री लक्ष्मीनृसिंह मंदिर आहेत. या मंदिराच्या सभोवततालचा परिसर रमणीय आहे. या मंदिरास प्राकार आहेत. प्राकार दक्षिणाभिमुख असलेतरी मंदिर मात्र पूर्वाभिमुख आहे. मुख्य अर्धगोलाकार द्वारातून आत प्रवेश करायचा नंतर आत चालत गेल्यावर प्रशस्त सभामंडप लागतो. आत गर्भगृह आहे. त्यावर वाढीव गोलाकार बांधणी व घुमट आहे. या मंदिरातील खांबावर सुंदर नक्षीकाम आहे. या मंदिराचा जिर्णोद्धार पूर्वीचे सौदर्य कायम ठेवून करण्यात आला आहे. येथे प्रसाद व कौल लावण्यासाठी अनेक भक्तजन येतात. कौल लावण्यासाठी पानांचा उपयोग येथे करतात. एकादशी, अमावस्या, कार्तिक पौर्णिमेला कौल लावला जात नाही.

## श्री काळभैरव देवस्थान

### धारगळ–तालुका–पेडणे

श्री काळभैरवाचे मूळ नाव भैरव असे होते आणि मूळचे मंदिर धारगळला नसून तिसवाडी तालुक्यात दिवाडी येथे होते. दिवाडी (पूर्वीचे नाव – दीपवती बेट) हे काळभैरवाचे मूळ स्थान. पण १५१० मध्ये पोर्तुगिजांनी गोवा जिंकल्यावर मंदिर उध्वस्त होण्याच्या भीतीने ती मूर्ती तेथून हलवून बारदेश तालुक्यातील 'कोलवाल' येथे आणली गेली याच सुमारास सप्तकोटेश्वर लिंग पण स्थलांतरीत करण्यात आले होते. 'कोलवाल' येथे मंदिराशेजारी जलाशय आहे. मंदिराला इनाम जमिनी पण लाभल्या होत्या. ख्रिस्तिकरणाची लाट 'बारदेश'मध्ये येऊन थडकताच पुन्हा मूर्तीचे स्थलांतर करणे प्राप्त झाले. हा १५६७ चा कालखंड असावा. कुळावी महाजनांनी भोसल्यांचा अंमल ज्या परिसरात होता त्या 'धारगळ' या ठिकाणी भैरवाची मूर्ती आणून पोहोचवली. 'धारगळ' हे ठिकाण पेडणे तालुक्यात येते. गौडसारस्वतांनी श्री भैरवाबरोबर श्री खळनाथ, श्री सांतेरी यांची पण स्थापना केली.

**श्री काळभैरव उत्पत्ती कथा** – काळभैरव हा देव तरी कोण हा प्रश्न नेहमी विचारला जातो. त्याच्या उत्पत्तीची कथा मोठी मजेदार आहे.

एकदा अगस्ती मुनींनीच कार्तिकेयाला काळभैरवाची निर्मिती कशी झाली ते सांगण्याचा आग्रह धरला. तेव्हा त्यांनी सांगितलेली कथा अशी – शिवशंकराच्या मायेने ब्रह्मदेव आणि विष्णू दोघेही भुलले. त्या दोघांनाही स्वकर्तृत्वाचा गर्व झाला. ब्रह्मदेव म्हणाले, 'जगनिर्माता म्हणून मी श्रेष्ठ, त विष्णू म्हणाले, 'जगनियंता म्हणून मी श्रेष्ठ.' भांडण विकोपाला जात आहे हे नारदांच्या लक्षात येताच त्यांनी दोघांनाही निवाड्यासाठी बद्रीकाश्रमात थोर ऋषी–मुनींचा सल्ला घेण्याचे सुचविले. अत्ति, दधिची, मार्कंडेय हे त्या दोघांचे द्वंद्व पाहून अवाक झाले. त्यांनी शिव मायेने दोघांनाही कसे भुलविले ते थोडक्यात सांगितले. पण त्या दोघांचे समाधान होत नाही हे पाहून ते पुढे म्हणाले कि प्रलयकालातही शिवशक्तीच श्रेष्ठ ठरली आहे तेव्हा तिलाच श्रेष्ठ मानावे असा वेदसिद्धान्त आहे. शेवटी वेद प्रामाण्य समजावून घेण्यास दोघे

वेदपुरीला गेले. चारी वेदांनी दिलेल्या उत्तराने समाधान न मिळाल्यामुळे ते वेदनिर्माता मूळ–ओंकार स्वरूपाकडे वळले. तेव्हा ओंकारच त्यांना शिवाप्रमाणे दिसला. शिवईच्छा म्हणजेच त्रिपदा त्यांना सांगते की आपण दोघे मायेपासून झालेले आहोत. सर्व काही 'शिवस्वरूपातच' सामावलेले आहे. तरीही त्या दोघांना वाटले की येथे कोणालाच 'निर्गुणतत्त्व' कळत नाही, पण अदृष्य शिवशक्तीला त्या दोघांचे हे विचार कळले. शंकरांना त्यांचा रागच आला. त्यांनी आपला उजवा हात झटकला त्यातून 'महाकाळ' निर्माण झाला. तोच 'काळभैरव' होय.

या काळभैरवाच्या मंदिरात काळभैरवाची सुमारे तीन फूट उंचीची काळ्या गुळगुळीत कातळात कोरलेली मूर्ती आहे. या मूर्तीच्या वरच्या हातात डमरू व त्रिशूल असून खालच्या हातात ब्रह्मकमळ व भिक्षापात्र आहे. गळ्यात रूद्रमाळा व कटी घंटा आहे. जवळच श्री महालक्ष्मी व खळनाथाची मूर्ती आहे. श्री सांतेरी देवींचे देऊळ उंच आहे.

**प्रसाद व कौल** – प्रसाद व कौल लावण्यासाठी भक्तजन येथे येतात. श्री भैरवाच्या मूळ मूर्तीलाच पटकुळींच्या पाकळ्या/फुले ३१ ठिकाणी लावून कौल मागितला जातो.

एकादशी, अमावस्या, श्रावणी सोमवार, नागपंचमी, भैरव जयंती, गणेश चतुर्थी, नारळी पौर्णिमा या दिवशी कौल लावला जात नाही.

**मंदिरातील महोत्सव –**

१) चैत्र – रामनवमी २) श्रावण – सोमवारी अभिषेक ३) आश्विन – दसऱ्याचा उत्सव १० दिवस असतो. ४) कार्तिक – कालभैरव जयंती

**– श्री परशुराम मंदिर – (पैंगिण)**

खरे तर परशुरामाचे मूळ मंदिर महाराष्ट्रात कोकणातील चिपळूणजवळ आहे. पण प्राचीन काळात कोकण, गोवा असे वेगळे भाग नव्हते. केरळपर्यंत ती सर्वच भूमी 'परशुराम भूमी' मानली जात असे.

परशुराम हा महापराक्रमी पुरूष. भृगु कुळात नर्मदेकाठी जमदग्नीच्या आश्रमात तो जन्माला आला. 'परशू' हे शस्त्र धारण करणारा म्हणून 'परशुराम.' त्याने तीन वेळा पृथ्वी प्रदक्षिणा करून २१ वेळा पृथ्वी निःक्षत्रिय केल्याचा उल्लेख आहे. या महापराक्रमी पुरूषाला विष्णू अवतारात व सप्त चिरंजीवात स्थान दिले गेले. यावरूनच त्याचे थोरपण लक्षात येते.

परशुरामाने अश्वमेघ यज्ञ करून सर्व भूमी कश्यपाला दान केली. स्वतःलादेखील भूमी उरली नाही, तेव्हा त्याने 'परशू' फेकून समुद्र हटवला आणि 'परशूराम भूमी' निर्माण केली. अशी कथा आहे.

या मंदिराजवळ भरणारी वेताळाची जत्रा मात्र पाहण्यासारखी असते.

**– श्री रामनाथ मंदिर –**

गोव्यात प्रवेश केल्यावर परशुरामाने विविध मंदिरे स्थापन केली. या ठिकाणांना अष्टग्राम म्हणतात. त्यांची नावे पुढीलप्रमाणे – मठग्राम, बाणावली, वेर्णे, रायचुरी, शंखावली, कुडतरी, नागवे आणि लोटली. सारस्वत ब्राह्मणांना येथे वसविले गेले.

'लोटली' हे सासाष्टी तालुक्यातील गाव. वत्स व कौंडिल्य गोत्र असलेल्या येथील सारस्वतांनी प्रथम रामनाथ मंदिराची स्थापना येथे केली. म्हणजे 'लोटली' हे रामनाथाचे मूळस्थान, शैवपंथी हे 'मंगेशाचे' भक्त तर वैष्णव पंथी हे 'रामनाथा'चे भक्त, असा भेद भक्तजनांनी पाडला. ही भेद पाडण्याची क्रिया भारतात चातुर्वर्णानंतर सुरू झाली असावी असे वाटते.

सीता हरणाची शिक्षा म्हणून रामाने रावणाचा वध केला, पण त्यानंतर ब्राह्मण हत्येचे पाप आपणास लागले याचा त्याला पश्चातापही झाला. त्याचे परिमार्जन करण्यासाठी त्याने दक्षिणेत 'रामेश्वर' येथे शिवलिंग स्थापून तपश्चर्या केली. हेच दक्षिणेतील दैवत परशुरामाच्या काळात त्याच नावाने गोव्यात आले.

परशुरामाने महायज्ञासाठी वसिष्ठ, भारद्वाज, वत्सादी ऋषींना पाचारण केले. त्यावेळी दक्षिणेतील हीच दैवते त्यांनी आपणासोबत आणली.

साडेचार हजार वर्षांपूर्वी रामनाथांची स्थापना 'लोटली' विभागात झाली असावी. कारण लोटलीजवळ असलेले 'रायतूर' हे पोर्तुगीजांचे ठाणे. कॅप्टन दियोगुने एकदा लोकांना किल्ल्यावर बोलावले. पण लोक तेथे न गेल्याने त्याने गावात शिरून अत्याचार केला. लोकांना स्वतःवरील हल्ल्यापेक्षा 'आदिदैवता'वरील हल्ला अधिक घातक वाटायचा. मंदिरे उद्ध्वस्त होण्यापूर्वी तेथील मूर्ती जीवापाड जपून एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेली जात असे. हे काम अर्थातच भक्तजन करीत असत. लोटलीच्या रामनाथ मंदिराची हीच स्थिती झाली. रामनाथाचे लिंग बैलगाडीने रासइला नदीकिनारी आणले. पुढे नावेने जुआरी नदी पार करून लोक शिवलिंगासह 'दुर्भाट' ला आले. तेथून त्यांनी सुरक्षिततेसाठी 'बांदिवडे' येथे प्रस्थान केले. इ.स. १५६० च्या सुमारास हेच स्थलांतर झाले असावे असा अंदाज आहे. 'लोटली' येथे मात्र आता मूळ रामनाथ मंदिराचे अवशेष सापडत नाहीत.

इ.स. १९०५ मध्ये बांदिवडे येथे रामनाथाचे नवीन मंदिर उभारण्यात आले. फाल्गुन शुद्ध १०, शके १८२६ या शुभमुहुर्तावर श्री रामनाथ, श्री लक्ष्मीनारायण, श्री शांतादुर्गा, श्री कामाक्षी यांची यथा विधिवत प्रतिस्थापना झाली. हेच सांप्रतकालीन 'रामनाथा'चे सुप्रसिद्ध मंदिर आहे. रामनाथाच्या उजव्या बाजूस श्री कामाक्षी देवी तर डाव्या बाजूस श्री लक्ष्मीनारायण मंदिर आहे. त्याच्याजवळ शांतादुर्गा व रामनाथ यांच्या मूर्ती आहेत. या मंदिरास मधील भागात विनास्तंभ प्रशस्त सभागृह आहे. मंदिराला स्वतंत्र नगारखाना आहे. मंदिराच्या उजव्या बाजूला अग्रशाळा आहे. येथे राहणे, खाणे इ. सर्व सोयी आहेत. येथे दर सोमवारी रात्री ८.३० च्या सुमारास रामनाथाची पालखी फिरते. शांतादुर्गा, कामाक्षीदेवी यांच्या पालख्या सुद्धा ठराविक काळात प्रदक्षिणेस जातात. रामनाथाला 'करमल' पानाचा कौल लावण्याची पद्धत आहे. परंतु सकाळी ११.०० नंतर मात्र कौल लावता येत नाही. रामनाथाचा नौकाविहार व महाशिवरात्री उत्सव हा अतिशय देखणा कार्यक्रम असतो.

### श्री दत्तमंदिर (साखळी)

पणजीपासून ४० कि.मी. तर डिचोलीपासून ४ कि.मी. अंतरावर गौड सारस्वत ब्राह्मणांनी या मंदिराची स्थापना केली. डिचोलीपासून साखळीपर्यंतचा भाग निसर्ग रमणीय आहे. मंदिराचा परिसर शांत व दत्त पंथीयांच्या भक्तीस योग्य अशा धीर—गंभीर वातावरणाने भरलेला आहे. सुरुवातीस एक दगडी भिंत असून तेथे महाद्वार आहे. समोर संगमरवरी मंडप आहे. पुढे पायऱ्या, नंतर गर्भगृह आहे. आत चौकात शिरल्यावर झुंबर आणि काचेच्या हंड्या यांच्या रंगसंगतीचे मनोहर दृश्य बघायला मिळते. आत दिव्यांची माळ असून आसनावर श्री दत्ताची मूर्ती आहे. या मूर्तीस तीन मुखे व सहा हात असून तिचे दर्शन होताच मनातील भक्तीभाव द्विगुणीत होतो. या मुख्य मूर्ती जवळच पूजादि विधींसाठी एकमुखी पंचधातूची उत्सवमूर्ती आहे. या मूर्तीची स्थापना चांदीच्या मखरात केलेली आहे. या मंदिराच्या मागे औदुंबराचे झाड आहे. दैनंदिन पूजनात कमालीची स्वच्छता व रेखीवता दिसते. घंटांचा आवाज, गोंगाट, गोंधळ येथे कधीही आढळत नाही. आत गर्भागारात कोणालाही प्रवेश नाही, पण स्नानादि कर्मानंतर सोवळे नेसून आत दर्शन घेता येते. गर्भागारात मुंज झालेल्यांना प्रवेश आहे.

### दत्तावतार

नारदमुनींनी नारायणाची मन:पूर्वक आराधना केली. तपश्चर्या फळाला आली. विष्णू प्रसन्न होऊन नारदाला वर माग असे म्हणाले. नारद हा निर्लोभी दर्शन भक्त. त्याने सांगितले, 'हे परमेश्वरा मला सत्यरूप घडव' जगंनियंत्याला या जगाचा पसारा आवरताना निर्गुण निराकार कसे राहता येणार ? सत्व—रज—तम गुणांसहीत रूप दाखवणे हे त्या क्षणाला तरी परमेश्वराला कठीण होते. ब्रम्हा—महेशासह एकत्र येऊन नंतरच सत्यरूप दर्शविता येईल असे त्यांनी नारदाला सांगितले. व तसे वचनही दिले.

नारदमुनी त्रिलोकी हिंडत असत. एकदा पृथ्वीवर हिंडत असता ते अत्री ऋषींच्या आश्रमात आले. तेथे त्यांना ऋषींची पत्नी 'अनुसया' ह्या महापतिव्रतेचे

दर्शन घडताच ते नतमस्तक झाले. तेथून ते निघाले व लक्ष्मीकडे आले. तिला त्यांनी अनुसयेचे महात्म्य कथन केले. नारद निघून गेल्यावर जेव्हा त्या तिघी एकत्र आल्या तेव्हा अनुसयेचा विषय निघाला. त्या तिघींचा स्वाभिमान दुखावला गेला. अनुसयेमुळे त्या तिघींना आलेला कमीपणा असह्य झाला. त्या तिघींनी शेवटी आपले गाऱ्हाणे आपापल्या पतींपुढे मांडले. आपापल्या पत्नींची समजूत ह्या त्रिश्रेष्ठींना काही काढता आली नाही. शेवटी पत्नींपुढे हार मानून अनुसयेचे सत्व हरण करण्यासाठी त्यांना पृथ्वीवर यावे लागले.

त्या तिघांनी ब्राम्हणांचे रूप धारण केले व ते अत्री ऋषींच्या आश्रमात आले. या ब्राम्हण अतिथींचे अनुसयेने यथोचित स्वागत केले. तिच्या स्वागताने ते अतिशय तृप्त झाले . तरीही तेथूननिघण्यापूर्वी त्यांनी विनंतीपूर्वक आपली इच्छा व्यक्त केली. ते तिला म्हणाले, 'हे सुंदर स्त्रिये, तू आम्हांस जेवण द्यावेस आणि विवस्त्र होऊनच.' त्यांच्या ह्या विचित्र मागणीने ती क्षणभर गोंधळली पण स्थीरमनाने विचार केल्यावर तिच्या चटकन लक्षात आले की हे ब्राम्हण सामान्य नाहीत, तर ते खुद्द त्रिश्रेष्ठीच असून आपली सत्य परीक्षाच घेण्यासाठी आलेले आहेत. त्यांना असेच परत कसे पाठवावयाचे ? असा प्रश्न तिला पडला. परंतु ती अतिशय हुशार, चाणाक्ष, होती. पतीची परवानगी घेण्यासाठी ती घरात गेली तेव्हा अत्री ऋषी ध्यानस्थ बसले होते. त्यांनी अंतर्ज्ञानाने सर्व काही जाणले. आणि डोळे उघडून तिच्या हाती गंगोदक दिले व सांगितले की हे पाणी त्या तिघांच्या अंगावर शिंपड व नंतर त्यांना इच्छा भोजन दे.

अनुसयेने गंगोदक अतिथींवर शिंपडताच तिघा ब्राम्हणांचे रूपांतर तीन बालकांत झाले. भुकेल्या बाळांना तिने स्तनपान केले. त्रिलोकी हिंडणारे नारदमुनी अत्रीऋषींचा समाचार घेण्यासाठी आश्रमात आले तो काय ? परमेश्वररूपी तीन बाळांचे दर्शन त्यांना घडले. परंतु काय घडले असावे ? हे त्यांनी अंतर्ज्ञानाने ताडले. नंतर स्वर्ग लोकात आल्यावर त्यांनी लक्ष्मी, पार्वती आणि सावित्री यांची भेट घेऊन घडलेली घटना त्यांच्या कानावर घातली. त्या तिघीही अतिशय घाबरल्या, चिंताग्रस्त झाल्या. सर्व काही विसरून त्या अनुसयेकडे आल्या. हात जोडून त्यांनी तिला

कळकळीची विनंती केली की, 'आम्हाला क्षमा करावी आणि आमचे पती आम्हाला परत द्यावे.' अत्री ऋषींनी अनुसयेला गंगोदक दिले व त्या बालकांवर शिंपडण्यास सांगितले. तिने तसे करताच ब्रम्हा–विष्णू–महेश यांना त्यांची पूर्ववत रूपे प्राप्त झाली. परमेश्वराचे दर्शन घडताच अत्री अनुसयेने त्यांना साष्टांग प्रणिपात केला. प्रसन्न होऊन ब्रम्हा–विष्णू–महेश यांनी अनुसयेला वर मागण्यास सांगितले. तेव्हा तिने सांगितले की, आपण तिघांनीही एकरूप होऊन माझ्या घरी वास्तव्य करावे. संतुष्ट झालेले ते तिघेही 'तथास्तू' म्हणून अंतर्धान पावले. तो दिवस म्हणजे मार्गशीर्ष शुद्ध चतुर्थीचा.

दत्तात्रयाचा अवतार हा कल्पान्तापर्यंत अविनाशी अवतार आहे. महाराष्ट्रात नरसोबाची वाडी हे दत्ताचे जागृत स्थान आहे. गोव्यातील साखळी येथील मंदिरात पहाटेच पूजेला सुरूवात होते. गर्भगृह 12 ते 3 वा. पर्यंत बंद असते. 5.30 ला पुन्हा नौबत होते. सायंकाळी आरती होते. भजनाच्या वेळी चौकातील आसन वस्त्राने झाकतात. देऊळ 8.30 वा. बंद होते. या मंदिरात मार्गशीर्ष पौर्णिमेला दत्त जयंतीचा महोत्सव होतो.

**मंदिरातील उत्सवः–**

चैत्र– शिबिकोत्सव (अक्कलकोट स्वामी पुण्यतिथी)

वैशाख – वसंत पूजा

आश्विन – दसरा, कोजागिरी

कार्तिक – शिबिकोत्सव

मागीशीर्ष – दत्तजयंती

पौष – नृसिंह सरस्वती जयंती

माघ – रथ सप्तमी, महाशिवरात्री

फाल्गुन – शिबिकोत्सव

विठ्ठल मंदिर – (साखळी)

खरेतर महाराष्ट्रात पंढरपूर हे विठ्ठलाचे माहेर. भक्तजन या माहेरी श्रद्धेने आषाढी–कार्तिकेला जातात. अशीच विठ्ठलाची मंदिरे इतरत्रपण आहेत.

विठ्ठल म्हणजेच पांडुरंग हे विष्णूचेच रूप मानतात. असे म्हणतात की, विठ्ठलाने आपल्या मस्तकात शिवलिंग धारण केल्याने विठ्ठल भक्तीत शिव–विष्णू हा भेद उरत नाही.

गोव्यातील रापोवंशातील एक वृद्ध पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनासाठी गेला. तुझे शेवटचे दर्शन घेतो असे तो विठ्ठलाला म्हणाला, तेव्हा विठ्ठलाला त्याची दया आली. पांडुरंग त्यास म्हणाले. 'मंदिरातील उत्सव मूर्ती घे. मीही तुझ्या सोबत येतो. त्या वृद्धाने मूर्ती उचलली व तो गोव्यात साखळीला येऊन पोहचला. 1448 मध्ये या मूर्तीसाठी साखळीत मंदिर उभारण्यात आले. चैत्र शुद्ध 10 ला मूर्तीची विधियुक्त स्थापना झाली. या मंदिराच्या उभारणीत उत्तरेकडील वास्तू कलेची छाप वाटते.

**दामोदर मंदिर (जांबवली – ता. केपे)**

मडगांव पासून या मंदिराचे अंतर 22 कि. मी. आहे. हिरव्यागार वनश्रीच्या परिसरात प्रशस्त अशा मोकळ्या जागेत दामोदरचे मंदिर सुंदर व रेखीव आहे. या मंदिराला एक मोठे सभागृह आहे. सभागृहाबाहेरच एक मूर्ती आहे. अनेक लोक येथेच कौल लावतात व प्रसाद घेतात. सायंकाळी आरती होते. त्यावेळी अनेक भक्तजन या ठिकाणी एकत्र होतात.

घोड्यावर पाय मोडून बसलेले शंकर स्वरूपातील विष्णूने हातात परशू व डमरू धारण केले आहे. येथे लक्ष्मीनारायणाची पण मूर्ती आहे. बाजूला इतर मंदिरे देखील आहेत.

**श्री भगवती चिंबलकरीण (माशेल – ता. फोंडा)**

सोळाव्या शतकात प्रथम हे मंदिर तीसवाडी तालुक्यातील 'चिंबल' गावी

होते. 1540 च्या सुमारास गोव्याची सत्ता पोर्तुगीजांच्या हाती गेल्याने त्यांच्या भीतीने देवीचे स्थलांतर करावे लागले. तेथून ती डिचोली तालुक्यातील मये गावात आणण्यात आली. 1751 मध्ये मयेहून पुन्हा तिचे स्थलांतर माशेल येथे झाले व माशेलला तिची स्थापना करण्यात आली.

माशेलमध्ये पालखीत देवींची उत्सवमूर्ती ठेऊन मोठ्या मंडपात येते. नंतर ती कुंकळ्येफर – माटव वाडा – माटव रायबंदरातील फोंडवे माटव, पानवेल माटव असा प्रवास करीत शेवटी चिंबल या मूळ स्थानी येते. येथे पोहोचताच पालखीचे स्वागत होते. या प्रत्येक ठिकाणी 2/3 दिवस उत्सव असतोच.

माशेलहून देवी चिंबल येथे आणण्याची पद्धत 1920 मध्ये सुरू झाली. मार्गशीर्ष नवमीला या देवीचा उत्सव होतो. देवीला कौल लावताना प्राचीन स्थलांतराची आठवण म्हणून तिला करंबळीच्या पानात बांधतात. या देवीचे भक्तजन माशेल ते चिंबल येथेच नाहीत तर सर्व गोव्यात पसरले आहेत.

**महालक्ष्मी मंदिर – (बांदिवडे – ता. फोंडा)**

रामनाथ मंदिराच्या जवळच हिरव्यागार वनश्रीने व्यापलेले महालक्ष्मी हे मंदिर आहे. ही देवी मूळची 'कोलवे' येथे होती. नंतर तिचे बांदिवडे येथे स्थलांतर झाले. कोल्हापूरच्या महालक्ष्मी सारखीच हुबेहूब तेजस्वी अशी ही देवता आहे. ह्या देवींची पालखी अष्टमीला निघते. व नवरात्रात मोठा उत्सवही असतो. हे ठिकाण शक्तीपीठ मानतात. सभामंडपाच्या गॅलरीत 18 मूर्ती आहेत. या देवीचे पूजन शीलाहार आणि कदम्ब राजघराण्याकडून होत असे.

**चंद्रेश्वर चंद्रनाथ मंदिर – (पारोंडे – ता. साष्टी)**

मडगाव तालुक्यात पारोंडे येथे उंच डोंगरावर चंद्रेश्वराचे मंदिर आहे. वरती शिखरावर भूतनाथ व चंद्रशेखर अशी दोन मंदिरे आहेत. भोजकाळातील चंद्रवर्मा राजाने हे मंदिर उभारले. या डोंगराला चंद्रनाथ डोंगर म्हणतात. येथेच शिवलिंग

कोरलेले आहे. या उंच डोंगरावरून बाजूच्या रमणीय प्रदेशातील मोहक निसर्ग सौंदर्य न्याहाळता येते. येथे एक जलाशय आहे. चैत्र पौर्णिमेला येथे जत्रा असते. पारोंड्याला उतरल्यावर चंद्रेश्वराच्या दर्शनाला दीड–दोन तासात चढून जाता येते.

एकदा दुष्काळ पडला असताना ऋषीमुनींनी कैलासपती शंकराची करूणा भाकली. शंकर प्रसन्न झाले. त्यांनी डोंगरा एवढे तेजस्वीरूप धारण केले. 'माझ्या शरीरापासून निर्माण झालेले पाणी तुमचे रक्षण तर करीलच शिवाय पापक्षालन पण करील.' असे म्हणून ते अंतर्धान पावले. अशी या चंद्रेश्वर चंद्रनाथाच्या निर्मितीची कथा आहे.

चंद्रेश्वर (हे शिवलींगाचे नाव आहे) या सोबत तेथे श्रीभूतनाथ, श्री सिद्धी भैरव, कालभैरव, श्री शंख भैरवाचे पण अस्तित्व आहे. दर सोमवारी रात्री येथे शिबिकोत्सव होतो. मंदिराच्या वार्षिकोत्सवात रामनवमी, दसरा, हरीजागर, कार्तिक पौर्णिमा, नवरात्र, महाशिवरात्र इत्यादींचा समावेश होतो.

**कामाक्षी देवालय – (शिरोडे)**

कामाक्षी देवीचे मंदिर प्रथम सासाष्टी तालुक्यातील 'राय' या गावी होते, पण पोर्तुगीजांच्या धास्तीने ह्या देवीचे स्थलांतर शिरोड्याला झाले. वाजे–वाड्यावर भक्तजनांनी मुक्काम केला. तेथून भरभर वाड्यावर आल्यावर तेथेही असुरक्षित वाटल्याने डोंगराळ, खिंडीसारख्या भागात येऊन त्यांनी देवीची स्थापना केली.

कामाक्षी देवीचे प्रवेशद्वार पूर्वेला आहे. पहिले सभागृह शुभ्र गोलखांबाचे, वर कौलारू उतरते छप्पर आहे.

आतील गर्भगृहात पट्टासनावर श्री कामाक्षी देवीची मूर्ती आहे. श्री वेताळाच्या मूर्तीचे पण दर्शन या मंदिरात होते. महाद्वाराच्या उजव्या बाजूस कालभैरव आहे. कामाक्षी देवालयाच्या उजव्या बाजूस श्री रायेश्वराचे मंदिर असून रायेश्वरालिंग, श्री लक्ष्मीनारायण श्री शांतादुर्गा, श्री ग्रामपुरूष श्री म्हाडेश्वर यांचेपण दर्शन होते. या

मंदिरात शिवरात्रीपासून फाल्गुन शुद्ध दशमी

या मंदिरात फार मोठा जत्राउत्सव होतो. माघ वद्य चतुर्थीला श्रीकामाक्षी व श्री रायेश्वर यांची भव्य मिरवणूक निघते.

**गोव्यातील मुख्य देवालये आणि स्थान –**

| **देवालयाचे नाव** | |
|---|---|
| श्री मंगेश | प्रियोळ ता. फोंडा |
| श्री शांतादुर्गा | कवळे |
| श्री रामनाथ | बांदिवडे |
| श्री नागेशी | बांदिवडे |
| श्री दामोदर | जांबवली |
| ,, विठ्ठलमंदिर | साखळी |
| ,, सप्त कोटेश्वर | नार्वे |
| ,, गणपती | खांडोळे |
| ,, दत्तमंदिर | डिचोली |
| ,, हनुमान व श्री दत्त मंदिर | म्हापसा |
| ,, मारूती व श्री महालक्ष्मी मंदिर | पणजी |
| ,, गोमतेश्वर मंदिर | ओल्डगोवा |
| ,, भगवती मंदिर | पेडणे |
| ,, वेताळ मंदिर | चोपले |
| ,, विजयदुर्गा मंदिर | म्हार्दोल |
| ,, महालसा मंदिर | म्हार्दोल |

| | |
|---|---|
| ,, मल्लीकार्जुन मंदिर | काणकोणे |
| ,, महालक्ष्मी मंदिर | बांदोडे |
| ,, कालीका देवी | कानसारपाल म्हापसा |
| श्री गोपाळ गणपती | फार्मागुडी पणजी |
| श्री भगवती मंदिर | पार्शेम |
| श्री ब्रम्हा मंदिर | करंबोलीम |
| श्री चंद्रनाथ | पारोंडे |
| श्री शांतादुर्गा फुंकलीकीकरण | फार्तेण केणे |
| श्री महादेव | कुडचडे |
| श्री कपिलेश्वर | कवळे |
| श्री धारेश्वर | धारगळी |
| श्री मल्लीकार्जुन | सांगे |
| श्री पांडुरंग | साखळी |
| श्री लक्ष्मी नारायण | नार्वे |
| श्री रूद्रेश्वर | हरवळे |
| श्री शांतादुर्गा चिमुलकरीण | माशेल |
| श्री शांतादुर्गा तेलीकरीण | मांद्रे |
| श्री शांतादुर्गा कुमार जीवेकरीण | माशेल |
| श्री शांतादुर्गा | फातर्पे |
| ,, ,, | कुंफलये |
| ,, ,, | कालापूर |

| | |
|---|---|
| ,, ,, | बाळ्ळी |
| श्री शांतादुर्गा | खांडेपार |
| ,, ,, | तिवेर |
| ,, ,, | अमिण |
| ,, ,, | सांखवाळ |
| ,, ,, | केरी |
| ,, ,, | पिळगाव |
| ,, ,, | गोठण |
| श्री भगवती | खांडोळे |
| श्री नवदुर्गा | कुंडई |
| श्री काणकेश्वरी | नारळे/नाखे |
| श्री चामुंडेश्वरी | शिखई |
| श्री कालीका | चोपडे |
| श्री महाकाली | जांबवली |
| श्री लक्ष्मीनारायण | म्हापसे |
| श्री सीताराम | डोंगरी |
| श्री लक्ष्मीनृसिंह | वेलींग |

**काही महत्त्वाच्या ठिकाणांचे अंतर —**

| | |
|---|---|
| मुंबई–गोवा | 594 कि. मी. |
| औरंगाबाद–गोवा | 706 कि. मी. |
| दमण–गोवा | 787 कि. मी. |

| | |
|---|---|
| दिल्ली–गोवा | 1895 कि. मी. |
| कोल्हापूर–गोवा | 246 कि. मी. |
| मद्रास–गोवा | 920 कि. मी. |
| पुणे–गोवा | 458 कि. मी. |
| कलकत्ता–गोवा | 2487 कि. मी. |
| बंगलोर–गोवा | 598 कि. मी. |
| बेळगाव–गोवा | 157 कि. मी. |
| लोंढा–गोवा | 106 कि. मी. |
| सदाशिवगड–गोवा | 96 कि.मी. |
| चिपळूण–गोवा | 325 कि. मी. |
| अहमदनगर–गोवा | 123 कि. मी. |
| दीव–गोवा | 1536 कि. मी. |
| हुबळी–गोवा | 184 कि. मी. |
| हैद्राबाद–गोवा | 743 कि. मी. |
| मालवण–गोवा | 150 कि. मी. |
| रत्नागिरी–गोवा | 263 कि.मी. |
| वेंगुर्ला–गोवा | 103 कि. मी. |

**गोव्यातील अंतरगत ठिकाणांचे पणजी पासून अंतर :–**

| | |
|---|---|
| मडगाव | 33 कि. मी. |
| वास्को | 30 कि. मी. |
| कलंगुट | 16 कि. मी. |
| डाभोलीम | 29 कि. मी. |

| | |
|---|---|
| ओल्डगोवा | 10 कि. मी. |
| तेरेखोल | 42 कि. मी. |
| बोंडला | 55 कि. मी. |
| व्हेगातोर | 22 कि. मी. |
| अगौदा फोर्ट | 18 कि. मी. |
| दूधसागर | 60 कि. मी. |
| मेयेलेक | 35 कि. मी. |
| बोंडला फॉरेस्ट | 55 कि. मी. |
| दोनापावला | 07 कि. मी. |
| पणजी ते मीरामार | 3 कि. मी. |
| कलंगुट बीच | 16 कि. मी. |
| मंगेशी | 22 कि. मी. |
| दत्तमंदिर (बिचोली) | 37 कि. मी. |
| मार्मागोवा डॉर्बर | 34 कि. मी. |
| पिलार | 11 कि. मी. |
| मॅगोस चर्च | 07 कि. मी. |
| दिवडी बेट | 13 कि. मी. |
| हरेवला धबधबा – (साखळी) | 40 कि. मी. |
| अंजुना बीच | 18 कि. मी. |
| व्हेगातर बीच | 22 कि. मी |
| अमरबोळ बीच | 50 कि. मी. |

**गोव्यात कोणते (बीचेस) समुद्रकिनारे बघाल –**

1) अनौडकिनारा
2) अंजुना किनारा
3) हरमल ,,
4) बागा ,,
5) बेनालिम ,,
6) बेतूल ,,
7) बागमालो ,,
8) कलंगुर ,,
9) कंडोलिम ,,
10) दोनापावला ,,
11) कनसा ऊलीम ,,
12) क्व्हेलोझीमे ,,
13) कोलवा ,,
14) माबोर ,,
15) माजोर्डा ,,
16) मांद्रेम ,,
17) मीरामार ,,
18) मॉर्गिम ,,
19) पलोलीम ,,
20) शिरीडाओ ,,
21) व्हेगातर ,,
22) वरका ,,
23) वेलसाओ ,,

**गोव्याची भाषा – (कोंकणी)**

'गोवा' हा भाग प्राचीन काळापासून महाराष्ट्रातील कोकणलाच लागून असलेला प्रदेश असल्याने येथे नव्वद टक्के लोक मराठी भाषा बोलू शकतात. वा समजू शकतात. पोर्तुगीज सत्तेमुळे एकेकाळी येथे पोर्तुगीज भाषेचे प्रस्थ होते, पण ते हळूहळू कमी होऊ लागले. तरीही परराष्ट्रीयांचा संबंध आल्यामुळे उच्चवर्गातील लोक व्यवहारात किंवा व्यवसायात इंग्रजी भाषा वापरतात. परंतु गोव्याची मात्र देशी भाषा आहे. कोकणी अनुनासिक उच्चार गोडवा व माधुर्य असलेली भाषा स्थानिक लोक जात–धर्म असा कोणताही भेदभाव न करता या भाषेचा वापर करतात. त्यामुळे आपुलकीने बोलायचे झाले तर कोंकणी भाषाच बोलायला व समजायला हवी असे वाटते.

विशेषत: ग्रामीण भागात किंवा स्थानिक चौकशीसाठी कोकणीचा वापर अपरिहार्य आहे. स्थानिक भाषेशिवाय तेथील संस्कृतीचे आकलन नीट होत नाही. मराठी आणि कोंकणी ह्या दोन्ही भाषेतील बऱ्याच शब्दात साम्य आहे.

**कोकणी शब्द – मराठी शब्द**

| | | | |
|---|---|---|---|
| आंबो – | आंबा | दनपार – | दुपारी |
| उदक – | पाणी | थांबो – | बसस्टॉप |
| कसो – | कसा | दाखय – | दाखव |
| काथो – | काथ्या | दादलो – | पुरूष |
| कित्याक – | कां ? | दिवो – | दिवा |
| खोप – | झोपडी | भुरगे – | लहान मूल |
| चवथो – | चौथा | धंय – | दही |
| चेडू – | मुलगी | नकसो – | नकाशा |
| चेडो – | मुलगा | पंखो – | पंखा |
| चेरो – | चेहरा | निळो – | निळे |
| म्हातारो – | म्हातारा | पैर – | काल |
| तरणो – | तारूण्य | पाखे – | छप्पर |
| झगडे – | भांडण | पावणो – | पाहुणा |
| डबो – | डबा | कांदो – | कांदा |
| तकली – | डोकं | पिशेपण – | मूर्खपणा |
| तवशे – | काकडी | पेज – | भाताचे पाणी |
| तागडी – | तराजू | पाटल्यात – | मागे |
| तेन्ना – | नंतर | फाल्या – | उद्या |
| थोडो – | थोडेसे | भोंव – | प्रवास |


| | |
|---|---|
| भोवडी – | पर्यटन |
| भोवंडेकार – | पर्यटक |
| मडवळ – | धोबी |
| म्हयनो – | महिना |
| मार्गदाखय – | मार्ग दाखव |
| बाहेर पडलो – | मरण पावला |
| मोगाचो – | प्रिय |
| मोठ्यान – | मोठ्याने |
| रस्तो – | रस्ता |
| रूच – | चव |
| वायंगे – | वांगी |
| वेचणूक – | निवडणूक |
| साबू – | साबण |
| सकयल – | खाली |
| सारणमार – | झाडून काढ |
| सूचय – | सुचव |
| सोप–सोपय – | संपव |
| हातरूण – | अंथरूण |
| बावटो – | बॅनर |
| म्हालो – | न्हावी |
| न्हाण – | आंघोळ |
| ल्ह्यानसो – | थोडे |
| जतनाय आसलो – | काळजीपूर्वक |


| | |
|---|---|
| म्हारग – | महाग |
| पंखो – | पंखा |
| गर्मी – | उष्मा |
| डोंगर – | टेकडी |
| बायलमनीस – | बाई माणूस |
| आयद्धान – | भांडे |
| कुशलताय – | कौशल्य |
| उरिल्ले – | उरले |
| उलय – | बोल |
| उबोराव – | थांब |
| गडगुडी – | तंबाखू पिणे |
| फाल्या – | उद्या |
| आयचे राती – | आजच्या रात्री |
| लाटी – | लाट (पाण्याची) |
| हाव – | मी |
| आमी – | आम्ही |
| त्यो – | ते |
| खंय – | कोठे |
| बरो – | छान |
| आवय – | आई |
| भयण – | बहीण |
| काडटा – | काढणे |

**कोकणातील काही महत्त्वाची वाक्ये :–**

| | |
|---|---|
| तू कोण असा ? | तू कोण आहेस ? |
| तू कसो असा ? | तू कसा आहेस ? |
| हावं डल्हार | मी डल्हास |
| तो माझो भाव आसा | तो माझा भाऊ आहे. |
| तो खंय आसा ? | तो कोठे आहे ? |
| ही म्हर्जी आवय | ही माझी आई |
| खोपींत रावता | झोपडीत राहतात. |
| भूरगो आंबो खाता | मूल आंबा खाते. |
| तो गोव्यात रायतोलो | तो गोव्यात राहतो. |
| हे गोव्यात रावचेनात | हे गोव्यात रहात नाहीत. |
| म्हज्या भावान पेन हाडला | माझ्या भावाने पेन आणला. |
| कोकणी शिकिल्लो | कोकणी शिकलो. |
| तो वचूक ना | तो जात नाही. |
| तो मुंबईच्यान आलाय | तो मुंबईहून आला आहे. |

# दीव




दीव
गुजरात
अरबी समुद्र
आडाचे वन
दीव विमान तळ
TV स्टेशन
गंगेश्वर
चक्रतीर्थ बीच
जालंधर बीच
FORT
पूल
घोघला
उना कडे
N

# दीव (DIV)

३८.८ चौ. कि.मी.

लोकसंख्या ५०,००० हजारपेक्षा जास्त

हवामान कोरडे आणि थंड

पाऊस सुमारे ७० ते ७५ सें.मी.

भाषा गुजराथी, हिंदी, इंग्लीश आणि पोर्तुगीज

लोक खिश्चन, हिंदू, मुस्लिम

दमणप्रमाणेच 'दीव' पण केंद्रशासित प्रदेश आहे. गोवा आणि दमणप्रमाणेच येथे पण पोर्तुगीजांची सत्ता होती. १९६१ मध्ये गोवा मुक्तीच्या वेळी दीव बेटही मुक्त करण्यात आले आणि तेथे केंद्रशासन लागू करण्यात आले.

गुजराथेतील सौराष्ट्र भागाच्या दक्षिणेला अरबी समुद्रात हे बेट आहे. चारही बाजूंना पाणी आणि मध्ये जमीन असलेल्या प्रदेशाला बेट म्हणतात. दीव बेटाच्या तीन बाजूंना समुद्र आहे. चौथ्या बाजूला खाडी आहे. सौराष्ट्रातील 'उना' गावाशी 'दीव' गाव जोडण्यात आलेले आहे. त्याचेच नाव या बेटाला दिले असावे.

**दीवमधील काही भाग**

१) बूचरवाडा २) दीव ३) फुदम ४) सिम्बोर ५) घोघला ६) नागोआ ७)बानाकबारा.

दीवच्या सभोवताली गुजराथचा परिसर असल्याने येथील लोकांची भाषा,वेषभूषा आणि एकंदर राहणीमानावर ९०% गुजराथी संस्कृतीचा पगडा असल्याचे जाणवते.

दमणहून अरबी समुद्रातून एक मागरिषा काढली तर हे अंतर १९२ कि.मी. इतके आहे. पण जमीनमार्गे गेल्यास हेच अंतर कितीतरी जास्त आहे.

दीव ते उना – ३० कि.मी.

उना ते अहमदाबाद – ४९५ कि.मी.

उना ते भावनगर – २२६ कि.मी.

उना ते मुंबई – ९३० कि.मी.

उना ते दमण – ७६३ कि.मी.

उना ते राजकोट – २६१ कि.मी.

उना ते सोमनाथ – ८७ कि.मी.

उना ते वेरावळ – ८५ कि.मी.

भौगोलिकदृष्ट्या दीवचे क्षेत्रफळ ४० चौ.कि.मी. पेक्षाही कमीच आहे. दीव जुनागढ जिल्ह्याच्या सीमेलगत आहे.

दमण आणि दीव येथील नैसर्गिक परिस्थिती, लोकजीवन, हवामान जवळपास सारखेच आहे. पोर्तुगीजांची सत्ता इथेही होती. त्यामुळे घरेही त्याच प्रकारची दिसतात.

दीव आणि घोघला ही दीवमधील प्रमुख ठिकाणे आहेत. येथील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. समुद्रकिनारा असल्यामुळे मासेमारीचा आणि मीठ तयार करण्याचा उद्योगही मोठ्या प्रमाणावर चालतो. खजूर आणि बाजरी ही मुख्य पिके आहेत. या प्रदेशातील लोकजीवनावर काठेवाडी संस्कृतीचे प्रतिबिंब उमटलेले दिसते.

मध्य आणि उत्तर दीवचा चार पंचमांश भाग वालुकामय आहे. तर दक्षिणेकडील भाग चुनखडीचा आहे. दीव, आणि नागोआ प्रदेशातील चुनखडी उच्च प्रतीची आहे. सिमेंट उद्योगासाठी त्याचा चांगला वापर करता येऊ शकेल. पण कारखाने वाढले तर पर्यावरणातील असंतुलन वाढते. मात्र कारखाने नसल्यामुळे या भागाचा औद्योगिक विकास फारसा झालेला नाही.

२०°–४३° उत्तर अक्षांश ते ७१°–५९° पूर्व रेखांशावर असलेल्या दीवचे

हवामान आल्हाददायक आहे. डिसेंबर ते फेब्रुवारी थंडीचा मोसम असतो. मार्चपासून मे महिन्यापर्यंत उन्हाळा आणि जून ते सप्टेंबर पावसाळा असतो. ऑक्टोबर नोव्हेंबरच्या उन्हाळ्याचा मात्र त्रास होतो.

येथील वार्षिक सरासरी पर्जन्यमान ७० सें. मी. इतके आहे. जुलै महिन्यात सर्वाधिक पाऊस पडतो. मार्चपासून मात्र चांगलेच ऊन तापायला लागते. मे महिन्यात तर तापमान ३० अंश से. पर्यंत वाढते. मे महिन्यापासून सप्टेंबरपर्यंत हवेत ८० टक्के आर्द्रता असते. तर हिवाळ्यात ती पन्नास टक्क्यांवर येते. पावसाळ्यात वातावरण ढगाळलेले असते. 'दीव'मध्ये नैऋत्य मोसमी वाऱ्यांपासून पाऊस पडतो. दुपारनंतर पश्चिमेकडून वारे वाहू लागतात. ऑक्टोबर ते मार्च सकाळच्या वेळी वायव्येकडून वारे वाहतात.

दीव बेटाची लांबी १२ कि. मी. तर रुंदी ३ कि. मी. आहे. ३६३ हेक्टर जमिनीवर पिके घेतली जातात. उर्वरीत जमिनीवर नारळी–पोकळी भाजीच्या व बागा आहेत.

दीवचा भूप्रदेश एकसारखा नाही. काही भाग खडकाळ आहे. काही वालुकामय आहे तर काही जमीन शेतीस उपयुक्त आहे. केरळ प्रमाणेच इथेही बॅक वॉटरने व्यापलेला प्रदेश आहे.

ऑगस्ट महिन्यात दीव बेटाचे महत्त्व आणखी वाढते. स्थलांतर करून शेकडो कि. मी. वरून येणारे फ्लेमिंगो पक्षी इथे पहायला मिळतात.

दीवचा समुद्रकिनारा २१ कि. मी. चा आहे. पॉम्फ्रेट, दारा, हिलसा, सिरफीश वगैरे जातीचे मासे इथल्या किनारपट्टीला सापडतात.

गुजराथ राज्याच्या दक्षिण किनाऱ्यावर दीव हा केंद्रशासित प्रदेश आहे. प्राचीन काळात या भागाला 'सुराष्ट्र' म्हणत. त्यावरून पुढे 'सौराष्ट्र' रुढ झाले असावे.स्कंद पुराणात याच प्रदेशाचा उल्लेख 'प्रभास क्षेत्र' असा आहे. देवपाटण किंवा सोमनाथ पाटण या नावांनीही हा प्रदेश ओळखला जात असे. येथून लालसमुद्र, गल्फ आणि आफ्रिकन किनाऱ्यापर्यंत दूरवर व्यापार चालत असे.

प्रभासच्या शेजारी हिरण्य नदीच्या परिसरात मध्य अश्मयुगीन शस्त्रं सापडली

आहेत. हा कालखंड इ. स. पूर्व २५०० चा असावा. इतिहास पूर्व काळात नाघेर भागात अतिप्राचीन मानवाची वसाहत असावी. कारण प्राचीन मानव दगडाची हत्यारे वापरीत होता. तोपर्यंत त्याला धातूचा उपयोग माहीत नव्हता.

इ. स. पूर्व २००० ते ५०० हा काळ प्राचीन आणि अर्वाचीन इतिहासाला जोडणारा भाग आहे. याच काळात येथील मानवाला धातूचा उपयोग समजला. प्रभास मधील हिरण्य नदीच्या काठी तत्कालीन नाघेर येथेही भारतातील प्राचीन सिंधुसंस्कृती प्रमाणेच अवशेष गवसले आहेत. सोमनाथ प्रभासपाटणच्या सांस्कृतिक प्रगतीबरोबरच दीवचीही सांस्कृतिक प्रगती झाली.

महाभारतानुसार उत्तरेकडील यादव स्थलांतर करून या ठिकाणी आले. प्रथम ते द्वारकेला आले. द्वारका या जागेबद्दल अजूनही भिन्न मते आहेत. दीवजवळील मूळ द्वारकेबरोबर दीवच्या वायव्येला असलेल्या ओखामंडलाला (जिल्हा जामनगर) पण द्वारका म्हणूनच संबोधतात.

महाभारतात प्रभासचा उल्लेख आहे. त्यामुळे दीव बेटाजवळील द्वारका हीच महाभारतातील खरी द्वारका असावी असंही काही शास्त्रज्ञांचं मत आहे. प्रभासपाटणचा यादवांशी जवळचा संबंध होता एवढं मात्र निश्चित. कारण महाभारताच्या आदि पर्वात श्रीकृष्णाने अर्जुनाचे स्वागत केले. तेव्हा यादवांची सत्ता सौराष्ट्रावर होती. दीवजवळचे 'नाघेर' ही त्यांच्याच ताब्यात होते असा महाभारतात उल्लेख आहे.

सत्ययुगातही दीव बद्दलचा उल्लेख सापडतो. त्यावेळी दीवच्या प्रदेशाला जालंघटक्षेत्र म्हणून संबोधण्यात येत असे. कारण तिथे जालंघट मंदिर होते. जालंघट हा दैत्य होता. त्याची पत्नी सती विंद्रा हिच्यामुळे त्याला अमरत्त्वाचा वर मिळाला. विष्णूने जालंघट दैत्याचा वेश करून विंद्राचे सत्व हरण केले आणि जालंघटाला सुदर्शन चक्राने ठार मारले. विष्णूने जेथे आपले चक्र ठेवले ते स्थान चक्रतीर्थ म्हणून ओळखले जाऊ लागले. आपले सत्व हरण करणाऱ्या विष्णूला सतीविंद्राने 'शीला' होशील असा शाप दिला. म्हणून विष्णू 'शालीग्राम' झाला.

चक्रतीर्थ स्थान देवभद्र येथे होते. भद्र म्हणजे किल्ला. पुराणात किल्ल्याचा उल्लेख दीव असा केला जात असे.

दीव पाटण–नाघेर या भागावर पुढे चावडा राजपुतांनी सत्ता स्थापन केली. चावडांच्या राज्याचं मुख्य स्थान द्वारका होते. तसेच सौराष्ट्र, देवपाटण, दीव, कालपूर या प्रदेशावरही त्यांची सत्ता होती. पण या भागाचा आजपर्यंतचा लेखी इतिहास इ. स. पूर्व ३०० नंतरचाच उपलब्ध आहे.

गिरनार येथील शिलालेखातील उल्लेखानुसार इ. स. १३९ मध्ये राजा सुद्दामन् याने सौराष्ट्रापर्यंत आपली सत्ता वाढविली होती. सौराष्ट्राचा कारभार पुष्पगुप्त पहात होता. सुवर्णनासिका नदीवर त्याने धरणासारखी भिंत उभारल्याचीही माहिती मिळते. यावरून तत्कालीन अशोकाचा अधिकारी यवनराज याचीही इ. स. पू. २७३ मध्ये सौराष्ट्रात सत्ता असल्याचा उल्लेख आढळतो.

मौर्य काळ हा एकूणच भारतीय संस्कृतीचा संपन्नतेचा काळ होता. याच काळात प्रभासपाटण – दीवला – व्यापारी महत्त्व प्राप्त झाले. सौराष्ट्रातून समुद्र व्यापार करणारे हे प्रमुख केंद्र होते.

पहिल्या शतकात भूमक आणि नट्टापान यांनी सौराष्ट्रात आपली सत्ता स्थापन केली. नट्टापान याने तर आपल्या नावाने चांदीची नाणीसुद्धा काढली होती. त्यावेळी प्रभासपाटण जवळील दीवचा भूभागही त्यांच्याच ताब्यात होता.

पहिल्या आणि दुसऱ्या शतकातील भारतीय ग्रीक व्यापाराच्या संबंधात मिनँडर, अपोलोडोट (दुलटा) यांची नाणी सौराष्ट्रात सापडली आहेत. पण पहिले शतक ते इ. स. ५० पर्यंत मात्र इतिहासाचा सलग धागा हाती लागत नाही.

सौराष्ट्रातील समुद्र व्यापार तिसऱ्या शतकात क्षमणांच्या नेतृत्त्वाखाली मोठ्या प्रमाणात विस्तारित झाला होता. क्षमणांनी सौराष्ट्रावर जवळजवळ ३०० वर्ष राज्य केले.

इ. स. ४१५ मध्ये कुमारगुप्ताने सौराष्ट्र जिंकले. त्यावेळी शार्व भट्टारक हा शेवटचा क्षमण राजा तेथे राज्य करीत होता. त्याच्या नाण्यावर शैवपंथाचे प्रतिक म्हणून त्रिशूळ कोरलेले असायचे. त्यातली काही चांदीची नाणी उपरकोट, दीव, वसोज याठिकाणी सापडली आहेत. दीवला 'दीवेनी' असे संबोधले जाई.

इ. स. ४१५ ते ४५५ पर्यंत दीववर गुप्तांचीच सत्ता होती. हे गुप्त जुनागढ

गिरनार येथून दीवचा राज्यकारभार पहात असत. गुप्तकाळातच वैष्णव धर्माचा अधिक प्रसार झाला असावा. कारण गुप्तकालीन नाण्यांवर गरूडाचे चिन्ह आढळते.

स्कंदगुप्ताच्या काळात मात्र 'नंदी'चे प्रतिक प्रचलीत होते. स्कंदगुप्तानंतर (इ.स. ४६७ ते ४६८) गुप्तांच्या सत्तेची उतरती कळा सुरू झाली. त्यांच्या मैमक नावाच्या सेनापतीने सगळी सत्ता हस्तगत केली आणि सौराष्ट्रात वल्लभीपूर येथे स्वतंत्र राज्य स्थापन केले. हा भाग दीवच्या ईशान्येला आहे.

मैमकाने हिंदू, बौद्ध आणि जैन धर्मियांना उदार आश्रय दिला. दीवजवळील 'उना' येथे ब्राम्हणांची वसाहत वसवली. ह्युएन त्संग या प्रसिद्ध चिनी प्रवाशानेही वल्लभीला भेट दिल्याचा उल्लेख आपल्या लेखनात केला आहे.

वल्लभीच्या अस्तानंतर गुजरातमध्ये चावडांची (चाप) सत्ता उदयास आली. तोडांची राजधानी 'दीव' होती असाही उल्लेख सापडतो. प्रभासपाटण येथील सोमनाथ हे त्यांचे दैवत. सौरा नावाच्या जमातीवरून या प्रदेशाचे नाव सौराष्ट्र पडले असावे. चाप म्हणजे बाण, म्हणून चावडांच्या उत्पत्तीचा संबंध थेट शंकराच्या शिवधनुष्याशी जोडला जातो. या काळात लोक सौराष्ट्रातून कंबोडिया, जावा येथे स्थलांतर करून जात असत. ७ व्या ८ व्या शतकात दीवच्या किनाऱ्यावर चीनची व्यापारी जहाजे येत असल्याचाही इतिहासात उल्लेख आढळतो. दीवच्या चावडांनी आपल्या वसाहती वाढवल्या होत्या. कटपूर, महुआ, शैल बेट, दीवच्या इशान्येकडील द्वारका. पंचसार, श्रीमळ ही व्यापारी केंद्रे प्रगत होती. ७ व्या शतकाच्या उत्तरार्धात चावडा घराण्यातील वत्सराज, वेर्णीराज हे राजे सत्तेवर होते. दीवचे स्वतंत्र राज्य होते. वेर्णीराज पाण्यात वाहून गेला. पुढे राणी पंचसार जंगलात गेली. तिथे तिला मुलगा झाला तोच 'वनराज'. त्याने सौराष्ट्रात चावडा राज्य स्थापन केले. इ. स. १७३८ पूर्वी भीनमलचे चावडा राज्य अरबांनी नष्ट केले.

मारवारचा राजा बाप्पा रावल याने दीवच्या इसूपगोल राजाच्या मुलीशी लग्न केले. तिने 'व्यानमाता'ची मूर्ती पूजेसाठी सोबत नेली होती. 'अपराजीत' हा दीवच्या राजकन्येचा मुलगा. बाप्पा रावलनंतर तोच राज्याचा वारस ठरला.

इ. स. ७८३ मध्ये वर्धमान पूर या ठिकाणी जयवराहाने आपली सत्ता स्थापन केली. दीवचे चावडा पुढे अनहीलवाड, वर्धमानपूरचे राजे झाले. त्यांनी आपली सत्ता

सौराष्ट्र गुजराथपर्यंत वाढविली.

प्रतिहार (अवंती) हे चालुक्यांचे मांडलिक होते. चालुक्यांनी दीवकडे फारसे लक्ष दिले नाही. अनहीलवाडला चावडांचे राज्य असताना वनराजचे वंशज सोमनाथ पाटणहून दीवचा राज्यकारभार चालवित असावेत. नंतर चुडासामाच्या मूलराजांनी सौराष्ट्रात आपली सत्ता वाढवली.

गुजराथमधील चावडा राज्य आणि सौराष्ट्रातील सत्ता वनराजाने स्थापन केली. त्याचे पूर्वज मूळचे 'दीव' या ठिकाणचे होते. त्याचे राज्य इ. स. ९४१ पर्यंत होते.

इ. स. १०२६ मध्ये गझनीच्या महंमदाने सोमनाथवर स्वारी केली. अनहीलवाडपाटणा काबीज केल्यावर त्याने आपला मोर्चा दीवजवळील देलवाडाकडे वळवला. सोमनाथचा मौल्यवान खजिना त्याने लुटला. स्थानिक ठिकाणी चावडांची सत्ता होतीच. ११ व्या शतकात गझनीच्या महंमदाने पुन्हा स्वारी करून हा प्रदेश लुटला.

१० व्या शतकात पर्शियन आणि अरेबियन लोकांनी सौराष्ट्राच्या किनारपट्टीवर वसाहत करायला सुरूवात केली. हे लोक व्यापारासाठी आले होते. चावडांची जहाजे पण व्यापारासाठी चीनपर्यंत जात. १०६४ ते १०९४ पर्यंत गुजराथमध्ये कर्ण चालुक्याची सत्ता होती. त्याने 'कर्णावती' ही नवीन राजधानी वसवली. कर्णाच्या मृत्यूनंतर त्याच्या राणीने गुजराथ आणि सौराष्ट्राचा राज्यकारभार सांभाळला. तिने महमंद घोरीचा पराभव केला. त्यामुळे पुढील शंभर वर्षे तरी या प्रदेशावरील यावनी आक्रमणांचा धोका टळला होता.

इ. स. ११५८ मध्ये भीम (दुसरा) राज्याच्या गादीवर बसला. त्याने दीवचा किल्ला उभारला. १२४२ ते १२९५ पर्यंत अनहीलवाडच्या वाघेला घराण्यातील विशालदेव, सारंगदेव इत्यादींनी राज्य केले.

इ. स. १२२५ मध्ये मारवाडच्या राजपूत घराण्यापैकी राठोड घराण्याने गुजराथमध्ये प्रवेश केला. वेगालजीने स्वारी करून द्वारकेसह नाघेरचे राज्यपण जिंकून घेतले. वेगालजीच्या उत्तराधिकाऱ्यांना 'वाज' असं संबोधण्यात येई. सोमनाथ पाटणहून ते दीववर राज्य करीत. इ. स. १२३० मध्ये वेगालजींचे राज्य

तिथे होते. १३६८ मध्ये मेघराज तर विजयराजने १४०६ पर्यंत राज्य केले. नाघेर हे त्यांचे राज्य होते.

येथून सौराष्ट्र–गुजराथला समुद्रमार्गाने व्यापार चालत असे. इ. स. १२९० मध्ये मार्कोपोलो हा जगप्रवासी भारतात आला. त्याने आपल्या प्रवास वर्णनात येथील भेटीचा उल्लेख केला आहे. 'गुजराथी लोक हजारोंच्या संख्येने उन्हाळ्यात बोटींने इथे येत असत', असे त्याने लिहून ठेवले आहे.

दिल्लीचा सुलतान उल्घखान याने इ. स. १२९७ मध्ये गुजरात आणि सौराष्ट्र जिंकून घेतले. अनहीलवाड येथील वाघेला घराण्याची सत्ता संपुष्टात आली होती. सोमनाथ पाटणचा राजा विजयराज या सततच्या आक्रमणांना कंटाळला होता. त्याने एकदाच सगळ्यांचा कायमचा सोक्षमोक्ष लावण्याचे ठरवले. पण मुझफ्फर खानसमोर त्याचा टिकाव लागला नाही. तो दीव बेटावर पळाला. मुझफ्फर खानने दीववर स्वारी केली. त्याने दीवचा दरवाजा उघडला आणि राजाला हत्तीच्या पायी दिले. सगळे शहर उध्वस्त करण्यात आले. तेथे मशीद उभारून काझीची नेमणूक करण्यात आली.

१४०७ मध्ये मुझफ्फर खानने स्वतःला गुजराथचा सुलतान म्हणून जाहीर केले. त्यानंतर ही सत्ता पहिला अहमद याच्या हाती आली. त्याने मलीक आयाझची गव्हर्नर म्हणून नेमणूक केली. आपले केंद्रीय सत्तास्थान दीव येथेच ठेवले होते. तिथे त्याने मजबूत किल्ल्याची उभारणी केली आणि उंच खडकावर दीपगृहपण उभारले.

दीव बंदराच्या मुखाशी खडकाला लागून लोखंडी साखळ्या लावण्यात आल्या. शत्रूच्या जहाजापासून बंदराचे संरक्षण व्हावे हा त्यामागचा उद्देश होता. तसेच जमीन आणि बेटाला जोडणारा एक पूलही उभारण्यात आला. लढाऊ जहाजांची उभारणी करून दीव बेटाच्या संरक्षणाची व्यवस्था केली. इ. स. १५०० मध्ये भारतात पोर्तुगीजांनी प्रवेश केला. तोपर्यंत गुजरातच्या सुलतानाने आपली सागरी सत्ता अबाधित ठेवली होती.

पोर्तुगीजांनी व्यापाराच्या निमित्ताने भारतात प्रवेश केला. भारतीय समुद्र परिसरातून हाकलून लावण्यासाठी गुजराथच्या सुलतानला इजिप्तच्या सुलतानने सैनिकी मदत देऊ केली. १५०९ मध्ये पोर्तुगीज व्हॉइसरॉय अल्मेडा याने दीव बेट

एकटे पाडून सुलतानचा पराभव केला. मुजफ्फर (दुसरा) याच्याशी पोर्तुगीजांनी दीवमध्ये किल्ला बांधण्यासाठी संधान बांधले. ही गोष्ट मलिक आयाझला पसंत नव्हती. त्याने दीवजवळील उना येथे पोर्तुगीजांच्या जहाजावर हल्ला केला. पण तो यशस्वी झाला नाही.

सुलतान मुझफ्फर १५२६ मध्ये मृत्यू पावला. त्यानंतर मलिक इशाकने बंड केले. दीववर चाल केली. किवान–इ–मुल्क यास दीवचा प्रमुख नेमण्यात आले. १५३१ मध्ये बहादूरशहा हा सेनापती दीव येथे जहाजाने आला. त्याचवेळी पोर्तुगीज गव्हर्नर डी कुन्हा याने पण दीवकडे मोर्चा वळवला. मुस्ताफा आणि लुघान यांनी मिळून पोर्तुगीजांचा हल्ला परतवून लावला. त्याचवेळी दीववर मोगलांचा हल्ला होण्याची चिन्हं दिसू लागली. त्यांना थोपवण्यासाठी लुघानला पोर्तुगीजांची मदत घ्यावी लागली. पोर्तुगीजांनी जमिनीवरील आणि सागरी युद्धात मदत करण्याचे अश्वासन दिले. पण त्याच्या बदल्यात तेथील बंदरावर किल्ला बांधण्याची परवानगी मागितली. तेथील व्यापारी कर मात्र गुजराथचा सुलतान वसूल करीत असे.

गुजराथच्या दक्षिणेकडील दीव बेट गुजराथच्या शहाच्या मालकीचे होते. अल्बुकर्कला ते बेट मिळवण्याची उत्कट इच्छा झाली. पण त्याला ते शक्य झाले नाही. दिआगो सिक्वेराचे प्रयत्न पण विफल ठरले. १५२६ मध्ये गव्हर्नरलोपोने शहाशी बोलणी सुरू केली. दरम्यान दिल्लीचा सुलतान हुमायूनने गुजराथच्या बहादूर शहा विरूद्ध मोहीम उघडली. दोघांनी पोर्तुगीजांची मदत मागितली. १३३५ मध्ये शहा पोर्तुगीजांमध्ये तह झाला. त्यात दीवची सत्ता पोर्तुगीजांकडे गेली. त्यांनी दीव येथे किल्ला बांधण्याची परवानगी मागितली. अखेरीस दीव पोर्तुगीजांच्या स्वाधीन करण्यात आले. हुमायूनला शहाने दीव सोडायला सांगितले. हुमायून गेल्यावर त्याने आपले कुटुंब आणि संपत्ती दीवच्या किल्ल्यात आणून ठेवली आणि आपल्या राज्याकडे परतला. पण हुमायून गेल्यानंतर दीव पोर्तुगीजांच्या स्वाधीन केल्याबद्दल शहाला पश्चाताप झाला. त्याने पोर्तुगीजांचा किल्ला आणि बेट यामध्ये भिंत बांधायचे ठरवले. पण पोर्तुगीजांनी त्याला तसे करू दिले नाही. शहाने त्यांच्याविरूद्ध युद्ध पुकारलेआणि अहमदनगरचा निजाम, विजापूरचा आदिलशहा यांच्याकडे मदत मागितली. पण प्रतिसाद मिश्र होता. काहींनी त्याला पोर्तुगीजांशी मैत्रीचे संबंध ठेवण्याचा सल्ला दिला. पण यासंबंधात गव्हर्नरला भेटायला जात असताना पाण्यात

पडून त्याला मृत्यू आला. त्याच्यानंतर कोणी वारस नसल्याने दीव आयतेच पोर्तुगीजांच्या हाती आले.

इजिप्तच्या शहाने पोर्तुगीजांविरुद्ध गुजराथमध्ये सैन्य पाठवले. पण त्या खलाशांना दीवचा किल्ला भेदता आला नाही. गार्सिया याने पुन्हा या किल्ल्याची दुरूस्ती केली. नंतर दीव आणि किल्ला यांच्यामध्ये एक भिंत उभारण्यात आली. तसा करारही करण्यात आलेला ही होता. (इ. स. १५३९ मध्ये)

कॅस्ट्रोने १५४७ पर्यंत दीवचा पूर्णपणे ताबा घेतला. नंतर तो गोव्याला निघून गेला. इथून पुढे पोर्तुगीजांनी दीववर नियंत्रण ठेवले. यापुढचा दीवचा इतिहास म्हणजे गोव्यातील पोर्तुगीजांचाच इतिहास होय.

**दीवमधील लोक व लोकजीवन :–** शंभर वर्षांपूर्वी दीवची लोकसंख्या केवळ सात हजार होती. आज ती पन्नास हजारांच्यावर आहे. सुरूवातीला स्त्रीयांपेक्षा पुरूष जन्माचे प्रमाण अधिक होते. पण इ. स. १९३१ नंतर ते प्रमाण उलटे होऊन आता स्त्री जन्माचे प्रमाण अधिक आहे.

हिंदू, मुस्लिम, जैन, ख्रिश्चन अशा विविध धर्माचे लोक दीव बेटावर एकत्र राहतात. यात हिंदूंची संख्या अधिक आहे. बहुजन वैदिक संस्कारानुसार व इतरधर्मिय आपापल्या परंपरेनुसार सामाजिक जीवन आचरतात. येथे पोर्तुगीजांचा प्रभाव असला तरी घटस्फोटाचे प्रमाण फारसे नव्हते. पायल कंठी असे अलंकार स्त्रिया वापरीत. तर पुरूष धोती व लांबकोट वापरत असत. आता मात्र मुंबईप्रमाणेच स्त्रिया व पुरूष कपडे, दागिने इ. वापरताना दिसतात. ख्रिश्चनांची संख्या १–२१ या प्रमाणात म्हणजे नगण्यच होती. हे पोर्तुगीज भाषा बोलत. पण गोव्यापेक्षाही येथील ख्रिश्चन समाज अधिक एकवटलेला व सामाजिक दृष्ट्या स्थिर असा होता. समाजात वर्गवारी ही होतीच. नंतर यांच्यावर गुजराथी भाषेचा पगडा पडला.

दीवच्या लोकांचा पारंपारिक उद्योग शेती होता. औद्योगिक प्रगती फारशी झालेली नव्हती. समुद्रकिनारा असल्याने मासेमारी उद्योग प्रगत होता. हे बेट एकेकाळी व्यापाराचे केंद्र होते. आता येथून व्यापार मुळीच चालत नाही. दीवला 'पर्यटन' उद्योग सुद्धा म्हणावा तसा आता वाढत नाही. 'पर्यटन उद्योग' वाढीसाठी अधिक लक्ष देणे आवश्यक आहे.

दीव बेटावर असलेल्या विविध गावात सहा नावांचा समावेश होतो. १) बूचरवाडा २) दीव ३) फुदम ४) घोघला ५) सिम्बोर ६) वणाकबारा.

**दीव बेटावरील पर्यटन स्थळे :–**

**बूचरवाडा :– (Bucharwada)** दीव बेटावरील हे एक निसर्गसुंदर लहानसे गाव. ग्रामीण संस्कृतीचे जीवन अनुभवायचे तर येथे जायला हरकत नाही. दीव पासून या गावाचे अंतर ८ कि. मी. आहे. येथे वीज–पाणीपुरवठा या सोयी व्यवस्थित आहेत. भात, मासे, बाजरीची भाकरी असे खमंग जेवण छोट्या हॉटेलात किंवा घरगुती करून दिले जाते.

**नागोआबीच :–** (Nagoa Beach) निसर्गसौंदर्याने नटलेल्या या समुद्रकिनारी भेट द्यायची तर 'दीव' वरून गाडीने २० मिनिटांवर हा किनारा आहे. अत्यंत रमणीय असे हे स्थान आहे. आजुबाजूचा रस्ता नारळाच्या गर्द झाडांनी व्यापलेला आहे. हा समुद्रकिनारा बूचरवाड्या जवळच येतो. स्वच्छ, सुंदर, नितळ वातावरणात पसरलेला हा किनारा अर्धवर्तुळाकार असल्याने एका नजरेत सामावता येतो. किनाऱ्यावरील शांत वातावरणात मनाला मिळणारा सात्विक आनंद अवर्णनीय भासतो. समुद्रस्नान करणाऱ्यांना हा किनारा सुरक्षित व सोयीचा आहे. ५ ते ६ कि. मी. लांबीचा हा बीच आहे. किनाऱ्यावरील वाळू चिखल नसलेली रवदार व शुभ्र आहे.

**दीव किल्ला :– (Fort)** दीव बेटावर पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकांना या ऐतिहासिक किल्ल्याचे आकर्षण वाटते. या बेटाच्या किनाऱ्यावर किल्ल्याची उभारणी करण्यात आलेली आहे. इ. स. १५३५ ते १५४१च्या सुमारास पोर्तुगीजांनी हा किल्ला उभारला. गुजराथचा प्रमुख सुलतान बहादूरशहा याच्याशी तह करून हा किल्ला उभारण्यात आला. पोर्तुगीजांना संरक्षणाच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त असा हा किल्ला होता.

दगड–विटांनी बांधलेले भक्कम बुरूज, काही ठिकाणी भिंतींची सुळकेवजा व कमानी सारखी बांधणी आढळते. दोन पहारेकरी चौकीतून आपण किल्ल्यात प्रवेश करतो. आत गेल्यावर समोरच वर्तुळाकृती आकाराचा ब्लॅक ॲन्ड व्हाईट दीपस्तंभ आहे. किल्ल्याच्या तीन बाजूने समुद्र आणि एका बाजूने कॅनालचे पाणी आहे.

तत्कालीन तोफा बुरूजांच्यावर पहायला मिळतात. किल्ल्याची बांधणीपाहून मन मुग्ध होते. किल्ल्याच्या उंच भागी गेल्यावर सभोवताली क्षितीजाला स्पर्श करणाऱ्या महाकाय समुद्राच्या अथांगपणाची कल्पना येते. या किल्ल्याच्यापश्चिमेला 'दीव' वसलेले आहे. किल्ल्यात प्रवेश करताना उजवीकडील दरवाज्यावर दोन सिंहांची तोंडे कोरलेली आढळतात. नंतर बगीच्या असून त्याच्या मध्यावर वास्को–डी–गामाचा पुतळा आहे. त्याकाळात या किल्ल्यात १०,००० सैनिक रहात होते. किल्ल्यात अनेक गुप्त रस्ते आणि दरवाजे असून संकटाच्या प्रसंगी त्याचा वापर केला जात असे. पुढे दगडी चौकातून जिन्याने चढून गेल्यानंतर उंच बुरूजवजा भागाकडे 'लाईट हाऊस' आहे. येथून दीव बेटकिनारी वाळवंटात पडलेल्या एखाद्या लखलखीत शिंपल्या सारखे वाटते. लाईटहाऊस मधून आपण ओरडले तर मोठा प्रतिध्वनी ऐकू येतो.

**सेंट पाऊल चर्च :– (St. poul's charch)** सिव्हिल कार्यालयाशेजारी सेंट पाऊल चर्च हे भव्य व पूर्वीच्या वास्तूकलेचा उत्कृष्ट नमूना आहे. या चर्चला धार्मिक तसेच ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झालेले आहे. इ.स. १६०१ मध्ये या चर्चची बांधणी सुरू झाली ती तब्बल ९ वर्षे चालली. भव्यप्रांगणात ही जुनी चर्चची इमारत एकाकी उभी आहे. डाव्या हाताला चर्चचे प्रवेशद्वार आहे. मध्यभागी मोठे द्वार असून बाजूला दोन बंद खिडक्यावजा दारे दिसतात. दुसऱ्या मजल्यावर तीन खिडक्या त्यावर पारंपारिकपद्धतीचे बांधकाम आहे. उजव्या बाजूला खिडक्या–खिडक्यांची उंचच उंच इमारत पसरली आहे. आतल्या भागात बेंच असून मध्यभागी प्रवचनाची जागा आहे. गोव्याच्या बाम जिझस चर्चच्या पद्धतीने या चर्चची बांधणी केल्यासारखी वाटते. या चर्चमध्ये असलेले लाकडावरील कोरीव काम प्रेक्षणीय व कलेचा उत्कृष्ट नमुना आहे.

**दीव जेट्टी :–** दीवच्या समुद्रकिनाऱ्यावर 'जेट्टी' आहे. येथून समोर पाहिले की घोघला या निसर्गरमणीय गावाचे उत्कृष्ट दृश्य दिसते. 'पानीकोट' हा समुद्रातील किल्लापण या ठिकाणाहून दिसतो. जेट्टीकडे जाताना प्रथम एका दगडी दरवाज्यातून आत जावे लागते. तेथे एक मोठी घंटा टांगलेली आहे. या जेट्टीपाशी मिळणाऱ्या लहान बोटींत बसून 'घोघला' गावी जाता येते. जेट्टीला प्रवाशांसाठी सोळाखांबी छत (निवारा) उभारले आहे. व त्यात 'कालशेतचा' पुतळा आहे. धर्म जातीभेद न मानता

हा पारशी गृहस्थ येथे येणाऱ्या सर्वांना त्याकाळी मदत करत असे.

**पानीकोट :– Panikot** दीव बेटावरून दूरवर समुद्रात लाल मण्यासारखा दिसणारा किल्ला म्हणजे 'पानीकोट' होय. उसळणाऱ्या लाटांना रात्रंदिवस ऊन्हा–पावसात शांत, धीरगंभीर उभा असलेला हा लहानसा किल्ला दीव बेटाचा एक रक्षक म्हणून वर्षोनूवर्षे उभा आहे. किल्ला लहानअसला तरी एकेकाळी या ठिकाणी तीन–चार हजार विद्यार्थी एकत्र रहात असत.'अवर लेडी ऑफ चॅपेल' हे एक लहानसे चर्च पण यात आहे. दीव –घोघला किंवा जेट्टी या कोणत्याही ठिकाणाहून या जलदुर्गाचे दृश्य मनोहर दिसते.

**सोमनाथ मंदिर :– Somnath Temple** पंचोली विभागात मध्यभागी हे महादेवाचे मंदिर आहे. या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे देवाचा गाभारा आत खोलवर आहे. त्यासाठी अंदाजे ५० फूट खाली उतरावे लागते. उतरत असताना सहा शिवलिंगांचे दर्शन होते. व सर्वात शेवटी 'सोमनाथ' हेलिंग आहे. समोर नंदीची प्रतिमा आहे. शिंवरात्रीला येथे मोठी यात्रा भरते.

**जगदीश मंदिर :– Jagdhish Temple**

पंचोली विभागातच हे जगदीशाचे मंदिर आहे. या मंदिराच्या दाराशीच द्वारपालाच्या मूर्ती आहेत. वरती तपश्चर्या करणारे ऋषी आहेत. गर्भगृहाचा दरवाजा कोरीव काम केलेल्या दगडाचा आहे. त्या सिंहासनावर जगदीशाची मूर्ती आहे. कार्तिक महिन्यात येथे अन्नकुटाचा मोठा कार्यक्रम होतो.

**महालक्ष्मी मंदिर :– Mahalaxmi Temple** या मंदिरात कमळात बसलेली चर्तुहस्त महालक्ष्मीची संगमरवरी मूर्ती आहे. या ठिकाणी या देवतेचे प्रकाशित रूप म्हणून दीप प्रज्वलीत केला जातो. येथे नवरात्रात गरबा नाच मोठ्या प्रमाणात होतो.

**गंगेश्वर :– Gangeshwar**

समुद्राच्या जवळच दगडामध्ये हे शिवलिंग आहे, त्यास गंगेश्वरअसे म्हणतात. समुद्राच्या लाटा भरतीच्यावेळी उसळतात तेव्हा ह्या शिवलिंगाला समुद्रस्नान घडते. गाभाऱ्यात लिंगाच्या बाजूला नागराज कोरलेला आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भू-प्रवास

**कंकाईमाता :–**

समुद्र किनाऱ्यावरच हे मंदिर दगडात कोरलेले आहे. ह्या मंदिराच्या समोरील समुद्र किनाऱ्याला चक्रतीर्थ असे म्हणतात. कारण श्रीकृष्णाने सुदर्शनचक्र सोडून जलांदारास ठार केले ती जागा ही होय. अशी तेथे कथा सांगितली जाते.

**नवलखा पार्श्वनाथ मंदिर :–**

प्रमुख रस्त्याच्या उत्तर दिशेस हे मंदिर आहे. मंदिरात नवलखा पार्श्वनाथाची मूर्ती प्रमुख असून अन्य तीस मूर्ती पण आहेत. ह्या संगमरवरी मूर्तीला पूर्वी नऊ लाख रूपयांच्या दागिन्यांनी सजवत म्हणून ह्यास नवलखा असे नामाभिधान प्राप्त झालेले आहे.

**जामा मशिद :–**

गावातील बाजारात जामा मशिद उभारण्यात आलेली आहे. मशिदीसमोर जलाशय आहे. मशिदीवर सहा घुमट असून त्यांची बांधणी कलात्मक व आकर्षक आहे. ह्यात एकूण ८४ खांब असून एकेवेळी ५०० लोक तेथे नमाज पढू शकतात. बकरीईद, मोहरम इ. सणाच्या वेळी विशेष प्रार्थना व कार्यक्रम आयोजित केले जातात.

**दीव :–**

उत्तरेला २०°, ४३', ४५" अक्षांश ते पूर्वेला ७०°, ५९, १३" रेखांशावर दीव हे बेट वसलेले आहे. हे जिल्ह्याचे ठिकाण असून ह्या जिल्ह्याने जवळ जवळ १०.५ चौ.कि.मी. चा भाग व्यापलेला आहे. येथे वार्षिक सरासरी पावसाचे मान ७०.६ मि.मी. असून हवा थंड व कोरडी आहे. नाविक सोयी ह्या बेटावर उपलब्ध असून जवळचे रेल्वे स्टेशन 'देलवडा' हे आहे.

प्राचीन काळात दीव व्यापाराचे केंद्र असल्याने ह्यास पूर्वीचे जिब्राल्टर असे संबोधले जात असे. येथे मिठाचे उत्पादनही मोठ्या प्रमाणात होते. हे बेट शांत गंभीर निसर्गसुंदर असल्याने पर्यटकांचे माहेरघर बनलेले आहे.

**दीव येथील महत्त्वाचे फोन नंबर**

(S.T.D. नंबर 028758)

१) दीव पोस्ट व टेलिग्राम ऑफिस – 2122

२) घोघला पोस्ट ऑफिस – 2127

३) दीव कलेक्टर – 2125

४) दीव मामलेदार – 2125

५) दीव पोलिस – 2133

६) शिक्षणाधिकारी – 2199

७) आरोग्य – 2143

८) वीजकेंद्र – 2157

९) एक्साईज – 2204

१०) फायर स्टेशन – 2239

११) सेंट्रल बँक – 2154

केमिस्ट – मनिष मेडिकल स्टोअर (बाजार)

सिनेमागृह – आराधना

हॉस्पिटल – गव्हर्नमेन्ट हॉस्पिटल दीव

मेडिकल हॉस्पिटल, घोघला.

**दीव येथील प्रेक्षणीय स्थळे**

१) दीव फोर्ट

२) फार्ग्ट–दी–मार

३) गंगेश्वर टेंपल

४) नागावबीच

५) चक्रतीर्थ बीच ६) चंडिकामाता बीच

७) वनकबारा बीच ८) म्युनिसिपल गार्डन

९) हरकेश्वर टेंपल १०) हरिशीदमाता टेंपल

११) जगदीश टेंपल १२) सोमनाथ टेंपल

१३) शिवमंदिर १४) कालकामाता मंदिर

१५) हनुमान टेंपल १७) जामा मशिद

१८) करवामन मशिद १९) सेंट फ्रान्सिस असीसी

२०) सेंट पाऊल चर्च २१) चंद्रिकामाता टेंपल

बूचरवाडा – १) कलंगली माता मंदिर २) रामदेवी टेंपल

घोघला – १) हटकेश्वर टेंपल २) भूतनाथ टेंपल

***दीव येथील निवासस्थान – हॉटेल्स***

| हॉटेलचे नाव | रूम | दर | फोन नंबर |
|---|---|---|---|
| १) टुरिस्ट होस्टेल कॉम्प्लेक्स | डिलक्स | ४०० | 2212 |
| | AC | | |
| २) टुरिस्ट कॉटिजेस जलंधरबीच | ४ बेडस् | ३०० | |
| | डबलबेड | १७५ | |
| ३) पी.डब्लू.डी. गेस्ट हाऊस | डिलक्स | ३०० | 2163 |
| | ए.सी. | | |
| ४) फनक्लब | नॉन ए.सी. | ९५ | |
| ५) अपना गेस्ट हाऊस | ए.सी. डबलबेड | २२० | |

| | | | |
|---|---|---|---|
| | नॉन ए.सी. | १२० | |
| | डॉर्मेटरी | ८० | 2112 |
| ६) निलेश गेस्ट हाऊस | सिंगलबेड | ३० | 2319 |
| | डबलबेड | ६० | |
| | थ्री बेड | १२० | |
| ७) हॉटेल आशियाना | डबलबेड | १७० | |
| | पाच बेड | ३०० | |
| ८) हॉटेल सम्राट | डबलबेड ए.सी. | ४५० | |
| | डबलबेड | २०० | |
| | थ्री बेड | २५० | |
| ९) ह्रॉटेल अंकुर | डबलबेड ए.सी. | ४०० | |
| | डबलबेड | २०० | |
| | थ्री बेड | २५० | |
| १०) हॉटेल मोझँबिक | डबलबेड | ६० | 2223 |
| ११) प्रिन्स गेस्ट हाऊस | डबलबेड | ८० | 2265 |
| १२) हॉटेल आलिशान | डबलबेड | २०० | 2354 |
| १३) हॉटेल हरेकृष्ण हॉल | | ७५ | |
| | थ्री बेड | ६० | 2213 |
| १४) गंगासागर डबलबेड | | ८० | 2249 |

नागोबा बीच


१५) टुरिस्ट कार्यालय पत्ता :-


डिपार्टमेन्ट ऑफ टुरिझम दीव

फोन – 2212

पिन – 362520

# दमण




दमण
N
अरबी समुद्र
कोळक नदी
उदवाडा कडे
गुजरात
आश्रमशाळा
देवका बीच
दमण विमान तळ
मारवाड हॉस्पिटल
ग. कॉलेज
TV स्टेशन
जेटी
दमण
मिठागर
पुल
दमण गंगा नदी
सरकारी कचेरी
हॉटेल पंचरत्न
सोमनाथ मंदिर
वापी कडे
जामपोर बीच
कलाई नदी
आश्रमशाळा झारी

# दमण (Daman)

आकार : ७२ चौ.कि.मी.

लोकसंख्या : ५०,००० च्या वर

हवामान : उष्ण पण दमट २०° ते २६° सें.ग्रे.

पाऊस : १९० सें.मी

समुद्रसपाटीपासून उंची : १२ मीटर.

पर्यटकांचा मोसम : सप्टेंबर ते मे.

भाषा : गुजराथी, हिंदी, इंग्लीश, पोर्तुगीज.

**दमणला कसे जाल?**

रेल्वेने – मुंबई ते सुरत मार्गावर 'वापी' स्टेशनवर उतरावे. तेथून रिक्षा, टॅक्सीने दमणला पोहोचता येते.

मुंबईहून वापी स्टेशनवर थांबणाऱ्या गाड्या –

गुजरात एक्सप्रेस : ८.४०

फिरोजपूर जनता : १०.१५

सौराष्ट्र एक्सप्रेस : ११.१५

बरोडा पॅसेंजर : १३.१०

अहमदाबाद पॅसेंजर : १६.४५

सयाजीराव एक्सप्रेस : १७.४०

सौराष्ट्र जनता एक्सप्रेस : १९.३५

फ्लाईंग राणी : २०.४०

बलसाड पॅसेंजर : २१.४५

अहमदाबाद जनता एक्सप्रेस : २३.१६

डेहराडून एक्सप्रेस : १.१५

विरमगाव पॅसेंजर : ३.१५

विरारहून सुरतला जाणाऱ्या शटलने पण वापीला जाता येते. मुंबईहून दमणला कारने ५–६ तासांत जाता येते.

मुंबई – दमण : १९३ कि.मी.

सुरत – दमण : ८० कि.मी.

अहमदाबाद – दमण : १६७ कि.मी.

पणजी – दमण : ७८७ कि.मी.

(स्टेशन) वापी – दमण : १३ कि.मी.

दमण एक लहानसे बेट असून अतिशय रमणीय–सुंदर आहे. अजूनतरी तेथे निसर्ग जिवंत आहे. सिमेंटचे जंगल वाढलेले नाही. निळाशार समुद्र किनारा, हिरवीगार मखमल निसर्गाला शोभून दिसते. हा भाग शहर नाहीच. आहेत ती लहान गावे किंवा मोकळा प्रदेश. झाडी–झुडपे–गवत आणि भातशेतीचा असा हा भाग. येथे निसर्गरमणीय वातावरण तर आहेच पण पर्यटकांना हवी असलेली निरव शांतताही आहे. राहण्यासाठी समुद्र किनारी सुंदर सुंदर हॉटेल्स बांधलेली आहेत. भातशेतीत हॉटेल न वाटणारे कौलारू बंगले पाहिले की वाटते ग्रामीण भागाची संस्कृती अजूनही येथे जपून ठेवली आहे. पोर्तुगीजांनी मात्र राज्य केल्याच्या खुणा ठिकठिकाणी अजूनही गवसतात. भारतीय संस्कृती त्या पोर्तुगीज जीवनाशी एकरूप झालेली आहे.

आतातर तेथील भाषा, लोक, चालीरीती पाहिल्या की वाटते पोर्तुगीजांच्या बऱ्याचशा पाऊलखुणा पुसत चालल्या आहे. गुजराथ राज्याच्या सुरत जिल्ह्याची आणि दमणची जमीन एकमेकास लागून आहेत. गुजराथच्या दक्षिण किनारपट्टीच्या भागात हा केंद्रशासित भाग येतो. सह्याद्रीचा भाग यास लागून आहे. मधला भाग काळ्या सुपीक जमिनीचा आहे. किनारपट्टीचा भाग बेसाल्ट खडकांनी तयार झालेला आहे. सह्याद्रीतून उगम पावणाऱ्या नदीबरोबर जी माती वाहून येते, त्या मातीचा मैदानी भाग नदीच्या खोऱ्यात निर्माण झाला आहे. दमण जिल्हातर दोन नद्यांच्या दुआबात तयार झालेला जमिनीचा पट्टा आहे.

'दमणगंगा' ही नदी सह्याद्रीतून उगम पावते. ती दमणमधून वाहते. दमणगंगेने

दमणचे दोन भाग केलेले आहेत. एका भागाला "मोठे दमण" म्हणतात. हा दक्षिणेकडील भाग होय आणि उत्तरेकडील भागाला "न्हानी दमण" असे संबोधतात.

खरेतर 'दमण' हा शेतीचा प्रदेश पण पोर्तुगीजांनी आपले पाय रोवल्यावर या भागाला व्यापारी महत्त्व प्राप्त झाले. या ठिकाणी बहुतेक 'भातशेती' आढळते. खजूर, पाम, फळझाडे इत्यादी शेती उत्पादन येथे होते. २०° ते २५° उत्तर अक्षांश ते ७२°–५५° पूर्व रेखांशावर असलेल्या दमणचे हवामान दमट असलेतरी आनंददायी आहे. मार्च ते मे या ठिकाणी उन्हाळा जाणवतो. आग्रेय मान्सून वाऱ्यापासून जून–सप्टेंबर येथे पाऊस पडतो. ऑक्टोबरचा उष्मा सोडला तर नोव्हेंबर ते फेब्रुवारी हा सिझन पर्यटकांना चांगलाच असतो. मे महिन्यात दुपारी ऊन असले तरी सायंकाळी समुद्रावरचा गार वारा वाहू लागला की वातावरण मुग्ध होते. ऑक्टोबर नंतरच्या रात्रीत गारवा वाढू लागतो. कधी कधी थंडीची लाट आलीतर येथील उष्णतामान ७ डिग्री पर्यंत खाली उतरते. समुद्राच्या सानिध्यामुळे येथील हवेत दमटपणा सदोदीत जाणवतो. मान्सून काळात ८० टक्क्याच्यावर 'ह्युमिडीटी' असते. नोव्हेंबर ते मार्च पर्यंतची हवा मात्र कोरडी असते. मान्सूनमध्ये हवामान सदोदीत ढगाळलेलेच आढळते. उन्हाळ्यात वादळी हवा जाणवते. ईशान्य वा आग्नेयकडून वारे वाहतात. मान्सून नंतर म्हणजे ऑक्टोबर–नोव्हेंबर मध्ये दमणमध्ये झंझावाती वारे किंवा पाऊस जाणवतो.

येथील ३६३६ हेक्टर जमिनीवर पिके होतात तर ७३५ हेक्टर जमिनीवर कॅशक्रॉप–व्यापारी पिके घेण्यात येतात. समुद्रकिनारपट्टीची जमीन रेताड व काही ठिकाणी लहान–मोठ्या टेकडयांची आहे. काही जमीन पाणथळ, चिखलाचीपण आहे. टेकड्या, उतार वगैरे भाग हिरव्या गवताने व झुडपांनी व्यापले आहेत. नारळाच्या बागा ठिकठिकाणी लावण्यात आल्या आहेत.

'दमण' हा भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील भाग असून त्यास १२ कि.मी. चा किनारा लाभला आहे. त्यामुळे मासेमारीचा मोठा उद्योग येथील लोकांना लाभला आहे. हा गवताळ प्रदेश असल्याने या प्रदेशात सापांचा आणि नागांचा सुकाळ आहे.

विविध जातींचे, विषारी, बिनविषारी साप येथे आढळतात.

# दमणचा इतिहास

भारताला स्वातंत्र्य मिळाले तरी गोवा, दीव आणि दमण पारतंत्र्यातच होते. १९६१ पर्यंत येथे पोर्तुगीज कॉलनीच होती. १९६१ मध्ये गोव्याबरोबर दीव–दमण वरचे पोर्तुगीजांचे वर्चस्व संपले आणि त्याचा केंद्रशासित प्रदेश करण्यात आला. नंतर गोव्याचा विस्तार लहान असल्याने आर्थिकदृष्ट्या व राज्यकारभाराच्या दृष्टीने दोन्ही ठिकाणांना स्वतंत्र्य राज्याचा दर्जा देणे कठीण आहे. एकतर ती राज्ये केंद्रशासित राहून स्वतंत्र राहतील पण त्यामुळे त्यांचा विकास होणे कठीण किंवा कालांतराने हा भाग शेजारच्या राज्यात विलीनही होईल, पण ह्या सर्व गोष्टी तेथील लोकमतावर अवलंबून असतील. परकीय सत्तेच्या शृंखलांनी जखडल्यापासून त्यांचा आर्थिक विकास खुंटला आहे. तो सहिष्णु व्हावा म्हणून जनतेने व केंद्राने तसेच शेजारच्या राज्यांनी त्यांना मदत करून सर्वांगाने त्यांचा विकास घडवायला हवा.

# प्राचीन इतिहास

इ.स. २ ऱ्या शतकाच्या पूर्वीपासून १३ व्या शतकापर्यंत या भागाला 'लता' असे संबोधित. कोकण किंवा अपरांत राज्याचा हा सातवा भाग मानला जात असे. इ.स. पूर्व २७४ ते २३६ सौराष्ट्रात गिरनार येथे सम्राट अशोकाचा जो शिलालेख सापडला, त्यात लता/दमण भागाचा अशोकाच्या राज्यात समावेश होता. असा उल्लेख आहे.

मौर्यांची सत्ता दमण भागावर होती. ही सत्ता लयाला गेल्यानंतर 'शुंग' घराण्याचे राज्य त्या ठिकाणी प्रस्थापित झाले. यावेळी दक्षिणापथात 'सप्तवाहन' घराण्यात 'सातकर्णी' (पहिला) राजा झाला. त्यावेळी दमणचा प्रदेश सातकर्णी राजांच्या अधिपत्त्याखाली होता. इ.स. पूर्व २ ऱ्या शतकात सातवाहनांची सत्ता संपुष्टात आल्यावर इ.स. पूर्व पहिल्या शतकाच्या कालखंडात 'शक' घराण्याची सत्ता दक्षिण गुजराथ पर्यंत पसरली होती. त्यावेळी त्यांचे सत्ता केंद्र ''उज्जैनी'' येथे होते.

१ल्या शतकात 'कुशाण' साम्राज्यात विभागीय प्रमुख म्हणून 'क्षत्रपांचे' राज्य

दमणवर होते. क्षत्रपराजे 'भूमक' आणि 'नाहपान' यांची नाणीपण तेथे सापडली आहेत. पूर्वी गुजराथसह दमणमधील नद्यांना–डहाणूक, दमण, एराडा, तापी अशी नावे होती. तीच प्रादेशिक झाली. त्यावेळी बराचसा प्रवास नद्यातून होत असे. तसेच व्यापारही नद्यांद्वारेच होत असे.

त्या काळात नाशिक येथे राजा 'अभिराचे' राज्य होते. त्याने सातवाहनांचा पराभव करून आपले राज्य दमणपर्यंत वाढवले होते. 'अभिर' घराण्याचे राज्य इ.स. ४०० पर्यंत असावे. पण त्या आधी इ.स. २४९ पर्यंत क्षत्रप राजा 'रूद्रदामन' यानेपण या ठिकाणी आपली सत्ता मधल्या काळात दमणच्या भागापर्यंत वाढवली होती. अभिर राजा 'ईश्वरसेन' याने दख्खनचा पश्चिमेकडील प्रदेश आपल्या ताब्यात घेतला. याने स्वतःच्या नावाने 'शक' स्थापन केला आणि १००० वर्षापर्यंत ती शकगणना सुरू होती. या शतकालाच 'कलचुरी' किंवा 'चेडी संवत्' म्हणतात. हा शक इ.स. २४८ मध्ये सुरू झालेला होता.

'महाराजेंद्रवर्मन' या राजाचा मुलगा 'रूद्रगण' याची चांदीची नाणी दमण भागात सापडली आहेत. त्याचे राज्य कऱ्हाड–साताऱ्या पर्यंत पसरले असावे. ५ व्या शतकात दमणचा भाग त्रैकुटकांच्या ताब्यात होता. सुरत आणि दमण भागात त्यांची पण नाणी सापडली आहेत. त्यात शिलालेखाचाही समावेश आहे. 'त्रैकुटक' हे अभीर राजांचे मांडलीक होते. 'त्रैकुट' म्हणजे तीन पर्वत शिखरे. 'त्रैकुट' घराण्यात पहिला राजा 'महाराजा इंद्रदत्त' हा होता. 'दाहरसेन' राजाची नाणी सुरत आणि दमण मध्ये सापडली आहेत. 'पारडी' या ठिकाणी सापडलेल्या शिलालेखात त्याने अश्वमेघ यज्ञ केल्याचा उल्लेख आहे. अभिरानंतर त्याने स्वतःचे राज्य प्रस्थापित केले होते. तो वैष्णव असून निःस्सीम विष्णुभक्त होता. इ.स. ४४० ते ४५८ पर्यंत तो सत्तेवर असावा. त्यानंतर त्याचा मुलगा 'व्याघ्रसेन' गादीवर आला. त्याने ४६५ ते ४९२ पर्यंत राज्य केले.

वाकाटक राजा 'हरीसेन' याने त्रैकुटकांचे राज्य नाहीसे केले. अजंठा लेणीत या विषयी उल्लेख आहे. इ.स. ५ व्या शतकाच्या शेवटी इंदोर जवळ 'मदिषमती' येथे कलचुरींचे राज्य उदयास आले. ६ व्या शतकापर्यंत कलचुरी राजा 'कृष्णराजा' याची

गुजराथ व दमणमध्ये सत्ता होती त्याच्या नंतर त्याचा मुलगा 'शंकरगण' याने इ.स. ५५७ ते ६०० पर्यंत राज्य केले. त्यानंतर 'बुद्धराज' आला पण इ.स. ६०९ च्या सुमारास बहामीच्या चालुक्यांनी त्याचा पराभव केला.

इ.स. ६१० मध्ये दुसरा पुलकेशी याने गुजराथ (लता), रेवती द्वीप (गोव्यासह) व इतर प्रदेश 'सत्यामय' आणि इंद्रवर्मनच्या ताब्यात दिले होते. इ.स. ६४३ मध्ये चालुक्य राजा 'विजयवर्मराज' याने तो प्रदेश आपल्या ताब्यात घेतला.

बहामीच्या चालुक्य घराण्यातील 'विक्रमादित्य' (पहिला) यास त्याच्या वडीलबंधूने भारताच्या उत्तरेकडील व वायव्येकडील सत्ता वाढविण्यासाठी मदत केली. इ.स. ६१७ च्या सुमारास दमणसह लता प्रदेशावर राज्यकारभार पाहण्यासाठी त्याने अधिकाऱ्यांची नेमणूक केली. त्यानंतर इ.स. ६७१ – ६९२ शिलादित्य, इ.स. ६८१ – ७३१ जयश्रय, इ.स. ७३९ अवनीजश्रय यांना 'लता' किंवा 'नवसारी' चे 'चालुक्य' असे संबोधित. दख्खनच्या प्रदेशात ते बहामीच्या चालुक्यांचे मांडलीक म्हणून राज्यकारभार पहात असत.

राष्ट्रकूट घराणे – इ.स. ७५७ ते ७७५ पर्यंत दमणचा भाग मालखंडच्या राष्ट्रकुटांच्या ताब्यात होता. राष्ट्रकूटांचे एक घराणे गुजराथ मध्ये राज्य सत्ताधीश होते. गुजराथ मध्ये राज्य करणाऱ्या राष्ट्रकूट राजाचे नाव 'पहिला कर्कराजा' असे होते. नवसारीच्या चालुक्य घराण्यातील राजकन्येशी कर्कराज घराण्यातील राजपुत्राने विवाह केल्याचा उल्लेख आढळतो. दंती दुर्गाने इ.स. ७४७ पासून स्वतःचे राज्य स्थापन केले. तेच दखखनवरील 'मालखेड' होय.

'लता' या प्रदेशावर मालखेडच्या राष्ट्रकुटांची इ.स. ८०८ मध्ये सत्ता होती. दंती दुर्गानंतर इ.स. ७५७ ते ७९५ कृष्ण आणि गोविंद हे अनुक्रमे राज्य करीत होते. इ.स. ८२६ मध्ये 'लतामंडलावर' गोविंद आणि दुसरा ध्रुव यांची सत्ता होती. इ.स. ८३५ मध्ये 'कर्क' सत्ताधिश झाला. इ.स. ८६७ मध्ये अकलवर्षाच्या हाती सत्ता गेली. ८७० पर्यंत ध्रुव (दुसरा) राज्यावर असल्याचा उल्लेख आढळतो. इ.स. ८८८ मध्ये राष्ट्रकुटांचे मांडलीक 'शीलाहार' (हे उत्तर कोकणातील) यांनी सत्ता हाती घेतली.

इ.स. ९७३ मध्ये कल्याणीच्या चालुक्यांनी 'लता' प्रदेश जिंकून तो 'बारप्पा' च्या हाती सोपवला. 'बारप्पां'ना लता देशाचा राजा संबोधले जात असे. इ.स. १०१८ मध्ये कीर्तीराज, १०१५ मध्ये संजनन, १०७७ मध्ये त्रिविक्रमपाल राज्यकारभार सांभाळीत होते. त्यांना निंबार्क चालुक्य असे म्हणत. त्याच्या राज्याचा विस्तार तापी – दमणगंगा पर्यंत होता. सुरतजवळ 'नंदपुरी' येथे डोंगराळ भागात या राज्याची राजधानी होती. त्रिविक्रमपालाचे राज्य इ.स. १०९० पर्यंत होते. चालुक्य राजा 'कर्ण' याने त्रिविक्रमपालाचे राज्य जिंकून घेतले (इ.स. १०७४) पण ते त्याने पुन्हा परत मिळविले. त्या दोघांचे बरोडा जवळील विश्वामित्र नदीजवळ युद्ध झाले होते. हे राज्य चालुक्य सम्राट विक्रमादित्य (सहावा) याच्या अधिपत्याखाली इ.स. १०७६ ते ११२७ पर्यंत होते.

कल्याणीच्या चालुक्यांचा मांडलीक नाशिक जवळील चांदोर येथील यादव सिंहराज याने (इ.स. ११०५ ते इ.स. ११२०) गुर्जरांचा पराभव करून 'लतामंडल' हस्तगत केल्याचा उल्लेख आहे. इ.स. ११२७ ते ११३७ सोमेश्वर आणि इ.स. ११३७ ते ११५२ जगदेकमल यांनी अनुक्रमे सत्ता उपभोगली. कल्याणीच्या चालुक्यांची सत्ता (११५२ ते ११६३) लयाला जात होती. इ. स. ११६० मध्ये गुजरात चालुक्यांचा सेनापती 'अंबड' याने कल्याणी चालुक्यांच्या मल्लीकार्जुनाचे राज्य नष्ट केले. कल्याणीच्या चालुक्यांच्या पराभवानंतर दख्खनमध्ये देवगिरी येथे इ. स.११८७ मध्ये यादवांनी आपली सत्ता प्रस्थापित केली. अनहिलवाडचा राजा– भीमदेव हा दिल्लीचा सुलतान – 'कुतुबुद्दीन ऐबक' याच्याशी लढतअसताना (इ. स. ११९७) परमार राजा 'शुभतवर्मन' याने लता प्रदेशाची सत्ता काबीज केली. इ. स. १२१० ते १२१७ पर्यंत त्याचा वारस 'अर्जुन वर्मन' हा राज्यकरीत होता. इ. स. १२२७ मध्ये यादव घराण्यातील सत्ताधीश 'सिंघाणा' याने अर्जुनवर्मनचा पराभव केला. यादवांनी भडोच पर्यंतचा प्रदेश घेतला. या काळात लतामंडलचा दक्षिण भाग 'दमण' देवगिरीच्या यादवांच्या ताब्यात होते. इ. स.१२३२ मध्ये सिंघाणा आणि अनहीळवाड यांच्यात अनाक्रमणाचा करार झाला होता.

तेराव्या शतकात रजपूत 'रामशाह' हा उदयपूरची पारंपारिक संपत्ती गेल्याने

नशीब काढण्यासाठी दक्षिणेत उतरला आणि 'दमण' जवळ 'अशेटी' येथे इ. स.१२६२ मध्ये त्याने आपली सत्ता स्थापित केली. इ. स. १२९५ मध्ये त्याचा मुलगा सत्ताधिश झाला. त्याचवेळी दिल्लीचा सुलतान 'अल्लाउद्दीन खिलजी' याने देवगिरीच्या यादवांचा आणि अनहीळवाडच्या चालुक्यांचा पराभव केला. रजपूत शाह घराण्याचे राज्य मात्र त्या थोडाशा प्रदेशात होतेच. राजधानी मात्र नगरहवेलीहून नगरपत्तापूरला हलविण्यात आली. धरमशाहचे राज्य तर ठाणे जिल्ह्यातील जव्हारपर्यंत होते. १४ व्या शतकात दमण ते माहीम पर्यंतचा किनारा रामनगरच्या सत्ताधिशांच्या हातात होता.

इ. स. १४६५ मध्ये महंमदशहा बेगडा याने 'पार' नदीवरील किल्ला पारनेरा आणि दमण बंदर काबीज केले. जगतशाह कडून खंडणी वसूल केली. त्याचा वारस नरनशाह याने १४७० ते १५०० पर्यंत तर धरमशाह (दुसरा) याने १५००ते १५३१ पर्यंत तेथे अधिकार गाजवला. या साठ वर्षांच्या काळात गुजरात दख्खनमध्ये आजु–बाजूला मुस्लिम सत्ता पसरली होती. पण दमणच्या सत्तेशी त्यांचा संघर्ष झाला नाही.

इ. स. १४९८ मध्ये पोर्तुगीज कालिकत बंदरात आले. इ. स. १५१० मध्ये त्यांनी गोव्यात आपली सत्ता स्थापन केली. इ. स. १५५३ मध्ये पोर्तुगीजांनी दमणची सत्ता आपल्या ताब्यात घेतली. रामनगरला प्रमुख 'राजा जयदेव' याने पोर्तुगीजांशी तह करून त्यांच्या अटी मान्य केल्या.

इ. स. १५२३ मध्ये दमणची प्राथमिक माहिती पोर्तुगीजांना मिळाली. त्यांना दमण मिळविण्यासाठी अनेक वेळा स्वाऱ्या कराव्या लागल्या. १५५९ च्या तहाने त्यांना तेथे आपला जम बसविता आला. १५५९ मध्ये त्यांनी पहिला हल्ला चढवून बंदरात आगी लावल्या.

इ. स. १५३१ मध्ये दमणवर दुसरा हल्ला चढवला. त्यामुळे दमण उध्वस्त होऊ लागले. १५३३ मध्ये त्यांनी पुन्हा हल्ल्याची योजना आखली. ४० जहाजे आणि ५०० सैनिकांसह हल्ला चढवला. दमणच्या किल्ल्यालाच भगदाड पाडले. गुजराथचा शहा आणि पोर्तुगीज यांच्यात अनेकवेळा तह झाले. त्यावेळी वसई आणि दीव त्यांच्या

ताब्यात आल्याने दमणकडे त्यांचे काही काळ फारसे लक्ष नव्हते. पण वसईच्या संरक्षणासाठी त्यांना दोन दशकानंतर दमणची आवश्यकता भासू लागली.

इ. स. १५५६ मध्ये त्यांनी गुजराथच्या शहाकडे दमण विषयी बोलणी करण्यासाठी प्रतिनिधी पाठवला. दीवच्या मोबदल्यात काही रक्कम घेऊन शहा दमणवर पाणी सोडण्यास तयार होता.

दमण शहर आणि किल्ल्याच्या बाबतीत अनेकदा बोलणी झाली पण पोर्तुगीजांच्या हे लक्षातच आले नाही की बळाचा वापर केल्याशिवाय दमण मिळणे कठीण आहे. दमणचा कॅप्टन 'ॲबेसिनियन' प्रमुख होता. त्याच्या हाताखाली ३०००सैनिक होते. अहमदाबादच्या राजाच्या आज्ञा तो पाळीत नसे. वारस राजा वयाने लहान होता. शहाकडून पोर्तुगीजांना त्यावेळी कळविण्यात आले की ॲबेसिनियन प्रमुखाचा बंदोबस्त केल्यास दमण त्यांना देण्याचा विचार करण्यात येईल. पुढे ॲबेसिनियन प्रमुखाला पोर्तुगीजांसमोर माघार घ्यावी लागली.

इ. स. १५५९ मध्ये त्यावेळचा गव्हर्नर कॅस्टंटिनो ब्रागन्झा १०० जहाजासह व सैन्यासह दमणवर चालून गेला. इकडे ॲबेसिनियन सत्ताधिशाने अन्नधान्य व दारूगोळा यांची साठवण केली होती. पण पोर्तुगीजांनी हिमतीने दमणवर पाय रोवला. त्यांना फारसा विरोध झाला नाही. त्यांनी शहर आपल्या ताब्यात घेतले. पारनेरा किल्ल्यातून ॲबेसिनियन विरोध करीत होता पण तेथूनही त्याला हलविण्यात आले. गव्हर्नर काही दिवस दमणमध्येच राहिला. तेथे नवीन किल्ला उभारण्याची तयारी करून तो गोव्याला गेला. त्याने कॅप्टन दिओगोसह १२०० सैन्य दमणला मागे ठेवले.

यानंतरचा दमणचा इतिहास गोव्याच्या इतिहासात विलीन झाला कारण 'गोवा'हे पोर्तुगीजांच्या सत्तेचे मध्यवर्ती केंद्र होते. गोव्यात इ. स. १५७५ मध्ये कंकळलीकरांचे बंड झाले. इ. स. १६०० मध्ये भारतात ब्रिटिशांनी 'ईस्ट इंडियाकंपनी'ची स्थापना करून पोर्तुगीजांशी स्पर्धा आरंभली. इ. स. १६६७ मध्ये 'डिचोली' जवळ शिवाजी राजे येऊन पोहोचले. नंतर १६८३ मध्ये संभाजीने बरेच

दुवे घेतले. १७८८ ते १७९१ या काळात पेडणे, डिचोली, सांखळी, फोंडा. पंचमहल, काणकोण इत्यादी पूर्णपणे पोर्तुगीजांच्या ताब्यात गेले.

इ. स. १८३९ मध्ये गोव्यातील तरूण वर्गाने जबाबदार राज्य पद्धतीची पहिली मागणी केली. इ. स. १८५६ मध्ये राज्यांनी बंड केले. इ. स. १९१० मध्ये पोर्तुगालमध्येच लोकशाही स्थापन झाली. १९३२ सालाझार पंतप्रधान झाला. यावेळी व्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आली. इ. स. १९४६ मध्ये म. गांधींच्या 'हरिजन'मधून गोवा लढ्याला पाठिंबा मिळून 'आझाद गोमांतक दलाची' स्थापना झाली. कॉंग्रेस तर्फे सत्याग्रह सुरू झाला. इ. स. १९५४ मध्ये 'गोमांतक दल' आणि स्वयंसेवकांचे प्रवेश करताच पोर्तुगीज सेना 'सिल्व्हासा' येथे शरण आली. त्याचवेळी 'नगरहवेली' भारतात विलीन करण्याची मागणी करण्यात आली. १५ ऑगस्ट १९५५ ला 'गोवा विमोचन समिती' तर्फे गोवा–दीव–दमण भारतात स्वयंसेवकांनी प्रचंडमोर्चे निघाले. इ. स. १९५५ मध्ये भारताने पोर्तुगालशी राजनैतिक संबंध तोडले.१९५७ ते १९६० हा संघर्षाचा काळ होता. १९६० हेग कोर्टाचा निकाल लागला. १९६१ साली भारतीय जवान मांडवीपर्यंत पोहोचले. ज. चौधरी यांनी भारतीय ध्वज सचिवालयावर फडकविला.

१९ डिसेंबर १९६१ साली गोवा–दीव–दमण पोर्तुगीजांच्या जोखडातून मुक्त होऊन भारतीय संघराज्यात विलीन झाले.

**लोक**

दमण मध्ये हिंदू, मुस्लिम, खिश्चन, शीख, जैन, पारशी आणि इतर असे विविध जाती–धर्माचे व भाषेचे लोक रहातात. येथे प्राचीन काळापासून मागासजाती–जमातींची पण वसाहत आहे. येथे हिंदू लोकांप्रमाणे पहिल्या मुलाचा जन्म आईच्या माहेरीच होतो. तसेच नाव ठेवणे, जावळ, उपनयनादि समारंभही होतात. एकत्र कुटुंब पद्धती अजूनही येथे रुढ आहे. येथे विवाह हा एक संस्कार मानला जातो. सगोत्र विवाह होत नाहीत. देसाई–पार्टीशर यांच्यात पूर्वी हुंडापद्धती होती. 'दोढीया' यांच्यात मुलाच्या वडिलांना पूर्वी काही वधुदक्षिणाही दिली जात असे. मद्यपान मात्र सगळीकडे सर्रास रुढ आहे, त्यास प्रतिबंध नाही. काही स्त्रिया ताडी पण पितात.

स्त्रिया फारशा न शिकलेल्या, घरगुती कामात गर्क असल्या तरी त्यांना समाजात श्रेष्ठ मानतात. येथील घरे कौलारूच आहेत. येथे दिवाळी, होळी, रक्षाबंधन इ. सण साजरे होतात. हिंदू–मुस्लिमांनंतर दमणमध्ये खिश्चनांचा क्रमांक लागतो. एकूण लोकसंख्येच्या ६/७ टक्के खिश्चन लोक आहेत. पोर्तुगीजांची पार्श्वभूमी लाभल्याने त्यांच्या सवयी खिश्चनांमध्ये आढळतात. पण दमणमधील खिश्चन कोकणीच बोलतात. दमणमधील बरेचसे लोक गुजराथी भाषा बोलतात. खिश्चन श्रीमंत नसले तरी त्यांच्या प्रॉपर्टीज आहेत. खिश्चन लोक जाती भेद मानीत नाहीत. आधुनिक पद्धतीने राहण्याचा ते प्रयत्न करतात. मद्य–गाणे त्यांच्या आवडत्या गोष्टी आहेत.

या ठिकाणच्या लोकांचा प्रमुख उद्योग शेती. काही लोक पोल्ट्रीचापण उद्योग करतात. लघुउद्योगाला येथे प्राधान्य आहे. फर्निचर, मद्योत्पादन, प्लॅस्टिक, साबण, प्रिंटिंग, तयार कपडे, सुगंधी द्रव्ये इत्यादी उत्पादनाकडे लोक वळले आहेत.

**शिक्षण**

शिक्षणाचा म्हणावा तसा प्रसार दमण भागात झालेला नाही. सर्व ग्रामीण भागाच्या थरापर्यंत उच्चशिक्षण पोहोचलेले नाही. सरकार प्राथमिक शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देत आहे. शिक्षणाचे माध्यम गुजराथी आणि इंग्रजी भाषा आहे. तांत्रिक शिक्षणाचा हळूहळू प्रसार होत आहे.

**दमण – एक भ्रमण.**

दमणचे दोन भाग आहेत. एक ''नानी दमण'' म्हणजे लहान दमण आणि दुसरा''मोती दमण'' म्हणजे मोठे दमण. पण आजतरी मोठ्या दमणपेक्षा लहान दमणचाच अधिक विकास झाल्यासारखा वाटतो. दमणगंगा नदीने दमणचे दोनभाग केले आहेत. हे पोर्तुगीज काळापासून आहे. या नदीमुळे झालेल्या दोन भागांपैकी उत्तरेकडचा दमणचा जो भाग तोच ''मोती दमण'. दमणगंगा नदीला मांडवी वा जुआरी नदीसारखे भव्य पात्र किंवा जलप्रवाहाची समृद्धता नाही. ती मातीने गढूळलेली वाटते. पावसाळ्यात मात्र तिला भरपूर पाणी असते. ही नदी आग्नेय दिशेकडून वहात येते व अरबी समुद्राला पश्चिमेकडे मिळते. दमण भागातून 'भगवान' आणि काळू या दोन नद्यापण वाहतात. दमणगंगा नदीच्या काठीच 'दमण' हे बंदर आहे.

दोन्ही दमणला जोडणारा एक ब्रीज आहे. आता पूर्वीचा किल्ला शिल्लक नसला तरी बुरूज,भिंत व प्रवेशद्वार पाहिले की किल्ल्याची भव्यता कळते. दमणगंगेच्या काठी दोन किल्ले आहेत. ''मोती दमण–दुर्ग'' लहान आहे पण ''नानी दमण–दुर्ग'' भव्य आहे. 'मोती दमण' भागात कचेऱ्या, चर्च, लाईटहाऊस वगैरे आहेत. 'नानी दमण' भागात मार्केट, हॉटेल्स, रेस्टॉरंट, जैनमंदिर, देवका बीच, जाम्पोर किनारा, वगैरे बघायला मिळते.

**पर्यटकांचे दमण**

निसर्ग सौंदर्याने नटलेले, शांत वातावरण, खळाळणारे समुद्र किनारे,हिरवळीची झालर लावलेले निरव शांततेचे रस्ते आणि नारळी पोफळीच्या शांत–शीतल परिसरात विसावणारी निवासस्थाने हे पर्यटकांचे आकर्षण असते आणि दमणमध्ये या गोष्टी उपभोगायला मिळतात म्हणूनच पर्यटक मुंबईला जवळ असणाऱ्या 'दमण' या निसर्ग रमणीय बेटाकडे श्रांत होण्यासाठी गर्दी करतात.

**दमणमध्ये काय बघाल!**

१) देवका बीच ४ कि. मी. नानी दमण

२) जाम्पोर बीच ६ कि. मी. मोठी दमण

३) काचीगम वॉटर टँक

४) धोबी तलाव टँक

५) हाथी बाग पार्क

**मोटी दमण मधील प्रेक्षणीय स्थळे :–**

१) जेट्टी गार्डन

२) ब्रीज साईड गार्डन

३) पारगोला गार्डन

४) हिलसा अक्वेरियम

५) किल्ला

६) लाईट हाऊस

७) बॉब जेरीस चर्च

८) अवर लेडी ऑफ रोझरी चॅपल

९) अवर लेडी ऑफ सी चर्च

१०) योगेश्वर टेंपल

११) जुम्मा मशीद

**नानी दमणमधील प्रेक्षणीय स्थळे :–**

१) नानी दमण बीच

२) म्युनिसिपल चिल्ड्रन पार्क

३) बांदोडकर चिल्ड्रन पार्क

४) किल्ला

५) सोमनाथ मंदिर

६) राम मंदिर

७) सत्यनारायण मंदिर

८) विश्वकर्मा मंदिर

९) जैन डेरासर

१०) फारशी फायर टेंपल

११) खोजा खाना

१२) जुम्मा मशीद–खारीवाड

१३) झामाबार मशीद

१४) अवर लेडी ऑफ सी चर्च

**दमणमधील लहान गावांची नावे :–**

१) भामटी २ कि. मी.
२) भीमपोर ५ कि. मी.
३) डाभेल
४) दमण
५) दमण वाडा २ कि. मी.
६) देयका ५ कि. मी.
७) दुनेढा ३ कि. मी.
८) जंपोर ५ कि. मी.
९) जरीवांकड ७ कि. मी.
१०) कचीगाम
११) ढोळर ३ कि. मी.
१२) देवकापारडी ४ कि. मी.
१३) मगरवाडा ४ कि. मी.
१४) मरवड ३ कि. मी.
१५) नायला पारडी ४ कि. मी.
१६) पल्हीत २ कि. मी.
१७) पटीयारी ६ कि. मी.
१८) थानापारडी ५ कि. मी.
१९) झरी ७ कि. मी.
२०) वरकुंड ३ कि. मी.

## दाभेळ (Dabhul)

हे एक लहानसे गाव आहे. या गावाच्या जवळचे शहर वापी. दमण जिल्ह्यातच हे गाव येते. जवळ–जवळ ७०० ते१००० हेक्टर जमीन याने व्यापली आहे. येथे पाहण्यासारखे स्थळ आहे सोमनाथ मंदिर.

## सोमनाथ मंदिर (Somnath Temple)

औद्योगिक वसाहतीच्या बाजूला सोमनाथ मंदिर आहे. सभोवताली निसर्गरमणीय वातावरण आहे. या मंदिराच्या प्रवेशद्वारावर रंगी–बेरंगी काचा आणि काचेवर म्हणा किंवा आरशांवर देवदेवतांची चित्रे आहेत. या मंदिराचा सभामंडप भव्य आहे. या मंदिरात शिवलिंग आहे. त्यासच सोमनाथ असे म्हणतात. हे शिवलिंग

स्वयंभू मानले जाते. गर्भगृहावर घुमट आहे. सभामंडपात गणपती व मारूतीचेपण दर्शन घडते. महाशिवरात्रीला या मंदिरात मोठा उत्सव होतो. सोमनाथाला महाभिषेक केला जातो.

**दमण (Daman)** उत्तर अक्षांश २०°–२४° आणि पूर्व रेखांश ७२°–५०° मध्ये दमण वसले आहे. पंचवीस वर्षांपूर्वी ५ कि. मी. परिसरात वसलेले हे शहर आता चांगलेच विस्तारित झाले आहे. येथील लोकसंख्याही वाढलेली आहे.

मुंबई ते वापी रेल्वेने जाऊन तेथून ५/६ तासात आराम–टॅक्सीने दमणला पोहचता येते. जंपोरी, दमण कॅम्प, मोठी दमण, खारीवाडी, काथिरिया इत्यादी भाग दमण नगरपालिकेत मोडतात. येथे २००० मि.मि. च्या वर पाऊस पडतो. आणि उष्णतामान ३२° सें. ते –२०° सें. या दरम्यान असते.

पोर्तुगीजांच्या काळात उत्तरेकडील नानी दमणला परगणा कोलना पावोरो (खलाडे–पावडी) म्हणजेच 'दामाओ पेक्वीनो' म्हणत, तर दक्षिणेकडील मोठी दमणला 'दामाओ ग्रँडे' म्हणत. दमणगंगा नदीला 'संदळकाळ' म्हणत. या नदीने दमण दुभागले आहे.

**मोठी दमणमध्ये खालील स्थळे बघण्यासारखी आहेत:–**

**बॉम जीझस चर्च – (Bom jesus church)** बॉम जीसस हा प्रसिद्ध ख्रिश्चन संत. त्याच्या स्मृत्यर्थच हे चर्च उभारण्यात आले. दमण नगरपालिकेच्या समोर रस्त्याला लागूनच हे चर्च आहे. या चर्चच्या अल्टरच्याबाजूला विविध पुतळे बघायला मिळतात. मध्यभागी बॉम जीझसचा पुतळा आहे.तेथे 'अवर लेडी ऑफ रोझरी' चा पण पुतळा आहे.

**चर्च ऑफ अॅवर लेडी ऑफ रेमेडीज – (Church of our Lady of Remedies)** दमण कॅम्पच्या जवळ हे चर्च आहे. इ. स. १६०७ मध्ये उभारण्यात आलेले हे चर्च 'अवर लेडी ऑफ रेमेडीज'ला अर्पण करण्यात आले आहे. चर्चच्या आत पाच अल्टरस् आहेत. त्यात लाकडी कोरीव काम आहे. या चर्चला लागूनच असलेल्या बगीच्याला 'हाथी बाग' म्हणतात.

**सत्यनारायण मंदिर – (Satya Narayan Mandir)** मोठी दमणमध्ये जुंपरी भागात सत्यनारायणाचे मंदिर आहे. १९७१ मध्ये या मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला. हे मंदिर पूर्वाभिमुख आहे. प्रथम सभामंडप आहे. नंतर गर्भगृहाकडे जाता येते. गर्भगृहात दगडी सिंहासनावर सत्यनारायणाची मूर्ती आहे. चार हात असलेली ही मूर्ती अतिशय मोहक आहे. गरूडावर अधिष्ठीत विष्णूची मूर्ती पण छान आहे. गरूडाजवळ हनुमानाचीही मूर्ती आहे. कार्तिक महिन्यात येथे मोठा उत्सव असतो.

**नानी दमणमध्ये खालील स्थळे बघण्यासारखी आहेत :–**

**दमणचा किल्ला – (Fort of Daman)** फेरी जेट्टी जवळ असलेला दमणमधील हा पोर्तुगीजांचा किल्ला. दमणगंगेजवळच या किल्ल्याचे प्रवेशद्वार आहे. किल्ल्याच्या दरवाज्याजवळ दोन तलवारधारी पुतळे आहेत. कमानीच्या दरवाजातून आत गेल्यावर प्रशस्त भाग दिसतो. उजव्या बाजूला स्मशान होते.

**चर्च ऑफ 'अवर लेडी ऑफ द सी' (Church of our Lady of the sea)** हे चर्च १९०१ मध्ये उभारण्यात आले आणि १९६६ मध्ये त्याचे नूतनीकरण करण्यात आले. १२ खाबांच्या रचनेवर हे चर्च उभारले आहे. शेजारी एक जलाशय आहे.

**सत्यनारायण मंदिर** – इ. स. १९०० मध्ये उभारण्यात आलेल्या सत्यनारायणमंदिराचा जीर्णोद्धार १९७१ मध्ये करण्यात आला. मोकळ्या भव्य परिसरात मंदिर उभारलेले आहे. या मंदिरास सुंदर सभागृह आहे. मंदिराच्या मध्यभागी वरच्या बाजूस सोनेरी घुमट आहे. आत सत्यनारायणाची मूर्ती आहे. मंडपाच्या भिंतीवर कृष्ण, शीव, सावित्री, अंबामाता यांची चित्रे आहेत.

**भीड भंजनेश्वर महादेव मंदिर – (Bhid Bhanjaneshwar Mahadev Temple)** हे जुने मंदिर पूर्वाभिमुख आहे. चार लाकडी खांबांवर सभामंडप उभारलेला असून तेथील दगडी नदीचे मुख भंजनेश्वराकडे आहे. गर्भगृहात शिवलिंग असून सणावाराला त्यावर पितळी मुखवटा चढवतात. मंदिराच्या दक्षिणेला

राममंदिरपण आहे. यात राम. लक्ष्मण. सीता. राधाकृष्ण यांच्या मूर्ती आहेत. या मंदिरात एक खिळ्यांचे आसन आहे. त्यावर संत खाफीबाबा योगासनावर अधिष्ठीत होत असत.

**विश्वकर्मा देवालय – (Vishwakarma Temple)-** हे मंदिर म्हणजे लोहार, सुतार. पांचाळ यांचे भक्तिस्थान. १९११ मध्ये या मंदिराची उभारणी झाली. प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला दोन दीपस्तंभ आहेत व वरच्याबाजूस दोन संतांच्या मूर्ती आहेत. गर्भगृहात एक संगमरवरी सिंहासन असून त्यावर पंचमुखी षड्हस्त असलेली विश्वकर्माची मूर्ती आहे. बाजूला अंबामातारायादेवी विट्ठल – रखुमाईचे पण दर्शन होते. वैशाखात येथे मोठा समारंभ साजरा होतो. अन्नकुराचाही समारंभ मोठा असतो.

**आदिनाथ भगवान मंदिर – (Adinath Bhagwan Temple)** आदिनाथाचे मंदिर २०० वर्षांपूर्वीचे प्राचीन असावे असे म्हणतात. या मंदिराचा जीर्णोद्धार १९४९ मध्ये करण्यात आला. मुख्य द्वाराच्या वर दोन हत्तींच्यामध्ये लक्ष्मी देवतेची मूर्ती आहे. सभामंडपाचे छतही देखणे आहे. गर्भगृहमात्र लहान आहे. त्यात संगमरवरी चौथऱ्यावर आदिश्वर, महावीर स्वामी,पुरूषनाथ भगवान यांच्या मूर्ती आहेत. भाद्रपदात येथे संवत्सरीचा उत्सवमोठ्या प्रमाणात असतो.

**पारशी मंदिर –** पारशी लोकांचे अतिशय साधे फायर टेंपल येथे आहे. आतआतश–अग्नीकुंड आहे. येथे फक्त पारशी लोकांनाच प्रवेश आहे.

**जामा मशीद –** या मशिदीची उभारणी इ. स. १९०३ मध्ये झाली. ९० वर्षांपूर्वीची ही जुनी मशीद इस्लाम धर्मियांचे पवित्र प्रार्थनास्थान आहे. या मशिदीच्या आजुबाजूला मुस्लिम वस्ती आहे. या मशिदीचे प्रमुख दोन भाग असून पहिला प्रशस्त भाग चार खांबांवर आधारलेला आहे. यास तीन प्रवेशद्वारे आहेत. एकाचवेळी ५०० लोक नमाज पडू शकतात.

**नुरानी मशीद – (Nurani Mosanr)** मुस्लिम मोहोत्सवात असलेली ही मशीद

१८९६ मध्ये उभारण्यात आली. पण नंतर १९६० मध्ये तिचे नूतनीकरण करण्यात आले. २४० चौ. फुटाच्या प्रशस्त भागात ही मशीद आहे. या मशिदीला चार मिनार आहेत. येथे पाच वेळा नमाज पढला जातो.

**जाम्पोर – (Jampor)** अतिशय रमणीय व सुंदर असे हे गाव दमण पासून ५ कि. मी. अंतरावर आहे. या ठिकाणी भेट देण्यासारखे सौंदर्यस्थळ म्हणजे 'जाम्पोर बीच'. येथे देशी–परदेशी पर्यटक भेट देतात. येथे हॉलीडे रिझॉर्ट आहे. दमण–जाम्पोर यांना जोडणारा सुंदर रस्ता आहे. या किनाऱ्यावरील पात्र आणि नारळाच्या झाडांमुळे तेथील शोभा अधिकच वाढलेली आहे. 'कलाई' नदी अरबी समुद्राला जाम्पोर जवळच मिळते. जाम्पोर म्हणजे दमणचे नैऋत्य टोक. 'जाम्पोर बीच' ही गुजरातची सीमा येते.हा किनारा पोहोण्यासाठी वापरतात. बाजूला निवासासाठी उत्तम हॉटेल्स आहेत. टुरिझम कडून येथे 'सनशेडस्' पिकनिक प्लॅटफॉर्मस् पुरवले जातात.

**देवका – (Devica)-** हा दमणचाच एक उपभाग. देवकाच्या समुद्रकिनाऱ्याचे पर्यटकांना जबरदस्त आकर्षण आहे. या किनारपट्टीला व रस्त्याला लागून एक निसर्गसुंदर बगीचा उभारण्यात आला असून बागेत कारंजे पण आहे. बाजूला खळखळणाऱ्या लाटा आणि बागेत थुई–थुई नाचणारे कारंजे पाहून वाटते पाणी तेच पण किती फरक, नाही का ? सणावाराला या पार्कमध्ये रंगी–बेरंगी दिव्यांची आरास केली जाते. या किनारपट्टीच्या वाळूत मुलांसाठी 'हॉर्स रायडिंग' पण उपलब्ध आहे.

उन्हाळ्यात विशेषतः युरोपियन पर्यटक या किनाऱ्यावर स्नानासाठी येतात. पण येथील पाण्याखाली खडकाळ भाग आहे. त्यामुळे किनाऱ्यावर पोहणे थोडे धोक्याचे मानतात. बसनी दमण किंवा टॅक्सी स्टँडवरून टॅक्सीने येथे येता येते.

**पर्यटनाविषयी माहिती हवी असल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.**

असि. डायरेक्टर ऑफ टुरिझम,

निलकंठ बिल्डिंग – पहिला मजला,

नानी दमण, ३९६२१०

टेलिफोन नंबर – (०२८३६) २०१४.

**दमण मधील उत्कृष्ट हॉटेल्सः (निवासस्थान)–**

(हॉटेलच्या दरात फरक होण्याची शक्यता आहे.)

हॉटेल मीरामार, ए. सी, सी फेस कॉटेज. ४ व्यक्ती ८०० रु.

देवका बीच, डिलक्स सूट. २ व्यक्ती ६०० रु.

दमण– ३९८२१० एक्स्ट्रा पर्सन १०० रु.

फोन – २४७/२९७१ सुपर डिलक्स १ व्यक्ती ४०० रु.

२) दरिया दर्शन हॉटेल चिल्ड्रन पार्क एस. बी. रेस्टॉरंट

देवका बीच, ए. सी. डिलक्स सूट ६०० रु.

दमण – ३९६२१० नॉन ए. सी. डबल बेड ३०० रु.

फोन– २२८८/२४७८ नॉन ए. सी. फॅरिज फॉर टू २०० रु.

एक्स्ट्रा ७५ रु.

३) हॉटेल समर हाऊस, डबल बेड ए. सी. ४०० रु.

देवका बीच, नॉन ए. सी. डबल बेड १५० रु.

दमण – ३९६२१० नॉन ए. सी. ४ बेड ३०० रु.

फोन – २४७४

४) हॉटेल अशोक पॅलेस, ए. सी. डबल बेड ४५० रु.

देवका बीच, एक्सट्रा ५०रु.

दमण – ३९६२१० नॉन ए. सी. डबल बेड २५० रु.

फोन – २२३९ (०२६३६) एस. टी. डी.

५) सँडी रिझॉर्ट ए. सी. डिलक्स ४५० रु.

देवका बीच, ए. सी. सिंगल ४०० रु.

दमण – ३९६२१० नॉन ए. सी. डबल ३५० रु.

फोन – २७५१ नॉन ए. सी. सिंगल ३०० रु.

चेक आऊट टाईम दुपारी – १२

६) हॉटिल शिलरन, ए. सी. कॉटिज ४५० रु. (चेक आऊट टाईम सकाळी ११)

देवका बीच, सी फेसींग. रुम २७५ रु.

दमण – ३९६२१० सी फेसींग कॉटिज २७५ रु.

(एस. टी. डी.) फोन – २५५८ कॉटिज २२५ रु. गार्डन रेस्टॉरंट – बार

४० रु. इंडियन, चायनीज फूड.

७) हॉटिल सागर सन कॉटिज, सूट ४ बेड ५०० रु.

देवका बीच, ए. सी. डिलक्स कॉटिज ३५० रु.

मारवाड–दमण – ३९६२१० नॉन ए. सी. डिलक्स कॉटिज २०० रु.

फोन – (एस. टी. डी. ०२६३६) २६८३ नॉन ए. सी. रुम १५० रु.

रुम १०० रु. मॅट्रेस ०५० रु.

८) हॉटिल ड्यूक देवका बीच

दमण – ३९६२१० फोन – (एस टी. डी. २२५७)

९) हॉटेल हॉलीडे ए. सी. डबलबेड २५० रु.

तीनबत्ती – दमण – ३९६२१० नॉन. ए. सी. ट्रिपल बेड २०० रु.

फोन – २०२९

एक्स्ट्रा ०३० रु.

हॉलिडे बार रेस्टॉरंट. व्हेज – नॉनव्हेज

१०) हॉटेल मरीना, रुम – ४ बेड १४० रु.

पोलीस स्टेशन मागे रुम – ३ बेड १०५ रु.

दमण – ३९६२१० रुम – २ बेड ७० रु.

फोन – २४२०

११) हॉटेल सुखसागर ए. सी. डबल बेड २५० रु.

नवी ओरि, नॉन ए. सी. थ्री बेड १७५ रु.

नानी दमण – ३९६२१०

एक्स्ट्रा ०३० रु.

(बार ॲण्ड रेस्टॉरंट)

१२) हॉटेल गुरूकृपा ए. सी. डबल बेड ३५० रु.

सी फेस रोड नॉन ए. सी. डबल बेड २०० रु.

दमण – ३९६२११० (बार + रेस्टॉरंट)

फोन – २८४६ (मुंबईत बुकींग होते) फोन – २०१४३३३

२०१९८२६

१३) सॅटिल सन्मान,

तीनबत्ती, दमण -- ३९६२१०

फोन – २४९८

१४) हॉटेल चायना टाऊन,

मोठी दमण – ३९६२२०

फोन – २७८०

१५) हॉटेल मनिषा, डबल बेड + ए. सी. २५० रु.

पटालिया नॉन ए. सी. १५० रु.

दमण – ३९६२१०

१६) हॉटेल स्वीटमनी,

सी फेस रोड

दमण, फोन – २८६९

१७) हॉटेल गोकुळ, डबल बेड ७५ रु.

पी. डब्ल्यू. डी. समोर

दमण

१८) हॉटेल डायमंड, डबल बेड + ए. सी २५० रु.

टॅक्सी स्टँड जवळ डबल बेड नॉन ए. सी १२५ रु.

दमण

१९) नटराज गेस्ट हाऊस,

सी फेस रोड

दमण, फोन – २५०५

२०) हॉटेल पॅरॉडाईज ए. सी + डबल बेड २०० रु.

टॅक्सी स्टँड नॉन ए. सी डबल बेड १०० रु.

दमण, फोन – २५०५ नॉन ए. सी थ्री बेड १५० रु.

२१) हॉटेल रत्नाकर, डबल बेड ९० रु.

देवका बीच, दमण

फोन – २२३९

२२) राही गेस्ट हाऊस, डबल बेड (ग्राऊंड) १०० रु.

माखाड रोड, देवका बीच. डबल बेड (१ ला मजला) १५० रु.

दमण – ३९६२१० एक्स्ट्रा ०३० रु.

फोन – २२५०

२३) हॉटेल सन ॲण्ड सी

म्युनिसिपल लायब्ररीसमोर

दमण, फोन, – २५०६

२४) हॉटेल ब्रायटन, डबल बेड ५० रु.

सी फेस रोड, दमण, चार बेड १०० रु.

फोन – २९२२ सहा बेड १५० रु.

२५) हॉटेल सॉव्हरीन (ग्राऊंड) सिंगल बेड ६० रु./डबल बेड ७० रु.

सी सरफेस रोड, दमण. ४ बेड १०० रु.

फोन– २८२३ (१ ला मजला) सिंगल बेड ७५ रु./डबल बेड ९० रु.

**नानी दमण मधील :–**

**स्वस्त दराची हॉटेल्स :** (५० रु. ते १०० रु. च्या दरम्यान डबल बेड)

१) मुन्ना गेस्ट हाऊस

२) दीपक–ज्योती (सी फेस)

३) गणेश गेस्ट हाऊस

४) हॉटेल श्री पंजाब

५) डिबळोस गेस्ट हाऊस

६) हॉटेल टुरिस्ट (मेन रोड)

७) हॉटेल मेट्रो (नवी ओरी)

८) गोवा बोर्डिंग हाऊस (जम्पाबार)

९) कॅफे एलीगंट (टॅक्सी स्टँड)

१०) हॉलिडे आयलंड (भीमपोर)

११) पी. डब्ल्यू. डी., सबडिव्हीजन

नानी दमण, फोन – २८८३

**: मोठी दमणमधील स्वस्त दराचे हॉटेल**

१) गव्ह. सर्किट हाऊस

पॅलेस, मोठी दमण

फोन – २२८४

रिझर्व्हेशन – असि. इंजिनियर

पी. डब्ल्यू. डी, सबडिव्हीजन

मोठी दमण, फोन – २९४३

दमण मधील व्ही. आय. पी. (सरकारी अधिकारी)

**सेक्रेटरीएट –**

१) ॲडमिनीस्ट्रेटर (दमण–दीव–नगरहवेली–दादरा)

फोन – (०२६३६ एस. टी. डी.) २७००

२) फायनान्स सेक्रेटरी फोन – (०२६३६) २७७३

३) कलेक्टर फोन – (०२६३६) २६८९

४) डेप्यू. कलेक्टर फोन – २६८९

५) मामलेदार फोन – २००७

६) M. P. फोन – २७८२ (Office) and 2599 (Res.)

**इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट कार्पोरेशन –**

१) मॅनेजींग डायरेक्टर

फोन – 2773 (Office) 2774 (Res)

२) डेप्यू. डायरेक्टर

फोन 2086 (Office) 2774 (Res)

टुरिझम डिपार्टमेंट असि. डायरेक्टर फोन – २०१४

पी. डब्ल्यू. डी.

**एक्झिक्यूटीव्ह इंजिनीयर**

फोन – २९२६

ट्रान्स्पोर्ट असि. डायरेक्टर फोन – २९४०

एक्साईज कमिशनर फोन – २००८

फॉरेस्ट ऑफीसर फोन – २३३७

शिक्षण असि. डायरेक्टर फोन – २०९८

पोलीस स्टेशन फोन – २०३३ (नानी दमण) २०६७ (कंट्रोल रुम)


इंडस्ट्रीज डायरेक्टर फोन – २०१८

एअर स्टेशन फोन २६६५

**दमणमधील सिनेमागृह**

१) दमण टॉकीज (नानी दमण) फोन – २२७२

२) रामा थिएटर (नानी दमण) फोन २२५२



प्रवासी मित्र खंड १ ला प्रकाशन समारंभ श्री. माधवराव गडकरी यांच्या शुभहस्ते दि. १५/१०/८५ ताजमहाल हॉटेल, मुंबई. डावीकडून लेखक श्री. प्रमोद चितारी, प्रकाशन श्री. माधवराव गडकरी (लोकसत्ता संपादक) व प्रकाशक कु. भारती कालेकर.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
मु-प्रवासी
दा. क्र. ८६५
२८३७५
२५।३।९६
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)




प्रवासी मित्र खंड २ रा प्रकाशन समारंभ

श्री. विद्याधर गोखले यांच्या शुभहस्ते दि. २०/४/९१ बिर्ला क्रीडा केंद्र, चौपाटी, मुंबई – ४

डावीकडून– लेखक श्री. प्रमोद चितारी, श्री. वसंतराव चितारी, श्री. मधु मंगेश कर्णिक, श्री. रविंद्र पिंगे, श्री. विद्याधर गोखले व श्री. राजा पाटील.




प्रवासी मित्र खंड ३ रा प्रकाशन समारंभ
श्री. बाळ सामंत यांच्या शुभहस्ते दि. १३/४/१९९३ शाहू सभागृह दादर, मुं. २८
डावीकडून कु. रेवती हिंगे, श्री. प्रमोद चितारी, सिनेस्टार श्री. रमेश देव, श्री. बाळ सामंत व सुभाष भेंडे.



प्रवासी मित्र खंड ४ था, प्रकाशन समारंभ
श्री. राम शेवाळकर यांच्या शुभहस्ते दि. २८-१-९४
प्रा. अ. का. प्रियोळकर नगर-पणजी (गोवा).

डावीकडून श्री. साठेसाहेब, लेखक श्री. प्रमोद चितारी, श्री, राम शेवाळकर (६७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष) तर्कतीर्थ श्री. लक्ष्मण शास्त्री जोशी व प्रा. रामभाऊ देशमुख.

REFBK-0027418